# वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे विकसन व परिणामकारकतेचा अभ्यास


## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


## शिक्षणशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)

## पदवीसाठी

## सादर केलेला संशोधन प्रबंध


संशोधक

एकनाथ दत्तात्रय वाजगे

मार्गदर्शक

डॉ.बापूसाहेब गणपत चौगुले


## डिसेंबर २०१८

# प्रतिज्ञापत्र

मी **एकनाथ दत्तात्रय वाजगे** प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, **वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे विकसन व परिणामकारकतेचा अभ्यास** हा शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये शिक्षणशास्त्र शाखेच्या विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर करीत असून सदर संशोधन कार्य मी स्वत: केले आहे. प्रस्तुत संशोधन हे इतर कोणत्याही पदवीसाठी यापूर्वी सादर केले नाही याची मी खात्री देतो. संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संदर्भ स्त्रोतांचा निर्देश प्रस्तुत संशोधनामध्ये केला आहे.

स्थळ : संशोधक

दिनांक : एकनाथ दत्तात्रय वाजगे

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **एकनाथ दत्तात्रय वाजगे** यांनी शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी **वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे विकसन व परिणामकारकतेचा अभ्यास** या विषयावरील संशोधन कार्य माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

सदर संशोधनातील काम त्यांचे स्वत:चे असून संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संदर्भ स्त्रोतांचा योग्य रितीने प्रबंधात निर्देश करण्यात आला आहे.

स्थळ : मार्गदर्शक

दिनांक : डॉ.बापूसाहेब गणपत चौगुले

# ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनासाठी अनेक व्यक्तींचे सहकार्य लाभले. त्यांची कृतज्ञता व्यक्त करणे हे संशोधकाचे कर्तव्य आहे. सदर संशोधन कार्य ज्यांच्या अनमोल मार्गदर्शनामुळे पूर्णत्वाप्रत येऊ शकले व ज्यांच्यामुळे व्यक्तिमत्त्वास चालना मिळाली, संशाोधनकार्यासाठी सतत प्रेरणा व प्रोत्साहन देणारे व मनोबल उंचावणारे मार्गदर्शक व पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आदरणीय प्राचार्य डॉ.बापूसाहेब चौगुले यांचे सर्वप्रथम कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. संशोधनामध्ये अनेक समस्यांना सामोरे जात असताना मार्गदर्शकांनी दिलेली प्रेरणाच निर्णायक ठरली.

प्रस्तुत संशोधनासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने संधी उपलब्ध करून दिली आणि वेळेत संशोधन कार्य पार पाडण्यास मदत केली. त्याबद्दल शिक्षणशास्त्र विभाग आणि पीएच.डी. विभाग यांचेही मनापासून धन्यवाद.

संशोधनातील सर्व्हेक्षणासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांनी वर्ग उपलब्ध करून दिले. त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे. त्याचबरोबर संदर्भ साहित्याच्या अभ्यासासाठी विविध महाविद्यालयातील ग्रंथपालांनी ग्रंथालयातील पुस्तके उपलब्ध करून दिली. त्या सर्वांचे मन:पूर्वक धन्यवाद.

जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, ॲड. संजय शिवाजीराव काळे, सर्व संचालक मंडळ यांचाही मी ऋणी आहे. श्री शिव छत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत मंडलिक यांनी संशोधन कार्यक्रमाच्या कार्यवाहीसाठी मदत केली. त्यांचेही आभार. संशोधनातील संख्याशास्त्रीय विश्लेषणासाठी सहकार्य करणारे प्राचार्य डॉ.कैलास दौंडकर, टंकलेखनाचे काम अत्यंत कमी वेळेत आणि सुबकपणे करणारे मित्र सतीश फुलसुंदर, सर्व्हेक्षणासाठी सहकार्य करणारे प्रा.शरद मनसुख, प्रा.समाधान केदारे, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

ज्यांच्या आशिर्वादामुळे संशोधन कार्य करण्यास बळ मिळाले असे माझे वडील श्री.दत्तात्रय कारभारी वाजगे, आई सौ.चंद्रभागा दत्तात्रय वाजगे, संशोधनासाठी वेळोवेळी प्रेरणा देणारे आणि मार्गदर्शन करणारे बंधू प्रा.नवनाथ वाजगे तसेच कौटुंबिक जबाबदारी सांभाळत संशोधन कार्यास वेळ उपलब्ध करून देणारी पत्नी सौ.प्रमिला वाजगे तसेच सर्व कुटुंबिय यांच्या सहकार्यामुळेच प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करू शकलो. या सर्वांचा मी ऋणी आहे.

या अभ्यासात अनेकांचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहकार्य लाभले त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

संशोधक

एकनाथ दत्तात्रय वाजगे

# सारांश

## प्रस्तावना

'मानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे माणूस म्हणून जन्मल्यामुळे सर्व मानवांना मिळाले पाहिजेत. हे हक्क उपभोगल्याशिवाय मानवाला माणूस म्हणून खऱ्या अर्थाने जगणे शक्य नाही.'

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये मानवी हक्कापासून वंचित राहणारा व हक्कांच्या पायमल्लीचा सतत सामना करणारा, तसेच अन्याय, भेदभाव, सामाजिक चालीरिती, रूढी–परंपरांना बळी पडणाऱ्या महिलांचा वर्ग दिसून येतो. सांस्कृतिक, पारंपारिक विविधतेमुळे कुटुंबव्यवस्थेत दुय्यम स्थान स्विकाराव्या लागणाऱ्या महिलांच्या हक्कांचे मोठ्या प्रमाणात हनन होताना दिसून येते. प्रबोधन युगानंतरही एकविसाव्या शतकात महिलांना फार मोठ्या अन्यायाला सामोरे जावे लागत आहे. कौटुंबिक दुय्यम स्थान, स्त्री भ्रूण हत्या, हुंडा पद्धती, कौटुंबिक हिंसाचार, बालविवाह, बलात्कार, लैंगिक छळ, आरोग्याबाबतची अवहेलना, नोकरीच्या/कामाच्या ठिकाणचा मानसिक–शारीरिक छळ या अनेक बाबींना महिलांना आजही सामोरे जावे लागत आहे. महिलांना समाजामध्ये मानाने जगता यावे, स्वतःचे अस्तित्व निर्माण करणे, रोजगार मिळवणे, शारीरिक व मानसिक त्रासापासून मुक्तता करून घेऊन आनंददायी जीवन जगण्याचा नैसर्गिक हक्क आहे. मात्र त्यांच्या या हक्कांवर मोठ्या प्रमाणात घाला घालण्याचे काम समाजामधूनच होताना दिसून येते. महिला सक्षमीकरणाशिवाय विकसनशील भारत विकसित होणार नाही हे सत्य एकविसाव्या शतकात स्विकारावेच लागणार आहे. महिलांची समस्या परंपरेने जुनी, व्यापक आणि सामाजिक, धार्मिक जीवनाशी निगडीत असल्यामुळे त्यावर दीर्घकालीन उपाय शोधणे गरजेचे आहे.

महिलांबाबतचा कौटुंबिक हिंसाचार, हुंडा, बलात्कार, कामाच्या ठिकाणी होणारा महिलांचा मानसिक छळ यासारख्या अनेक समस्यांमुळे महिलांच्या हक्कांवर नेहमीच गदा येते. महिला आयोगाकडे येणाऱ्या तक्रारींमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसून येत आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे महिलांच्या मानवी हक्काविषयी समाजामध्ये व विशेषतः महिलांमध्येच जागृती असल्याचे दिसून येत नाही. मानवी हक्काविषयी, स्त्रियांच्या हक्कांविषयी शिक्षणातून जनजागृती होणे गरजेचे आहे. महाविद्यालयीन स्तरावर विविध उपक्रमांच्या माध्यमातून

विद्यार्थिनींमध्ये मानवी हक्काची विशेषत: महिलांच्या मानवी हक्काची जाणीव निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून संशोधकाने प्रस्तुत विषयावर संशोधन केले आहे.

**संशोधनाची गरज**

१. समाजामध्ये पिढ्यान्‌पिढ्या कुटुंबात दुय्यम दर्जा दिल्याने कौटुंबिक अत्याचारापासून मुक्ततेसाठी, स्त्रियांना त्यांच्या हक्कांची माहिती होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

२. समाजामध्ये घडणाऱ्या बलात्कार, लैंगिक छळ, शारीरिक व मानसिक अत्याचारापासून संरक्षण मिळविण्यासाठी त्या विषयीच्या तरतुदींची माहिती संक्रमित होऊन स्त्रियांच्या सबलीकरणास मदत मिळण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

३. सामाजिक रूढींमुळे उद्‌भवणाऱ्या स्त्री–पुरूष भेदाभेद, हुंडा प्रथा, बालविवाह या समस्यांना सामोरे जाण्याची वृत्ती विद्यार्थिनींमध्ये निर्माण होण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

४. स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांसाठी, समानतेसाठी आणि त्यांच्या सबलीकरणासाठी महाविद्यालयीन स्तरावर त्यांना योग्य ज्ञान व माहिती मिळून सक्षम समाज निर्मितीमध्ये त्यांचे योगदान मिळण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

**संशोधनाचे शीर्षक**

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे विकसन व परिणामकारकतेचा अभ्यास.

**संशोधन समस्या विधान**

पुणे जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करून त्याची परिणामकारकता तपासणे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्काविषयी असलेल्या माहितीची सद्यस्थिती तपासणे.

२. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करणे.

३. वरिष्ठ महाविद्यालातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

**कार्यात्मक व्याख्या**

**पुणे जिल्हा**

**संकल्पनात्मक व्याख्या**

महाराष्ट्र राज्यातील एक प्रशासकीय घटक, प्रशासकीय सोयीसाठी महाराष्ट्राची अनेक जिल्ह्यांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. त्यातील एक जिल्हा म्हणजे पुणे जिल्हा होय.

**कार्यात्मक व्याख्या**

महाराष्ट्र राज्यातील एक प्रशासकीय विभाग.

**वरिष्ठ महाविद्यालय**

**संकल्पनात्मक व्याख्या**

उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर उच्च शिक्षणाची व पदवी मिळविण्याची सुविधा ज्या शैक्षणिक संस्थेत होते तिला महाविद्यालय म्हणतात. महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय, शेतकी, व्यवस्थापन इत्यादी विद्याशाखांमधील विषयांचे अध्ययन, अध्यापन करण्याची सोय असते. व्यापक अर्थाने उच्च माध्यमिक शिक्षणानंतरचे शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थेला महाविद्यालय म्हटले जाते. महाविद्यालये ही विद्यापीठाशी संलग्नीत असतात. (जोशी, २००७)

**कार्यात्मक व्याख्या**

ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये पदवीचे शिक्षण दिले जाते अशी शैक्षणिक संस्था म्हणजे वरिष्ठ महाविद्यालय होय.

**कला शाखा**

**संकल्पनात्मक व्याख्या**

महाविद्यालयीन शिक्षणामध्ये कला, शास्त्र, वाणिज्य, तंत्र इत्यादी अनेक शाखा उपलब्ध आहेत. कला विद्याशाखेत भाषा, संस्कृत, प्राकृत इत्यादी विषयांसह मानव्य शाखेतील राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल, गणित, मानसशास्त्र इ. विषय येतात. गणित भूगोल यासारखे काही विषय शास्त्र व कला या दोन्ही विद्याशाखेत शिकविले जातात. (जोशी, २००७)

**कार्यात्मक व्याख्या**

वरिष्ठ महाविद्यालयामध्ये वेगवेगळ्या विद्याशाखा असतात. पुणे विद्यापीठाशी संलग्नीत वरिष्ठ महाविद्यालयातील एक शाखा म्हणजे कला शाखा होय.

**महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम**

**कार्यात्मक व्याख्या**

महिलांच्या मानवी हक्कातील वैवाहिक हक्क, वारसा हक्क, नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क, हिंसेपासून संरक्षणाचा हक्क, संविधानिक हक्क या पाच हक्कांच्या माहिती संपादनात वाढ होण्यासाठी तयार केलेला कालबद्ध कार्यक्रम.

**परिणामकारकता**

**कार्यात्मक व्याख्या**

महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे कला शाखेतील विद्यार्थिनींच्या मानवी हक्काविषयी माहिती संपादनात झालेली वाढ.

**संशोधनाचे महत्त्व**

१. महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या मानवी हक्क विषयक माहिती संपादनात वाढ होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

२. महिलांवर दिवसेंदिवस अत्याचारात होणाऱ्या वाढीमुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या अत्याचाराविरोधी असणाऱ्या विविध कायद्यांची माहिती होऊन त्यांच्या आत्मविश्वासात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

३. महाविद्यालयीन जीवनानंतर गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थिनींना महिलांच्या हक्कांविषयी माहिती होणार आहे. कुटुंबव्यवस्थेच्या या महत्त्वाच्या घटकास महिला मानवी हक्कांची जाणीव झाल्यास स्त्रियांच्या कौटुंबिक दर्जात सुधारणा होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

४. आजची महाविद्यालयीन विद्यार्थिनी उद्याची गृहिणी, आई तसेच विविध नातेसंबंधातून कुटुंबातील महत्त्वाची भूमिका पार पाडणार आहे. प्रस्तुत संशोधनातून तिने अवगत केलेल्या ज्ञानाचा फायदा कुटुंबातील व्यक्तींबरोबरच भावी पिढीमध्ये संक्रमित होऊन संस्कारक्षम

आणि महिलांच्या सन्मानाची आणि तिच्या हक्काची जपवणूक होण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

५. महाविद्यालयीन शिक्षणानंतर विद्यार्थिनी नोकरी, व्यवसाय, स्वयंरोजगारानिमित्त विविध स्तरावर कार्यरत होणार आहेत. मानवी हक्काविषयी, स्त्रियांच्या हक्काविषयी त्यांनी संपादन केलेले ज्ञान त्यांना त्या त्या क्षेत्रात स्त्रियांच्या सन्मानासाठी, त्यांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण आहे.

**संशोधनाची गृहीतके**

१. शालेय अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र या विषयात मानवी हक्काबद्दल माहिती दिलेली आहे. (इयत्ता आठवी, नागरिकशास्त्र पाठ्यपुस्तक)

२. समाजामध्ये महिलांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होताना आढळते. (माहेश्वरी, २०११)

३. महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थिनींना मानवी हक्कांचे शिक्षण देणे गरजेचे आहे. (राधामणी, २०१५)

**संशोधनाचे प्रश्न**

महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थिनींना महिलांच्या मानवी हक्काविषयी माहितीची काय स्थिती आहे?

**परिकल्पना**

**अ) संशोधन परिकल्पना**

१. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या वैवाहिक हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

२. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या वारसा हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

३. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

४. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या हिंसेपासून संरक्षणाचा हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

५. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या संविधानिक हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

६. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

**ब) शून्य परिकल्पना**

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील वैवाहिक हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

२. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील वारसा हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

३. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

४. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

५. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील संविधानिक हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

६. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

**प्रस्तुत संशोधनातील चले**

स्वाश्रयी चल : महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम

आश्रयी चल : विद्यार्थिनींची संपादणूक

नियंत्रित चल : विद्यार्थिनींचा वयोगट, वेळ, माध्यम

अनियंत्रित चल : विद्यार्थिनींची सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक परिस्थिती

**संशोधनाची व्याप्ती, मर्यादा, परिमर्यादा**

**व्याप्ती**

१. प्रस्तुत संशोधन हे पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील कला शाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींशी संबंधित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे मानवी हक्कांशी संबंधित आहे.

**मर्यादा**

१. प्रस्तुत संशोधनातून आलेले निष्कर्ष हे पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींकडून आलेल्या प्रतिसादावर आधारित आहे.

२. प्रस्तुत संशोधनामध्ये विद्यार्थिनींच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक परिस्थितीवर संशोधकाचे नियंत्रण नाही.

**परिमर्यादा**

१. प्रस्तुत संशोधन हे पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित १२ वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी माध्यमांच्या कला शाखेतील टी.वाय.बी.ए. वर्गातील विद्यार्थिनींपुरते परिमर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे उत्तर पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ आणि शिरूर या तालुक्यांपुरते परिमर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे महिलांच्या मानवी हक्कातील वैवाहिक हक्क, वारसा हक्क, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क, हिंसेपासून संरक्षणाचा हक्क, संविधानिक हक्क या हक्कांपुरते परिमर्यादित आहे.

**संबंधित साहित्याचा आढावा**

संशोधकाने घेतलेल्या संबंधित साहित्याचा आढावा पुढील सारणीमध्ये दिलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुढीलप्रमाणे संबंधित साहित्याचा आढावा घेतला आहे.

| अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | पुस्तके : इंग्रजी | १८ |
| २ | पुस्तके : हिंदी | ९ |
| ३ | पुस्तके : मराठी | १६ |
| ४ | मासिके | २३ |
| ५ | वर्तमानपत्रे | १० |
| ६ | संकेतस्थळे | ९ |
| ७ | पूर्व संशोधन : पी.एच.डी. | १२ |
| | **एकूण** | **९७** |

### प्रस्तुत संशोधनाची संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने संशोधनासाठी बहु संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. सर्वेक्षण पद्धती, साधननिर्मिती पद्धती आणि प्रायोगिक पद्धती या तीन पद्धतींचा अवलंब केला आहे.

**संशोधनातील मुख्य उद्दिष्टानुसार संशोधन पद्धती**

| उद्दिष्टे क्र. | संशोधन पद्धती | नमुना निवड पद्धती | माहिती संकलन साधने | माहिती विश्लेषण साधने | माहिती सादरीकरण साधने |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वेक्षण पद्धती | यादृच्छिक पद्धती | प्रश्नावली | शेकडेवारी | आलेख |
| २ | साधन निर्मिती पद्धती | सहेतुक पद्धती | तज्ज्ञ प्रतिसाद शोधिका पदनिश्चयन श्रेणी | शेकडेवारी | आलेख |
| ३ | प्रायोगिक पद्धती | सहेतुक पद्धती | प्रश्नावली | मध्यमान, प्रमाण विचलन, टी परिक्षिका | आलेख |

## महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे स्वरूप

| अ.क्र. | महिला मानवी हक्कातील घटक | उपघटक | कार्यक्रमाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | वैवाहिक हक्क | वैवाहिक हक्काबाबत कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | हुंडाप्रथा व तिचे घातक परिणाम | व्याख्यान | २ तास |
| | | हुंडाप्रथा, प्रतिबंधात्मक उपाय | व्याख्यान | २ तास |
| | | हुंडाप्रथा व महिलांचे हक्क | बुद्धिमंथन | २ तास ३० मि. |
| | | कुटुंबातील हक्क | बुद्धिमंथन | २ तास |
| २ | वारसा हक्क | पित्याच्या संपत्तीतील हक्क | वादविवाद | २ तास |
| | | स्त्रीधन व भारतीय विवाह व्यवस्था | वादविवाद | २ तास |
| | | पतीची संपत्ती आणि महिला हक्क | निबंध लेखन | २ तास |
| | | वारसा हक्क विषयक कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | पित्याच्या संपत्तीतील हक्काबाबत योजना | प्रश्नमंजुषा | २ तास |
| ३ | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | महिला आरक्षण आणि नोकरीच्या संधी | निबंध लेखन | २ तास |
| | | नोकरी व्यवसायातील महिलांचे स्थान | वादविवाद | २ तास ३० मि. |
| | | समान काम समान वेतन | व्याख्यान | २ तास |
| | | नोकरी करणाऱ्या महिलांसाठी कायद्याचे संरक्षण | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | प्रश्नमंजुषा | २ तास |
| ४ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | कुटुंब आणि परिसरामध्ये होणारी महिलांबाबत हिंसा | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | २ तास |
| | | छेडछाड | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | २ तास |
| | | छेडछाड, उपाययोजनात्मक बाबी | प्रसंग विश्लेषण | २ तास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | स्त्री भ्रूणहत्या | प्रसंग विश्लेषण | २ तास ३० मि. |
| | | हिंसाचारापासून संरक्षणासाठी कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| ५ | संविधानिक हक्क | संविधान आणि महिला सक्षमीकरण | व्याख्यान | २ तास |
| | | राज्यघटनेतील मुलभूत हक्क | गटचर्चा | २ तास ३० मि. |
| | | राज्यघटनेतील मुलभूत हक्कांचे रक्षण | गटचर्चा | २ तास |
| | | संविधानातील महिलांसाठीच्या तरतुदी | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | संविधानिक हक्कासाठी योजना | बुद्धीमंथन | २ तास |

**संशोधन अभिकल्प**

प्रस्तुत संशोधनासाठी एकलगट अभिकल्पाचा वापर संशोधकाने केला आहे.

एकलगट पूर्व चाचणी – उत्तर चाचणी अभिकल्प

**प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या**

प्रस्तुत संशोधनामध्ये पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींचा समावेश करण्यात आला आहे.

**न्यादर्श आणि न्यादर्श निवड पद्धती**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने सर्वेक्षणासाठी पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या ७५६ विद्यार्थिनींची निवड यादृच्छिक पद्धतीने केली. तसेच प्रायोगिक गटासाठी श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर येथील कला शाखेतील ६२ विद्यार्थिनींची निवड सहेतुक पद्धतीने केली आहे.

**माहिती संकलनाची साधने**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने उद्दिष्ट क्र.१ साठी महिला मानवी हक्क विषयक सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी संशोधक निर्मित प्रश्नावलीचा उपयोग केला.

उद्दिष्ट क्र.३ साठी प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तर चाचणीसाठी संशोधक निर्मित प्रश्नावलीचा वापर केला आहे.

**माहिती विश्लेषणाची साधने**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने उद्दिष्टांनुसार माहितीचे संकलन केले. त्यानुसार माहिती विश्लेषणाची साधने वापरली आहेत.

| **उद्दिष्ट क्रमांक** | **संशोधन पद्धती** | **माहिती विश्लेषणाची साधने** |
|---|---|---|
| १.वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्काविषयी असलेल्या माहितीची सद्यस्थिती तपासणे. | सर्वेक्षण पद्धती | शेकडेवारी |
| २.वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करणे. | साधन निर्मिती पद्धती | शेकडेवारी |
| ३.वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे | प्रायोगिक पद्धती | मध्यमान, प्रमाण विचलन टी– परिक्षिका |

**संशोधनाचे निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनात उद्दिष्टांना अनुसरून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**उद्दिष्ट क्र १** : वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्काविषयी असलेल्या माहितीची सद्यस्थिती तपासणे.

प्रस्तुत उद्दिष्टाच्या साध्यतेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित पुणे जिल्ह्यातील एकूण बारा महाविद्यालयाचे सर्व्हेक्षण केले त्यातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिंनींची महिला मानवी हक्कातील संपादनाची सरासरी निम्म्यापेक्षाही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनीना महिला मानवी हक्क विषयी माहिती कमी आहे.

२. पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींची वैवाहिक हक्क घटकातील संपादनाची सरासरी निम्मापेक्षाही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना वैवाहिक हक्कांविषयी माहिती कमी आहे.

३. पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनीची वारसा हक्क घटकातील संपादनाची सरासरी निम्मापेक्षाही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना वारसा हक्काविषयी माहिती कमी आहे.

४. पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींची नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क घटकातील संपादनाची सरासरी निम्मापेक्षाही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना नोकरी करणाऱ्या महिलांच्या हक्कांविषयी माहिती कमी आहे.

५. पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींची हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकातील संपादनाची सरासरी निम्मापेक्षही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना हिंसेपासून संरक्षणाचा हक्कांविषयी माहिती कमी आहे.

६. पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींची संविधानिक हक्क घटकातील संपादनाची सरासरी निम्मापेक्षही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना संविधानिक हक्कांविषयी माहिती कमी आहे.

**उद्दिष्ट क्र.३** : वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

१. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील वैवाहिक हक्क घटकातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १८.३९ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

२. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील वारसा हक्क घटकातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १६.६५ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक

असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

३. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींच्या महिला मानवी हक्कातील नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क घटकातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १६.९४ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

४. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींच्या महिला मानवी हक्कातील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकांतील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १९.८३ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

५. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींच्या महिला मानवी हक्कातील सांविधानिक हक्क घटकांतील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १७.८१ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

६. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींच्या महिला मानवी हक्कातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य २६.८७ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

## ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनांच्या परिक्षणावरून निष्कर्ष

| अ.क्र. | महिला मानवी हक्कातील घटक | परिकल्पना क्रमांक | टी मूल्य | त्याग / स्विकार | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैवाहिक हक्क | १ | १८.३९ | त्याग | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींच्या महिला मानवी हक्कातील वैवाहिक हक्क घटकातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १८.३९ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला. |
| २ | वारसा हक्क | २ | १६.६५ | त्याग | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींच्या महिला मानवी हक्कातील वारसा हक्क घटकातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १६.६५ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला. |
| ३ | नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क | ३ | १६.९४ | त्याग | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींच्या महिला मानवी हक्कातील नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क घटकातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १६.९४ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | ४ | १९.८३ | त्याग | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींच्या महिला मानवी हक्कातील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकांतील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १९.८३ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला. |
| ५ | संविधानिक हक्क | ५ | १७.८१ | त्याग | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींच्या महिला मानवी हक्कातील सांविधानिक हक्क घटकांतील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १७.८१ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला. |
| ६ | महिला मानवी हक्कातील एकत्रित पाच घटक | ६ | २६.८७ | त्याग | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींच्या महिला मानवी हक्कातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य २६.८७ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला. |

**संशोधनाचे योगदान**

१. महाविद्यालयातील विद्यार्थिनींना त्यांच्या हक्कांविषयी माहिती मिळून स्त्री प्रश्नांच्या जाणिवांचे व त्यावरील उपायांचे ज्ञान त्यांना प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून मिळण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाचे योगदान आहे.

२. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे महाविद्यालयीन विद्यार्थिनींना महिलांच्या प्रश्नांची जाणीव झाल्याने आणि त्यावरील उपायांची माहिती मिळाल्याने स्त्रियांचे समाजातील स्थान उंचावण्याच्या दृष्टीने सदर संशोधनाचे योगदान आहे.

३. समाजामध्ये स्त्री पुरूष समानतेचे मूल्य रूजण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाचे योगदान आहे.

४. समाजातील अनिष्ट चालीरीती, रूढी, परंपरांमुळे महिलाच्या हक्कावर येणारे संकट दूर होऊन महिलांच्या हक्कांचा प्रचार आणि प्रसार होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाचे योगदान आहे.

५. महाविद्यालयीन विद्यार्थिनींमध्ये कौटुंबिक हिंसाचाराविरोधी उपायांची जागृती घडून येण्यास मदत होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाचे योगदान आहे.

**शिफारशी**

१. महाविद्यालयीन स्तरावर विविध अभ्यासपूरक उपक्रमांच्या माध्यमातून महिला मानवी हक्कांचा प्रसार करावा.

२. महाविद्यालयामध्ये महिला मानवी हक्काविषयी चर्चासत्र व परिसंवादाचे आयोजन करावे.

३. वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांसाठी मानवी हक्काविषयी उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करावे.

४. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी अल्पमुदतीचे महिला मानवी हक्क विषयीचे कोर्स आयोजित करावेत.

**पुढील संशोधनासाठी विषय**

१. माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमांमध्ये प्रतिबिंबित झालेल्या मानवी हक्कांचा चिकित्सक अभ्यास.

२. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखा आणि विज्ञान शाखा यामधील विद्यार्थ्यांच्या मानवी हक्कांविषयी माहितीचा तुलनात्मक अभ्यास.

३. विविध व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या कायदेविषयक हक्कांच्या जाणीव जागृतीचा तुलनात्मक अभ्यास.

४. ग्रामीण व शहरी भागातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थिनींमध्ये मानवी हक्कांचा विकास करण्यासाठी कार्यक्रमाची निर्मिती आणि परिणामकारकतेचा अभ्यास.

५. महिला अभ्यास केंद्रामार्फत चालविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा चिकित्सक अभ्यास.

६. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी–शिक्षकांसाठी मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे विकसन आणि परिणामकारकतेचा अभ्यास.

७. पारंपारिक अभ्यासक्रम आणि व्यावसायिक अभ्यासक्रम यातील विद्यार्थिनींमध्ये मानवी हक्काविषयी माहितीचा तुलनात्मक अभ्यास.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ | I |
| | प्रतिज्ञापत्र | II |
| | मार्गदर्शकांचे प्रमाणपत्र | III |
| | ऋणनिर्देश | IV |
| | सारांश | V |
| **प्रकरण पहिले : संशोधन विषयाची ओळख** | | **१–२८** |
| १.१ | प्रस्तावना | ३ |
| १.२ | मानवी हक्क | ४ |
| १.२.१ | मानवी हक्कांचे वर्गीकरण | ४ |
| १.२.२ | मानवी हक्क संकल्पनेची पार्श्वभूमी | ६ |
| १.२.३ | मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा | ८ |
| १.२.४ | नागरी व राजकीय हक्कांची आंतरराष्ट्रीय सनद | ९ |
| १.२.५ | महिला आणि मानवी हक्क | ९ |
| १.२.६ | महिला प्रश्नांचे स्वरूप व सद्यस्थिती | ११ |
| १.२.७ | महिला मानवी हक्कांचे स्वरूप | १६ |
| १.३ | संशोधनाची गरज | २२ |
| १.४ | संशोधनाचे महत्त्व | २३ |
| १.५ | संशोधनाचे शीर्षक | २४ |
| १.६ | संशोधन समस्या विधान | २४ |
| १.७ | कार्यात्मक व्याख्या | २४ |
| १.८ | संशोधनाची उद्दिष्टे | २५ |
| १.९ | संशोधनाची गृहीतके | २६ |
| १.१० | संशोधनाचे प्रश्न | २६ |
| १.११ | परिकल्पना | २६ |
| १.१२ | संशोधनाची व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा | २७ |
| **प्रकरण दुसरे : संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा** | | **२९–७२** |
| २.१ | प्रस्तावना | ३१ |
| २.२ | संबंधित साहित्य व पूर्व संशोधन आढाव्याचे महत्त्व | ३१ |
| २.३ | संबंधित साहित्य व पूर्व संशोधनाच्या अभ्यासाची उद्दिष्टे | ३२ |
| २.४ | संबंधित साहित्याचे प्रकार | ३२ |
| २.५ | प्रस्तुत संशोधनासाठी संदर्भस्थळे | ३३ |

| | | |
|---|---|---|
| २.६ | संदर्भ साहित्याचा आढावा | ३३ |
| २.६.१ | पुस्तके | ३४ |
| २.६.२ | मासिके | ४४ |
| २.६.३ | वर्तमानपत्रे | ५० |
| २.६.४ | संकेतस्थळे | ५३ |
| २.७ | पूर्व संशोधनाचा आढावा | ५४ |
| २.७.१ | पी.एच.डी. संशोधने | ५४ |
| २.८ | प्रस्तुत संशोधन आणि पूर्व संशोधन यातील साम्य | ६८ |
| २.९ | प्रस्तुत संशोधन आणि पूर्व संशोधन यातील भेद | ६८ |
| २.१० | संबंधित संशोधन अभ्यासाच्या आढाव्याचा बोध | ६९ |
| २.११ | संबंधित साहित्याच्या आढाव्याचा संशोधकास झालेला उपयोग | ७० |
| २.१२ | प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण | ७१ |
| **प्रकरण तिसरे : संशोधनाची कार्यपद्धती** | | **७३–१०८** |
| ३.१ | प्रस्तावना | ७५ |
| ३.२ | संशोधनाचा अर्थ | ७५ |
| ३.२.१ | संशोधनाचे प्रकार | ७५ |
| ३.२.२ | प्रस्तुत संशोधनाचा प्रकार | ७५ |
| ३.३ | संशोधन पद्धती | ७६ |
| ३.४ | उद्दिष्ट क्र.१ ची कार्यपद्धती | ७७ |
| ३.४.१ | सर्वेक्षण पद्धती | ७८ |
| ३.४.२ | जनसंख्या | ७८ |
| ३.४.३ | नमुना निवड | ७८ |
| ३.४.४ | माहिती संकलनाची साधने | ८० |
| ३.५ | उद्दिष्ट क्र.२ ची कार्यवाही | ८३ |
| ३.५.१ | साधन निर्मिती पद्धती | ८३ |
| ३.५.२ | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचा मानसशास्त्रीय सिद्धांत | ८४ |
| ३.५.३ | साधन निर्मितीचे टप्पे | ८५ |
| ३.६ | उद्दिष्ट क्र.३ ची कार्यवाही | ९६ |
| ३.६.१ | प्रायोगिक संशोधन पद्धती | ९६ |
| ३.६.२ | चले | ९७ |
| ३.६.३ | प्रयोगाच्या कार्यवाहीचा ओघ तक्ता | ९७ |
| ३.६.४ | प्रायोगिक अभिकल्प | ९८ |
| ३.६.५ | प्रयोगासाठी साधन निर्मिती | १०२ |

| | | |
|---|---|---|
| ३.६.६ | जनसंख्या आणि नमुना निवड | १०२ |
| ३.६.७ | प्रश्नावलीचे प्रमाणीकरण | १०५ |
| ३.७ | पूर्वचाचणीचे आयोजन | १०७ |
| ३.८ | प्रत्यक्ष प्रयोग / कार्यक्रमाची अंमलबजावणी | १०७ |
| ३.९ | उत्तर चाचणीचे आयोजन | १०७ |
| ३.१० | माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १०७ |
| **प्रकरण चौथे : माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन** | | **१०९–१४६** |
| ४.१ | प्रस्तावना | १११ |
| ४.२ | माहितीचे विश्लेषण | १११ |
| ४.३ | उद्दिष्ट क्र.१ साठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | ११२ |
| ४.४ | उद्दिष्ट क्र.२ साठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १२५ |
| ४.५ | उद्दिष्ट क्र.३ साठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १२८ |
| ४.६ | वैवाहिक हक्क घटकांसाठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १२८ |
| ४.७ | वारसा हक्क घटकासाठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १३१ |
| ४.८ | नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क घटकासाठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १३५ |
| ४.९ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकासाठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १३७ |
| ४.१० | संविधानिक हक्क घटकासाठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १४० |
| ४.११ | महिला मानवी हक्कातील एकत्रित पाच घटकांचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १४३ |
| **प्रकरण पाचवे : संशोधनाचे सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी** | | **१४७–१७०** |
| ५.१ | प्रस्तावना | १४९ |
| ५.२ | संशोधनाची गरज | १५१ |
| ५.३ | संशोधनाचे शीर्षक | १५२ |
| ५.४ | संशोधन समस्या विधान | १५२ |
| ५.५ | संशोधनाची उद्दिष्टे | १५२ |
| ५.६ | कार्यात्मक व्याख्या | १५२ |
| ५.७ | संशोधनाचे महत्त्व | १५४ |
| ५.८ | संशोधनाची गृहीतके | १५५ |
| ५.९ | संशोधन प्रश्न | १५५ |
| ५.१० | परिकल्पना | १५५ |

| | | |
|---|---|---|
| ५.११ | प्रस्तुत संशोधनातील चले | १५६ |
| ५.१२ | संशोधनाची व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा | १५७ |
| ५.१३ | संबंधित साहित्य आणि संशोधनाचा आढावा | १५७ |
| ५.१४ | प्रस्तुत संशोधनाची संशोधन पद्धती | १५८ |
| ५.१५ | संशोधन अभिकल्प | १६१ |
| ५.१६ | जनसंख्या | १६१ |
| ५.१७ | न्यादर्श आणि न्यादर्श निवड पद्धती | १६१ |
| ५.१८ | माहिती संकलनाची साधने | १६१ |
| ५.१९ | माहिती विश्लेषणाची साधने | १६१ |
| ५.२० | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची निर्मिती | १६२ |
| ५.२१ | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी | १६२ |
| ५.२२ | निष्कर्ष | १६२ |
| ५.२३ | पूर्व संशोधन व प्रस्तुत संशोधन यातील निष्कर्षांवर चर्चा | १६७ |
| ५.२४ | संशोधनाचे योगदान | १६९ |
| ५.२५ | शिफारशी | १६९ |
| ५.२६ | पुढील संशोधनासाठी दिशा | १७० |
| | संदर्भ ग्रंथ | **१७१–१७६** |

# परिशिष्ट यादी



| परिशिष्टक्र. | परिशिष्ट तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| क | महाविद्यालयांची यादी | १७९ |
| ख | विद्यार्थिनींची यादी | १८० |
| ग | महिला मानवी हक्क शिक्षण प्रश्नावली | १८१ |
| घ | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम | १९२ |
| च | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक | २०२ |
| छ | महिला मानवी हक्क शिक्षण माहिती पुस्तिका | २०४ |
| ज | पूर्व आणि उत्तर चाचणीतील प्राप्तांक | २१४ |
| झ | तज्ञांची नावे | २१८ |
| ट | प्रमाणपत्रे | २१९ |
| ठ | विद्यार्थिनी प्रतिक्रीया | २३३ |
| ड | छायाचित्रे | २३६ |

# कोष्टक यादी


| कोष्टक क्र. | कोष्टकांचा तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २.१ | संदर्भ साहित्याच्या आढाव्याचा तपशील | ३३ |
| ३.१ | संशोधनातील मुख्य उद्दिष्टानुसार संशोधनाची कार्यपद्धती | ७७ |
| ३.२ | उद्दिष्ट क्र.१ ची कार्यपद्धती | ७७ |
| ३.३ | महिला मानवी हक्कविषयी सद्यस्थितीची संख्यात्मक माहिती | ७९ |
| ३.४ | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचा मानसशास्त्रीय आधार | ८४ |
| ३.५ | महिला मानवी हक्क सर्वेक्षणातील संपादनानुसार कार्यक्रमाची रचना | ८८ |
| ३.६ | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचा प्रारंभिक तक्ता | ९० |
| ३.७ | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचा अंतिम आराखडा | ९२ |
| ३.८ | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक | ९४ |
| ३.९ | उद्दिष्ट क्र. ३ ची कार्यपद्धती | ९६ |
| ३.१० | संशोधनासाठी न्यादर्श | १०३ |
| ३.११ | प्रश्नावलीची घटकानुसार विभागणी | १०४ |
| ३.१२ | चाचणीची विश्वसनीयता आणि सप्रमाणता | १०६ |
| ४.१ | महिला मानवी हक्कातील घटकानुसार प्रश्नांची विभागणी | ११२ |
| ४.२ | विद्यार्थिनींची वैवाहिक स्थिती | ११३ |
| ४.३ | विद्यार्थिनींचे वयोगटानुसार वर्गीकरण | ११४ |
| ४.४ | विद्यार्थिनींच्या पालकांची व्यावसायिक स्थिती | ११५ |
| ४.५ | महिला मानवी हक्क शिक्षण चाचणीतील संपादन | ११६ |
| ४.६ | महिला मानवी हक्कातील वैवाहिक हक्क घटकातील संपादन | ११८ |
| ४.७ | महिला मानवी हक्कातील वारसा हक्क घटकातील संपादन | ११९ |
| ४.८ | महिला मानवी हक्कातील नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क घटकातील संपादन | १२१ |
| ४.९ | महिला मानवी हक्कातील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकातील संपादन | १२२ |
| ४.१० | महिला मानवी हक्कातील संविधानिक हक्क घटकातील संपादन | १२४ |
| ४.११ | तज्ज्ञाच्या प्रतिसादाचे विश्लेषण व अर्थनिर्वचन | १२६ |
| ४.१२ | वैवाहिक हक्क या घटकाबाबत वर्णनात्मक संख्याशास्त्रीय माहिती | १२८ |
| ४.१३ | वैवाहिक हक्क या घटकासाठी टी परीक्षण | १३१ |
| ४.१४ | वारसा हक्क या घटकाबाबत वर्णनात्मक संख्याशास्त्रीय माहिती | १३१ |
| ४.१५ | वारसा हक्क या घटकासाठी टी परीक्षण | १३३ |
| ४.१६ | नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क या घटकाबाबत वर्णनात्मक संख्याशास्त्रीय माहिती | १३४ |
| ४.१७ | नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क या घटकासाठी टी परीक्षण | १३७ |
| ४.१८ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकाबाबत वर्णनात्मक | १३७ |

| | | |
|---|---|---|
| | संख्याशास्त्रीय माहिती | |
| ४.१९ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकासाठी टी परीक्षण | १४० |
| ४.२० | संविधानिक हक्क या घटकाबाबत वर्णनात्मक संख्याशास्त्रीय माहिती | १४० |
| ४.२१ | संविधानिक हक्क या घटकासाठी टी परीक्षण | १४२ |
| ४.२२ | महिला मानवी हक्कातील एकत्रित पाच घटकांबाबत वर्णनात्मक संख्याशास्त्रीय माहिती | १४३ |
| ४.२३ | महिला मानवी हक्कातील एकत्रित पाच घटकांसाठी टी परीक्षण | १४५ |
| ५.१ | संबंधित साहित्याच्या आढाव्याचा तपशील | १५८ |
| ५.२ | उद्दिष्ट क्र.१ साठी संशोधन पद्धती | १५८ |
| ५.३ | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे स्वरूप | १५९ |
| ५.४ | उद्दिष्ट क्र.३ साठी संशोधन पद्धती | १६१ |
| ५.५ | ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनांच्या परीक्षणावरून निष्कर्ष | १६५ |

# आलेखांची यादी


| आलेख क्र. | आलेखांचा तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ३.१ | महिला मानवी हक्क सद्यस्थिती | ७९ |
| ४.१ | प्रश्नांची घटकानुसार विभागणी | ११२ |
| ४.२ | विद्यार्थिनींची वैवाहिक स्थिती | ११३ |
| ४.३ | विद्यार्थिनींचे वयोगटानुसार वर्गीकरण | ११४ |
| ४.४ | पालकांचा व्यवसाय | ११५ |
| ४.५ | महिला मानवी हक्क शिक्षण चाचणीतील संपादन | ११७ |
| ४.६ | महिला मानवी हक्कातील वैवाहिक हक्क घटकातील संपादन | ११८ |
| ४.७ | महिला मानवी हक्कातील वारसा हक्क घटकातील संपादन | १२० |
| ४.८ | महिला मानवी हक्कातील नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क घटकातील संपादन | १२१ |
| ४.९ | महिला मानवी हक्कातील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकातील संपादन | १२३ |
| ४.१० | महिला मानवी हक्कातील संविधानिक हक्क घटकातील संपादन | १२४ |
| ४.११ | वैवाहिक हक्क घटकातील विद्यार्थिनींचे पूर्व चाचणीमधील संपादन | १२९ |
| ४.१२ | वैवाहिक हक्क घटकातील विद्यार्थिनींचे उत्तर चाचणीमधील संपादन | १३० |
| ४.१३ | वारसा हक्क घटकातील विद्यार्थिनींचे पूर्व चाचणीमधील संपादन | १३२ |
| ४.१४ | वारसा हक्क घटकातील विद्यार्थिनींचे उत्तर चाचणीमधील संपादन | १३३ |
| ४.१५ | नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क घटकातील विद्यार्थिनींचे पूर्व चाचणीमधील संपादन | १३५ |
| ४.१६ | नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क घटकातील विद्यार्थिनींचे उत्तर चाचणीमधील संपादन | १३६ |
| ४.१७ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकातील विद्यार्थिनींचे पूर्व चाचणीमधील संपादन | १३८ |
| ४.१८ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकातील विद्यार्थिनींचे उत्तर चाचणीमधील संपादन | १३९ |
| ४.१९ | संविधानिक हक्क घटकातील विद्यार्थिनींचे पूर्व चाचणीमधील संपादन | १४१ |
| ४.२० | संविधानिक हक्क घटकातील विद्यार्थिनींचे उत्तर चाचणीमधील संपादन | १४२ |
| ४.२१ | महिला मानवी हक्कातील एकत्रित पाच घटकांचे पूर्व चाचणीमधील संपादन | १४४ |
| ४.२२ | महिला मानवी हक्कातील एकत्रित पाच घटकांचे उत्तर चाचणीमधील संपादन | १४५ |

# आकृत्यांची यादी



| आकृती क्र. | आकृत्यांचा तपशील | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| ३.१ | सर्वेक्षणाच्या पायऱ्यांचा प्रवाही तक्ता | ७८ |
| ३.२ | प्रश्नावली विकसनाचा प्रवाही तक्ता | ८० |
| ३.३ | साधननिर्मितीचे टप्पे | ८५ |
| ३.४ | प्रयोगाच्या कार्यवाहीचा ओघतक्ता | ९७ |

## प्रकरण पहिले

# संशोधन विषयाची ओळख

प्रकरण पहिले

# संशोधन विषयाची ओळख


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १.१ | प्रस्तावना | ३ |
| १.२ | मानवी हक्क | ४ |
| १.२.१ | मानवी हक्कांचे वर्गीकरण | ४ |
| १.२.२ | मानवी हक्क संकल्पनेची पार्श्वभूमी | ६ |
| १.२.३ | मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा | ८ |
| १.२.४ | नागरी व राजकीय हक्कांची आंतरराष्ट्रीय सनद | ९ |
| १.२.५ | महिला आणि मानवी हक्क | ९ |
| १.२.६ | महिला प्रश्नांचे स्वरूप व सद्यस्थिती | ११ |
| १.२.७ | महिला मानवी हक्कांचे स्वरूप | १६ |
| १.३ | संशोधनाची गरज | २२ |
| १.४ | संशोधनाचे महत्त्व | २३ |
| १.५ | संशोधनाचे शीर्षक | २४ |
| १.६ | संशोधन समस्या विधान | २४ |
| १.७ | कार्यात्मक व्याख्या | २४ |
| १.८ | संशोधनाची उद्दिष्टे | २५ |
| १.९ | संशोधनाची गृहीतके | २६ |
| १.१० | संशोधनाचे प्रश्न | २६ |
| १.११ | परिकल्पना | २६ |
| १.१२ | संशोधनाची व्याप्ती, मर्यादा, परिमर्यादा | २७ |

## प्रकरण पहिले

# संशोधन विषयाची ओळख

### १.१ प्रस्तावना

मनुष्य प्राणी असल्याकारणाने व्यक्ती ज्या हक्कांचा दावेदार ठरते त्यास मानवी हक्क असे संबोधले जाते. मानवी हक्क संकल्पनेचे असे गृहितक आहे की, सर्व मनुष्यमात्र हे समान आहेत. त्यांना प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्यासाठी काही समान हक्क उपलब्ध असले पाहिजेत. जन्मानेच मनुष्य काही नैसर्गिक हक्क घेऊन येतो. या गृहितकृत्यावर या हक्कांची मांडणी करण्यात आली आहे. मानवी हक्कांची संकल्पना ही पुरातन असून ग्रीक व रोमन विचारवंतांच्या तसेच ख्रिस्ती तत्त्वज्ञानात आणि थॉमस अक्वायन सारख्या विचारवंतांच्या लिखाणातूनही मांडली गेल्याचे दिसून येते. मानवी संस्कृतीच्या विकासामध्ये वेगवेगळ्या टप्प्यांवर मानवास जगण्याकरीता आवश्यक असणाऱ्या हक्कांसाठी निरनिराळ्या संकल्पना मांडल्या आहेत. त्या मानवी हक्कांचाच भाग आहेत. मानवी हक्कांमध्ये जगण्याचा हक्क, अन्न, वस्त्र, निवारा मिळविण्याचा हक्क, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, हिंसेपासून मुक्तता, धार्मिक स्वातंत्र्य, गुलामगिरीतून मुक्ततेचा हक्क, व्यक्तीच्या खासगीपणाचा हक्क, संपत्तीवरील मालकीचा हक्क, क्रूर, अमानुष व अपमानास्पद वागणुकीपासून संरक्षणाचा हक्क यासारख्या अनेक हक्कांचा समावेश होतो.

मानवी हक्कांची व्याप्ती मोठी आहे. मानवी हक्कांमध्ये एकीकडे पारंपारिक हक्क आणि राजकीय हक्क यांचा तर दुसरीकडे नव्याने विकसित झालेल्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक या हक्कांचाही समावेश होतो. हे हक्क माणसाला जन्मापासून मिळालेले असतात. ते जन्मसिद्ध असल्यामुळे त्यास वेगळे करता येत नाही. हे हक्क अविभाज्य व परंपरागत असतात. ते कोणीही देत नसल्याने ते हिराऊनही घेऊ शकत नाही. मानवी हक्क वैश्विक असतात. याचाच अर्थ प्रत्येक व्यक्तीला जी कोणत्याही धर्म, जाती, वंश, लिंग, सामाजिक व आर्थिक स्तर यातील किंवा भाषा, प्रांत अथवा कोणत्याही जन्मस्थानातील असली तरी तिला मानवी हक्क प्राप्त होतात. मानवी हक्क हे परस्परावलंबी व परस्परसंबंधी असतात. सर्व मानवी हक्कांकडे एकत्रितपणेच पहावे लागते. कोणताही हक्क स्वतंत्र काढून पाहता येत नाही. हे सर्व हक्क सर्व मानवांसाठी एकाचवेळी अस्तित्त्वात असतात. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही गुण असतात. त्या गुणांचा विकास होण्यासाठी प्रत्येकाला समान संधीची आवश्यकता असते. जेव्हा जात, धर्म,

लिंग भेदविरहित सर्वांना समान संधी दिल्या जातात, तेव्हा प्रत्येकजण आपल्यातील सुप्त गुणांचा विकास करू शकतो. म्हणजेच मानवी हक्क हे सार्वत्रिक आहेत. मानवी हक्क हे काळानुसार विकसित होणारे असतात. उदा. माहितीचा अधिकार अथवा प्रदुषण मुक्त पर्यावरणाचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार इ. हक्क काळानुसार विकसित होत गेलेले दिसून येतात. मानवी हक्क हे अनिर्बंध नसून नेहमी त्यावर वाजवी अशी बंधने टाकलेली असतात. उदा. विचार व भाषण यांचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. मात्र हे स्वातंत्र्य कोणाला बदनाम करण्यासाठी किंवा खोटे आरोप करण्यासाठी वापरता येत नाही. (मुहावर, २०११)

मानवी हक्कांना नेहमीच वैश्विक, अविभाज्य आणि मुलभूत हक्क म्हणून पाहिले जाते. मानवी हक्कांच्या वैश्विकतेचे दोन अर्थ आहेत. एका बाजुला मानवी हक्कांची वैश्विकता लिंग, रंग, सामाजिक दर्जा यासारख्या आधारावर होणाऱ्या भेदभावास प्रतिबंध करते. जवळजवळ सर्वच आंतरराष्ट्रीय मानवी करारनाम्यात अशी तरतुद केलेली आहे. दुसऱ्या बाजुला मानवी हक्कांची वैश्विकता मानवी हक्क वैश्विक स्तरावर लागू असल्याबाबत सांगते. कोणत्याही भौगोलिक, आर्थिक, राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत फरक असला तरी सर्व लोकांचे मानवी हक्क समान असतात. (कुलकर्णी, २०१५)

## १.२ मानवी हक्क

संयुक्त राष्ट्राने मानवी हक्कांची केलेली व्याख्या : ‘मानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे माणूस म्हणून जन्मल्यामुळे सर्व मानवांना मिळाले पाहिजेत. हे हक्क उपभोगल्याशिवाय मानवाला माणूस म्हणून जगणे खऱ्या अर्थाने शक्य नाही. (देहाडराय, तांबे, २००९)

मानवी हक्क हे मानवाला प्राप्त झालेले अधिकार असून त्यांचे सार्वजनिक हिताच्या कारणावरूनही शासनाकडून उल्लंघन होऊ शकत नाही आणि राष्ट्रीय कायद्याशिवाय देखील ते उपभोगता येऊ शकतात. (जोशी, २००४)

### १.२.१ मानवी हक्कांचे वर्गीकरण

मानवी हक्क हे मानवाचे स्वाभाविक हक्क असल्यामुळे त्याचे वर्गीकरण करता येणे कठीण आहे. मात्र मानवी हक्कांच्या स्वरूपावरून त्याचे काही गटात वर्गीकरण करता येईल.

**१. सकारात्मक मानवी हक्क आणि नकारात्मक मानवी हक्क**

जेव्हा एखादी व्यक्ती आपले हक्क इतर कोणाच्याही हस्तक्षेपाशिवाय उपभोगू शकते तेव्हा ते मानवी हक्कांचे सकारात्मक स्वरूप होय. व्यक्तीला मानवी हक्क उपभोगता यावे यासाठी राज्याला काही उपाययोजना कराव्या लागतात. जगण्याचा हक्क हे सकारात्मक हक्काचे उत्तम उदाहरण होय. याउलट राज्याला काही गोष्टींची कारवाई करण्यापासून मज्जाव करण्याचे हक्क असतात. त्यास नकारात्मक हक्क म्हणतात. कोणत्याही व्यक्तीच्या हक्कांचे हनन करू नये ही राज्याची जबाबदारी असते. मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यातील कलम १९ अन्वये व्यक्तीला मत, विचार, स्वातंत्र्याचा हक्क आहे. हे नकारात्मक हक्काचे उदाहरण होय. (कुलकर्णी, २००९)

**२. नागरी हक्क आणि राजकीय हक्क**

नागरी हक्क हे प्रदिर्घ काळात विकसित झालेले हक्क आहेत. जिविताचा आणि व्यक्तीस्वातंत्र्याच्या हक्काशी संबंधित असणाऱ्या या हक्कांना मानवाच्या कायद्याचा एक अविभाज्य भाग समजले जाते. या हक्कांमध्ये व्यक्तीच्या जिविताचा हक्क, गुलामगिरीपासून मुक्ततेचा हक्क, व्यक्तीच्या खासगीपणाचा हक्क, संपत्तीवर मालकी असण्याचा हक्क, क्रूर, अमानूष व अपमानास्पद वागणूक व शिक्षेपासून संरक्षणाचा हक्क यांचा समावेश होतो. राजकीय हक्क हे सरकार आणि समाजातील दुव्याचे काम करतात. या हक्कांमध्ये मतदानाचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क, सार्वजनिक कारभारामध्ये निवडणूक लढविण्याचा हक्क, माहितीचा अधिकार आदि हक्कांचा समावेश होतो.

**३. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क**

हे हक्क 'अभावापासून मुक्तता' या संकल्पनेवर आधारलेले असून ते मुलभूत मानवी गरजांशी संबंधित हक्क आहे. यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, अपेक्षित जीवन स्तर, पिण्यायोग्य पाणी, निरोगी वातावरण, शिक्षणाचा हक्क, उपासमारीपासून मुक्तता, काम मिळविण्याचा हक्क, सामाजिक सुरक्षिततेचा हक्क, सामाजिक व शारीरिक आरोग्याचा हक्क यांचा समावेश होतो.

**४. वैयक्तिक हक्क व सामुहिक हक्क**

बंधुत्वाच्या भावनेवर आणि एकत्रित राहण्याच्या इच्छेवर हे हक्क आधारलेले असतात. या हक्कांमध्ये प्रामुख्याने विकासाचा हक्क, शांततेचा हक्क आणि स्वयंनिर्णयाचा हक्क इ. हक्कांचा

समावेश होतो. केराल वसाक यांच्या मतानुसार हक्कांचा हा प्रकार बंधुभावाच्या भावनेवर आधारित आहे. हा बंधुभाव आंतरराष्ट्रीय समाजाच्या अशांततेच्या तसेच विकास आणि पर्यावरण यामध्ये येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक आहे.

मानवी हक्कांचे या व्यतिरिक्त समर्थनीय हक्क व असमर्थनीय हक्क असेही वर्गीकरण करता येईल. मानवी हक्कांचे वर्गीकरण पाहत असताना हे लक्षात येते की, असेही काही हक्क आहेत, जे एकापेक्षा अधिक प्रकारात येतात. उदा. संपत्तीचा हक्क हा एकाचवेळी नागरी, राजकीय व आर्थिक अशा तीनही प्रकारात मोडतो. मानवी हक्क हे एकमेकांशी संबंधित व त्याचबरोबर परस्परावलंबी असू शकतात. उदा. नागरी व राजकीय हक्कांशिवाय आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क प्रत्यक्षात उतरू शकत नाही. (जाधव, शिरापूरकर, २०१५)

### १.२.२ मानवी हक्क संकल्पनेची पार्श्वभूमी

मानवी हक्क ही संकल्पना मानवाच्या उदयापासून, त्याच्या एकत्र राहण्याच्या कालखंडापासून अस्तित्त्वात आहे. इतिहासाचा आढावा घेताना लक्षात येते की, प्राचीन भारताबरोबरच जागतिक स्तरावरही त्याचे प्राचीनत्व पहावयास मिळते. प्राचीन भारतातील वेद, उपनिषदे, महाकाव्यांबरोबरच भगवान बुद्ध, महावीर, गुरूनानक यांच्याबरोबरच आधुनिक कालखंडातील रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, रमन महर्षी यांच्या विचारांतील काही समान धाग्यांचा विचार करता असे दिसून येते की, सहनशीलता, स्वतंत्रता, समानता, अहिंसा, निष्पक्षता, सत्य या बाबी समान आहेत. भारतामध्ये इ.स.पू. तिसऱ्या शतकामध्ये राजा अशोकाच्या कालखंडात मानवी हक्काची पायाभूत तत्त्वे दिसून येतात. बौद्ध धर्माचा स्विकार केल्यानंतर अहिंसा, सहिष्णूता, पालक, गुरू व थोरांप्रती कर्तव्यभावना, मित्रांप्रती उदार दृष्टीकोन, सेवकांना मानवी वर्तणूक या तत्त्वांचा केलेला वापर हा मानवाधिकाराचाच एक भाग होय. भारतीय तत्त्वज्ञानाचे महत्त्वाचे साधन असलेल्या वेद, उपनिषदे यामध्ये लोकांची कर्तव्ये, हक्क व जबाबदाऱ्या यांची माहिती दिलेली आहे. (शुक्ल, २०१५)

आंतरराष्ट्रीय स्तरावर मेसोपोटोमियातील इ.स.पू. १७८० मधील हम्मुराबीची आचारसंहिता तसेच इ.स.पू. सहाव्या शतकातील पर्शियन साम्राज्यातील हक्कविषयक तत्त्वे, तसेच युरोपातील सायप्रस द ग्रेट या राजाने इ.स.पू. ५३९ मध्ये घोषित केलेले सायप्रस कॅलेंडर या बाबी प्राचीन कालखंडातील मानवी हक्काच्या दर्शक आहेत. मध्ययुगीन कालखंडामध्येही

मानवी हक्कांची संकल्पना अधिक व्यापक होत गेल्याचे दिसून येते. इंग्लंडचा राजा जॉन याने १५ जून १२१५ रोजी जाहिर केलेली मॅग्ना कार्टा ही हक्कांची सनद मानवी हक्कांच्या संदर्भात महत्त्वाची मानली जाते. त्याचबरोबर राजाचे हक्क मर्यादित करणारी इ.स.१८२८ चे पिटीशन ऑफ राइटस् देखील महत्त्वाची मानली जाते. इंग्लंडबरोबरच अमेरिकेतही १७७६ साली अमेरिकी हक्कांची सनद मानवी हक्कांचे उदात्तीकरण करणारी आहे. १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांतीनेही मानवी हक्काच्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. (जाधव, शिरापूरकर, २०१५)

आधुनिक कालखंडात मानवी हक्कांचा प्रश्न हा प्रामुख्याने महायुद्धानंतर अधिक तीव्रतेने भासू लागला. पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाने शांततेसाठी आणि हक्क संवर्धनासाठी प्रयत्न केले. मात्र मानवी हक्कांच्या संदर्भात राष्ट्रसंघाचे कार्यक्षेत्र सुस्पष्ट नसल्याने राष्ट्रसंघाचे मानवी हक्कविषयक कार्य काही देशातील अल्पसंख्यांकांचे हक्क निश्चित करण्यापुरते म्हणजे अतिशय मर्यादित राहिले. तुलनेने दुसरे महायुद्ध हे मानवतेच्या दृष्टीकोनातून अधिक घातक ठरले. या महायुद्धानंतर देखील शांतता व स्थैर्याची हमी देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना झाली. या संघटनेचा उद्देशच भविष्यात युद्धाचा धोका उद्भवू नये, मुलभूत मानवी हक्कांची पायमल्ली होऊ नये, व्यक्तीमूल्य आणि स्त्री–पुरुष समानता या तत्त्वावर दृढ विश्वास निर्माण व्हावा हा होता. संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी सन १९४६ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क आयोगाची स्थापना केली. सुरूवातीच्या काळात मानवी हक्कांच्या प्रश्नाबाबत जरी संघटनेला ठाम अशी भूमिका घेता आली नसली तरी १९६७ नंतर आयोगाने मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबत केलेले कार्य महत्त्वाचे आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने या काळात अल्पसंख्यांकांचे हक्क, दहशतवाद, आदिवासींचे हक्क, गुलामगिरी यासारख्या विषयावर कृतिगट स्थापन करून मानवी हक्कांच्या प्रश्नाकडे गांभिर्याने लक्ष दिले. नंतरच्या काळात मात्र बड्या देशांच्या दबावामुळे आयोगाच्या कार्यावर मर्यादा आल्या. त्यामुळेच १५ मार्च २००६ रोजी संयुक्त राष्ट्राच्या मानवी हक्क आयोगाच्या जागी संयुक्त राष्ट्र मानवी हक्क मंडळाची स्थापना करण्यात आली. जून २००७ नंतर या आयोगाने संस्था बांधणीवर अधिक भर दिला. तसेच तज्ञ सल्लागारांचा समावेश असणारी सल्लागार समिती स्थापन करून तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया ठरविली. (जाधव, शिरापूरकर, २०१५)

### १.२.३ मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा

दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क आयोगाने मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी तयार केलेल्या मानवी हक्काच्या जाहिरनाम्यास संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ मध्ये मान्यता दिली. १० डिसेंबर हा दिवस जगभर मानवी हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. मानवी हक्कांचा हा जाहिरनामा अनेक देशांना मानवी हक्कांच्या ध्येयधोरणासाठी आणि अंमलबजावणीसाठी दिशादर्शक ठरला आहे. या जाहिरनाम्यामध्ये एकूण ३० कलमे असून त्याची चार भागामध्ये विभागणी केली आहे.

**अ) पहिला भाग** : यामध्ये दोन कलमांचा समावेश करण्यात आला आहे. ही दोन्हीही कलमे मानवी हक्कांच्या पायाभूत तत्त्वांना अधोरेखित करतात. यामध्ये मानवाची प्रतिष्ठा तसेच भेदभावाशिवाय प्रत्येकला दिलेली स्वातंत्र्ये यावर भर देण्यात आला आहे.

**ब) दुसरा भाग** : कलम ३ ते २१ या दुसऱ्या भागामध्ये राजकीय आणि नागरी हक्कांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये कायद्यासमोर समानता, न्यायालयीन उपायांचा हक्क, छळ आणि अमानवी शिक्षेपासून मुक्तता, संचार स्वातंत्र्य, राजकीय आश्रयाचा हक्क, राष्ट्रीयत्त्वाचा हक्क, कुटुंब संरक्षणाचा हक्क, मालमत्तेचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, एकत्र येण्याचा आणि संघटना स्थापन करण्याचा हक्क इत्यादी हक्कांचा विचार केला आहे.

**क) तिसरा भाग** : जाहिरनाम्याच्या तिसऱ्या भागात कलम २२ ते २७ चा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये व्यक्तीच्या सामाजिक सुरक्षिततेचा हक्क, समान कामासाठी समान वेतनाचा हक्क, शिक्षणाचा हक्क, चांगल्या जीवनमानाचा हक्क यासारखी तत्त्वे समाविष्ट आहेत.

**ड) चौथा भाग** : जाहिरनाम्याच्या शेवटच्या भागामध्ये कलम २८ आणि ३० मध्ये मानवी हक्कांच्या उपभोगांचा अंतर्भाव करताना सार्वजनिक व्यवस्था व सर्वसामान्य कल्याण याकरिता उपरोक्त हक्कांवर असणाऱ्या मर्यादांचा समावेश करण्यात आला आहे. उपरोक्त हक्क आणि स्वातंत्र्याला बाधा आणण्यास व तशी कृती करण्याचा हक्क कोणत्याही राष्ट्राला, गटाला अथवा व्यक्तीला नाही. (जाधव, शिरापूरकर, २०१५)

१९४८ मधील हा जाहिरनामा जगभरातील विविध राज्यघटनांवर आपला ठसा उमटवत आहे. याशिवाय विविध जागतिक, राष्ट्रीय, प्रादेशिक कायदे व करार यावरही त्याची छाप दिसून येते. (शर्मा, २००९)

**१.२.४ नागरी व राजकीय हक्कांची आंतरराष्ट्रीय सनद (१९६६)**

मानवी हक्काच्या जाहिरनाम्यानंतर मानवी हक्कांच्या संदर्भातील संयुक्त राष्ट्रसंघाचे महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे नागरी हक्कांची मांडलेली सनद होय. या सनदेवर स्वाक्षरी करणाऱ्या देशांनी सर्व राष्ट्रांच्या स्वयंनिर्णयाचा अधिकार मान्य केला. १९६६ ची ही सनद मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीय जाहिरनाम्यास पूरक म्हणून मानली जाते. यामध्ये सर्वांना समान वर्तणूक व भेदभावविरहित वर्तनाची हमी, कायद्याचा मोफत सल्ला मिळण्याचा हक्क, मोफत प्राथमिक शिक्षणाचा हक्क यासह कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून संरक्षण या महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश करण्यात आला. (पाटील, २०१४)

**१.२.५ महिला आणि मानवी हक्क**

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये मानवी हक्कांपासून दूर व वंचित राहणारा, हक्कांच्या पायमल्लीचा सतत सामना करणारा, अन्याय, भेदभाव, अनिष्ठ चालीरिती, रूढी, परंपरांना बळी पडणारा महिलांचा वर्ग दिसून येतो. सर्वात प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभलेल्या भारतात स्त्री जीवनामध्ये टप्प्याटप्प्याने बदल होत गेलेले दिसून येतात. प्राचीन वाङ्मयाचा विचार केला तर दोन पद्धतीने स्त्रियांचे सादरीकरण झालेले दिसून येते. तिला दुर्गा, महाकाली अशा रूपात पुजले गेले, तर दुसरीकडे कुटुंबातील प्रमुख हालचालीचे केंद्र मानले गेलेल्या त्याच स्त्रीला ती स्त्री आहे म्हणून अपवित्र ठरवून धार्मिक कार्यापासून, समाजातील कार्यक्रमांपासून दूर केले गेले. स्त्रियांचे हे स्थान पाहत असताना इतिहासाची केली गेलेली मांडणी लक्षात घेणे गरजेचे आहे. वैदिक वाङ्मयामध्ये गार्गी, मैत्रेयी, इंद्रसेना, लोपमुद्रा, विश्पला, घोषा, शशीयसी अशा पंडीता अथवा ऋषिकांचा उल्लेख आला आहे. मात्र या अपवादात्मक  बाबी सोडल्या तर स्त्रियांचे स्थान खरोखरच मानाचे होते का? तर याचे उत्तर नाही म्हणूनच द्यावे लागते. गार्गी, मैत्रेयीसारख्या एखाद्या दुसऱ्या स्त्रीचा दाखला देऊन भारतीय संस्कृतीतील सहिष्णूता सिद्ध होत नाही. वास्तविकत: उत्तर वैदिक कालखंडापासूनच महिलांच्या नैसर्गिक हक्कांचा संकोच मोठ्या प्रमाणात होताना दिसून येत आहे. पिढ्यान्‌पिढ्या कुटुंबातील दुय्यम स्थान, कुटुंबातील

गुलामाप्रमाणे असणारे अस्तित्त्व, शिक्षणापासूनची वंचितता, आर्थिक उत्पन्नात सहभागी होण्यास केलेली बंदी, सामाजिक, धार्मिक कार्यक्रमात सहभागावर केलेला मज्जाव, बालविवाह, सतीप्रथा यासारख्या कितीतरी समस्यांमुळे तिचे मानवी हक्क हे कायम डावलले गेल्याचे दिसून येते. (जुन्नरकर, २०१५)

मध्ययुगीन कालखंडात भारतीय स्त्रियांच्या परिस्थितीमध्ये व त्यांच्या हक्कांच्या उल्लंघनामध्ये वाढ होत गेली. प्राचीन कालखंडापासून आलेल्या समस्यांबरोबरच सती प्रथेमध्ये वाढ होत गेली. मुलीच्या लग्नाच्या वयाचा प्रश्न हा पित्याच्या स्वर्ग नरकाच्या स्थानाशी जोडला गेला. त्यातून वय वर्षे ८ ते १० मध्ये मुलींचे विवाह होऊ लागले. बहुपत्नीत्वाची प्रथा पुरूषत्वाच्या प्रतिष्ठेशी जोडली गेली. विधवांच्या प्रश्नातही मोठ्या प्रमाणात वाढ होत गेली. बालविवाहातून बालविधवांची वेगळीच समस्या उत्पन्न झाली. विधवा विवाहावर घातलेल्या बंदीमुळे स्त्रियांच्या जीवंतपणीच्या नरकयातना वाढत गेल्या. देवदासी हीदेखील मध्ययुगीन कालखंडात तीव्रतेने आढळून येणारी स्त्री समस्या होय. देवाची सेवा करण्यासाठी आजन्म देवालयाला बहाल केलेल्या देवदासींचे शारीरिक शोषण मोठ्या प्रमाणात होत गेले. मुरळी आणि जोगतीन या देवाला बहाल केलेल्या स्त्रियांची आणखी काही उदाहरणे होय. सर्व होत असताना या सर्वांचा संबंध परंपरा, धर्म यांच्याशी जोडला गेल्यामुळे या समस्या दिवसेंदिवस वाढतच गेल्या.

स्त्रियांच्या अवहेलनांची ही स्थिती प्राचीन, मध्ययुगीन कालखंडाप्रमाणे आधुनिक भारतातही दिसून येते. काळानुसार स्त्री प्रश्नाचे स्वरूप जरी बदलत गेले असले तरी मूळ समस्या संपलेली नाही. भारतात ब्रिटिश कालखंडात शिक्षणाच्या प्रचार, प्रसारामुळे प्रबोधनाचे पर्व सुरू झाले. इंग्रजांनी भारतामध्ये टप्प्याटप्प्याने शिक्षण व्यवस्था रूजवली.

मात्र सुरूवातीच्या काळात भारतीय प्रथा–परांपरांमुळे महिलांच्या शिक्षणात मोठ्या प्रमाणात अडथळे निर्माण होत गेले. त्याला पर्याय म्हणून ब्रिटिश मिशनऱ्यांनी 'जनाना' शिक्षण पद्धती राबवून सर्वप्रथम उच्च वर्गातील स्त्रियांना त्यांच्या आंतरमहालात गृहकृत्यांचे शिक्षण देण्याचे धोरण अवलंबिले. १८२४ मध्ये ब्रिटिश मिशनऱ्यांनी मुलींसाठी पहिली शाळा स्थापन करून महिलांना शिक्षणाचा हक्कच एकप्रकारे मान्य केला. याच कालखंडात इंग्रजी शिक्षणव्यवस्थेतून उच्च शिक्षण घेतलेल्या मध्यमवर्गीयांना भारतातील स्त्री विषयक सुधारणांची

गरज वाटली. भारतात वंचित घटक म्हणून राहिलेल्या स्त्रीला बालविवाह, भ्रूणहत्या, सतीप्रथा, विधवाविवाहावरील बंदी, समाजामधील दुय्यम स्थान तसेच त्यांचा विविध कारणासाठी होत असलेला छळ पाहून भारतीय समाज रानटी, असंस्कृत, अमानवी असल्याची टिका ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून आणि विचारवंतांकडून होत गेली. यातूनच हा भारतीय संस्कृती आणि पुरूषार्थावरील हल्ला समजून भारतीय विचारवंत आणि राष्ट्रवाद्यांकडून स्त्री सुधारणाविषयक पावले उचलली गेली. पुढे भारतीय समाजसुधारकांनी समाजसुधारणेच्या अग्रभागी महिलांच्या प्रश्नास ठेवले. यातून महिलांच्या शिक्षणविषयक हक्कासाठी महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, महर्षी वि. रा. शिंदे यांनी अमूलाग्र कार्य केले. १८२९ मध्ये लॉर्ड बेटींगने सतीप्रथेविरूद्ध कायदा संमत केला व विधवेच्या जिवितेच्या हक्काचे रक्षण केले. १८२९ च्या कायद्यानंतर भारतात सामाजिक सुधारणांच्या कायद्यास सुरूवात झाली. १९३७ मध्ये हिंदू स्त्रियांचा मालमत्ता हक्क कायदा संमत झाला. या कायद्यामुळे अपत्यहीन विधवा स्त्रीला मृत पतीच्या संपत्तीचा वारसा मिळाला. यामुळे प्रथमच विधवेला कायद्याद्वारे हक्क मिळाला. (देहाडराय, २००९)

### १.२.६ महिला प्रश्नाचे स्वरूप व सद्यस्थिती

आधुनिक भारतामध्ये एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करत असताना स्त्रियांच्या योगदानास विसरता येणार नाही. कोणताही समाज हा त्या देशातल्या स्त्रियांच्या विकासाशिवाय पुढे जाऊ शकणार नाही. भारत हा विकसनशीलतेकडून विकसित अवस्थेकडे जात असताना समाजाच्या लोकसंख्येपैकी जवळपास पन्नास टक्के असलेल्या महिलांच्या प्रगतीकडे लक्ष द्यावे लागेल. मात्र प्रत्यक्षात ज्या प्रमाणात महिलांचे सक्षमीकरण हवे होते ते झाले नाही. शहरी व ग्रामीण भागात अजूनही महिलांना कितीतरी समस्यांना सामोरे जावे लागत आहे. समाज व कुटुंबातील आजही स्त्रियांचे दुय्यम स्थान, वर्तमानपत्रामध्ये सतत येणाऱ्या बलात्कार, छेडछाड, कौटुंबिक छळ, हुंड्यासाठी घेतला गेलेला बळी यासारख्या बातम्या या महिलांच्या गंभीर स्थितीची माहिती देतात. सद्यकालीन स्त्रियांचे प्रश्न खालीलप्रमाणे दिसून येतात.

### १. स्त्री भ्रूण हत्या

निसर्गत: प्रत्येक व्यक्तीस जगण्याचा हक्क आहे. मात्र समाजामध्ये स्त्री भ्रूण हत्येतून तिचा हा हक्कच हिरावून घेतला जात आहे. भारतात आधुनिक कालखंडात निर्माण झालेला हा

घातक प्रश्न आहे. वंशाला दिवा म्हणून मुलाची अपेक्षा, त्याचबरोबर ‘मुलगी ही परक्या घरची लक्ष्मी’ या मनोभूमिकेमुळे मुलीच्या जन्माबाबत समाजमनात फार मोठ्या प्रमाणात उदासिनता दिसून येते. कॅनडा आणि भारत स्थित लँसेट या पत्रिकेने भारतात दरवर्षी जवळपास पाच लाख स्त्री भ्रूणांची लिंगनिदानानंतर हत्या केली जाते असे मत नोंदविले आहे. (जाधव, शिरापूरकर, २०१५)

स्त्री भ्रूण हत्येचा परिणाम लिंग गुणोत्तरावर झालेला दिसून येतो. २००१ ते २०११ या कालावधीमध्ये बाललिंगगुणोत्तर (० ते ६ वयोगटातील) ९१३ वरून ८९४ इतके खाली आले आहे. महाराष्ट्रामध्ये सर्वात कमी बीड या ठिकाणी लिंग गुणोत्तर प्रमाण आहे. पुण्यामध्ये २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये ९०२ वरून ८८३ इतके आले आहे. यावरून स्त्री भ्रूण हत्येचा परिणाम दिसून येतो.

**२. हुंडा**

सामाजिक चालीरितींशी आणि विवाह संस्थेशी संबंधित ही समस्या आजही मोठ्या प्रमाणात दिसून येते. हुंडाबंदी अधिनियम १९६१ नुसार हुंडा म्हणजे विवाहातील एका पक्षाने दुसऱ्या पक्षास किंवा विवाहातील कोणत्याही पक्षाच्या आई वडीलांना अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीने विवाहातील अन्य पक्षास अथवा व्यक्तीस विवाहाच्या वेळी किंवा तत्पुर्वी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे दिलेली किंवा द्यावयाचे कबूल केलेली संपत्ती अथवा मौल्यवान रोखा होय. हुंडा ही लग्नविधीशी जोडली गेलेली अनिष्ठ सामाजिक प्रथा आहे. १९९३ च्या भारत सरकारच्या एका अहवालानुसार दर १०२ मिनिटाला एक हुंड्यासंबंधी हत्या होत होती. २०१४ च्या सी.आय.डी.च्या अहवालानुसार २०१४ मध्ये महाराष्ट्रात हुंडाबळीचे २७९ गुन्हे दाखल झाले आहेत. २०१३ मध्ये गुन्ह्यांची संख्या ३२० इतकी होती. १९६१ मध्ये हुंडा बंदी कायदा संमत झाला असूनही गुन्ह्याचे प्रमाण हे अधिक असलेले दिसून येते. कायद्यातील पळवाटा, समाजजागृतीचा अभाव, छळाच्या भितीमुळे तसेच प्रतिष्ठेस बाधा पोहोचेल या भितीमुळे बहुतांश गुन्हे दाखल होत नाही. (भारंबे, २०१०)

**३. स्त्री पुरूष असमानता**

UNDP या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या मार्च २०१३ च्या मानव विकास अहवालानुसार (UDR) लिंगभाव असमानतेबाबत अफगाणिस्तान नंतर भारताची सुमार अवस्था आहे. शिक्षण,

आरोग्य आणि उत्पन्न यांच्या आधारावर ठरविला जाणारा मानव विकास निर्देशांकामध्ये (HDI) १८६ देशांमध्ये भारताचा १३६ वा क्रमांक आहे. यावरून भारतातील स्त्री–पुरूष असमानतेची समस्या किती गंभीर आहे याची कल्पना येते. २०११ च्या जनगणनेच्या अहवालानुसार भारतामध्ये कामामध्ये गुंतलेल्या लोकसंख्येपैकी पुरूषांचे प्रमाण ५३.३ टक्के तर स्त्रियांचे प्रमाण २५.५ टक्के आहे. अमर्त्य सेन यांनी स्त्री व पुरूषाबाबत सात प्रकारच्या असमानता सांगितल्या आहे. यामध्ये मृत्युदर असमानता, जन्मविषयक असमानता, मुलभूत सुविधांबाबत असमानता, विशेष संधीची असमानता, व्यावसायिक असमानता आणि कुटुंबातील असमानता या बाबींचा समावेश होतो. (जाधव, शिरापूरकर, २०१५)

भारतामध्ये विविध घटनांमधून जात आणि जमातवादी राजकारण, राष्ट्रीय राजकारणात केंद्रस्थानी येते. यात वरिष्ठ वर्गाचे हितसंबंध संरक्षिले जात असताना महिलांच्या हितसंबंधाकडे दुर्लक्ष होते. भारतातील आरक्षण धोरणाचा लाभही प्रामुख्याने पुरूषांनाच झालेला दिसून येतो. भारतीय कुटुंबव्यवस्थेतही अन्न वाटप, आरोग्य सुविधा व शिक्षणावरील खर्च यामध्ये मुलामुलींमध्ये भेदभाव केला जातो. मुलीला वा स्त्रीला मुलाच्या वा पुरूषाच्या तुलनेमध्ये वैद्यकीय सेवा, शिक्षण, संपत्ती समान न्यायाने उपलब्ध होत नाही.

### ४. कौटुंबिक हिंसाचार

कौटुंबिक हिंसाचार म्हणजे व्यक्तीला शारीरिक, मानसिक, आर्थिक किंवा लैंगिक असा कोणत्याही प्रकारे दिलेला अत्यंतिक त्रास, स्त्रीच्या जिवीतास धोका पोहोचेल अशी केलेली कोणतीही कृती, तिला असुरक्षित वाटेल असे केलेले वर्तन म्हणजे हिंसाचार होय. भारतीय कुटुंबव्यवस्थेत हुंड्यासाठी केला जाणारा आर्थिक, मानसिक छळ, महिलेला अपमानित करणे, शिवीगाळ करणे, अपत्य नसल्यामुळे हिनवणे, धमकावणे, त्रास देणे यासारख्या हिंसा सर्रास दिसून येतात. हिंसामुक्त जीवन हा स्त्रीचा मानवी हक्क आहे. म्हणूनच कौटुंबिक हिंसाचार हा निश्चितच तिच्या मानवी हक्कांच्या उल्लंघनानाच भाग आहे. कुटुंबात स्त्रियांवर होणारे अत्याचार हे तिच्या सर्वांगीण विकासाला अडथळा निर्माण करणारा विषय आहे. कुटुंबामध्ये होणारी हिंसा ही प्रामुख्याने स्त्रीकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टीकोन, हुंडा किंवा इतर कारणांसाठी होणारी पिळवणूक, स्त्रीला नातेसंबंधामध्ये घालून दिलेल्या मर्यादा, पुरूषप्रधान संस्कृतीतील पुरूषी अहंभाव या व अशा अनेक कारणांमुळे होतात. (भारंबे, २०१०)

२०१३ मध्ये राष्ट्रीय गुन्हे अभिलेख मंडळाने भारतातील महिलांवरील अत्याचाराची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. यामध्ये २०१३ मध्ये पती व त्याच्या नातेवाईकांकडून हिंसाचाराचे भारतात ११८८६६ गुन्हे दाखल झाले आहेत. सी.आय.डी.च्या अहवालानुसार महाराष्ट्रात २०१४ मध्ये कौटुंबिक हिंसाचाराचे ७६९६ गुन्हे दाखल झाले आहेत. पुण्यामध्ये २०१४ मध्ये नातेवाईकांकडून होणाऱ्या छळांचे २७६ गुन्हे तर २०१५ मध्ये २६६ गुन्हे नोंदविले आहेत.

**५. बालविवाह**

बालविवाह ही भारतामध्ये सर्वत्र आढळून येणारी पद्धती आहे. विवाहाच्या वेळी मुलाचे व मुलीचे कायद्याने वय निश्चित केले आहे. मात्र अजूनही काही प्रदेशात तसेच काही जमातीमध्ये मुलामुलींचे कमी वयामध्ये विवाह केले जातात. मुलीला समाजामध्ये कुटुंबावर असलेला भार, परक्याचे धन या भूमिकेतून पाहिले गेल्यामुळे बालविवाहाची प्रथा अधिक रूढ झाली. इंग्रजांनी १९२९ मध्ये बालविवाहासंबंधी कायदा संमत केला. त्यानुसार मुलीचे वय १२ वर्षे तर मुलाचे १५ वर्षे इतके ठरविले गेले. स्वातंत्र्यानंतर १९७८ मध्ये या कायद्यात सुधारणा घडवून आणली गेली. त्यानुसार मुलाचे वय २१ व मुलीचे १८ वर्षे ग्राह्य धरण्यात आले. (पाटील, २०१४)

**६. बलात्कार**

महिलांवर होणाऱ्या अन्यायापैकी समाजामध्ये सध्या मोठ्या प्रमाणात घडणारा अन्याय म्हणजे बलात्कार होय. ज्या स्त्रीच्या बाबतीत हा गुन्हा घडतो तिची मात्र सामाजिक हत्याच होत असते. या घटनांनंतर कितीतरी स्त्रियांना सामाजिक जीवनातून उठावे लागले आहे. पिडीत व्यक्तीच्या शीलहननाशी गुन्हा संबंधित असल्याने समाज पुन्हा स्विकारेल की नाही या भितीमुळे बऱ्याचदा तक्रारही केली जात नाही. तक्रार दाखल न करण्याच्या कारणामध्ये पिडीत स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन, नातेवाईकांमधील प्रतिष्ठेस हानी पोहोचण्याची भिती, अविवाहित पिडीत मुलीचे लग्न न जमण्याची भिती, मुलीचे अल्पवयीनत्व व त्यामुळे जिविताची असलेली भिती, गुन्हा करणारा परिचित किंवा घरातीलच व्यक्ती असणे, न्यायालयामध्ये गुन्हा सिद्ध होण्याचे अत्यल्प प्रमाण, न्यायालयात उलटतपासणीमध्ये चारित्र्यावर विचारले जाणारे प्रश्न या कारणांचा समावेश होतो. या कारणामुळे गुन्हे दाखल होत नाही. अशा गुन्ह्यांची संख्या नोंद

झालेल्या गुन्ह्यांच्या तुलनेत कितीतरी अधिक असते. सी.आय.डी.च्या अहवालानुसार २०१४ मध्ये ३४३८ गुन्ह्यांची नोंद झाली. पुणे जिल्ह्यात २०१५ मध्ये २६४ गुन्ह्यांची नोंद झाली. राष्ट्रीय गुन्हे अन्वेशन विभागाच्या २०१२ च्या आकडेवारीनुसार बलात्काराच्या ९८ टक्के प्रकरणात पालक, जवळचे नातेवाईक, शेजारी, परिचित असे माहितीतील अपराधी होते. (बुरटे, २०१५)

**७. छेडछाड**

छेडछाड हा महिलांच्या संदर्भातील लैंगिक अत्याचाराचाच एक भाग आहे. शहरी भागापासून ग्रामीण भागापर्यंत मोठ्या प्रमाणात छेडछाडीचे प्रकार घडून येताना दिसतात. कायद्याच्या दृष्टीने हा किरकोळ स्वरूपाचा गुन्हा समजला जातो. त्यास एका दिवसाच्या कारावासाइतका दंड दिला जातो. त्यामुळे कायदा या गुन्ह्यास आळा घालण्यात असमर्थ ठरत आहे. प्रत्यक्षात मात्र ज्या मुलीच्या वा महिलेच्या बाबतीत अशा प्रकारचे गुन्हे होतात त्यामध्ये कितीतरी मानसिक दडपणाला सामोरे जावे लागत आहे. छेडछाडीतून आत्महत्या केल्याचे अनेक प्रकार समोर येत आहेत. छेडछाड ही शारीरिक व मानसिक पातळीवर मोठ्या प्रमाणात परिणाम करणारी घटना आहे. २०१४ मध्ये महाराष्ट्रात १५७५ इतके गुन्हे दाखल झालेले आहेत.

**८. देहव्यापार, वेश्या व्यवसाय**

देशामध्ये अनैतिक देहव्यापार प्रतिबंध कायदा अस्तित्त्वात असूनही वेश्या व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. वेश्या व्यवसाय हा संघटीतरित्या चालविला जात असलेला गुन्हा आहे. ग्रामीण भागातील दारिद्रय, बेरोजगारी, विविध प्रकारची आमिषे या बाबीतून मोठ्या प्रमाणात देहव्यापारास चालना मिळत आहे. यातून महिलांचे, लहान मुलींचे अपहरणासारखे गुन्हे घडताना दिसून येत आहे. या गुन्ह्याचा संबंध आंतरराष्ट्रीय स्तरावर आहे. मोठ्या प्रमाणात बाहेरच्या देशातून आयात तसेच निर्यातीचे व्यवहार होताना दिसून येतात. २०१३ मध्ये देहव्यापाराचे २५७९ गुन्हे नोंदविले गेले आहे.

**९. देवदासी, जोगतीन आणि मुरळी प्रथा**

देव आणि देवालय यांची सेवा करण्यास सोडण्याच्या ज्या पारंपारिक समजुती आहेत त्यापैकी देवदासी, जोगतीन आणि मुरळी होय. नवस, घराण्याची प्रथा, किंवा निराधार असणे

या बाबी महिलांना यामध्ये जाण्यास भाग पाडतात. प्रामुख्याने महाराष्ट्रामध्ये दिसणारे हे तीनही प्रश्न धर्माशी व धार्मिक परंपरांशी निगडीत आहेत. देवाच्या सेवेच्या नावाखाली त्यांची शारीरिक पिळवणूक होते.

**१०. प्रतिष्ठेसाठी हिंसा**

समाजाच्या उच्च वर्गामध्ये बऱ्याच वेळा या प्रकारचे गुन्हे दिसून येतात. घराण्याच्या, कुळाच्या प्रतिष्ठेसाठी हत्या होण्याच्या प्रमाणामध्ये पुरूषांपेक्षा महिलांचे प्रमाण अधिक आहे. बहुतेक वेळा आंतरजातीय विवाह आणि आंतरधर्मीय विवाह यामुळे प्रतिष्ठेस धक्का पोहचू नये यासाठी अशा प्रकारची हत्या होते. दक्षिण भारताच्या तुलनेत उत्तर भारतात प्रतिष्ठेसाठी होणाऱ्या हत्यांचे प्रमाण अधिक आहे.

**११. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या**

आधुनिक कालखंडात स्त्री ही पुरूषाच्या बरोबरीने नोकरी व्यवसायात सहभागी होत आहे. शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे स्वत:च्या पायावर उभे राहण्याचे स्त्रियांचे प्रमाणही वाढलेले आहे. सरकारच्या धोरणांमुळे, विविध क्षेत्रात आरक्षणामुळे तिला हक्काच्या जागा मिळाल्या आहेत. मात्र त्याचबरोबर काही प्रश्नही पुढे उभे राहिले आहेत. दिवसभर पुरूषाच्या बरोबरीने काम करून कुटुंबामध्ये स्वयंपाक, साफसफाई, वडीलधाऱ्यांची सेवा, बालसंगोपन या बाबी तिला पहाव्या लागतात. तिच्या या दुहेरी भूमिकेमुळे तिला शारीरिक, मानसिक त्रासास सामोरे जावे लागते. याबरोबरच कामास महत्त्व द्यायचे की पती आणि मुलांकडे लक्ष द्यायचे या दोन भूमिकांमध्येही संघर्ष दिसून येतो. या व्यतिरिक्त कामाच्या ठिकाणी स्त्री म्हणून कनिष्ठतेची वागणूक मिळण्याची शक्यता असते. वरिष्ठांकडून शारीरिक व मानसिक पिळवणूक होण्याचे प्रमाणही अलिकडे मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसून येते. (भारंबे, २०१०)

**१.२.७ महिला मानवी हक्कांचे स्वरूप**

महिला मानवी हक्कांचे स्वरूप पुढीलप्रमाणे :

**१. वैवाहिक हक्क**

भारतीय संस्कृतीचा पाया हा विवाह व्यवस्थेवर आधारित आहे. विवाह ही व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वाची घटना मानून भारतीय परंपरेमध्ये त्यास एक संस्कार म्हणून गणले गेले आहे. परंपरांचे अनुकरण करणारे महत्त्वाचे केंद्रही विवाहसंस्थाच आहे. मात्र समाजामध्ये पूर्ववत

चालत आलेल्या व्यवस्थेत स्त्रीला कुटुंबामध्ये दिले जाणारे दुय्यम स्थान, कुटुंबातील व्यक्तींकडून बऱ्याच वेळा तिच्यावर होणारे अन्याय, अत्याचार या बाबींकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. कुटुंबामध्ये पुरूषाने करावयाचे अर्थार्जन, अनिष्ठ व घातक रूढी, परंपरा, पुरूषी अहंभाव यामुळे तिची अवहेलना मोठ्या प्रमाणात होताना दिसून येते. समाजामध्ये हुंडाप्रथा, हुंड्यामुळे होणारा कौटुंबिक छळ, बालविवाह, घटस्फोट, चूल आणि मूल हे ठरवून दिलेले कार्यक्षेत्र यामुळे महिलेसमोरील समस्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या दिसून येतात. ताराबाई शिंदे यांनी स्त्रिया गृहशाळेतील बंदिवान आहेत असे म्हटले आहे. विवाहामुळे महिलांच्या नैसर्गिक हक्कांवर मोठ्या प्रमाणात गदा आली. त्यामुळे ते अन्यायाचे एखादे केंद्र वाटावे अशी स्थिती निर्माण झाली. विवाह संस्थेने जे काही दिले नाही त्यापेक्षा जे दिले ते जास्त भयावह आहे. विवाह संस्थेने औरस, अनौरस बेवारसी असे संततीचे प्रकार तयार केले. विवाहातून वैधव्य ही घातक स्थिती उदयास आली. विवाहित, अविवाहित, परितक्ता, घटस्फोटीता असे अनैसर्गिक प्रकार उदयास आले. विवाहाने कुमारी मातृत्व, बलात्कारीत मातृत्व, विवाहित मातृत्व असे वर्गीकरण करून मातृत्वास कलंकीत केले. (सामन, २००८)

विवाहसंस्थेतून निर्माण झालेल्या समस्यांवर उपाय म्हणून स्त्रिला वैवाहिक जीवन आनंददायी पद्धतीने जगता यावे यासाठी तिच्या अधिकारांचे रक्षण करणे गरजेचे आहे. कुटुंबातील हिंसाचारापासून तसेच कुटुंबातील शारीरिक, मानसिक, भावनिक आणि आर्थिक पिळवणुकीपासून मुक्तता मिळणे हा तिचा हक्क आहे. हुंडा पद्धती आणि त्याच्या दुष्परिणामातून तसेच घटस्फोट, बालविवाह यासारख्या समस्यांतून तिची मुक्तता होणे हा तिचा अधिकार आहे. कुटुंबात पुरूषांच्या बरोबरीने समान हक्क, सन्मान मिळणे हा देखील तिचा वैवाहिक हक्क आहे.

वैवाहिक हक्कांच्या रक्षणार्थ भारत सरकारने हिंदू विवाह कायदा, कुटुंब न्यायालय, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा, हुंडाबंदी कायदा असे अनेक प्रयत्न केले आहे.

**२. वारसा हक्क**

प्राचीन कालखंडापासून महिलांना मालमत्तेच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याची प्रथा जवळजवळ सर्वच मानव समुहामध्ये होती. हिंदू कायदाही त्याला अपवाद नव्हता. भारतामध्ये महिलांच्या हक्क रक्षणासाठी वेगवेगळ्या कालखंडात कायदे निर्माण केले गेले. महिलांना अलिकडच्या काळात जे अनेक हक्क प्राप्त झाले त्यातील एक महत्त्वपूर्ण हक्क म्हणजे वारसा हक्क

होय. महिलांच्या दयनिय स्थितीचे एक कारण म्हणजे तिची परावलंबिता होय. पिता, पती, पुत्र यावर अवलंबून राहिलेल्या महिलेला स्वतःची मालमत्ता नसल्यामुळे तिच्या हाल अपेष्ठांमध्ये वाढ होत गेली. महिलांना कौटुंबिक मालमत्तेमध्ये १९५६ पर्यंत शून्य अधिकार होता. १९५६, १९९४ आणि २००५ अशा चढत्या क्रमाने मुलींच्या वारसा हक्कांचा प्रवास झालेला आहे. २००५ मध्ये वारसा हक्क कायद्यात महत्त्वपूर्ण बदल होऊन महिलांना पित्याच्या संपत्तीत मुलांबरोबर समान हिस्सा मिळेल अशी तरतूद केली. त्यामुळे भारतीय महिलांना मालमत्तेचा महत्त्वपूर्ण अधिकार मिळाला.

### ३. नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क

विकसनशील भारतामध्ये महिलांच्या कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून केवळ चूल आणि मूल एवढेच मर्यादित क्षेत्र न राहता समाजाच्या विविध क्षेत्रामध्ये महिला कार्यरत आहेत. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या संख्येतही शहरी भागात वाढ झालेली आहे. उद्योग, व्यवसाय, संशोधन अशा अनेक बाबतीत महिला अग्रेसर आहेत. मात्र त्यामुळे तिच्या समोरील समस्या संपल्या आहेत असे मात्र नाही. नोकरी करून गृहकृत्य करणे, कुटुंबातील वडीलधाऱ्यांची सेवा, बालसंगोपन अशा दुहेरी भूमिकेत तिला जगावे लागत आहे. शिवाय कामाच्या ठिकाणी अन्याय, अत्याचार, शारीरिक, मानसिक, आर्थिक पिळवणूक या बाबींनाही तिला सामोरे जावे लागत आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना तिचे हक्क मिळाले पाहिजेत या दृष्टीने सरकारने अनेक प्रयत्न केले आहे. भारतीय राज्यघटनेत समान कामास समान मोबदल्याचे तत्त्व समाविष्ट आहे. त्यामुळे स्त्री व पुरूषांच्या वेतनात असमानता आणता येणार नाही. आवश्यक असेल तर राज्याला महिलांसाठी उपयोजनात्मक बाबी करण्याचा हक्क दिला आहे. महिलांना कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून संरक्षणासाठी कामाच्या ठिकाणी लैंगिक छळास प्रतिबंध कायदा २०१३ मध्ये निर्माण करण्यात आला आहे.

### ४. हिंसेपासून संरक्षणाचा हक्क

समाजामध्ये कौटुंबिक हिंसाचारास बळी पडलेल्या, हुंड्यामुळे जीवन हरवून बसलेल्या महिला मोठ्या प्रमाणात दिसून येतात. विनयभंग, बलात्कार, छेडछाड, ॲसिड हल्ला, स्त्री भ्रूण हत्या यासारखे हिंसाचार सर्रास होताना दिसून येतात. यामुळे हिंसेपासून महिला सुरक्षित नाहीत असे दिसून येते. हिंसेपासून संरक्षण व्हावे म्हणून कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा, कामाच्या

ठिकाणी लैंगिक छळास प्रतिबंध कायदा, लिंगनिदान प्रतिबंध कायदा यासारखे कायदे अस्तित्वात आहेत. या कायद्यांविषयी महिलांच्या मनात जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे.

**५. संविधानिक हक्क**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी भारत लोकसत्ताक देश म्हणून घोषित केला गेला. भारतीय राज्यघटनाही याच दिवसापासून अंमलात आली. राज्यघटनेची सुरूवात ज्या सरनाम्याने झाली त्यातील पहिलेच वाक्य 'आम्ही स्वतंत्र भारताचे नागरिक' हे आहे. या शब्दामध्ये सर्व जातीचे, धर्माचे, वंशाचे, स्त्रिया व पुरूष यांचा समावेश होतो. मुलभूत हक्क हे भारतीय राज्यघटनेचा आत्मा आहे. समाजातील दुर्बल घटक, स्त्रिया, अल्पसंख्यांक यांची जबाबदारी शासनावर टाकण्यात आली आहे. भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मुलभूत हक्कांमध्ये समतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरूद्धचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क आणि घटनात्मक उपायांचा हक्क यांचा समावेश होतो.

**भारतीय संविधानातील महिलाविषयक तरतुदी**

१. कलम १४ नुसार राज्यघटना प्रत्येक नागरिकाला कायद्याची समानता व कायद्याचे समान संरक्षण देते.
२. कलम १५ (१) नुसार धर्म, वंश, जात, लिंग यावरून सार्वजनिक स्थान व जागा यांचा वापर करण्यास कुठल्याही भारतीय नागरिकास इतर भारतीय नागरिकांशी भेदभाव करता येणार नाही.
३. कलम १५ (३) नुसार राज्य महिला व बालकांसाठी विशेष तरतुदी करू शकते.
४. कलम १६ (२) नुसार कोणत्याही नागरिकाला लिंगभावाच्या आधारे राज्यसेवेतील पदाकरीता भेदभाव केला जाणार नाही वा अपात्र ठरविले जाणार नाही.
५. कलम २१ नुसार कायद्याने प्रस्थापित केलेल्या प्रक्रियेशिवाय व्यक्तीच्या जिवीत व स्वातंत्र्याच्या हक्काचा संकोच करता येणार नाही.
६. कलम २३ नुसार मानवाचा व्यापार अथवा वेठबिगारास प्रतिबंध करण्यात आला आहे.
७. कलम ३९ नुसार स्त्री व पुरूष या दोहोंनाही समान कामासाठी समान वेतन देण्यात येईल.

८. कलम ३९ (अ) नुसार पुरूष आणि स्त्रियांना उपजिविकेची पुरेशी साधने मिळविण्याचा समान हक्क आहे.

९. कलम ३९ (ई) नुसार स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे वय यांचा दुरूपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय वा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडू नये.

१०. कलम ४२ नुसार राज्यसंस्था कामाबाबत न्याय आणि मानवोचित परिस्थिती उपलब्ध करण्यासाठी व प्रसुतीसहाय्यासाठी तरतुद करेल.

११. कलम ५१ (अ) (ई) नुसार स्त्रियांच्या प्रतिष्ठेला दुय्यमत्व आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे हे प्रत्येक भारतीयाचे मुलभूत कर्तव्य असेल.

१२. कलम २४३ (ड) ३ नुसार प्रत्येक पंचायतीमध्ये प्रत्यक्ष निवडणुकीत भरल्या जाणाऱ्या एकूण जागापैकी एक तृतीयांश पदे महिलांसाठी राखीव असेल.

१३. कलम २४३ (ड) ४ नुसार प्रत्येक स्तरावरील पंचायतीमधील एकूण पदाधिकारी पदापैकी एक तृतीयांश पदे महिलांसाठी राखीव असेल.

१४. कलम २४३ (ट) ३ नुसार प्रत्येक नगरपालिकेतील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या संख्येपैकी एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव असेल. (जाधव, शिरापूरकर, २०१५)

राज्यघटनेमध्ये महिलांच्या हक्कांसाठी अनेक उपाय योजलेले आहेत. हे हक्क डावलले गेल्यास व्यक्ती घटनात्मक उपायांच्या अधिकाराचा वापर करू शकते. भारतात राज्यघटनेने दिलेल्या मुलभूत हक्कांचे रक्षण न्यायसंस्था करते.

भारतात महिलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी मानवी हक्क आयोग, महिला आयोग, राज्य महिला आयोग तसेच विविध कायदे अस्तित्त्वात आहेत. मात्र महिलांवरील अन्याय व अत्याचारात दिवसेंदिवस वाढच होताना दिसून येत आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे महिलांच्या मानवी हक्काविषयी समाजामध्ये व विशेषत: महिलांमध्ये जागृती असल्याचे दिसून येत नाही. महिलांच्या मानवी हक्कांविषयी शिक्षणातून जनजागृती होणे गरजेचे आहे. महाविद्यालयीन स्तरावर विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थिनींमध्ये मानवी हक्कांची

विशेषत: महिलांच्या मानवी हक्कांची जाणीव निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून संशोधकाने प्रस्तुत विषयावर संशोधन केले आहे.

**सैद्धांतिक पार्श्वभूमी**

मानवी हक्कांचे स्वरुप अभ्यासायचे वा समजून घ्यायचे असेल तर मानवी हक्कांच्या अध्ययनाचे दृष्टीकोन अभ्यासणे गरजेचे आहे. मानवी हक्कांचे अध्ययन तत्त्वज्ञानशास्त्रीय/सैद्धांतिक आणि उपयुक्त दृष्टीकोनातून केले जाते. प्रस्तुत संशोधनामध्ये मानवी हक्कांतील नैसर्गिक हक्कांचा सिद्धांत आणि मानवी हक्काविषयक न्यायाचा सिद्धांत या सिद्धांतांचा आधार घेतला आहे.

**नैसर्गिक हक्कांचा सिद्धांत**

या सिद्धांताच्या पुरस्कर्त्यांच्या मते मानवाला जन्मताच काही हक्क प्राप्त होतात. हे हक्क त्याच्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. स्वातंत्र्यांचा आणि समानतेचा हक्क हे त्यातील प्रमुख हक्क होय. समाज आणि राज्याच्या स्थापनेच्या पूर्वी सर्व मानव समान होते. समाज आणि राज्याची स्थापना ही नैसर्गिक हक्कांच्या रक्षणासाठीच झाली आहे.

लास्कीच्या मते 'निसर्गनियमानुसार सर्व मानव समान आहेत. त्यामुळे इतरांच्या हक्कांवर कुणीही गदा आणू नये.' एलेन पॅगेल्सच्या मते 'व्यक्तीचे काही हक्क समाजाच्या संदर्भात किंवा समाजाच्या विरोधात असू शकतात. की जे हक्क समाजाने मान्य केले पाहीजेत. व त्याप्रमाणे क्रिया करणे व्यक्तीवर बंधनकारक असले पाहिजे. तसेच ते व्यक्तीचा विचार करता मूलभूत स्वरुपाचे असावेत.'

येथे मानवी हक्क समाजाच्या बाजूचे अथवा विरोधात असले तरी या मानवी हक्कांचे अस्तित्त्व स्वतंत्र असते. व मानवी हक्क समाज निर्माण होण्यापूर्वीपासूनच अस्तित्त्वात असतात. फक्त त्याची जाणीव व्यक्तींना करुन देणे गरजेचे असते. (कुल्हरी २०१०).

**मानवी हक्काविषयक न्यायाचा सिद्धांत**

जॉन रॉवल्स यांनी मानवी हक्काविषयक न्यायाचा सिद्धांत मांडला. त्यांच्यामते सामाजिक संस्थांचा सद्‌गुण म्हणजे न्याय. मानवी हक्क म्हणजे न्यायाचा शेवट होय. त्यांच्या मते न्यायाची दोन तत्त्वे आहेत.

१. व्यक्तीला समान हक्क मिळाले पाहिजेत. हे अधिकार एकूण समाजव्यवस्थेच्या समान मूलभूत स्वातंत्र्यावर आधारित असावे.

२. आर्थिक आणि सामाजिक समानता अशा तऱ्हेने व्यवस्थितपणे मांडली पाहिजे की, ज्याद्वारे मितव्ययाच्या तत्त्वानुसार कमीत कमी मदतीच्या सहाय्याने जास्तीत जास्त फायदा मिळवणे शक्य होईल. आणि एखाद्या स्थानावर आणि कार्यालयात सर्व परिस्थितीत संधीची समानता असेल.

कायदेतज्ञांच्या मते न्याय म्हणजे साध्या शब्दात सदाचरणी, प्रामाणिक, योग्य आणि समानतेच्या पार्श्वभूमीवर वापरण्यात येणारी संज्ञा होय. न्याय ही अशी एक महत्त्वपूर्ण संज्ञा आहे. कि जिने अनेक क्षेत्रातील विद्वानांचे व विशेषता कायदेतज्ञांचे व तत्त्वज्ञांचे लक्ष आकर्षित केले. जर निरंकुश न्याय साध्य करायचा असेल तर विद्वानांना अनेक घटक निर्धारित करावे लागतात. जर तुम्हाला परीपूर्ण न्याय साध्य करायचा असेल तर तुम्हाला समानता, नैतिकता, नितीशास्त्र, इत्यादी सकंल्पनांवरही भर द्यावा लागतो. मानवी हक्कांचा हेतू हा प्रत्येक राज्याने आपल्या नागरिकांना स्थिर परिस्थिती प्राप्त करुन दिली पाहिजे हा असतो. न्यायाला सर्वोच्च मूल्य असून ते साध्य करणे राज्याचे कर्तव्य आहे. (कुलकर्णी, २०१३)

### १.३ संशोधनाची गरज

प्रस्तुत संशोधन महिलांच्या हक्काविषयी अर्थात त्यांच्या नैसर्गिक हक्काशी संबंधित आहे. समाजातील अनेक समस्यांना सामोरे जाणाऱ्या महिलांना त्यांच्या मानवी हक्काविषयी माहिती असणे गरजेचे आहे. प्रस्तावित संशोधनाची गरज पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. समाजामध्ये पिढ्यान्पिढ्या कुटुंबात दुय्यम दर्जा दिल्याने कौटुंबिक अत्याचारापासून मुक्ततेसाठी, स्त्रियांना त्यांच्या हक्कांची माहिती होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

२. समाजामध्ये घडणाऱ्या बलात्कार, लैंगिक छळ, शारीरिक व मानसिक अत्याचार यासारख्या घटनांपासून संरक्षण मिळविण्यासाठी त्या विषयीच्या तरतुदींची माहिती संक्रमित होऊन स्त्रियांच्या सबलीकरणास मदत मिळण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

३. सामाजिक रूढींमुळे उद्भवणाऱ्या स्त्री–पुरूष भेदाभेद, हुंडा प्रथा, बालविवाह या समस्यांना सामोरे जाण्याची वृत्ती विद्यार्थिनींमध्ये निर्माण होण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

४. स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कासाठी, समानतेसाठी आणि त्यांच्या सबलीकरणासाठी महाविद्यालयीन स्तरावर त्यांना योग्य ज्ञान व माहिती मिळून सक्षम समाज निर्मितीमध्ये त्यांचे योगदान मिळण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

## १.४ संशोधनाचे महत्त्व

मानवी हक्क म्हणजे प्रत्येक मानवाला जन्मापासून असलेले अधिकार. या अधिकाराच्या उल्लंघनामध्ये महिलांच्या हक्कांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणात होताना दिसून येते. प्रस्तुत संशोधनातून महिलांच्या मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाद्वारे महाविद्यालयीन विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्काविषयी जाणिवांच्या संपादनामध्ये वाढ होणार आहे. या दृष्टीने प्रस्तुत संशोधन कार्य महत्त्वाचे ठरणार आहे. संशोधनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे–

१. महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या मानवी हक्क विषयक माहिती संपादनात वाढ होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.
२. महिलांवर दिवसेंदिवस अत्याचारात होणाऱ्या वाढीमुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या अत्याचाराविरोधी असणाऱ्या विविध कायद्यांची माहिती होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.
३. महाविद्यालयीन जीवनानंतर गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थिनींना महिलांच्या हक्कांविषयी माहिती होणार आहे. कुटुंबव्यवस्थेच्या या महत्त्वाच्या घटकास महिला मानवी हक्कांची जाणीव होऊन स्त्रियांच्या कौटुंबिक दर्जात सुधारणा होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.
४. आजची महाविद्यालयीन विद्यार्थिनी उद्याची गृहिणी, आई तसेच विविध नातेसंबंधातून कुटुंबातील महत्त्वाची भूमिका पर पाडणार आहे. प्रस्तुत संशोधनातून तिने अवगत केलेल्या ज्ञानाचा फायदा कुटुंबातील व्यक्तींबरोबरच भावी पिढीमध्ये संक्रमित होऊन संस्कारक्षम आणि महिलांच्या सन्मानाची आणि तिच्या हक्काची जपवणूक होण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.
५. महाविद्यालयीन शिक्षणानंतर विद्यार्थिनी नोकरी, व्यवसाय, स्वयंरोजगारानिमित्त विविध स्तरावर कार्यरत होणार आहेत. मानवी हक्काविषयी, स्त्रियांच्या हक्काविषयी त्यांनी संपादन

केलेले ज्ञान त्यांना त्या त्या क्षेत्रात स्त्रियांच्या सन्मानासाठी, त्यांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण आहे.

**१.५ संशोधनाचे शीर्षक**

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे विकसन व परिणामकारकतेचा अभ्यास.

**१.६ संशोधन समस्या विधान**

पुणे जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करून त्याची परिणामकारकता तपासणे.

**१.७ कार्यात्मक व्याख्या**

**१. पुणे जिल्हा**

**संकल्पनात्मक व्याख्या**

महाराष्ट्र राज्यातील एक प्रशासकीय घटक, प्रशासकीय सोयीसाठी महाराष्ट्राची अनेक जिल्ह्यांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. त्यातील एक जिल्हा म्हणजे पुणे जिल्हा होय.

**कार्यात्मक व्याख्या**

महाराष्ट्र राज्यातील एक प्रशासकीय विभाग.

**२. वरिष्ठ महाविद्यालय**

**संकल्पनात्मक व्याख्या**

उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर उच्च शिक्षणाची व पदवी मिळविण्याची सुविधा ज्या शैक्षणिक संस्थेत होते तिला महाविद्यालय म्हणतात. महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय, शेतकी, व्यवस्थापन इत्यादी विद्याशाखांमधील विषयांचे अध्ययन, अध्यापन करण्याची सोय असते. व्यापक अर्थाने उच्च माध्यमिक शिक्षणानंतरचे शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थेला महाविद्यालय म्हटले जाते. महाविद्यालये ही विद्यापीठाशी संलग्नीत असतात. (जोशी, २००७)

**कार्यात्मक व्याख्या**

ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये पदवीचे शिक्षण दिले जाते अशी शैक्षणिक संस्था म्हणजे वरिष्ठ महाविद्यालय होय.

**कला शाखा**

**संकल्पनात्मक व्याख्या**

महाविद्यालयीन शिक्षणामध्ये कला, शास्त्र, वाणिज्य, तंत्र इत्यादी अनेक शाखा उपलब्ध आहेत. कला विद्याशाखेत भाषा, संस्कृत, प्राकृत इत्यादी विषयांसह मानव्य शाखेतील राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल, गणित, मानसशास्त्र इ. विषय येतात. गणित भूगोल यासारखे काही विषय शास्त्र व कला या दोन्ही विद्याशाखेत शिकविले जातात. (जोशी, २००७)

**कार्यात्मक व्याख्या**

वरिष्ठ महाविद्यालयामध्ये वेगवेगळ्या विद्याशाखा असतात. पुणे विद्यापीठाशी संलग्नीत वरिष्ठ महाविद्यालयातील एक शाखा म्हणजे कला शाखा होय.

**महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम**

**कार्यात्मक व्याख्या**

महिलांच्या मानवी हक्कातील वैवाहिक हक्क, वारसा हक्क, नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क, हिंसेपासून संरक्षणाचा हक्क, संविधानिक हक्क या पाच हक्कांच्या माहिती संपादनात वाढ होण्यासाठी तयार केलेला कालबद्ध कार्यक्रम.

**परिणामकारकता**

**कार्यात्मक व्याख्या** : महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे कला शाखेतील विद्यार्थिनींच्या मानवी हक्काविषयी माहिती संपादनात झालेली वाढ.

## १.८ संशोधनाची उद्दिष्टे

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्काविषयी असलेल्या माहितीची सद्यस्थिती तपासणे.

२. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करणे.

३. वरिष्ठ महाविद्यालातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

## १.९ संशोधनाची गृहीतके

१. शालेय अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र या विषयात मानवी हक्काबद्दल माहिती दिलेली आहे. (इयत्ता आठवी, नागरिकशास्त्र पाठ्यपुस्तक)

२. समाजामध्ये महिलांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होताना आढळते. (माहेश्वरी, २०११)

३. महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थिनींना मानवी हक्कांचे शिक्षण देणे गरजेचे आहे. (राधामणी, २०१५)

## १.१० संशोधनाचे प्रश्न

महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थिनींना महिलांच्या मानवी हक्काविषयी माहितीची काय स्थिती आहे?

## १.११ परिकल्पना

### संशोधन परिकल्पना

१. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या वैवाहिक हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

२. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या वारसा हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

३. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

४. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या हिंसेपासून संरक्षणाचा हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

५. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या संविधानिक हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

६. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

**शून्य परिकल्पना**

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील वैवाहिक हक्क या घटकाच्या संपादन गुणाच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

२. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील वारसा हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

३. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क या घटकाच्या संपादन गुणाच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

४. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकाच्या संपादन गुणाच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

५. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील संविधानिक हक्क या घटकाच्या संपादन गुणाच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

६. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील संपादन गुणाच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

## १.१२ संशोधनाची व्याप्ती, मर्यादा, परिमर्यादा

**व्याप्ती**

१. प्रस्तुत संशोधन हे पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील कला शाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींशी संबंधित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे मानवी हक्कांशी संबंधित आहे.

## मर्यादा

१. प्रस्तुत संशोधनातून आलेले निष्कर्ष हे पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींकडून आलेल्या प्रतिसादावर आधारित आहे.

२. प्रस्तुत संशोधनामध्ये विद्यार्थिनींच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक परिस्थितीवर संशोधकाचे नियंत्रण नाही.

## परिमर्यादा

१. प्रस्तुत संशोधन हे पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित १२ वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी माध्यमाच्या कला शाखेतील टी.वाय.बी.ए. वर्गातील विद्यार्थिनींपुरते परिमर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे उत्तर पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ आणि शिरूर या तालुक्यांपुरते परिमर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे महिलांच्या मानवी हक्कातील वैवाहिक हक्क, वारसा हक्क, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क, हिंसेपासून संरक्षणाचा हक्क, संविधानिक हक्क या हक्कांपुरते परिमर्यादित आहे.

वरीलप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाची पार्श्वभूमी, मानवी हक्कांची संकल्पना, महिलांचे मानवी हक्क, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधन समस्येचे विधान, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, परिकल्पना विशद केल्या आहेत. पुढील प्रकरण दोनमध्ये संशोधन विषयाशी संबंधित संदर्भ साहित्य व पूर्व संशोधनाचा आढावा घेतला आहे.

## प्रकरण दुसरे

# संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा

## प्रकरण दुसरे

# संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २.१ | प्रास्ताविक | ३१ |
| २.२ | संबंधित साहित्य व पूर्व संशोधन आढाव्याचे महत्त्व | ३१ |
| २.३ | संबंधित साहित्य व पूर्व संशोधनाच्या अभ्यासाची उद्दिष्टे | ३२ |
| २.४ | संबंधित साहित्याचे प्रकार | ३२ |
| २.५ | प्रस्तुत संशोधनासाठी संदर्भस्थळे | ३३ |
| २.६ | संदर्भ साहित्याचा आढावा | ३३ |
| २.६.१ | पुस्तके | ३४ |
| २.६.२ | मासिके | ४४ |
| २.६.३ | वर्तमानपत्रे | ५० |
| २.६.४ | संकेतस्थळे | ५३ |
| २.७ | पूर्व संशोधनाचा आढावा | ५४ |
| २.७.१ | पी.एच.डी. संशोधन | ५४ |
| २.८ | प्रस्तुत संशोधन आणि पूर्व संशोधन यातील साम्य | ६८ |
| २.९ | प्रस्तुत संशोधन आणि पूर्व संशोधन यातील भेद | ६८ |
| २.१० | संबंधित संशोधन अभ्यासाच्या आढाव्याचा बोध | ६९ |
| २.११ | संबंधित साहित्याच्या आढाव्याचा संशोधकास झालेला उपयोग | ७० |
| २.१२ | प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण | ७१ |

# प्रकरण दुसरे

# संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा

## २.१ प्रस्तावना

संशोधनास प्रारंभ करण्यापूर्वी संशोधकास स्वत:च्या विषयाशी संबंधित साहित्य आणि पूर्वसंशोधन यांचा आढावा घेणे गरजेचे असते. आपल्या संशोधन विषयाच्या अनुषंगाने कोणत्या साहित्याचा आढावा घेणे आवश्यक आहे याचा विचार करून संशोधन विषयाशी निगडीत संदर्भ साहित्याचा, ग्रंथांचा तसेच यापूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे हा संशोधनाचा महत्त्वाचा भाग आहे. संदर्भ साहित्याच्या आढाव्याचे स्वरूप जेवढे व्यापक तेवढे संशोधन दर्जेदार होण्यास मदत होते.

## २.२ संबंधित साहित्य व पूर्व संशोधन आढाव्याचे महत्त्व

संशोधनाचा दर्जा हा संशोधकाने संशोधनावेळी घेतलेल्या आढाव्यावरून स्पष्ट होतो. संशोधकास भेडसावणारी समस्या सोडविण्यासाठी पूर्वी या प्रकारची समस्या कशी सोडविली याचा विचार करावा लागतो. संशोधन विषयाशी निगडीत साहित्याचा अभ्यास केल्यास निवडलेल्या विषयावरील संशोधन निश्चितच अधिक चांगले होते. खालील बाबींवरून संशोधनामध्ये संबंधित साहित्य व पूर्व संशोधनाच्या आढाव्याचे महत्त्व स्पष्ट होते.

१. संबंधित साहित्याच्या आढाव्यामुळे संशोधनाची व्याप्ती, संशोधनाची मर्यादा तसेच परिमर्यादा ठरविता येतात.
२. संशोधकास संशोधन योग्य दिशेने नेण्यास मदत होते.
३. संशोधकास संशोधन विषयासंबंधीचे सखोल ज्ञान प्राप्त होते.
४. संशोधकास संशोधनासाठी आवश्यक पुरावे संबंधित साहित्याच्या आढाव्यातून मिळतात.
५. विषयाशी संबंधित क्षेत्रात कोणती पूर्व संशोधने झालेली आहेत व कोणत्या बाबी अजून बाकी आहेत हे समजते.
६. वेगवेगळ्या संशोधनात वापरलेल्या विविध संशोधन पद्धती, कसोट्या लक्षात आल्यानंतर संशोधकास स्वत:च्या संशोधनास आवश्यक असलेली पद्धती ठरविण्यास दिशा मिळते.
७. पूर्वीच्या संशोधनातील सिद्ध झालेल्या निष्कर्षांचा आधार संशोधकास घेता येतो.
८. संशोधकास संशोधनातील गृहितकृत्ये मांडण्यासाठी पूर्वीच्या संशोधनाची मदत होते.

९. संशोधनासाठी वापरण्याची विविध संख्याशास्त्रीय तंत्रांची माहिती पूर्व संशोधनाच्या आढाव्यातून मिळते.

## २.३ संबंधित साहित्य व पूर्व संशोधनाच्या अभ्यासाची उद्दिष्टे

१. विषयक्षेत्राचा परिचय करून घेऊन संशोधन समस्येची निश्चिती करणे.

२. संशोधन विषयाची पुनरावृत्ती टाळणे.

३. संशोधन विषयासाठी संशोधन पद्धती, उद्दिष्टे, परिकल्पना यांची माहिती करून घेणे.

४. संशोधनातील माहिती विश्लेषणाची साधने, तंत्रे यांची माहिती करून घेणे.

५. संदर्भ साहित्याचा अभ्यास करून स्वतःची ज्ञानवत्ता वाढविणे.

६. आधारसामग्री व निष्कर्ष याविषयी तुलनात्मक माहिती मिळविणे.

## २.४ संबंधित साहित्याचे प्रकार

संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे पुढील प्रमुख दोन प्रकार पडतात.

### १. संदर्भ साहित्य

अ) संदर्भ पुस्तके

ब) मासिके

क) नियतकालिके

ड) वृत्तपत्रे

इ) संकेतस्थळे

### २. पूर्व संशोधन

अ) पी.एच.डी. स्तरावरील संशोधने

ब) एम.फिल. स्तरावरील संशोधने

क) एम.एड. स्तरावरील संशोधने

ड) एस.सी.इ.आर.टी. संशोधने

### प्रस्तुत संशोधनातील संबंधित साहित्यातील विविधता

१. संबंधित विषयाशी निगडीत संदर्भ ग्रंथ

२. संशोधन प्रक्रियेशी संबंधित संदर्भ ग्रंथ

३. पी.एच.डी. स्तरावरील पूर्वसंशोधने

४. विविध संकेतस्थळावरील संशोधने

## २.५ प्रस्तुत संशोधनासाठी संदर्भस्थळे

१. डॉ.बाबासाहेब जयकर ग्रंथालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

२. ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

३. ग्रंथालय, शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

४. ग्रंथालय, श्री शिव छत्रपती महाविद्यालय, ता.जुन्नर, जि.पुणे.

५. ग्रंथालय, आय.आय.ई., पुणे.

६. ग्रंथालय, अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर, पुणे.

७. ग्रंथालय, राज्यशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

८. ग्रंथालय, सावित्रीबाई फुले महिला अभ्यास केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

९. ग्रंथालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

१०. ग्रंथालय, डॉ. एम. ए. खान शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मंचर, जि.पुणे.

## २.६ संदर्भ साहित्याचा आढावा

संशोधकाने घेतलेल्या संबंधित साहित्याचा आढावा पुढील सारणीमध्ये दिलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुढीलप्रमाणे संबंधित साहित्याचा आढावा घेतला आहे.

**कोष्टक क्र. २.१ : संबंधित साहित्याच्या आढाव्याचा तपशील**

| अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | पुस्तके : इंग्रजी | १८ |
| २ | पुस्तके : हिंदी | ९ |
| ३ | पुस्तके : मराठी | १६ |
| ४ | मासिके | २३ |
| ५ | वर्तमानपत्रे | १० |
| ६ | संकेतस्थळे | ९ |
| ७ | पूर्व संशोधन : पी.एच.डी. | १२ |
| | **एकूण** | **९७** |

### २.६.१ पुस्तके

### २.६.१.१ इंग्रजी पुस्तके

**१. Mahapatra, S. (2005).** ***Modern Encyclopedia of Women and Development : Development of Women Challenges and Response,*** **Vol-1, New Delhi, Rajat Publication.**

सदर पुस्तकामध्ये महिलांच्या विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, महिलांचा मानसिक व सामाजिक विकास, महिलांच्या विकासामध्ये शिक्षणाचे असणारे योगदान, मानवी संसाधन म्हणून महिलांचे योगदान, तांत्रिक विकास आणि ग्रामीण भागातील महिलांचा विकास यातील संबंधावर भाष्य करण्यात आले आहे. या पुस्तकातून महिला विकासाच्या विविध घटकांची माहिती संशोधकास मिळाली.

**२. Mahapatra, S. (2005).** ***Modern Encyclopedia of Women and Development : Reflection of Crime against of Women,*** **Vol-5, New Delhi, Rajat Publication.**

या पुस्तकामध्ये मानवी हक्क आणि सामाजिक न्याय यांची सांगड घालण्यात आली आहे. लेखकाने स्वातंत्र्याचा हक्क, मार्गदर्शक तत्त्वे, सास्कृतिक आणि शैक्षणिक हक्क, सामाजिक न्यायाची मुलभूत तत्त्वे यांचे विवेचन केले आहे. प्रस्तुत पुस्तकातून संशोधकास मानवी हक्कांच्या स्वरूपाविषयी माहिती मिळाली.

**३. Sharma, G. (1997).** ***Human Rights and Social Justice,*** **New Delhi, Deep and Deep Publication.**

सदर पुस्तकामध्ये मानवी हक्कांचे रक्षण यावर भर देण्यात आला आहे. मानवी हक्क आणि सामाजिक न्याय यामधील संबंधावर चर्चा करण्यात आली आहे. सामाजिक न्याय ही संकल्पना मानवी हक्कांच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण असून भारतीय राज्यघटनेने सामाजिक न्यायाच्या भूमिकेचा केलेला अवलंब यावर विस्तृत चर्चा प्रस्तुत पुस्तकामध्ये केलेली आहे. या पुस्तकातून संशोधकास मानवी हक्क आणि सामाजिक न्याय यातील संबंध समजण्यास मदत झाली. तसेच संशोधनाची व्याप्ती ठरविण्यासाठी सदर पुस्तकाचा उपयोग झाला.

४. **Sharma, G. (1997).** ***Social Secutiry and Human Rights,*** **New Delhi, Deep and Deep Publication.**

सदर पुस्तकामध्ये मानवी हक्कांची संकल्पना, सामाजिक न्याय आणि सामाजिक संरक्षणाची संकल्पना यांची मांडणी केली आहे. यामध्ये जीवन जगण्याचा हक्क, यातनेपासून संरक्षणाचा हक्क, गुलामगिरीपासून मुक्ततेचा हक्क, भाषण, स्वातंत्र्याचा हक्क, विचार, विवेक आणि धर्म स्वातंत्र्याचा हक्क यांची चिकित्सक मांडणी केली आहे. सदर पुस्तकाचा उपयोग संशोधकास साधननिर्मितीसाठी झाला.

५. **Schulz, W. F. (2009).** ***The Future of Human Rights,*** **New Delhi, Manas Publications.**

या पुस्तकामध्ये दहशतवादाचा प्रश्न आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्या अनुषंगाने मानवाधिकाराचे स्वरूप याविषयीचे विवेचन केले आहे. राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून कायद्याचे महत्त्व यांचा विचार केला आहे. जागतिक स्तरावरील मानवी हक्कांच्या प्रश्नासंदर्भातले चिकित्सक विवेचन या ग्रंथाच्या माध्यमातून लेखकाने केल्याचे पहावयास मिळते. सदर पुस्तकातून संशोधकास आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानवी हक्कांचे स्वरूप समजण्यास मदत झाली.

६. **Chandra, U. (2014).** ***Human Rights Alahabad,*** **Alahabad Law Agency Publications.**

सदर पुस्तकामध्ये मानवी हक्कांचा उदय आणि विकास यांची संकल्पना मांडली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाचे मानवी हक्काविषयीचे धोरण आणि कार्य तसेच राजकीय हक्क याविषयी संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका लेखकाने दिलेली आहे. सदर पुस्तकाचा उपयोग संशोधकास संशोधनासाठी तयार करावयाच्या साधननिर्मितीसाठी झाला.

७. **Sen, S. (1998).** ***Human Rights in a Developing Society,*** **New Delhi, APH Publishing Corporation.**

सदर पुस्तकामध्ये मानवी हक्कांच्या शिक्षणाचा विचार सखोलपणे मांडला आहे. विकसित देशामधील मानवी हक्कांचे स्वरूप तसेच मानवी हक्कांच्या रक्षणार्थ विविध विकसित देशांनी केलेले प्रयत्न यांचा अभ्यास या पुस्तकाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. सदर पुस्तकातून मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम ठरविण्यासाठी आवश्यक असणारी पार्श्वभूमी संशोधकास मिळाली.

८. **Alston, P. & Robinson, M. (2006).** ***Human Rights and Development Towards Mutual Reinforcement,*** **New York, Oxford University Press.**

सदर पुस्तकामध्ये सामाजिक हक्क आणि अधिकारांची मांडणी केली आहे. महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक हक्कांच्या सक्षमीकरणासाठी होत असलेल्या विविध प्रयत्नांचा आढावा या पुस्तकाच्या माध्यमातून घेण्यात आला आहे. खाजगी क्षेत्रातील महिलांच्या सहभागाची माहिती, महिलांच्या न्यायालयीन हक्काविषयी माहिती या पुस्तकातून मिळते. सदर पुस्तकातून संशोधकास सर्वेक्षणासाठी आवश्यक आशय मिळाला.

९. **Myneni, S. R. (2013).** ***Human Rights Hydrabad,*** **Asia Law House.**

सदर पुस्तकातून मानवी हक्काच्या संकल्पनेचा उदय आणि विकास, मानवी हक्कांची वैशिष्ट्ये, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय तसेच मानवी हक्कांच्या चळवळीतील स्वयंसेवी संस्थांची भूमिका याविषयीची माहिती देण्यात आली आहे.

१०. **Naik, V. & Sahani, M. (2011).** ***Human Rights and Social Justice,*** **New Delhi, Crescent Publishing Corporation.**

सदर पुस्तकामध्ये सामाजिक न्याय आणि महिलांचे अधिकार याविषयी माहिती देण्यात आली आहे. लोकशाही शासनयंत्रनेतील कायदा आणि सुव्यवस्था यांची चर्चा सदर पुस्तकात केली आहे. महिला आणि पुरूष यांच्यातील असमानतेची क्षेत्रे सांगताना आर्थिक सहभाग, आर्थिक संधी, राजकीय सामर्थ्य, शैक्षणिक सहभाग, आरोग्य आणि सोयी सुविधा यांची माहिती देण्यात आली आहे. सदर पुस्तकाचा उपयोग संशोधकास कार्यक्रम विकसनातील अध्ययनसाहित्य निर्माण करण्यासाठी झाला.

११. **Viplav and Bhaskar (2013).** ***Concept of Human Rights,*** **Meerat, Rahul Publishing House.**

सदर पुस्तकामध्ये मानवी हक्कांची संकल्पना मांडताना महिलांचे विविध हक्क, त्या हक्कांच्या उपभोगामध्ये भारतामध्ये येणाऱ्या विविध समस्या, भारतातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील महिलांची परिस्थिती, महिलांच्या आरोग्याच्या हक्काबाबत येणाऱ्या विविध समस्या यांची माहिती मिळते. संशोधनाच्या विषयाची व्याप्ती ठरविण्यासाठी या पुस्तकाचा उपयोग संशोधकास झाला.

१२. **Saksena, A. (2004).** ***Gender and Human Righst : Status of Women Workers in India,*** **Dehli, Shipra Publication.**

सदर पुस्तकामध्ये भारतातील नोकरी व व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या विविध हक्क आणि अधिकाराबाबत आणि त्यांच्या स्थितीबाबतचा आढावा लेखकाने घेतलेला आहे. नोकरी आणि व्यवसाय करणाऱ्या महिलांबाबतच्या राज्य आणि केंद्र सरकारच्या धोरणांची माहिती देण्यात आलेली आहे.

2. To find out the influence of awareness of women rights on the self concept of secondary school girl students.
3. To assess the influence of media on the self concept of secondary school girl students.
4. To study the difference between Malayalam medium and English medium students, Rural and Urban Students, difference among 8th, 9th and 10th class students, difference among Govt. Aided and Private School students etc. in Awareness of women rights, influence of media and self-concept.
5. To offer suggestions for the development of self-concept and awareness of women rights among secondary school girl students.

**Findings of the Study**

1. There exists a significant high positive relationship between awareness of women rights and self-concept of secondary girl students.
2. There exists a significant negative relationship between influence of media and self-concept of secondary girl students.
3. There is a significant difference between actual self-concept and ideal self-concept of secondary girl students.
4. Secondary girl students exhibit a lower level of self-concept than that of their expectation.

**10. Kumar, R. (2012).** ***Women and Human Rights in Haryana : A Critical Analysis*****. Ph. D dissertation, Maharshi Dayanand University, Rohtak.**

**Objectives of the Study**

1. To evaluate the various provisions of human rights for women in India.
2. To evaluate the role of political parties, NGO's, interest groups, media and judiciary in promoting women rights.
3. To examine how women rights violations takes place, besides constitutional provisions?
4. To evaluate the causes for violation.
5. To find out the areas of violation.
6. To evaluate the practice of socio-economic, civil and political rights of women.
7. To evaluate the impact of feminist movement on women rights condition in India.
8. To find out what necessary action or policies can be implemented for safeguarding the rights of the women?

**Findings of the Study**

1. Results of our questionnaire reveals that majority of women respondents56.84% were not aware about their rights. However, a total sum of 43% were aware about their rights.
2. Only 41,37% feels equality in family and society. This shows that slogan “Equality" only exists in paper not in practice.
3. Approximately 22% women know about constitutional provisions of women Human Rights. Illiteracy is the main cause behind this ...
4. Unawareness and illiteracy are the main hindrances behind the awareness of Government policies. So only 24% knows the policies and programmers for Women Empowerment.
5. Women generally avoid complaining to authorities to escape, social embarrassment. So, only26.49% goes to police about complaining the complaint.
6. Women were not satisfied with the present provisions. So, they (66.96%)want separate provisions for safeguarding their rights .
7. 61.90% women were not satisfied with the role of State Government in protecting Women Human Rights.
8. However, 63.99% women satisfied with the role of media in pro,tectingand promoting Women Rights.

**11. Roy A.C.(2013) *Human Rights and women : A study of the role of state commission for women’s in the northeast India.*Ph. D dissertation, Aasam University.**

**Objectives of the study**

1. To understand composition, function and status of the State Commissions for Women in Northeast India.
2. To identify and analyse the working and the role of the State Commissions for Women in cases of violations of women's rights.
3. To explore the relationship of NGOs with their respective SCWs.
4. To analyse the views of NGOs on the role of SCWs as also the role of the State Governments with regard to functioning of SCWs and NGOs.

**Findings of the Study**

1. Conflicts between ethnic groups, armed forces and armed opposition groups and the existing socio-cultural values have made Northeast India a fertile ground for the violation of women's rights. The enactment of ASCW Act1994, MSCW Act 2005 and TCW Act 1993 for the establishment of ASCWi n 1994, MSCW in 2005 and TCW in 1994 respectively has been a significant step towards protecting the rights of women.
2. At present the ASCW has eight members including the Chairperson and Vice Chairperson. Administrative functions of the ASCW have been discharged by ten (10) staff members under the supervision of the Member Secretary. In MSCW there are one Chairperson, one Vice Chairperson and four members. In MSCW nine (9) staff members discharge day to day functions of MSCW under the Secretary. In TCW there are seven members including the Chairperson and the Vice Chairperson. In TCW twenty eight(28) staff members discharge the functions of TCW under the supervision of the Member Secretary. However, in these three Commissions all staff members have either been deputed from other departments under their respective State Governments or appointed on contractual basis.
3. The ASCW Act, 1994 and the TCW Act, 1993 state that State Governments shall provide necessary staff to the Commissions for effective functioning. This implies that SCWs of these two States cannot appoint their own staff. They have to depend on their respective State Governments. However, the MSCW Act, 2005 states that the MSCW can appoint staff other than the Secretary to assist the Commission in its day-to-day function, either through direct recruitment or on deputation with the prior approval of the State Government. But the MSCW has not utilized this power of direct recruitment to meet its need of adequate staff members.

4. The ASCW, MSCW and TCW till date do not have their own Member Secretary/Secretary. The present Member Secretary of ASCW is an Escoffier under Govt. of Assam and is presently deputed to ASCW. In Scathe present Secretary is a Secretary to the Govt. of Meghalaya, Department of Social Welfare and has the additional charge of MSCW. In TCW the present Member Secretary is an Assistant Professor of a Govt. Degree college of the State and is deputed to the TCW.

**12. Yadav, V. (2012).** ***To study the Awareness about womens legal rights amongst girls students studying in diferant professional courses,*** **Ph. D dissertation, Jaipuresh Gyan Vihar University jagatpur.**

**Objectives of the Study**

1. To study the awareness about women's legal rights related to four aspects social, general, political and economic amongst girl students studying in different professional courses. These are as follows:(i) MBA (ii) B.Ed. (iii) M.Tech.(iv) MCA (v) PGDCA (vi) Law
2. To compare awareness about women's legal rights related to four aspects social, general, political and economic amongst girl students studying in MBA and B.Ed courses.
3. To compare awareness about women's legal rights related to four aspects social, general, political and economic amongst girl students studying in M.Tech. and B.Ed. Courses.
4. To compare awareness about women's legal rights related to four aspects social, general, political and economic amongst girl students studying in MCA and B.Ed. Courses.
5. To compare awareness about women's legal rights related to four aspects social, general, political and economic amongst girl students studying in PGDCA and B.Ed. Courses.
6. To compare awareness about women's legal rights related to four aspects social, general, political and economic amongst girl students studying in Law and B.Ed. Courses.

**Findings of the Study**

1. The result indicates that there is no significant difference amongst girl students studying in MBA and B.Ed. (Group A-1) courses regarding the social rights as an aspect of legal rights of women. It implies that both groups have equal level of

awareness about the social rights of women. Hence the null hypothesis is accepted.

2. The result indicates that there is significant difference amongst girl students studying in M.Tech. and B.Ed. (Group A-2) courses regarding the social rights as an aspect of legal rights of women. It implies that M.Tech. girls are more aware about the social rights of women than B.Ed. girls. Hence the null hypothesis is rejected.
3. The result indicates that there is significant difference amongst girl students studying in MCA and B.Ed. (Group A-3) courses regarding the social rights as an aspect of legal rights of women. It implies that MCA girls are more aware about the social rights of women than B.Ed. girls. Hence the null hypothesis is rejected.
4. The result indicates that there is significant difference amongst girl students studying in PGDCA and B.Ed. (Group A-4) courses regarding the social rights as an aspect of legal rights of women. It implies that PGDCA girls are more aware about the social rights of women than B.Ed. girls. Hence the null hypothesis is rejected.
5. The result indicates that there is significant difference amongst girl students studying in Law and B.Ed. (Group A-5) courses regarding social rights as an aspect of legal rights of women. It implies that Law girls are more aware about the social rights of women than B.Ed. girls. Hence the null hypothesis is rejected
6. The result indicates that there is significant difference amongst girl students studying in MBA. and M.Tech. (Group A-6) courses regarding social rights as an aspect of legal rights of women. It implies that M.Tech. girls are more aware about the social rights of women than MBA girls. Hence the null hypothesis is rejected.
7. The result indicates that there is significant difference amongst girl students studying in MBA and MCA (Group A-7) courses regarding social rights as an aspect of legal rights of women. It implies that MCA girls are more aware about the social rights than MBA girls. Hence the null hypothesis is rejected.
8. The result indicates that there is no significant difference amongst girl students studying in MBA and PGDCA (Group A-8) courses regarding social rights as an aspect of legal rights of women. It implies that both groups have equal level of awareness of the social rights of women. Hence the null hypothesis is accepted.

9. The result indicates that there is significant difference amongst girl students studying in MBA and Law (Group A- 9) courses regarding social rights as an aspect of legal rights of women. It implies that Law girls are more aware about the social rights of women than MBA girls. Hence the null hypothesis is rejected.

## २.८ प्रस्तुत संशोधन आणि पूर्व संशोधन यातील साम्य

१. प्रस्तुत संशोधन आणि पूर्व संशोधन हे मानवी हक्क या व्यापक विषयाशी संबंधित आहे.

२. प्रस्तुत संशोधन व पूर्व संशोधन हे महिलांच्या मानवी हक्काशी संबंधित आहे.

३. पूर्व संशेधन व प्रस्तुत संशोधनातून महिलांच्या हक्काविषयी जाणीव जागृती विकसित करण्याचा उद्देश आहे.

४. प्रस्तुत संशोधनामध्ये आणि पूर्व संशोधनामध्ये महिलांच्या मानवी हक्कांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

५. प्रस्तुत संशोधन व पूर्व संशोधन यामध्ये साधननिर्मिती, कृतिकार्यक्रम निर्मिती यावर भर देण्यात आला आहे.

६. प्रस्तुत संशोधन आणि संबंधित साहित्यातील बहुतांश पूर्व संशोधनामध्ये माहिती संकलनासाठी प्रश्नावली या तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

७. प्रस्तुत संशोधन व पूर्व संशोधन हे विद्यार्थ्यांच्या प्रगतीशी निगडीत आहे.

८. प्रस्तुत संशोधन व पूर्व संशोधन हे कार्यक्रम निर्मिती व कार्यक्रमाची परिणामकारकता यांच्याशी संबंधित आहे.

## २.९ प्रस्तुत संशोधन आणि पूर्व संशोधन यातील भेद

१. प्रस्तुत संशोधनामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींमधील महिला मानवी हक्काबातच्या माहितीच्या स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. तो संबंधित साहित्याच्या आढाव्यातील इतर संशोधनामध्ये नाही.

२. प्रस्तुत संशोधनामध्ये महिलांना समाजामध्ये भेडसावणाऱ्या विविध समस्या, महिलांचे विविध प्रश्न आणि त्यावरील उपाययोजनात्मक बाबी यांचा विचार करण्यात आला आहे. तर पूर्व संशोधनामध्ये शालेय स्तरावरील मुलींच्या समस्या, त्यांचे प्रश्न याचा अभ्यास करण्यात आला आहे.

३. प्रस्तुत संशोधनामध्ये महिलांच्या वैवाहिक हक्क, वारसा हक्क, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क, संविधानिक हक्क, हिंसेपासून मुक्ततेचा हक्क या हक्कांचा समावेश करण्यात आला आहे. तर पूर्व संशोधनामध्ये कौटुंबिक हिंसाचारापासून मुक्ततेचा हक्क, मानवी हक्क आदि बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

४. संबंधित संशोधनातून महिलांच्या मानवी हक्कांच्या जाणीव व जागृतीसाठी कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे तर इतर संशोधनामध्ये महिलांच्या मानवी हक्कांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

५. प्रस्तुत संशोधनामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी महिलांच्या मानवी हक्क विषयक कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे. तर पूर्व संशोधनामध्ये कार्यक्रमनिर्मिती करण्यात आलेली नाही.

६. प्रस्तुत संशोधनामध्ये पुणे विद्यापीठातील वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींचा समावेश माहिती संकलनासाठी आणि कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आला आहे. तर पूर्व संशोधनामध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट असणाऱ्या विद्यार्थिनींचा समावेश करण्यात आला आहे.

७. प्रस्तुत संशोधनामध्ये एकलगट अभिकल्पाची निवड करण्यात आली आहे तर पूर्व संशोधनातील बहुतांश संशोधनात दोन गटांचा समावेश करण्यात आला आहे.

### २.१० संबंधित संशोधन अभ्यासाच्या आढाव्याचा बोध

उपलब्ध विविध संदर्भ साहित्य पूर्व संशोधने याचा आढावा घेतल्यानंतर यापूर्वीच्या विविध स्तरावरील संशोधनामध्ये नोकरी करणाऱ्या महिलांच्या मानवी हक्कांचा तसेच शालेय स्तरावरील विद्यार्थिनींच्या हक्कांचा समावेश असलेला दिसून येतो. कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रश्नावर केवळ सर्वेक्षणात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे. शालेय स्तरावरील मुलींच्या हक्कांच्या बाबींचा समावेश काही संशोधनामध्ये करण्यात आलेला आहे. मात्र वैवाहिक व सामाजिक जीवनाच्या उंबरठ्यावर असणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या हक्कांबाबतचा अभ्यास पूर्व संशोधनाच्या आढाव्यातून झालेला दिसून येत नाही. प्रस्तुत संशोधनातून संशोधकाने वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे विकसन केले आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीनंतर महिलांच्या मानवी

हक्कांच्या जाणीवांमध्ये वाढ होताना दिसून येत आहे. अशा प्रकारचे संशोधन यापूर्वी झाल्याचे संबंधित संशोधनाच्या आढाव्यातून दिसून येत नाही. त्यामुळे संशोधकाने वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे विकसन व परिणामकारकतेचा अभ्यास हा विषय निश्चित केला आहे.

## २.११ संबंधित साहित्याच्या आढाव्याचा संशोधकास झालेला उपयोग

संशोधकाने संशोधन कार्यास योग्य दिशा मिळविण्यासाठी विविध संदर्भ पुस्तके, ग्रंथ मराठी, इंग्रजी, हिंदी पुस्तके, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे, यापूर्वी पीएच.डी., एम.फिल., स्तरावरील संशोधने, विविध संकेतस्थळे यांचा आढावा घेतला असून प्रस्तुत संशोधनामध्ये या आढाव्याचा पुढीलप्रमाणे उपयोग झाला.

१. संबंधित साहित्याचा आढावा घेतल्यानंतर संशोधकास संशोधनासाठीची समस्या निश्चित करता आली व पुनरावृत्ती टाळता आली.
२. संबंधित साहित्याच्या आढाव्यामुळे संशोधन विषयाची व्याप्ती, मर्यादा, परिमर्यादा योग्य रितीने ठरविता आल्या.
३. संबंधित साहित्याच्या आढाव्यामुळे संशोधनास मार्गदर्शक दिशा मिळाली. संशोधन कोणत्या मार्गाने पुढे न्यावे याविषयीची उपयुक्त माहिती मिळाली.
४. संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके तसेच परिकल्पना निश्चित करताना यापूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा उपयुक्त ठरला.
५. संशोधनासाठी निवडायची संशोधन पद्धती, संशोधनातील चले, नमुना निवडीच्या पद्धती, न्यादर्शाचा आकार याविषयीची माहिती पूर्व संशोधनातून मिळाली.
६. संशोधनामध्ये माहिती संकलनासाठी आवश्यक असणारी प्रश्नावलीची सप्रमाणता, विश्वसनियता याविषयीची माहिती मिळाली. त्यातून महिला मानवी हक्काविषयी प्रश्नावली तयार करण्यास मदत झाली.
७. महिला मानवी हक्कांचे स्वरूप, मानवी हक्कांच्या रक्षणासाठी असणाऱ्या विविध संस्था, त्यांचे स्वरूप याविषयीची माहिती संदर्भ साहित्याच्या आढाव्यातून मिळाली.
८. महिलांना सामोरे जावे लागत असणाऱ्या समस्यांचा अभ्यास, समस्यांचे स्वरूप, त्यावर असणाऱ्या विविध उपाययोजना, कायदे याविषयीचा वृत्तांत, संदर्भ साहित्याच्या

आढाव्यातून मिळाला. त्यामुळे महिलांच्या मानवी हक्काविषयीच्या सद्यस्थितीचा अभ्यास करताना उपयोग झाला.

९. संशोधनामध्ये माहिती संकलनानंतर त्या माहितीवर प्रक्रिया करून निष्कर्षापर्यंत पोहोचविण्यासाठी कोणत्या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर करावा याची माहिती पूर्व संशोधनाच्या आढाव्यातून प्राप्त झाली.

१०. पी.एच.डी. स्तरावरील संशोधनाच्या आढाव्यातून उद्दिष्टांची मांडणी, कार्यक्रमाचे विकसन व त्याची प्रत्यक्ष कार्यवाही यांची माहिती मिळाली. अहवाल लेखनामधील तांत्रिक बाबींची माहिती त्यातून प्राप्त झाली.

## २.१२ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण

प्रस्तुत संशोधनासाठी विविध स्त्रोतांतून संबंधित साहित्याचा व पूर्व संशोधनाचा आढावा संशोधकाने घेतला. हा आढावा घेत असताना संशोधकाच्या असे लक्षात आले की, महिलांच्या विविध हक्कांविषयी विविध ज्ञानशाखांमध्ये अभ्यास झालेला आहे. यामध्ये महिला आयोगाची महिला हक्काविषयीची भूमिका, मुस्लिम स्त्रियांच्या स्थितीमध्ये आणि हक्कविषयक जाणिवांमध्ये शिक्षणाचा झालेला परिणाम, माध्यमिक शाळेतील शिक्षकांसाठी तयार केलेल्या मानवी हक्कविषयक कृतिकार्यक्रमाचा विद्यार्थ्यांच्या संपादनावर होणारा परिणाम, विविध व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थिनींमध्ये मानवी हक्कविषयक जाणीव जागृतीचा अभ्यास यासारख्या विषयावर यापूर्वी संशोधने झालेली आहेत. प्रामुख्याने या संशोधनामध्ये सर्व्हेक्षण, प्रायोगिक या संशोधन पद्धती वापरलेल्या आहेत.

प्रस्तुत संशोधनामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करून त्याची परिणामकारकता अभ्यासली आहे. संशोधनामध्ये बहु संशोधन पद्धतीचा वापर संशोधकाने केला आहे. एकलगट अभिकल्पाचा अवलंब करून एकाच गटावर पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी दिलेली आहे. संशोधनामध्ये विकसित केलेला महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम हा पूर्णत: वेगळा व नाविन्यपूर्ण आहे. हा कार्यक्रम शैक्षणिक सिद्धांतावर आधारित आहे. असा कार्यक्रम यापूर्वीच्या ज्ञात संशोधनात वापरला गेलेला नाही. संशोधनामध्ये प्रामुख्याने वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींचा समावेश केला आहे. यापूर्वीची संशोधने ही माध्यमिक शाळेतील विद्यार्थिनी, विविध व्यावसायिक शिक्षण

घेणाऱ्या विद्यार्थिनी यांना केंद्रीभूत ठेऊन झालेली आहेत. परंतु पारंपरिक पदवी घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या मोठी आहे. त्यांना केंद्रीभूत ठेऊन संशोधने झालेली नाहीत. त्या दृष्टीनेही प्रस्तुत संशोधन वेगळे आहे.

**समारोप**

संबंधित साहित्याचा व पूर्व संशोधनाचा आढावा घेतल्यामुळे संशोधकास संशोधन कार्यास दिशा मिळाली. संशोधनातील पुनरावृत्ती टाळता येऊन संशोधनास आवश्यक असणारी उद्दिष्टे, गृहितके, परिकल्पना मांडताना मदत झाली. संशोधन समस्यानुसार संशोधनाची पद्धती ठरविता आली. तसेच माहिती संकलनाची साधने आणि माहिती विश्लेषणाची तंत्रे याविषयी माहिती मिळाली. त्यामुळे संशोधनाचे वेगळेपण मांडण्यास उपयोग झाला.

# प्रकरण तिसरे

# संशोधनाची कार्यपद्धती

## प्रकरण तिसरे

# संशोधनाची कार्यपद्धती


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ३.१ | प्रस्तावना | ७५ |
| ३.२ | संशोधनाचा अर्थ | ७५ |
| ३.२.१ | संशोधनाचे प्रकार | ७५ |
| ३.२.२ | प्रस्तुत संशोधनाचा प्रकार | ७५ |
| ३.३ | संशोधन पद्धती | ७६ |
| ३.४ | उद्दिष्ट क्र.१ ची कार्यवाही | ७७ |
| ३.४.१ | सर्वेक्षण पद्धती | ७८ |
| ३.४.२ | जनसंख्या | ७८ |
| ३.४.३ | नमुना निवड | ७८ |
| ३.४.४ | माहिती संकलनाची साधने | ८० |
| ३.५ | उद्दिष्ट क्र.२ ची कार्यवाही | ८३ |
| ३.५.१ | साधन निर्मिती पद्धती | ८३ |
| ३.५.२ | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचा मानसशास्त्रीय सिद्धांत | ८४ |
| ३.५.३ | साधन निर्मितीचे टप्पे | ८५ |
| ३.६ | उद्दिष्ट क्र.३ ची कार्यवाही | ९६ |
| ३.६.१ | प्रायोगिक संशोधन पद्धती | ९६ |
| ३.६.२ | चले | ९७ |
| ३.६.३ | प्रयोगाच्या कार्यवाहीचा ओघ तक्ता | ९७ |
| ३.६.४ | प्रायोगिक अभिकल्प | ९८ |
| ३.६.५ | प्रयोगासाठी साधन निर्मिती | १०२ |
| ३.६.६ | जनसंख्या आणि नमुना निवड | १०२ |
| ३.६.७ | प्रश्नावलीचे प्रमाणीकरण | १०५ |
| ३.७ | पूर्वचाचणीचे आयोजन | १०७ |
| ३.८ | प्रत्यक्ष प्रयोग | १०७ |
| ३.९ | उत्तर चाचणीचे आयोजन | १०७ |
| ३.१० | माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १०७ |

## प्रकरण तिसरे

# संशोधनाची कार्यपद्धती

### ३.१ प्रस्तावना

संबंधित साहित्य व पूर्व संशोधनाच्या आढाव्यानंतर संशोधकास संशोधनाची पद्धती व कार्यपद्धती यांची कल्पना आली. प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी संशोधकाने वापरलेल्या संशोधन कार्यपद्धतीची मांडणी केली आहे.

### ३.२ संशोधनाचा अर्थ

'मानवी मनाला अस्वस्थ करणाऱ्या बहुविध समस्यांचे सप्रमाण व विश्वसनीय समाधानासाठी आवश्यक असलेल्या आधारसामग्रीचे, माहितीचे संकलन व विश्लेषण करून त्यांचा अन्वयार्थ लावण्याची व्यवस्थाबद्ध प्रक्रिया म्हणजे संशोधन होय.'

बेस्ट आणि कान यांच्या मते 'Research is considered tobe more formul systematic intensive prossess of carrying on the scientific method of analysis' (Best and Kahn pp 18)

'शैक्षणिक संशोधन म्हणजे शिक्षण क्षेत्रातील उद्दिष्ट, अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन पद्धती, मुल्यमापन, विद्यार्थी, वातावरण, विविध संकल्पना, शैक्षणिक साहित्य, तंत्र, पाठ्यपुस्तके इत्यादी एक वा अनेक शैक्षणिक घटकांच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या समस्यांचे शास्त्रशुद्ध उत्तर शोधण्याचा केलेला अथवा करण्यात येणारा प्रयत्न.' (भिंताडे, २००९)

### ३.२.१ संशोधनाचे प्रकार

शैक्षणिक संशोधनाचे तीन प्रकार पडतात.

अ) मुलभूत संशोधन

ब) उपयोजित संशोधन

क) कृती संशोधन

### ३.२.२ प्रस्तुत संशोधनाचा प्रकार

प्रस्तुत संशोधनामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थिनींमध्ये महिला मानवी हक्कांच्या विकासासाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात आली. महिला मानवी हक्क कार्यक्रमाच्या साहाय्याने

विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्कांच्या जाणिवांचा विकास होतो का? हे पडताळून पाहण्यात आले आहे. म्हणून सदर संशोधन हे उपयोजित संशोधन आहे.

### ३.३ संशोधन पद्धती

शैक्षणिक संशोधन विविध पद्धतीने केले जाते. संशोधन पद्धती कोणती असावी हे संशोधन विषयाच्या स्वरूपावर व संशोधनासाठी कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे यावर अवलंबून असते.

### १. ऐतिहासिक संशोधन पद्धती

भूतकाळातील घटनांचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अर्थ लावला जातो. हा अर्थ लावण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचे केलेले उपयोजन म्हणजे ऐतिहासिक संशोधन होय. ऐतिहासिक संशोधन हे भूतकाळातील समस्येशी संबंधित असते.

### २. वर्णनात्मक संशोधन पद्धती

या पद्धतीमध्ये वर्तमानकाळातील प्रश्नांचा विचार केला जातो. यामध्ये मुलभूत स्वरूपाची माहिती जमा केली जाते. सद्यस्थितीशी संबंधित समस्यांवरील संशोधन वर्णनात्मक संशोधन पद्धतीमध्ये केले जाते.

### ३. प्रायोगिक संशोधन पद्धती

या संशोधनामध्ये भविष्यकाळाचा विचार केला जातो. विशिष्ट चलांचा उपयोग करताना इतर चलांना नियंत्रित ठेऊन विशिष्ट वातावरणात केवळ एका चलाच्या बदलाने होणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला जातो.

### प्रस्तुत संशोधनाची संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने संशोधनासाठी बहु संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. बहु संशोधन पद्धती म्हणजे संशोधनाच्या उद्दिष्टांना अनुसरून दोन किंवा दोनपेक्षा जास्त संशोधन पद्धतीचा अवलंब करणे होय. प्रस्तुत संशोधनात उद्दिष्टांना अनुसरून सर्वेक्षण पद्धती, साधननिर्मिती पद्धती आणि प्रायोगिक पद्धती या तीन पद्धतींचा अवलंब केला आहे.

**कोष्टक क्र. ३.१ : संशोधनातील मुख्य उद्दिष्टांनुसार संशोधनाची कार्यपद्धती**

| उद्दिष्टे | संशोधन पद्धती | नमुना निवड पद्धती | माहिती संकलन साधने | माहिती विश्लेषण साधने | माहिती सादरीकरण साधने |
|---|---|---|---|---|---|
| वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्कांविषयी असलेल्या माहितीची सद्यस्थिती तपासणे. | सर्वेक्षण पद्धती | यादृच्छिक पद्धती | प्रश्नावली | शेकडेवारी | आलेख |
| वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकासित करणे. | साधन निर्मिती पद्धती | सहेतुक | तज्ज्ञ प्रतिसाद शोधिका– पदनिश्चयन श्रेणी | शेकडेवारी | आलेख |
| वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे. | प्रायोगिक पद्धती | सहेतुक पद्धती | प्रश्नावली | मध्यमान, प्रमाण विचलन, टी परिक्षिका | आलेख |

## ३.४ उद्दिष्ट क्र.१ ची कार्यपद्धती

संशोधनामध्ये उद्दिष्ट क्र.१ साठी संशोधकाने पुढील कार्यपद्धतीचा वापर केला आहे.

**उद्दिष्ट क्र.१**

वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्कांविषयी असलेल्या माहितीची सद्यस्थिती तपासणे.

**कोष्टक क्र. ३.२ : उद्दिष्ट क्र. १ ची कार्यपद्धती**

| उद्दिष्ट | संशोधन पद्धती | नमुना निवड पद्धती | नमुना | माहिती संकलनाची साधने | माहिती विश्लेषणाची साधने | माहिती सादरीकरणाची साधने |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वेक्षण पद्धती | यादृच्छिक पद्धती | १२ महाविद्यालये, ७५६ विद्यार्थिनी | प्रश्नावली | शेकडेवारी | आलेख |

### ३.४.१ सर्वेक्षण पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये उद्दिष्ट क्र.१ 'वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्काविषयी असलेल्या माहितीची सद्यस्थिती तपासणे.' यासाठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा स्विकार केला आहे. त्यासाठी सर्वेक्षण पद्धतीच्या पुढील पायऱ्यांचा अवलंब केला आहे.

**आकृती क्र. ३.१ : सर्वेक्षणाच्या पायऱ्यांचा प्रवाही तक्ता**

संशोधनाची उद्दिष्टे

↓

जनसंख्या, न्यादर्श,

↓

माहिती संकलनाची साधने

↓

माहितीचे संकलन

↓

माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

↓

निष्कर्ष

### ३.४.२ जनसंख्या

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींची जनसंख्या म्हणून निवड केली आहे.

### ३.४.३ नमुना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने यादृच्छिक नमुना निवड पद्धती वापरली आहे. पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित १२ महाविद्यालयातील तृतीय वर्ष कला शाखेच्या ७५६ विद्यार्थिनींची निवड केली.

**नमुना प्रसामान्यता तपासणी**

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षणासाठी निवडलेले बारा महाविद्यालयातील ७५६ विद्यार्थिंनींकडून आलेल्या प्रतिसादाच्या आधारे न्यादर्शाची प्रसामान्यता तपासणी केली आहे.

कोष्टक क्र. ३.३ महिला मानवी हक्काविषयी सद्यस्थितीची संख्यात्मक माहिती

| Description | Survey Result |
|---|---|
| N | 756 |
| Mean | 32.26 |
| Standard error of mean | 0.44 |
| Standard Deviation | 12.30 |
| Skewness | 0.67 |
| Kurtosis | 0.68 |

**आलेख क्र. ३.१ महिलांच्या मानवी हक्क सद्यस्थिती**




प्रस्तुत संशोधनामध्ये महिला मानवी हक्क विषयी पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील विद्यार्थिनींमध्ये असलेली सद्यस्थिती अभ्यासण्यासाठी सर्वेक्षण केले. एकूण ७५६ विद्यार्थिनींकडून आलेल्या माहितीवरुन प्रसामान्यता तपासणी केली. वरील कोष्टकावरुन आणि आलेखावरुन लक्षात येते की मध्यमान ३२.२६ आहे. तसेच विषमितता मूल्य हे ०.६७ असून ते धन आहे. धन विषिमत वितरणामुळे वक्र साधारणता डावीकडे झुकलेला आहे. वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ असल्यामुळे ते प्रसामान्य आहे. तसेच शिखरदोष मूल्य हे ०.६८ असून ते धन आहे. हे मूल्य ०.२६३ पेक्षा जास्त असल्याने वितरण साधारणता चर्पटक शिखरी आहे. वितरण प्रसामन्याच्या अगदी जवळ असल्याने ते प्रसामान्य आहे.

### ३.४.४ माहिती संकलनाचे साधन

महिलांच्या मानवी हक्काविषयी विद्यार्थिनींमध्ये असलेल्या माहितीच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी माहिती संकलनाचे संशोधक निर्मित प्रश्नावली हे साधन संशोधकाने निवडले आहे.

महिला मानवी हक्काविषयी प्रश्नावली तयार करताना संशोधकाने मानवी हक्क, महिलांचे हक्क यावरील पुस्तके, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे, संकेतस्थळे याद्वारे माहिती मिळविली. प्रश्नावली तयार करून ती तज्ञ व्यक्तींकडून तपासून घेतली. त्यामध्ये योग्य ते बदल करून पथदर्शी अभ्यासाद्वारे प्रश्नावलीची विश्वसनियता व सप्रमाणता तपासली. प्रश्नावली निर्मितीसाठी व कार्यवाहीसाठी पुढील बाबींचा अवलंब केला.

**आकृती क्र. ३.२: प्रश्नावली विकसनाचा प्रवाही तक्ता**

प्रश्नावलीची उद्दिष्टे

↓

प्रश्नावली तयार करताना लावलेले निकष

↓

पथदर्शक अभ्यास

↓

तज्ञांशी चर्चा

↓

सूचनांनुसार प्रश्नावलीत बदल

↓

प्रश्नावलीतील आशयानुसार पुनर्रचना

↓

प्रश्नावलीची सप्रमाणता व विश्वसनियता पडताळणी

↓

अंतिम स्वरूप

↓

निवडलेल्या न्यादर्शावर प्रश्नावलीचे प्रशासन

### ३.४.४.१ प्रश्नावलीची उद्दिष्टे

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या वैवाहिक हक्काविषयी असलेल्या माहितीच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
२. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या वारसा हक्काविषयी असलेल्या माहितीच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
३. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्काविषयी असलेल्या माहितीच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
४. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या हिंसेपासून संरक्षणाचा हक्काविषयी असलेल्या माहितीच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
५. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या संविधानिक हक्काविषयी असलेल्या माहितीच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

### ३.४.४.२ प्रश्नावली तयार करताना लावलेले निकष

१. विद्यार्थिनींची सर्वसामान्य माहिती
२. महिलांच्या विविध हक्कांचे वर्गीकरण
३. प्रश्नांची सुयोग्य संख्या
४. प्रश्नांचे प्रकार
५. महिला हक्क कायदे, योजना यांना सामावून घेणारे प्रश्न

### ३.४.४.३ पथदर्शक अभ्यास

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावलीचा पथदर्शक अभ्यास करण्यासाठी निवडलेल्या नमुन्यातील दिलीपराव वळसे पाटील महाविद्यालय, निमगाव सावा येथील तृतीय वर्ष कला शाखेच्या ३० विद्यार्थिनींकडून प्रश्नावली भरून घेतली. यामध्ये महिला मानवी हक्क विषयक बहुपर्यायी प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. पथदर्शक अभ्यास करताना एकूण ५५ प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. पथदर्शक अभ्यासानंतर प्रश्नांची संख्या ५० इतकी करण्यात आली. त्यामुळे प्रश्नावली कंटाळवाणी न होता आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यास मदत झाली.

### ३.४.४.४ तज्ज्ञांशी चर्चा

महिलांच्या विविध मानवी हक्कांविषयीच्या जाणीवांवर आधारित असलेल्या संशोधक निर्मित प्रश्नावलीच्या निर्मितीनंतर शिक्षणक्षेत्रातील आणि संशोधन विषयाशी संबंधित तज्ज्ञांशी चर्चा केली.

### ३.४.४.५ सुचनेनुसार प्रश्नावलीत बदल

तज्ज्ञ व्यक्तींकडून आलेल्या अभिप्रायानुसार प्रश्नावलीतील प्रश्नांची संख्या, प्रश्नांचे स्वरूप, काठीण्यपातळी यामध्ये योग्य ते बदल संशोधकाने केले.

### ३.४.४.६ प्रश्नावलीतील आशयानुसार पुनर्रचना

तज्ज्ञांशी चर्चा व पथदर्शक अभ्यासानंतर संशोधकाने प्रश्नावलीमध्ये योग्य ते बदल केले. त्याचबरोबर संशोधनासाठीचा आवश्यक आशय, महिलांच्या हक्कांचे प्रकार यानुसार प्रश्नावलीत बदल करून अंतिम प्रश्नावली तयार केली.

### ३.४.४.७ प्रश्नावलीची सप्रमाणता आणि विश्वसनीयता

**सप्रमाणता**

संशोधनासाठी आवश्यक असणारी सर्व माहिती प्रश्नावलीतून प्राप्त होईल आणि विचारलेल्या प्रश्नांतून उद्दिष्टांशी सांगड घातली जाईल याची दक्षता घेऊन प्रश्नावली तयार करण्यात आली. प्रश्नावलीची विश्वसनियता राखण्यासाठी पथदर्शी अभ्यासाद्वारे निवडलेल्या प्रतिसादकांना पुन्हा तीच प्रश्नावली देऊन प्राप्त झालेल्या माहितीची तुलना केली. प्रश्नावलीची सप्रमाणता ठरविण्यासाठी आशय सप्रमाणतेचा अवलंब केला. आशय सप्रमाणता म्हणजे अभ्यासक्रमातील प्रत्येक घटक, उपघटकांवर प्रश्नांचे योग्य प्रमाण, प्रश्नांची भाषा व वयानुरूप योग्य व सोपी असावी होय. (कदम, चौधरी २०११)

**विश्वसनीयता**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने तयार केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण प्रश्नावलीची विश्वसनीयता ठरविण्यासाठी चाचणी–पुनर्चाचणी पद्धतीचा अवलंब केला. चाचणीची विश्वसनीयता तपासण्यासाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले. संशोधकाने तयार केलेल्या प्रश्नावलीचा सहसंबंध गुणांक ०.८२ म्हणजेच उच्चतम स्वरूपाचा असून विश्वसनीय आहे.

### ३.४.४.८ प्रश्नावलीचे प्रशासन

महिला मानवी हक्क विषयक प्रश्नावली तयार केल्यानंतर ती पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित १२ वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या ७७० विद्यार्थिनींकडून भरून घेतली. त्यातील काही प्रश्नावल्या अपूर्ण असल्याने ७५६ प्रश्नावलींचा समावेश संख्याशास्त्रीय विश्लेषणासाठी करण्यात आला.

### ३.४.४.९ माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

उद्दिष्ट क्र. १ च्या पूर्ततेसाठी संकलित केलेल्या माहितीचे अर्थनिर्वचन करण्यासाठी व त्यातून निष्कर्ष काढण्यासाठी सांख्यिकी तंत्राची मदत घेतली ती पुढीलप्रमाणे.

१. शेकडेवारी : वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींकडून मिळालेल्या माहितीचे पृथःकरण करण्यासाठी शेकडेवारीचा वापर केला. सर्वेक्षणासाठी निवडलेल्या बारा महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे महिला मानवी हक्कातील वैवाहिक हक्क, वारसा हक्क, नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क, हिंसेपासून संरक्षणाचा हक्क, संविधानिक हक्क, या पाच घटकातील संपादनाची सद्यस्थिती शेकडेवारी पद्धतीने अभ्यासली.

२. आलेख : सर्वेक्षणातून प्राप्त झालेल्या माहितीचे सादरीकरण हे आलेखाच्या साहाय्याने केले.

## ३.५ उद्दिष्ट क्र. २ ची कार्यवाही

प्रस्तुत संशोधनामध्ये उद्दिष्ट क्र. २ साठी संशोधकाने पुढीलप्रमाणे कार्यवाहीचा वापर केला.

उद्दिष्ट क्र. २ वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करणे.

### ३.५.१ साधन निर्मिती पद्धती

प्रस्तुत संशोधनाचे उद्दिष्ट क्र. २ 'वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करणे.' यासाठी साधन निर्मिती पद्धतीचा वापर संशोधकाने केला. त्यासाठी महिलांच्या मानवी हक्कांचे गट तयार केले. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींमधील मानवी हक्काविषयी असलेल्या माहितीच्या सद्यस्थितीच्या

अभ्यासानंतर साधन निर्मिती पद्धतीच्या आधारे महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे विकसन केले.

### ३.५.२ महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचा मानसशास्त्रीय सिद्धांत

प्रस्तुत संशोधनामध्ये महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची रचना करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने पियाजेची बोधात्मक विकासाची उपपत्तीचा समावेश आहे. या उपपत्तीमध्ये प्रत्येक मुलाची वाढ होत असताना त्याच्या भोवतालच्या परिस्थितीशी शारीरिक, सामाजिक व बौद्धिक आंतरक्रिया घडत असतात. त्यातूनच ते शिकते. तसेच वायगॉस्टकी यांच्या मुलाचे विचार व भाषा या संबंधातील विकासाची उपपत्तीचा आधार घेतला आहे. या उपपत्तीनुसार मुलांच्या विचारप्रक्रिया व भाषा त्याचबरोबर सामाजिक आंतरक्रिया यांचा मोठा वाटा आहे. आंतरक्रिया संभाषणातून घडतात. जेरोम ब्रुनर यांच्या शिक्षणाच्या संस्कृतीची उपपत्ती नुसार शिक्षण तीन प्रकारच्या माध्यमातून होते. १ कृतीद्वारे, २ प्रतिमाद्वारे, भाषेद्वारे तसेच ३ समकेंद्री अभ्यासक्रमाद्वारे.

**कोष्टक क्र. ३.४: महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचा मानसशास्त्रीय आधार**

| सैद्धांतिक पार्श्वभूमी | सिद्धांत | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमातील उपयोजन |
|---|---|---|
| पियोजेची बोधात्मक विकासाची उपपत्ती | सभोवतालच्या परिस्थितीशी शारीरिक, सामाजिक व बौद्धिक आंतरक्रियेद्वारे शिक्षण | गटकार्य<br>निबंध स्पर्धा |
| वायगॉस्टकीची विकासाची उपपत्ती | आंतरक्रिया व संभाषणाद्वारे शिक्षण, अनुभवांद्वारे शिक्षण | बुद्धीमंथन<br>वादविवाद<br>प्रसंग विश्लेषण<br>विद्यार्थिनींच्या अनुभवाचे सादरीकरण |
| जेरोम ब्रुनर यांची शिक्षणाच्या संस्कृतीची उपपत्ती | कृतीद्वारे, प्रतिमांद्यारे तसेच भाषेद्वारे शिक्षण | अध्ययन साहित्यातून शिक्षण |
| डेव्हिड आसुबेल यांची अध्ययन आणि अनुदेशन उपपत्ती | तर्कशुद्ध व अर्थपूर्ण मांडणीतून अध्ययन प्रक्रिया अधिक प्रभावी होते. | व्याख्यान |
| मेग्डुगल यांचा सहजप्रवृत्ती विषयक सिद्धांत | संघप्रवृत्तीच्या उदात्तीकरणातून अध्ययनार्थींमध्ये निष्ठा वाढविता येते. | गटचर्चा |

### ३.५.३ साधन निर्मितीचे टप्पे

**आकृती क्र. ३.३ साधननिर्मितीचे टप्पे**

संशोधनातील कृती कार्यक्रमाचे स्थान

↓

कृतीकार्यक्रमाची उद्दिष्टे

↓

साधनाचे स्वरूप आणि नियोजन

↓

कृतिकार्यक्रमाची निर्मिती

↓

प्रत्यक्ष कृती कार्यक्रम व तपशील

↓

कृतीकार्यक्रमाचे मुल्यमापन व सुधारणा

↓

पथदर्शक अभ्यास

↓

प्रत्याभरणानुसार कृतीकार्यक्रमात आवश्यक ते बदल

↓

अंतिम कार्यक्रम

↓

कृतीकार्यक्रमाचा प्रत्यक्ष उपयोग

↓

उद्दिष्टे व फलिते यांचा परस्पर संबंध

↓

निष्कर्ष व शिफारशी

↓

अहवाल व कृतिकार्यक्रमाचे सादरीकरण

(संदर्भ : संशोधन मार्गदर्शन मालिका पुष्प पंधरावे, साधननिर्मितीद्वारे संशोधन, २००६, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ.२०, २१.)

### १. संशोधनातील कार्यक्रमाचे स्थान

शिक्षणाचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे समाजपरिवर्तन होय. विधायक समाजपरिवर्तनाच्या दिशेने जाताना महिलांच्या विकासास आणि सबलीकरणास महत्त्वाचे स्थान आहे. पारंपारिक

शिक्षणव्यवस्थेतून आणि शिक्षण पद्धतीतून हे उद्दिष्ट प्रभावीपणे पार पाडण्यासाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम महत्त्वाचा आहे.

- महिलांच्या कायदेविषयक हक्कांची जाणीव निर्माण होण्यासाठी.
- महिलांचे प्रश्न, त्यांच्या विविध समस्या, त्यांच्या विकासास अडसर ठरणाऱ्या बाबी समजण्यासाठी.
- महिलेला स्वतःमध्ये बदल करून तिच्या हक्कांचे उल्लंघन झाल्यास त्यावरील उपाय समजण्यासाठी.
- महिला मानवी हक्काची जाणीव प्रभावीपणे निर्माण होण्यासाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम महत्त्वपूर्ण आहे.
- महिला कल्याणविषयी सरकारने तयार केलेले कायदे व योजना जाणून घेण्यासाठी.

**२. साधननिर्मितीची उद्दिष्टे**

संशोधकाने विकसित केलेल्या साधननिर्मितीची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींमध्ये मानवी हक्क विषयक माहितीच्या संपादनात वाढ होण्यास मदत करणे.

२. महिलांच्या विकासामध्ये येणाऱ्या समस्या तसेच अडसर यांच्यावरील उपायांची माहिती विद्यार्थिनींना समजण्यासाठी मदत करणे.

३. महिला सबलीकरणासाठी आवश्यक सरकारची धोरणे आणि विविध योजना यांची माहिती विद्यार्थिनींना मिळण्यास मदत करणे.

**३. साधनाचे स्वरूप आणि नियोजन**

महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची निर्मिती करताना महिला मानवी हक्कांचे विविध गट संशोधकाने तयार केले. यामध्ये महिलांचे वैवाहिक हक्क, वारसा हक्क, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क, हिंसेपासून संरक्षणाचा हक्क आणि संविधानिक हक्क यांचा समावेश करण्यात आला. महिलांचे हे विविध हक्क विद्यार्थिनींना समजण्यासाठी त्यांचा क्रियात्मक सहभाग या कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आला. विद्यार्थिनींना विविध परिस्थितीला सामोरे जावे लागते. त्यासाठी प्रसंग विश्लेषण या उपक्रमाचा समावेश मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमात करण्यात

आला. कार्यक्रमाचा संबंध प्रत्यक्ष जीवनाशी जोडला जाईल याची दक्षता संशोधकाने घेतली आहे.

### ४. कार्यक्रमाची निर्मिती

महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची निर्मिती करताना पुढील बाबींचा समावेश त्यामध्ये करण्यात आला.

- महिलांच्या वैवाहिक हक्काविषयी विद्यार्थिनींच्या माहितीची सद्यस्थिती.
- महिलांच्या वारसा हक्काविषयी विद्यार्थिनींच्या माहितीची सद्यस्थिती.
- नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या हक्काविषयी विद्यार्थिनींच्या माहितीची सद्यस्थिती.
- महिलांच्या हिंसेपासून संरक्षणाच्या हक्काविषयी विद्यार्थिनींच्या माहितीची सद्यस्थिती.
- महिलांच्या संविधानिक हक्काविषयी विद्यार्थिनींच्या माहितीची सद्यस्थिती.

कार्यक्रमामध्ये महिला मानवी हक्क शिक्षण माहिती पुस्तिका तयार करण्यात आली. या पुस्तिकेमध्ये महिलांच्या हक्क रक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या संस्था आणि कायदे यांचा समावेश करण्यात आला. विद्यार्थिनींसाठी गटचर्चा, व्याख्यान, विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण या बाबी समाविष्ट केल्या.

### सर्वेक्षण आणि साधननिर्मिती यांची सांगड

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींमध्ये महिला मानवी हक्क विषयी असलेली माहितीची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित बारा वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यासाठी वापरलेल्या प्रश्नावलींमध्ये एकूण उपघटकांनुसार प्रश्नांची विभागणी करण्यात आली होती. उपघटकानुसार विद्यार्थिनींच्या संपादनाचे विश्लेषण केल्यानतर सरासरी ४० टक्के पेक्षा अधिक संपादन असलेल्या हक्कातील उपघटकांच्या संदर्भात कार्यक्रमाचा अवलंब केला नाही तर सरासरी ४० टक्केपेक्षा कमी संपादन असलेल्या उपघटकासाठी उपघटकातील आशयाचा विचार करुन कार्यक्रमाची निवड केली. महिला मानवी हक्कांतील उपघटकानुसार कार्यक्रमाची रचना पुढीलप्रमाणे करण्यात आली.

**कोष्टक क्र. ३.५ महिला मानवी हक्क सर्वेक्षणातील संपादनानुसार कार्यक्रमाची रचना**

| अ. क्र | महिला मानवी हक्क | उपघटक | सरासरी संपादन | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम |
|---|---|---|---|---|
| १ | वैवाहिक हक्क | कौटुंबिक हिंसाचार संकल्पना | ४४.०४ | -- |
| | | वैवाहिक हक्काबाबत कायदे | २४.८ | अध्ययन साहित्याचे अवलोकन |
| | | कुटुंबातील हक्क | २४.९३ | बुद्धिमंथन |
| | | हुंडाप्रथा व महिलांचे हक्क | २३.०१ | बुद्धिमंथन |
| | | हुंडाप्रथा व तिचे घातक परिणाम | २४.२ | व्याख्यान |
| | | हुंडाप्रथा, प्रतिबंधात्मक उपाय | २२.६१ | व्याख्यान |
| | | भारतीय विवाह व्यवस्था | ४३.०५ | -- |
| | | विवाह नोंदणी | ४४.१७ | -- |
| | | कुटुंब न्यायालय | ४३.६५ | -- |
| ०२. | वारसा हक्क | पित्याच्या संपत्तीतील हक्क | २८.९६ | वादविवाद |
| | | पित्याच्या संपत्तीतील हक्काबाबत योजना | २८.३ | प्रश्नमंजुषा |
| | | मृत्युपत्र आणि अधिकार | ५०.९२ | -- |
| | | पतीची संपत्ती आणि महिला हक्क | २८.१७ | निबंधलेखन |
| | | वारसा हक्क विषयक कायदे | २७.७० | अध्ययन साहित्याचे अवलोकन |
| | | विधवा आणि वारसा हक्क | ४९.७३ | -- |
| | | स्त्री धन आणि भारतीय विवाह व्यवस्था | २७.७० | वादविवाद |
| | | | | |
| ३. | नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क | नोकरी करणाऱ्या महिलां साठी कायद्याचे संरक्षण | २६.६४ | अध्ययन साहित्यचे अवलोकन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | २६.९८ | प्रश्नमंजुषा |
| | | नोकरी व्यवसायातील महिलांचे स्थान | २७.५१ | वादविवाद |
| | | मातृत्व लाभ कायदा | ५५.१५ | -- |
| | | समान काम समान वेतन | २६.५८ | व्याख्यान |
| | | नोकरी करणाऱ्या महिलांना प्रसुती सहाय्य | ५५.६८ | -- |
| | | महिला आरक्षण आणि नोकरीच्या संधी | ३०.२९ | निबंधलेखन |
| ०४. | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | स्त्री भ्रुण हत्या | २६.०५ | प्रसंग विश्लेषण |
| | | हिंसापासून संरक्षणासाठी कायदे | २७.०४ | अध्ययन साहित्याचे अवलोकन |
| | | छेडछाड, उपाययोजनात्मक बाबी | २७.७७ | प्रसंग विश्लेषण |
| | | कुंटुब आणि परिसरामध्ये होणारी महिलांबाबत हिंसा | २८.०१ | विद्यार्थिनींच्या अनुभवाचे सादरीकरण |
| | | हिंसाचार गुन्हयाच्या नोंदीची समस्या | ५४.६२ | -- |
| | | छेडछाड | २७.२४ | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण |
| | | देहव्यापार समस्या | ५२.७७ | -- |
| ०५. | संविधानिक हक्क | संविधान आणि महिला सबलीकरण | २३.५४ | व्याख्यान |
| | | राज्यघटनेतील मूलभूत हक्कांचे रक्षण | २३.६७ | गटचर्चा |
| | | राज्यघटनेतील मूलभूत हक्क | २२.४८ | गटचर्चा |
| | | संपत्तीचा हक्क | ४४.३१ | -- |
| | | संविधानातील महिलांसाठी तरतुदी | २४.७३ | अध्ययन साहित्याचे अवलोकन |
| | | सांविधानिक हक्कासाठी योजना | २२.७५ | बुद्धिमंथन |
| | | मुलभूत हक्कांच्या मर्यादा | ४६.६९ | -- |
| | | महिला आयोग | ४६.४२ | -- |

## ५. प्रत्यक्ष कार्यक्रम व तपशील

संशोधनासाठी प्रथमत: पुढील कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली.

**कोष्टक क्र. ३.६ : मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचा प्रारंभिक तक्ता**

| अ.क्र. | महिला मानवी हक्कातील घटक | उपघटक | कार्यक्रमाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | वैवाहिक हक्क | वैवाहिक हक्काबाबत कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | हुंडाप्रथा व तिचे घातक परिणाम | व्याख्यान | २ तास |
| | | हुंडाप्रथा, प्रतिबंधात्मक उपाय | व्याख्यान | २ तास |
| | | कर्तबगार महिलांच्या जीवन चरित्राचा अभ्यास | बुद्धिमंथन | २ तास ३० मि. |
| | | कुटुंबातील हक्क | बुद्धिमंथन | २ तास |
| २ | वारसा हक्क | पित्याच्या संपत्तीतील हक्क | वादविवाद | २ तास |
| | | स्त्रीधन व भारतीय विवाह व्यवस्था | वादविवाद | २ तास |
| | | मृत्युपत्र आणि अधिकार | परिसंवाद | ३ तास |
| | | पतीची संपत्ती आणि महिला हक्क | निबंध लेखन | २ तास |
| | | वारसा हक्क विषयक कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | पित्याच्या संपत्तीतील हक्काबाबत योजना | प्रश्नमंजुषा | २ तास |
| ३ | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | महिला आरक्षण आणि नोकरीच्या संधी | निबंध लेखन | २ तास |
| | | नोकरी व्यवसायातील महिलांचे स्थान | वादविवाद | २ तास ३० मि. |
| | | रोजगाराची समस्या | समस्या निराकरण पद्धती | २ तास ३० मि. |
| | | समान काम समान वेतन | व्याख्यान | २ तास |
| | | नोकरी करणाऱ्या महिलांसाठी कायद्याचे संरक्षण | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | समस्या निराकरण पद्धती | २ तास |
| ४ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | कुटुंब आणि परिसरामध्ये होणारी महिलांबाबत हिंसा | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | २ तास |
| | | छेडछाड | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | २ तास |
| | | छेडछाड,उपाययोजनात्मक बाबी | प्रसंग विश्लेषण | २ तास |
| | | स्त्री भ्रूणहत्या | प्रसंग विश्लेषण | २ तास ३० मि. |
| | | हिंसाचारापासून संरक्षणासाठी कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| ५ | संविधानिक हक्क | संविधान आणि महिला सक्षमीकरण | व्याख्यान | २ तास |
| | | राज्यघटनेतील मुलभूत हक्क | गटचर्चा | २ तास ३० मि. |
| | | राज्यघटनेतील मुलभूत हक्क व मुलभूत हक्कांचे रक्षण | गटचर्चा | २ तास |
| | | संविधानातील महिलांसाठीच्या तरतुदी | अध्ययन साहित्याचे समालोचन | २ तास |
| | | संविधानिक हक्कासाठी योजना | बुद्धीमंथन | २ तास |

## ६. कार्यक्रमाचे मुल्यमापन व सुधारणा

महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची निर्मिती केल्यानंतर संबंधित विषयातील व संशोधन क्षेत्रातील विविध तज्ञ व्यक्तींकडून कार्यक्रमाचे मुल्यमापन करून घेतले. तज्ञांनी सुचविलेल्या सुचनांनुसार कार्यक्रमामध्ये योग्य ते बदल करण्यात आले.

### तज्ञांनी सांगितलेल्या सूचना

१. अध्ययन साहित्यामध्ये कायद्यावर भर देण्यात यावा.

२. विद्यार्थिनी अनुभवांच्या सादरीकरणामध्ये कौटुंबिक हक्कांवर भर दयावा.

३. विद्यार्थिंनीचा अधिकाधिक कृतियुक्त सहभागाची आवश्यकता आहे.

## ७. पथदर्शक अभ्यास

संशोधकाने साधन निर्मितीच्या तत्त्वांचा अवलंब करून तयार केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची तपासणी करण्यासाठी महिला मानवी हक्क कार्यक्रमातील ठराविक

भागांशावर आधारित कार्यक्रमाचा काही भाग राबविला. त्यातील न समजलेला भाग आणि विद्यार्थिनींना आलेल्या अडचणी या बाबी विचारात घेऊन मार्गदर्शकांच्या मदतीने कार्यक्रमात योग्य ते बदल केले.

### ८. प्रत्याभरणानुसार कृतीकार्यक्रमात आवश्यक ते बदल

पथदर्शक अभ्यासानंतर कार्यक्रमात असलेल्या उणिवा दूर करून महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामध्ये कायद्यांवर अधिक भर देण्यात आला होता. प्रत्याभरणामध्ये क्लिष्ट कायद्याचा काही भाग वगळण्यात आला. त्याचप्रमाणे कार्यक्रमात गटचर्चा, वादविवाद यासारख्या कार्यक्रमाचां समावेश केला असल्यामुळे परिसंवाद हा कार्यक्रम अंतिम कार्यक्रमातून वगळला. तज्ञ मार्गदर्शकांच्या सल्ल्यानुसार अध्ययन साहित्य प्रभावी असल्यामुळे समस्या निराकरण हा कार्यक्रम वगळण्यात आला व ५२ तासांचा अंतिम कार्यक्रम तयार करण्यात आला.

### ९. अंतिम कार्यक्रम

कार्यक्रम विकसनाच्या विविध टप्प्यांच्या आधारे शास्त्रीय पद्धतीने महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम निर्माण करण्यात आला. यामध्ये तज्ञांचे मार्गदर्शन, पथदर्शी अभ्यासातून मिळालेली माहिती याचा आधार घेतला. अंतिम कार्यक्रमाचा आराखडा पुढीलप्रमाणे

**कोष्टक क्र. ३.७ : महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचा अंतिम आराखडा**

| अ.क्र. | महिला मानवी हक्कातील घटक | उपघटक | कार्यक्रमाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | वैवाहिक हक्क | वैवाहिक हक्काबाबत कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | हुंडाप्रथा व तिचे घातक परिणाम | व्याख्यान | २ तास |
| | | हुंडाप्रथा, प्रतिबंधात्मक उपाय | व्याख्यान | २ तास |
| | | हुंडाप्रथा व महिलांचे हक्क | बुद्धिमंथन | २ तास ३० मि. |
| | | कुटुंबातील हक्क | बुद्धिमंथन | २ तास |
| २ | वारसा हक्क | पित्याच्या संपत्तीतील हक्क | वादविवाद | २ तास |
| | | स्त्रीधन व भारतीय विवाह व्यवस्था | वादविवाद | २ तास |
| | | पतीची संपत्ती आणि महिला हक्क | निबंध लेखन | २ तास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | वारसा हक्क विषयक कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | पित्याच्या संपत्तीतील हक्क | प्रश्नमंजुषा | २ तास |
| ३ | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | महिला आरक्षण आणि नोकरीच्या संधी | निबंध लेखन | २ तास |
| | | नोकरी व व्यवसायातील महिलांचे स्थान | वादविवाद | २ तास ३० मि. |
| | | समान काम समान वेतन | व्याख्यान | २ तास |
| | | नोकरी करणाऱ्या महिलांसाठी कायद्याचे संरक्षण | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | प्रश्नमंजुषा | २ तास |
| ४ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | कुटुंब आणि परिसरामध्ये होणारी महिलांबाबत हिंसा | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | २ तास |
| | | छेडछाड | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | २ तास |
| | | छेडछाड,उपाययोजनात्मक बाबी | प्रसंग विश्लेषण | २ तास |
| | | स्त्री भ्रूणहत्या | प्रसंग विश्लेषण | २ तास ३० मि. |
| | | हिंसाचारापासून संरक्षणासाठी कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| ५ | संविधानिक हक्क | संविधान आणि महिला सक्षमीकरण | व्याख्यान | २ तास |
| | | राज्यघटनेतील मुलभूत हक्क | गटचर्चा | २ तास ३० मि. |
| | | राज्यघटनेतील मुलभूत हक्कांचे रक्षण | गटचर्चा | २ तास |
| | | संविधानातील महिलांसाठीच्या तरतुदी | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | संविधानिक हक्कासाठी योजना | बुद्धीमंथन | २ तास |

**१०. कार्यक्रमाचा प्रत्यक्ष उपयोग**

संशोधनासाठी तयार केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर येथील कला शाखेतील ६२ विद्यार्थिनींची

निवड करून त्या गटावर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली. त्यानंतर उत्तर चाचणीद्वारे कार्यक्रमापूर्वी व कार्यक्रमानंतर झालेले गुणांतील बदल तपासण्यात आले.

## ११. उद्दिष्टे व फलिते यांचा परस्पर संबंध

कार्यक्रमाची अंमलबजावणी केल्यानंतर पूर्व चाचणी व उत्तर चाचणी यांच्या गुणांतील फरक शास्त्रीय पद्धतीनुसार योग्य आहे की नाही तसेच संशोधनाची उद्दिष्टे साध्य झाली की नाही हे समजते. त्यासाठी पूर्वचाचणी व उत्तरचाचणी यांच्या प्राप्तांकांचे टी मूल्य काढण्यात आले.

## १२. निष्कर्ष व शिफारशी

संशोधकाने विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी केल्यानंतर पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी यांच्या संपादन गुणांच्या मध्यमानातील फरकाद्वारे कार्यक्रमाची परिणामकारकता तपासली. त्या आधारावर संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी यांची मांडणी केली.

## १३. अहवाल व कार्यक्रमाचे सादरीकरण

प्रस्तुत संशोधनामध्ये महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे विकसन करण्यात आले. संशोधकाने साधन निर्मितीच्या चार अवस्थातील १३ टप्प्यांतून कार्यक्रम विकसित केला.

अवस्था १ : संकल्पित साधन

अवस्था २ : प्रत्यक्ष साधन

अवस्था ३ : सुधारित अंतिम साधन

अवस्था ४ : सिद्ध साधन

वरील चार अवस्थांचा अवलंब करून महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची रचना केली. कार्यक्रमाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे.

**कोष्टक क्र. ३.८: महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक**

| अ. क्र. | दिनांक | कार्यक्रम | महिला मानवी हक्कातील घटक | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | २८/११/२०१७ | महिला मानवी हक्क शिक्षण माहिती पुस्तिकेचे अवलोकन | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | २ तास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | २९/११/२०१७ | वादविवाद स्पर्धा | वारसा हक्क | २ तास |
| ३ | ३०/११/२०१७ | वादविवाद स्पर्धा | वारसा हक्क | २ तास |
| ४ | २/१२/२०१७ | निबंध लेखन | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | २ तास |
| ५ | ४/१२/२०१७ | वादविवाद | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | २ तास ३० मि. |
| ६ | ५/१२/२०१७ | बुद्धीमंथन | वैवाहिक हक्क | २ तास ३० मि. |
| ७ | ६/१२/२०१७ | बुद्धीमंथन | वैवाहिक हक्क | २ तास |
| ८ | ७/१२/२०१७ | अध्ययन साहित्याचे अवलोकन | संविधानिक हक्क | २ तास |
| ९ | ८/१२/२०१७ | व्याख्यान | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | २ तास |
| १० | ९/१२/२०१७ | प्रसंग विश्लेषण | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | २ तास ३० मि. |
| ११ | ११/१२/२०१७ | प्रसंग विश्लेषण | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | २ तास |
| १२ | १२/१२/२०१७ | गटचर्चा | संविधानिक हक्क | २ तास ३० मिनीटे |
| १३ | १३/१२/२०१७ | गटचर्चा | संविधानिक हक्क | २ तास |
| १४ | १४/१२/२०१७ | अध्ययन साहित्याचे अवलोकन | वैवाहिक हक्क | २ तास |
| १५ | १५/१२/२०१७ | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | २ तास |
| १६ | १६/१२/२०१७ | प्रश्नमंजुषा | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | २ तास |
| १७ | १८/१२/२०१७ | अध्ययन साहित्याचे अवलोकन | वारसा हक्क | २ तास |
| १८ | १९/१२/२०१७ | बुद्धीमंथन | संविधानिक हक्क | २ तास |
| १९ | २०/१२/२०१७ | व्याख्यान | वैवाहिक हक्क | २ तास |
| २० | २१/१२/२०१७ | निबंध स्पर्धा | वारसा हक्क | २ तास |
| २१ | २२/१२/२०१७ | व्याख्यान | वैवाहिक हक्क | २ तास |
| २२ | २३/१२/२०१७ | व्याख्यान | संविधानिक हक्क | २ तास |
| २३ | २६/१२/२०१७ | अध्ययन साहित्याचे | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | २ तास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अवलोकन | | |
| २४ | २७/१२/२०१७ | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | २ तास |
| २५ | २८/१२/२०१७ | प्रश्नमंजुषा | वारसा हक्क | २ तास |

### ३.६ उद्दिष्ट क्र. ३ ची कार्यवाही

प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्ट क्र.३ साठी संशोधकाने पुढीलप्रमाणे कार्यपद्धती निश्चित केली. उद्दिष्ट क्र.३ वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

**कोष्टक क्र. ३.९ : उद्दिष्ट क्र. ३ ची कार्यपद्धती**

| उद्दिष्ट क्रमांक | संशोधन पद्धती | नमुना | नमुना निवड पद्धती | नमुना | स्त्रोत | माहिती संकलनाची साधने | माहिती विश्लेषणाची साधने |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | प्रायोगिक पद्धती | १ महाविद्यालय ६२ विद्यार्थिनी | सहेतुक | ६२ | वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनी | प्रश्नावली | मध्यमान, प्रमाण विचलन, टी परिक्षिका |

#### ३.६.१ प्रायोगिक संशोधन पद्धती

प्रायोगिक संशोधन पद्धती ही एक वैज्ञानिक पद्धती आहे. वैज्ञानिक पद्धतीवर आधारित असलेल्या या पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे या पद्धतीतील प्रयोग होय. विशिष्ट घटकाचा उपयोग केला असता विशिष्ट परिणाम दिसतात. या परिकल्पनेचे निव्वळ परिक्षण येथे अपेक्षित नसून इतर सर्व घटकांना नियंत्रित करून फक्त एका घटकाच्या उपयोगाने कोणता बदल घडून येतो हे पाहण्याकरीता केलेला प्रयोग हे प्रायोगिक पद्धतीचे वैशिष्ट्य आहे. (मुळे, उमाठे, १९९८)

प्रायोगिक संशोधनात उपचार मात्रा कोणाला द्यावयाची आणि उपचार मात्रेचे स्वरूप व प्रमाण काय असावे याबाबतचे निर्णय संशोधक स्वत: घेत असतो. उपचार मात्रा योग्य कालावधीपर्यंत दिल्यानंतर संशोधक उपचार घेणाऱ्या दोन गटांचे निरीक्षण अथवा मापन करून त्यात काही फरक आढळतो का? याचा शोध घेतो. संशोधकाला दोन गटांच्या उत्तर परिक्षणातील सरासरी गुणांकामध्ये फरक आढळून आल्यास तो फरक उपचारामुळे पडला

असून उपचारच त्या फरकाला कारणीभूत आहे असा निष्कर्ष संशोधक काढू शकतो. (पंडित,२०१०)

प्रस्तुत संशोधनामध्ये 'वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.' या उद्दिष्टासाठी संशोधकाने प्रायोगिक पद्धतीचा वापर केला आहे. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर येथील कला शाखेतील ६२ विद्यार्थिनींच्या गटावर हा प्रयोग राबविला. पूर्वचाचणी व उत्तरचाचणीच्या संपादनावरून कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासली.

### ३.६.२ चले

**व्याख्या**

शैक्षणिक प्रक्रियेच्या व्यवस्थापन व निरीक्षणावर परिणाम करणारा शैक्षणिक संशोधनातील कोणताही घटक म्हणजे चल. (भिंताडे, २००४)

**संशोधनातील चलाचे प्रकार**

चलाचे प्रामुख्याने पुढील प्रकार पडतात.

१. स्वाश्रयी / स्वतंत्र  २. आश्रयी / परतंत्र  ३. नियंत्रित चल

**प्रस्तुत संशोधनातील चले**

स्वाश्रयी चल : महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम

आश्रयी चल : विद्यार्थिनींची संपादणूक

नियंत्रित चल : विद्यार्थिनींचा वयोगट, वेळ, माध्यम

अनियंत्रित चल : विद्यार्थिनींची सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक परिस्थिती

### ३.६.३ प्रयोगाच्या कार्यवाहीचा ओघतक्ता

**आकृती क्र. ३.४ : प्रयोगाच्या कार्यवाहीचा ओघतक्ता**

प्रायोगिक अभिकल्प

↓

प्रयोगासाठी साधननिर्मिती

↓

प्रयोगासाठी नमुना निवड

↓

चाचणीचे प्रमाणीकरण
↓
पूर्वचाचणी
↓
कार्यक्रमाची अंमलबजावणी
↓
उत्तर चाचणी
↓
माहितीचे पृथःकरण / विश्लेषण
↓
निष्कर्ष

### ३.६.४ प्रायोगिक अभिकल्प

प्रायोगिक संशोधन पद्धतीत प्रयोग करण्यापूर्वी अभिकल्प निश्चित करणे गरजेचे असते.

**व्याख्या**

प्रायोगिक संशोधन पद्धती प्रत्यक्ष राबविण्यापूर्वी त्याची एक पद्धतशीर योजना राबवावी लागते. त्यामध्ये स्वतंत्र चले, परतंत्र चले समाविष्ट केले जाणारे गट व त्यांच्या निवडीच्या पद्धती, चाचण्या इत्यादी तपशीलात विचार करून संशोधनाचा आराखडा बनवावा लागतो. यालाच प्रायोगिक अभिकल्प म्हणतात.

**१. पूर्व प्रायोगिक अभिकल्प**

अ. एकल गट : केवळ उत्तर परिक्षण अभिकल्प

ब. एकल गट : पूर्वोत्तर परिक्षण अभिकल्प

क. स्थिर गट : तुलना अभिकल्प

**२. विशुद्ध प्रायोगिक अभिकल्प**

अ. पूर्वोत्तर परिक्षण नियंत्रित गट अभिकल्प

ब. केवळ उत्तर परिक्षण नियंत्रित गट अभिकल्प

**३. प्रायोगिक अभिकल्प**

अ. समय मालिका अभिकल्प

ब. असमान नियंत्रित गट अभिकल्प

क. प्रति संतुलित अभिकल्प

**प्रस्तुत संशोधनासाठी अभिकल्पाची निवड**

प्रस्तुत संशोधनासाठी एकलगट अभिकल्पाचा वापर संशोधकाने केला आहे.

**एकल गट पूर्व चाचणी–उत्तर चाचणी अभिकल्प**

प्रस्तुत संशोधनात श्री शिव छत्रपती महाविद्यालयातील ६२ विद्यार्थिनींचा गट पूर्व चाचणी व उत्तर चाचणीसाठी निवडला आहे.

**प्रायोगिक सप्रमाणता**

प्रायोगिक संशोधन पद्धतीमध्ये स्वतंत्र चलाचा अश्रित चलावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केला जातो. त्यातून स्वतंत्र चलाची परिणामकारकता अभ्यासली जाते. प्रयोगाअंती प्राप्त माहितीवर प्रक्रिया करून स्वतंत्र चलाविषयी निष्कर्ष काढले जातात. या निष्कर्षांची अचूकता ही प्रायोगिक सप्रमाणतेशी संबंधित असते. आश्रित चलाला प्रभावित करणाऱ्या कोणत्याही अनियंत्रित, बाह्य चलांमुळे प्रायोगिक अभ्यासाच्या सप्रमाणतेस धोका निर्माण होतो व त्या अभ्यासाची सप्रमाणता प्रश्नांकीत होते.

प्रायोगिक अभ्यासाच्या निष्कर्षाला जेव्हा केवळ हाताळेलेले स्वाधीन चल जबाबदार असते व त्या प्रायोगिक अभ्यासाचे निष्कर्ष प्रयोगादरम्यानच्या परिस्थितीपेक्षा भिन्न परिस्थीतीतही खरे ठरतात याला प्रायोगिक सप्रमाणता म्हणतात.

**प्रायोगिक सप्रमाणतेवर परिणाम करणारे घटक**

प्रायोगिक सप्रमाणतेच्या प्रामुख्याने अंतर्गत व बाह्य सप्रमाणतेवर परिणाम करणारे घटक पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) आंतरिक सप्रमाणता**

१. समकालीन घटना

२. परिपक्वता

३. पूर्व परीक्षण

४. साधनसिद्धी

५. सांख्यिकीय समाश्रयन

६. प्रयोगवस्तुची भेददर्शी निवड

७. प्रायोगिक मर्त्यता

**ब) बाह्य सप्रमाणतेवर परिणाम करणारे घटक**

१. जनसंख्या सप्रमाणता

२. परिस्थितीकी सप्रमाणता

३. संचालनांची सप्रमाणता

**प्रायोगिक सप्रमाणतेवर परिणाम करणाऱ्या घटकांचे नियंत्रण**

आश्रित चलामध्ये आढळून आलेला फरक हा इतर कोणत्याही चल घटकामुळे पडलेला नाही तर तो फक्त स्वाधीन चलाच्या हाताळणीचाच परिणाम आहे हे निर्विवादपणे प्रतिपादन करता येणे म्हणजेच संशोधन अभ्यासाचे निष्कर्ष सप्रमाण आहेत हे सिद्ध करणे होय. यालाच संशोधनाची आंतरिक सप्रमाणता म्हणतात.

प्रस्तुत संशोधनात आंतरिक सप्रमाणतेवर परिणाम करणाऱ्या पुढील घटकांना नियंत्रित करून आंतरिक सप्रमाणता वाढविण्याचा प्रयत्न केला आहे.

१. **समकालीन घटना** : वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची रचना करताना कार्यक्रमात विविधता व नाविन्यता होती. प्रायोगिक गटातील सर्वच विद्यार्थिनींसाठी समान कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तसेच कोणताही खंड न पडता सलगपणे निर्धारित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कार्यक्रमाची अंमलबजावणी केली. त्यामुळे समकालीन घटना या घटकावर संशोधकाला नियंत्रण ठेवणे शक्य झाले.

२. **परिपक्वता** : प्रयोगासाठी निवडलेल्या विद्यार्थिनींचा वयोगट हा साधारणतः २१ ते २४ वर्ष दरम्यान आहे. सदर कार्यक्रम हा २५ दिवसांचा होता. कार्यक्रम आणि उत्तरचाचणी यामध्ये एक महिन्याचा कालावधी गेला. त्यामुळे शारीरिक परिपक्वतेमध्ये तसेच विद्यार्थिनींच्या अनुभवामध्ये बदल होण्याची शक्यता अत्यंत कमी आहे.

३. **पूर्व परीक्षण** : पूर्व परीक्षणाच्या मापनामुळे संशोधनाच्या हेतुविषयी सुप्त कल्पना प्रतिसादकांना आल्यास ते उत्तर परीक्षणावेळी आपले प्रतिसाद बदलण्याची शक्यता असते. त्याचा परिणाम अंतर्गत सप्रमाणतेवर होतो. संशोधकाने पूर्व चाचणीतून आलेल्या अचूक उत्तरांची माहिती विद्यार्थिनींना दिली नाही. तसेच उत्तरचाचणी कोणत्या प्रकारची असेल

याची कल्पना विद्यार्थिनींना येणार नाही याची दक्षता घेतली. त्यामुळे या घटकावर नियंत्रण ठेवणे शक्य झाले.

४. **साधनसिद्धी** : प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने पूर्व परीक्षण आणि उत्तर परीक्षण यासाठी संशोधक निर्मित प्रश्नावलीचा वापर केला आहे. एकच प्रश्नावली वापरल्यामुळे प्रायोगिक साधनसिद्धीचा कोणताही परिणाम होण्याची शक्यता कमी झाली. तसेच प्रश्नावलीतील प्रश्नांची संख्या अधिक नसल्यामुळे ती प्रतिसाद देण्यास सहज सोपी आहे.

५. **सांख्यिकीय समाश्रयन** : सांख्यिकीय समाश्रयन या घटकावर नियंत्रण ठेवण्यासाठी संशोधकाने उद्दिष्टांना अनुसरून कार्यक्रमाची रचना केली. शैक्षणिक सिद्धांतावर आधारित कार्यक्रम असल्यामुळे आणि तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन घेतल्यामुळे उत्तर परीक्षणातील प्राप्त गुणांक हे उपचारातील परिणामांमुळेच मिळणे शक्य आहे.

६. **प्रयोज्याची भेददर्शी निवड** : सदर संशोधनामध्ये एकलगट अभिकल्पाचा अवलंब केला आहे. त्याच गटावर पूर्वचाचणी घेऊन कार्यक्रमाची अंमलबजावणी केली आणि उत्तरचाचणी दिलेली आहे. त्यामुळे प्रायोगिक व नियंत्रित गटातील सहभागीची वेगवेगळी गुणवैशिष्ट्ये या संशोधनात नाहीत.

७. **प्रायोगिक मर्त्यता** : सदर घटकावर नियंत्रण ठेवण्यासाठी संशोधकाने विद्यार्थिनींना उपस्थिती अनिवार्य केली. त्यांना उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचा त्यांच्या भविष्यातील जीवनात होणारा फायदा याची जाणीव करून दिली.

**बाह्य सप्रमाणतेवर परिणाम करणारे घटक**

प्रयोगाचे निष्कर्ष प्रायोगिक परिस्थितीशिवाय अन्य परिस्थितीतही अचूक आढळून येणे म्हणजे प्रयोगाची बाह्यसप्रमाणता होय. प्रस्तुत संशोधनात बाह्य सप्रमाणतेवर परिणाम करणाऱ्या खालील घटकांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधकाकडे कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक कौशल्य नसतील तर कार्यक्रमाची परिणामकारकता दिसणार नाही. यासाठी संशोधकाने कार्यक्रम राबविण्यापूर्वी कार्यक्रमाचा पथदर्शी अभ्यास केला. त्यामुळे कार्यक्रम राबविण्यामध्ये येणारे अडथळे व त्या अडथळ्यांवरील उपाय यांची माहिती संशोधकास मिळाली.

### ३.६.५ प्रयोगासाठी साधन निर्मिती

### ३.६.५.१ संपादन चाचणी

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने संशोधक निर्मित प्रश्नावलीचा उपयोग पूर्व व उत्तर चाचणी म्हणून केला. महिलांच्या विविध मानवी हक्कावर आधारित असलेल्या आशयावर प्रश्नावली तयार केली. तसेच प्रश्नावलीची विश्वसनीयता आणि सप्रमाणता यांची पडताळणी केली. प्रत्येक प्रश्नाचे प्रश्नवार पृथ:करण करून काठिण्यपातळी, भेदभावक्षमता निश्चित करून चाचणीचे अंतिम स्वरूप तयार केले. (प्रश्नावली, परिशिष्ट ग)

### ३.६.६ जनसंख्या आणि नमुना निवड

**जनसंख्या**

जनसंख्या म्हणजे संशोधन विषयाशी संबंधित घटकांचा मोठा समुह किंवा गट होय.

संशोधनात एखाद्या प्रयुक्त वस्तुंच्या गटाच्या लक्षणाबाबत विश्वसनीय निष्कर्ष काढायचे असतात. अशा प्रयोग वस्तुंच्या संचाला जनसंख्या म्हणतात. (पंडीत, २०१०)

**प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या**

प्रस्तुत संशोधनामध्ये पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींचा समावेश करण्यात आला आहे.

**न्यादर्श**

शैक्षणिक संशोधनामध्ये जनसंख्येवर प्रयोग राबविणे शक्य नसते त्यामुळे जनसंख्येतून नमुना निवडणे आवश्यक असते.

जनसंख्येच्या तथ्याविषयी पूर्वानुमान करण्याकरिता जनसंख्येतून निवडलेल्या व्यक्ती किंवा वस्तू यांच्या लहान समुदायाला न्यादर्श किंवा नमुना म्हणतात. (मुळे, उमाठे, १९९८)

शैक्षणिक समस्यांच्या संदर्भात संपूर्ण जनसंख्येतून एक प्रातिनिधिक नमुना निवडला जातो. नमुना निवडताना भौगोलिक मर्यादांचाही विचार केला जातो.

**न्यादर्श निवडीच्या पद्धती**

नमुना निवडीच्या पद्धतीचे प्रमुख दोन गटात वर्गीकरण करता येते.

**१. संभाव्यतेवर आधारीत पद्धती**

जनसंख्येतून न्यादर्शाचे घटक निवडताना ते निवडले जाण्याची निश्चित संभाव्यता ज्या पद्धतीत सांगता येते त्या पद्धतीला संभाव्यता न्यादर्श पद्धती म्हणतात.

**२. असंभाव्यतेवर आधारीत पद्धती**

ज्या पद्धतीत संशोधक आपल्या व्यक्तिगत निर्णयानुसार जनसंख्येचे प्रतिनिधित्व करू शकणाऱ्या न्यादर्श घटकाची निवड करतो त्यास असंभाव्यता पद्धती म्हणतात.

न्यादर्श निवडीच्या पद्धती खालीलप्रमाणे आहेत.

**संभाव्यता पद्धती**

१. सुगम यादृच्छिक न्यादर्शन

२. नियमबद्ध न्यादर्शन

३. बहुस्तरीय न्यादर्शन

४. वर्गीकृत न्यादर्शन

५. गुच्छ न्यादर्शन

**असंभाव्यता पद्धती**

१. प्रासंगिक न्यादर्शन

२. निर्दिष्टांश न्यादर्शन

३. सप्रयोजन न्यादर्शन

**प्रस्तुत संशोधनासाठी न्यादर्शनः** प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने पुढीलप्रमाणे न्यादर्श निवड पद्धतीचा अवलंब केला आहे.

**कोष्टक क्र. ३.१० : प्रस्तुत संशोधनासाठी न्यादर्श**

| संशोधन पद्धती | न्यादर्श पद्धती | न्यादर्श |
|---|---|---|
| सर्वेक्षण पद्धती | यादृच्छिक पद्धती | पुणे विद्यापीठाशी संलग्नित १२ महाविद्यालयातील ७५६ विद्यार्थिनी |
| प्रायोगिक पद्धती | सहेतुक पद्धती | एका महाविद्यालयातील ६२ विद्यार्थिनी |

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने सर्वेक्षणासाठी पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित १२ महाविद्यालयातील कला शाखेच्या ७५६ विद्यार्थिनींची निवड यादृच्छिक पद्धतीने केली. तसेच प्रायोगिक गटासाठी श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर येथील कला शाखेतील ६२ विद्यार्थिनींची निवड सहेतूक पद्धतीने केली.

**माहिती संकलनाची साधने**

संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी विविध तंत्र व पद्धती वापरल्या जातात. त्यांना आपण संशोधन साधने असे म्हणतो. संशोधनाची उद्दिष्टांनुसार कोणत्या प्रकारची माहिती संकलित करायची आहे यावर संशोधन साधनाची निवड आधारित असते.

प्रस्तुत संशोधनामध्ये महिलांच्या मानवी हक्कांविषयी विद्यार्थिनीकडे असलेली माहिती अभ्यासण्यासाठी संशोधकनिर्मित प्रश्नावलीचा वापर करण्यात आला आहे.

महिलांच्या मानवी हक्काविषयी माहिती अभ्यासण्यासाठी संशोधकाने तयार केलेली प्रश्नावली त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींकडून तपासून घेतली आहे.

**महिला मानवी हक्क शिक्षण प्रश्नवालीचे स्पष्टीकरण**

संशोधकाने निर्माण केलेली महिला मानवी हक्क शिक्षण प्रश्नावली ही सर्व्हेक्षणातून माहिती संकलनासाठी तसेच पूर्व आणि उत्तर चाचणीसाठी वापरलेली आहे. यामध्ये एकूण ५० वस्तुनिष्ठ प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. महिलांच्या विविध हक्कांच्या वर्गीकरणानुसार प्रश्नांची संख्या निश्चित करण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ३.११ : प्रश्नावलीची घटकानुसार विभागणी**

| **अ.क्र.** | **महिलांचे विविध हक्क** | **प्रश्नांची संख्या** | **गुण** |
|---|---|---|---|
| १ | वैवाहिक हक्क | १२ | २४ |
| २ | वारसा हक्क | ९ | १८ |
| ३ | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | १० | २० |
| ४ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | १० | २० |
| ५ | संविधानिक हक्क | ९ | १८ |
| | **एकूण** | **५०** | **१००** |

### ३.६.७ प्रश्नावलीचे प्रमाणीकरण

### ३.६.७.१ प्रश्नावलीची विश्वसनीयता

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने तयार केलेल्या प्रश्नावलीची विश्वसनीयता ठरविण्यासाठी चाचणी–पुनर्चाचणी पद्धतीचा वापर केला. या पद्धतीने विश्वसनीयता ठरविण्यासाठी संशोधकाने तयार केलेली प्रश्नावली दिलीपराव वळसे पाटील महाविद्यालय, निमगाव सावा येथील तृतीय वर्ष कला शाखेतील ३० विद्यार्थिनींना देण्यात आली. विद्यार्थिनींना प्रश्नावली सोडविण्यासाठी लागणारा वेळ याची नोंद करण्यात आली. पुन्हा १५ दिवसांनंतर तीच चाचणी त्याच विद्यार्थिनींना दिली. चाचणी देताना सर्व दक्षता घेण्यात आली. दोन्ही चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांवरून सहसंबंध काढण्यात आला. या दोन्ही चाचणीतील संपादनाचा आलेला सहसंबंध गुणक ०.८२ म्हणजेच उच्चतम स्वरूपाचा असून विश्वसनीय आहे.

### ३.६.७.२ प्रश्नावलीची सप्रमाणता

सप्रमाणता म्हणजे जे वैशिष्ट्य मोजण्यासाठी कसोटी तयार केली आहे. ते वैशिष्ट्य त्या कसोटीद्वारा किती प्रमाणात मोजले जाते हे होय. सप्रमाणतेचे पुढील प्रमुख प्रकार पडतात.

अ. आशय सप्रमाणता

ब. संकल्पना सप्रमाणता

क. समवर्ती सप्रमाणता

ड. भविष्यकथानत्मक सप्रमाणता

प्रस्तुत संशोधनातून संशोधकाने तयार केलेल्या प्रश्नावलीची सप्रमाणता ठरविण्यासाठी आशय सप्रमाणतेचा वापर केला. आशय सप्रमाणता म्हणजे अभ्यासक्रमातील प्रत्येक घटक उपघटकावर प्रश्नांचे योग्य प्रमाण, प्रश्नांची भाषा, वयानुरूप योग्य व सोपी असावी होय. (कदम, चौधरी, २०११)

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने तयार केलेली प्रश्नावली शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांना तपासण्यासाठी दिली. तज्ज्ञांनी सुचविलेल्या सुचनांनुसार प्रश्नावलीत योग्य ते बदल केले.

**कोष्टक क्र. ३.१२ : चाचणीची विश्वसनीयता व सप्रमाणता**

| साधन | विश्वसनीयता | सप्रमाणता |
|---|---|---|
| प्रश्नावली | चाचणी पुनर्चाचणी (सहसंबंध गुणक ०.८२) | आशय सप्रमाणता |

### ३.६.७.३ प्रश्नावलीचे प्रश्नवार पृथःकरण

संशोधनासाठी तयार केलेल्या प्रश्नावलीतील प्रश्नांची काठिन्यपातळी तसेच भेदभावक्षमता किती आहे हे पाहण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्नांचे पृथःकरण करण्यात आले. त्यासाठी चाचणीचा प्रारंभिक नमुना विद्यार्थिनींना सोडविण्यासाठी दिला.

विद्यार्थिनींकडून पथदर्शी अभ्यासासाठी भरून घेतलेल्या प्रश्नावलीतील संपादनानुसार सर्वप्रथम गुणांच्या उतरत्या क्रमाने उत्तरपत्रिकांची मांडणी केली. त्यानुसार वरचे शेकडा २७ टक्के विद्यार्थिनी आणि शेवटच्या २७ टक्के विद्यार्थिनी असे दोन गट तुलनेसाठी घेतले. दोन्ही गटातील बरोबर उत्तरांच्या संख्येच्या आधारे काठिण्यमुल्य आणि भेदनक्षमता काढली.

काठिण्यमुल्य काढण्यासाठी पुढील सुत्राचा वापर केला.

$$DV = \frac{RH + RL}{NH + NL}$$

DV = काठिण्यमुल्य

RH = वरच्या गटातील बरोबर उत्तरांची संख्या

RL = खालील गटातील बरोबर उत्तरांची संख्या

NH = वरच्या गटातील एकूण विद्यार्थी संख्या

NL = खालील गटातील एकूण विद्यार्थी संख्या

चाचणीची भेदनक्षमता काढण्यासाठी खालील सुत्राचा वापर केला.

$$DI = \frac{RH + RL}{\frac{1}{2}N}$$

DI = भेदनक्षमता

RH = वरच्या गटातील बरोबर उत्तरांची संख्या

RL = खालील गटातील बरोबर उत्तरांची संख्या

N = एकूण विद्यार्थी संख्या

वरील सुत्राचा वापर करून काढलेल्या भेदनक्षमतेतील ०.१८ पेक्षा कमी भेदन मूल्य असलेल्या प्रश्नांचा समावेश प्रश्नावलीत केला नाही. ०.२० ते ०.२९ भेदनमुल्य असणाऱ्या प्रश्नांच्या स्वरूपात सुधारणा केली.

### ३.७ पूर्वचाचणीचे आयोजन

संशोधकाने महिला मानवी हक्क विषयक विद्यार्थिनींना सद्यस्थितीच्या माहितीचा अभ्यास करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींकडून प्रश्नावली भरून घेतली. त्यापैकी श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर येथील कला शाखेतील विद्यार्थिनींची निवड प्रयोगासाठी करण्यात आली. या महाविद्यालयातील प्रश्नावलीद्वारे संकलित केलेली माहिती पूर्वचाचणीसाठी गृहित धरण्यात आली.

### ३.८ प्रत्यक्ष प्रयोग / कार्यक्रमाची अंमलबजावणी

प्रस्तुत संशोधनामध्ये श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर येथील कला शाखेतील ६२ विद्यार्थिनींची निवड सहेतुक नमुना निवड पद्धतीने करण्यात आली. पूर्वचाचणीनंतर संशोधकाने विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी या गटावर केली.

### ३.९ उत्तर चाचणीचे आयोजन

संशोधकाने प्रायोगिक गटावर महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी केल्यानंतर त्या गटाची उत्तरचाचणी म्हणून पूर्वी दिलेल्या प्रश्नावलीचाच वापर केला. पूर्व चाचणी व उत्तर चाचणी यांच्या गुणांच्या आधारे सदर माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले व निष्कर्ष काढण्यात आले.

### ३.१० माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

पूर्वचाचणी, कार्यक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही आणि त्यानंतर घेतलेल्या उत्तर चाचणीच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीचे संख्याशास्त्रीय साधनाच्या आधारे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन केले. त्यासाठी पुढील संख्याशास्त्रीय साधनाचा वापर केला.

१. मध्यमान : टी मूल्य काढण्यासाठी पूर्व आणि उत्तर चाचणीचे मध्यमान काढले.

२. प्रमाण विचलन : मध्यमानाच्या आधारे पूर्व व उत्तर चाचण्यांचे प्रमाणविचलन काढले.

३. टी–परिक्षिका : वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी तयार केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता तपासण्यासाठी टी परिक्षिका या साधनाचा उपयोग केला. ०.०१ या सार्थकता स्तरावर पडताळणी केली.

**समारोप**

प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी आवश्यक असलेली संशोधनाची कार्यपद्धती मांडताना संशोधनाच्या उद्दिष्टानुसार संशोधन पद्धती, त्यासाठी माहिती संकलनाची साधने, साधनाचा पथदर्शक अभ्यास, विश्वसनीयता, सप्रमाणता, कार्यक्रमाची निर्मिती, कार्यक्रमाची अंमलबजावणी यांचा समावेश केला आहे. पुढील प्रकरणामध्ये पूर्वचाचणी आणि उत्तरचाचणीच्या आयोजनातून आलेल्या माहितीचे विश्लेषण तसेच अर्थनिर्वचन केले आहे.

## प्रकरण चौथे

# माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण चौथे

# माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ४.१ | प्रस्तावना | १११ |
| ४.२ | माहितीचे विश्लेषण | १११ |
| ४.३ | उद्दिष्ट क्र.१ साठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | ११२ |
| ४.४ | उद्दिष्ट क्र.२ साठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १२५ |
| ४.५ | उद्दिष्ट क्र.३ साठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १२८ |
| ४.६ | वैवाहिक हक्क घटकांसाठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १२८ |
| ४.७ | वारसा हक्क घटकासाठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १३१ |
| ४.८ | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क घटकासाठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १३५ |
| ४.९ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकासाठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १३७ |
| ४.१० | संविधानिक हक्क घटकासाठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १४० |
| ४.११ | महिला मानवी हक्कातील एकत्रित पाच घटकांचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | १४३ |

**प्रकरण चौथे**

# माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

## ४.१ प्रस्तावना

संशोधनामध्ये माहितीचे संकलन केल्यानंतर त्या माहितीचे सुव्यवस्थित वर्गीकरण करणे गरजेचे असते. वर्गीकरण केलेल्या माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचन केले जाते. संशोधनातील समस्या निराकरणासाठी प्राप्त माहितीचे संख्याशास्त्रीय साधनाद्वारे विश्लेषण करून समस्यांसाठी ठरविलेली उद्दिष्टे व परिकल्पना पडताळून पाहणे व त्याद्वारे निष्कर्ष मांडण्यासाठी माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करणे गरजेचे आहे.

## ४.२ माहितीचे विश्लेषण

संकलित माहितीचे विश्लेषण संशोधनाच्या स्वरूपानुसार गुणात्मक व संख्यात्मक या दोन प्रकारांनी केले जाते. प्रस्तुत संशोधनात पहिल्या उद्दिष्टासाठी वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी संशोधकाने तयार केलेल्या प्रश्नावलीद्वारे माहितीचे संकलन केले. प्रश्नावलीतील विविध हक्कांच्या वर्गीकरणानुसार कोष्टके तयार केली. रेखाचिन्हाद्वारे संख्या निश्चित केली. नंतर प्रत्येक हक्काच्या प्रकाराचे शेकडा प्रमाण काढले. प्रश्नावलीतून मिळालेल्या प्रतिसादावरून विद्यार्थिनींमध्ये महिला मानवी हक्काविषयी असलेल्या माहितीची सद्यस्थिती लक्षात आली. त्याचा उपयोग कार्यक्रमनिर्मितीसाठी झाला.

प्रस्तुत संशोधनाच्या दुसऱ्या उद्दिष्टामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम तयार केला. कार्यक्रम तयार करत असताना साधननिर्मितीच्या विविध पायऱ्यांचा आधार संशोधकाने घेतला. कार्यक्रम तयार केल्यानंतर त्याविषयी तज्ज्ञांची मते जाणून घेतली. तज्ज्ञांनी दिलेल्या अभिप्रायानुसार कार्यक्रमात योग्य बदल केले. (महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिशिष्ट घ)

प्रस्तुत संशोधनाच्या तिसऱ्या उद्दिष्टामध्ये संशोधकाने विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता तपासण्यासाठी प्रायोगिक गटास उत्तरचाचणी दिली. पूर्वचाचणी व उत्तरचाचणीतील मिळालेल्या गुणांच्या आधारावर मध्यमान, प्रमाणविचलन व टी मूल्य काढून परिकल्पना तपासली.

## ४.३ प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्ट क्र.१ साठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

उद्दिष्ट क्र.१ : 'वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्कांविषयी असलेल्या माहितीची सद्यस्थिती तपासणे.'

प्रस्तुत उद्दिष्ट साध्यतेसाठी संशोधकाने विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण प्रश्नावलीच्या साहाय्याने पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या एकूण ७५६ विद्यार्थिनींकडून प्रश्नावली भरून घेतली.

प्रस्तुत प्रश्नावलीमध्ये महिलांच्या मानवी हक्कांतील पाच प्रकारच्या हक्कांचा समावेश करण्यात आला.

**कोष्टक क्र. ४.१ : महिला मानवी हक्कांतील घटकानुसार प्रश्नांची विभागणी**

| अ.क्र. | प्रश्न क्र. | महिला मानवी हक्कांचे प्रकार | प्रश्न संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | १ ते १२ | वैवाहिक हक्क | १२ | २४ |
| २ | १३ ते २१ | वारसा हक्क | ९ | १८ |
| ३ | २२ ते ३१ | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | १० | २० |
| ४ | ३२ ते ४१ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | १० | २० |
| ५ | ४२ ते ५० | संविधानिक हक्क | ९ | १८ |

**आलेख क्र. ४.१ : प्रश्नांची घटकानुसार विभागणी**



वरील सारणीवरून लक्षात येते की, वैवाहिक हक्क या घटकावर २४ टक्के विचारले आहेत. वारसा हक्क आणि संविधानिक हक्क यासाठी प्रत्येकी १८ टक्के विचारले आहेत. तर नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क आणि हिंसेपासून संरक्षणाचा हक्क यासाठी प्रत्येकी २० टक्के विचारले आहेत.

**कोष्टक क्र. ४.२ : विद्यार्थिनींची वैवाहिक स्थिती**

| अ.क्र. | वैवाहिक स्थिती | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | अविवाहित | ७०४ | ९२.०२ |
| २ | विवाहित | ५२ | ६.८७ |
| ३ | इतर | ०० | ०० |

**आलेख क्र. ४.२ : विद्यार्थिनींची वैवाहिक स्थिती**




वरील सारणी आणि आलेखावरून लक्षात येते की, एकूण प्रतिसादक विद्यार्थिनींपैकी ९२.०२ टक्के विद्यार्थिनी अविवाहित आहेत. तर केवळ ६.८७ टक्के विद्यार्थिनी विवाहित आहेत.

अर्थनिर्वचन : एकूण प्रतिसादक विद्यार्थिनींपैकी बहुतांश विद्यार्थिनी अविवाहित आहेत.

**कोष्टक क्र. ४.३ : विद्यार्थिनींचे वयोगटानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | वयोगट | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २०–२४ | ६९२ | ९०.४५ |
| २ | २५–२८ | ५८ | ७.६७ |
| ३ | २९–३२ | ६ | ०.७८ |

**आलेख क्र. ४.३ : विद्यार्थिनींचे वयोगटानुसार वर्गीकरण**




वरील सारणी व आलेखावरून असे निदर्शनास येते की, वरिष्ठ महाविद्यालयातील प्रतिसादक विद्यार्थिनींपैकी ९०.४५ टक्के विद्यार्थिनी या २०–२४ या वयोगटातील आहेत. ६.६७ टक्के विद्यार्थिनी २५–२८ या वयोगटातील आहेत. तर २९–३२ वयोगटातील केवळ ०.७८ टक्के विद्यार्थिनी आहेत.

अर्थनिर्वचन : प्रतिसादक विद्यार्थिनींपैकी २०–२४ वयोगटातील विद्यार्थिनींची संख्या अधिक आहे.

**कोष्टक क्र. ४.४ : विद्यार्थिनींच्या पालकांच्या व्यवसायाची स्थिती**

| अ.क्र. | पालकांचे व्यवसाय | एकूण संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नोकरी | १६४ | २१.४३ |
| २ | व्यवसाय | ४८१ | ६२.८८ |
| ३ | स्वयंरोजगार | १११ | १४.६९ |
| ४ | इतर | ०० | ०० |

**आलेख क्र. ४.४ : पालकांचे व्यवसाय**




वरील कोष्टकावरून प्रतिसादक विद्यार्थिनींपैकी २१.४३ टक्के विद्यार्थिनींचे पालक हे नोकरी करतात तर ६२.८८% विद्यार्थिनींचे पालक हे व्यवसाय करतात. १५.६८ टक्के विद्यार्थिनींचे पालक हे स्वयंरोजगार करणारे आहेत.

अर्थनिर्वचन : प्रतिसादक विद्यार्थिनींपैकी बहुतांश विद्यार्थिनी या ग्रामीण भागातील असल्यामुळे व्यवसाय आणि स्वयंरोजगार करणारे पालकांचे प्रमाण अधिक आहे.

**उद्दिष्ट क्र.१ साठी माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

प्रस्तुत उद्दिष्ट क्र.१ च्या साध्यतेसाठी संशोधकाने पुणे जिल्ह्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या ७५६ विद्यार्थिनींकडून संशोधक निर्मित महिला मानवी हक्क शिक्षण प्रश्नावलीच्या साहाय्याने महिलांच्या हक्कांविषयी सद्यस्थितीचा शोध घेतला.

महिला मानवी हक्क शिक्षण प्रश्नावलीमध्ये विविध महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थिनींना मिळालेले प्राप्तांक खालील कोष्टकामध्ये दर्शविले आहेत.

**कोष्टक क्र. ४.५ : महिला मानवी हक्क शिक्षण चाचणीतील संपादन**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | नमुना | सरासरी |
|---|---|---|---|
| १ | बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव | ६० | ३७.३० |
| २ | अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, ता.आंबेगाव | ६५ | ३२.६१ |
| ३ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे, ता.खेड | ६४ | २९.२० |
| ४ | रत्नाई महिला महाविद्यालय, राजगुरूनगर, ता.खेड | ६८ | २८.०८ |
| ५ | श्रीमती सिताबाई रंगुजी शिंदे महाविद्यालय, बोरी, ता.जुन्नर | ६६ | ३१.९५ |
| ६ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता.जुन्नर | ५८ | ३६.९५ |
| ७ | मा.बाळासाहेब जाधव महाविद्यालय, आळे, ता.जुन्नर | ५२ | २८.७२ |
| ८ | श्री शिव छत्रपती महाविद्यालय, बोडकेनगर, ता.जुन्नर | ६२ | ३३.७७ |
| ९ | अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर, ता.जुन्नर | ६५ | ३२.४३ |
| १० | पद्ममणि जैन महाविद्यालय, पाबळ, ता.शिरूर | ६५ | ३२.२७ |
| ११ | इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ | ६७ | २९.३७ |
| १२ | सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ | ६४ | २९.५३ |
| | एकूण | ७५६ | ३१.८५ |

**आलेख क्र. ४.५ : महिला मानवी हक्क शिक्षण प्रश्नावलीतील संपादन**




**विश्लेषण :**

पुणे जिल्ह्यातील एकूण बारा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कला शाखेतील एकूण ७५६ विद्यार्थिनींचे महिला मानवी हक्क प्रश्नावलीतील संपादनाची सरासरी सारणीमध्ये दिली आहे.

बारा महाविद्यालयांपैकी महिला मानवी हक्कातील कमाल संपादन (३७.३०%) बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता. आंबेगाव येथील विद्यार्थिनींचे आहे. तसेच रत्नाई महाविद्यालय राजगुरुनगर ता. खेड येथील विद्यार्थिनींचे महिला मानवी हक्कातील संपादन सर्वात कमी (२८.०८%) असल्याचे दिसून येते. महिला मानवी हक्कातील एकूण संपादनाची सरासरी ३१.८५% आहे.

**अर्थनिर्वचन**

वरील माहितीवरुन लक्षात येते की, महिला मानवी हक्कातील एकूण संपादनाची सरासरी ही निम्मापेक्षाही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनीना महिला मानवी हक्काविषयी माहिती कमी आहे.

महिला मानवी हक्कातील वैवाहिक हक्क, वारसा हक्क, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क, हिंसेपासून संरक्षणाचा हक्क, संविधानिक हक्क यामधील विद्यार्थिनींचे संपादन पुढीलप्रमाणे आहे.

**कोष्टक क्र. ४.६ : महिला मानवी हक्कातील वैवाहिक हक्क घटकातील संपादन**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | नमुना | सरासरी |
|---|---|---|---|
| १ | बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव | ६० | ३८.१९ |
| २ | अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, ता.आंबेगाव | ६५ | ३३.९७ |
| ३ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे, ता.खेड | ६४ | ३०.४६ |
| ४ | रत्नाई महिला महाविद्यालय, राजगुरूनगर, ता.खेड | ६८ | २७.२० |
| ५ | श्रीमती सिताबाई रंगुजी शिंदे महाविद्यालय, बोरी, ता.जुन्नर | ६६ | ३२.५६ |
| ६ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता.जुन्नर | ५८ | ३८.६४ |
| ७ | मा.बाळासाहेब जाधव महाविद्यालय, आळे, ता.जुन्नर | ५२ | २८.५२ |
| ८ | श्री शिव छत्रपती महाविद्यालय, बोडकेनगर, ता.जुन्नर | ६२ | ३२.१९ |
| ९ | अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर, ता.जुन्नर | ६५ | ३५.०० |
| १० | पद्ममणि जैन महाविद्यालय, पाबळ, ता.शिरूर | ६५ | ३२.५६ |
| ११ | इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ | ६७ | २८.७९ |
| १२ | सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ | ६४ | २९.१६ |
| | एकूण | ७५६ | ३२.२७ |

**आलेख क्र. ४.६ : महिला मानवी हक्कातील वैवाहिक हक्क घटकातील संपादन**



**विश्लेषणः**

एकूण बारा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थिनींचे महिला मानवी हक्कातील वैवाहिक हक्क  या घटकातील संपादनाची सरासरी सारणीमध्ये दर्शविली आहे.

बारा महाविद्यालयांपैकी वैवाहिक हक्क घटकातील कमाल संपादन (३८.६४%) कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव येथील विद्यार्थिनींचे आहे. तसेच रत्नाई महाविद्यालय राजगुरुनगर ता. खेड येथील विद्यार्थिनींचे वैवाहिक हक्क या घटकातील संपादन सर्वात कमी (२७.२०%) असल्याचे दिसून येते. वैवाहिक हक्क घटकातील एकूण संपादनाची सरासरी ३२.२७% आहे.

**अर्थनिर्वचन :**

वरील माहितीवरुन लक्षात येते की, वैवाहिक हक्क घटकांतील एकूण संपादनाची सरासरी ही निम्म्यापेक्षही  कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना वैवाहिक हक्काविषयी माहिती कमी आहे.

**कोष्टक क्र. ४.७ : महिला मानवी हक्कातील वारसा हक्क घटकातील संपादन**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | नमुना | सरासरी |
|---|---|---|---|
| १ | बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव | ६० | ४०.०० |
| २ | अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, ता.आंबेगाव | ६५ | ३३.५० |
| ३ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे, ता.खेड | ६४ | ३०.५५ |
| ४ | रत्नाई महिला महाविद्यालय, राजगुरूनगर, ता.खेड | ६८ | २९.४१ |
| ५ | श्रीमती सिताबाई रंगुजी शिंदे महाविद्यालय, बोरी, ता.जुन्नर | ६६ | ३५.३० |
| ६ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता.जुन्नर | ५८ | ३७.९३ |
| ७ | मा.बाळासाहेब जाधव महाविद्यालय, आळे, ता.जुन्नर | ५२ | २८.६३ |
| ८ | श्री शिव छत्रपती महाविद्यालय, बोडकेनगर, ता.जुन्नर | ६२ | ३५.६९ |
| ९ | अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर, ता.जुन्नर | ६५ | ३१.७९ |
| १० | पद्ममणि जैन महाविद्यालय, पाबळ, ता.शिरूर | ६५ | ३४.१८ |
| ११ | इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ | ६७ | २८.८५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ | ६४ | २९.८६ |
| | एकूण | ७५६ | ३२.९७ |

**आलेख क्र. ४.७ : महिला मानवी हक्कातील वारसा हक्क घटकातील संपादन**




**विश्लेषण:**

एकूण बारा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थिनींचे महिला मानवी हक्कातील वारसा हक्क या घटकातील संपादनाची सरासरी सारणीमध्ये दर्शविली आहे.

सारणीवरून असे निदर्शित होते की, बारा महाविद्यालयापैंकी वारसा हक्क घटकातील कमाल संपादन (४०%) बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव येथील विद्यार्थिनींचे आहे. तसेच बाळासाहेब जाधव महाविद्यालय, आळे येथील विद्यार्थिनींचे वारसा हक्क याघटकातील संपादन सर्वात कमी (२८.६५%) असल्याचे दिसून येते. वारसा हक्क घटकांतील एकूण संपादनाची सरासरी ३२.९७% आहे.

**अर्थनिर्वचनः**

वरील माहितीवरुन लक्षात येते की वारसा हक्क घटकातील एकूण संपादनाची सरासरी ही निम्म्यापेक्षाही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना वारसा हक्कविषयी माहिती कमी आहे.

**कोष्टक क्र. ४.८ : महिला मानवी हक्कातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क घटकातील संपादन**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | नमुना | सरासरी |
|---|---|---|---|
| १ | बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव | ६० | ३५.१६ |
| २ | अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, ता.आंबेगाव | ६५ | ३१.५३ |
| ३ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे, ता.खेड | ६४ | २९.५३ |
| ४ | रत्नाई महिला महाविद्यालय, राजगुरूनगर, ता.खेड | ६८ | २९.८५ |
| ५ | श्रीमती सिताबाई रंगुजी शिंदे महाविद्यालय, बोरी, ता.जुन्नर | ६६ | ३४.०३ |
| ६ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता.जुन्नर | ५८ | ३८.६२ |
| ७ | मा.बाळासाहेब जाधव महाविद्यालय, आळे, ता.जुन्नर | ५२ | ३१.३४ |
| ८ | श्री शिव छत्रपती महाविद्यालय, बोडकेनगर, ता.जुन्नर | ६२ | ३३.०३ |
| ९ | अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर, ता.जुन्नर | ६५ | ३४.४६ |
| १० | पद्ममणि जैन महाविद्यालय, पाबळ, ता.शिरूर | ६५ | ३५.०७ |
| ११ | इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ | ६७ | २८.५० |
| १२ | सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ | ६४ | ३३.२८ |
| | एकूण | ७५६ | ३२.८६ |

**आलेख क्र. ४.८ : महिला मानवी हक्कातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क घटकातील संपादन**



**विश्लेषण:**

एकूण बारा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थिनींचे महिला मानवी हक्कातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटकातील संपादनाची सरासरी सारणीमध्ये दर्शविली आहे.

सारणीवरून असे निदर्शित होते की, बारा महाविद्यालयापैकी नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क घटकातील कमाल संपादन (३८.६२%) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव येथील विद्यार्थिनींचे आहे. तसेच इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे येथील विद्यार्थिनींचे नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटाकतील संपादन सर्वात कमी (२८.५०%) असल्याचे दिसून येते. नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटाकतील एकूण संपादनाची सरासरी ३२.८६% आहे.

**अर्थनिर्वचन**

वरील माहितीवरुन लक्षात येते की नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या हक्कांतील एकूण संपादनाची सरासरी ही निम्म्यापेक्षाही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनीना नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्काविषयी माहिती कमी आहे.

**कोष्टक क्र. ४.९ : महिला मानवी हक्कातील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकातील संपादन**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | नमुना | सरासरी |
|---|---|---|---|
| १ | बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव | ६० | ३७.०० |
| २ | अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, ता.आंबेगाव | ६५ | ३३.०७ |
| ३ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे, ता.खेड | ६४ | ३१.०९ |
| ४ | रत्नाई महिला महाविद्यालय, राजगुरूनगर, ता.खेड | ६८ | २९.५५ |
| ५ | श्रीमती सिताबाई रंगुजी शिंदे महाविद्यालय, बोरी, ता.जुन्नर | ६६ | ३४.५१ |
| ६ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता.जुन्नर | ५८ | ३८.९६ |
| ७ | मा.बाळासाहेब जाधव महाविद्यालय, आळे, ता.जुन्नर | ५२ | २८.२६ |
| ८ | श्री शिव छत्रपती महाविद्यालय, बोडकेनगर, ता.जुन्नर | ६२ | ३३.३३ |
| ९ | अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर, ता.जुन्नर | ६५ | ३४.०० |
| १० | पद्ममणि जैन महाविद्यालय, पाबळ, ता.शिरूर | ६५ | ३३.३८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ | ६७ | २७.९१ |
| १२ | सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ | ६४ | २८.९० |
| | एकूण | ७५६ | ३२.४९ |

**आलेख क्र. ४.९ : महिला मानवी हक्कातील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकातील संपादन**




**विश्लेषण:**

एकूण बारा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थिनींचे महिला मानवी हक्कातील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकातील संपादनाची सरासरी सारणीमध्ये दर्शविली आहे.

सारणीवरून असे निदर्शित होते की, बारा महाविद्यालयांपैकी हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकातील कमाल संपादन (३८.९६%) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव येथील विद्यार्थिनींचे आहे. तसेच इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे येथील विद्यार्थिनींचे हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटाकतील संपादन सर्वात कमी (२७.९१%) असल्याचे दिसून येते. हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटाकतील एकूण संपादनाची सरासरी ३२.४९% आहे.

**अर्थनिर्वचन**

वरील माहितीनुसार लक्षात येते की, संविधानिक हक्क घटकातील एकूण संपादनाची सरासरी ही निम्म्यापेक्षाही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना संविधानिक हक्काविषयी माहिती कमी आहे.

**कोष्टक क्र. ४.१० : महिला मानवी हक्कातील संविधानिक हक्क घटकातील संपादन**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | नमुना | सरासरी |
|---|---|---|---|
| १ | बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव | ६० | ३६.११ |
| २ | अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, ता.आंबेगाव | ६५ | ३०.५९ |
| ३ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे, ता.खेड | ६४ | ३०.०३ |
| ४ | रत्नाई महिला महाविद्यालय, राजगुरूनगर, ता.खेड | ६८ | २८.७५ |
| ५ | श्रीमती सिताबाई रंगुजी शिंदे महाविद्यालय, बोरी, ता.जुन्नर | ६६ | ३२.९७ |
| ६ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता.जुन्नर | ५८ | ३७.७३ |
| ७ | मा.बाळासाहेब जाधव महाविद्यालय, आळे, ता.जुन्नर | ५२ | २९.२७ |
| ८ | श्री शिव छत्रपती महाविद्यालय, बोडकेनगर, ता.जुन्नर | ६२ | ३१.६४ |
| ९ | अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर, ता.जुन्नर | ६५ | ३०.५९ |
| १० | पद्ममणि जैन महाविद्यालय, पाबळ, ता.शिरूर | ६५ | २६.८३ |
| ११ | इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ | ६७ | २७.५२ |
| १२ | सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ | ६४ | २९.५१ |
| | एकूण | ७५६ | ३०.९६ |

**आलेख क्र. ४.१० : महिला मानवी हक्कातील संविधानिक हक्क घटकातील संपादन**



**विश्लेषण:**

एकूण बारा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थिनींचे महिला मानवी हक्कातील संविधानिक हक्क या घटकातील संपादनाची सरासरी सारणीमध्ये दर्शविली आहे.

सारणीवरून असे निदर्शित होते की, बारा महाविद्यालयापैकी संविधानिक हक्क घटकातील कमाल संपादन (३७.७३%) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव येथील विद्यार्थिनींचे आहे. तसेच पद्ममणि जैन महाविद्यालय, पाबळ येथील विद्यार्थिनींचे संविधानिक हक्क या घटकातील संपादन सर्वात कमी (२६.८३%) असल्याचे दिसून येते. संविधानिक हक्क घटकातील एकूण संपादनाची सरासरी ३०.९६% आहे.

**अर्थनिर्वचन**

वरील माहितीवरुन लक्षात येते की, संविधानिक हक्क घटकातील एकूण संपादनाची सरासरी ही निम्म्यापेक्षाही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना संविधानिक हक्काविषयी माहिती कमी आहे.

## ४.४ प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्ट क्र.२ साठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

उद्दिष्ट क्र.२ वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करणे.

प्रस्तुत उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संशोधकाने तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक तत्त्वावर आधारित साधननिर्मिती पद्धतीच्या आधारे महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची निर्मिती करून अंमलबजावणी केली आहे. (महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम, परिशिष्ट घ )

### ४.४.१ तज्ज्ञांच्या प्रतिसादाचे विश्लेषण

पथदर्शक अभ्यास आणि तज्ज्ञांची मते यानुसार कार्यक्रमात बदल केले. कार्यक्रमाच्या अंतिम स्वरुपाबाबत तज्ज्ञांकडून प्रतिसाद शोधिका भरुन घेतली. त्याचे विश्लेषण व अर्थनिर्वचन पुढीलप्रमाणे

**कोष्टक ४.११ तंज्ञाच्या प्रतिसादाचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

| अ. क्रः | प्रतिसाद | पूर्ण सहमत | सहमत | सांगता येत नाही | असहमत | पूर्ण असहमत | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संशोधनाच्या उद्दिष्टांशी कार्यक्रमाची सांगड घातली आहे. | ७ | | | | | ३५ |
| २. | प्रत्येक कार्यक्रमात उद्दिष्टांचा समावेश करण्यात आला आहे. | ७ | | | | | ३५ |
| ३. | कार्यक्रमामध्ये मानसशास्त्रीय तत्त्वांचा आधार घेतला आहे. | ६ | १ | | | | ३४ |
| ४. | कार्यक्रम विद्यार्थिनींच्या वयानुरुप योग्य आहे. | ६ | १ | | | | ३४ |
| ५. | कार्यक्रमामध्ये योग्य क्रमबद्धता आहे. | ५ | २ | | | | ३३ |
| ६. | उद्दिष्टानुसार कार्यक्रमाचे स्वरुप योग्य आहे. | ५ | २ | | | | ३३ |
| ७. | कार्यक्रमातील भाषेची मांडणी योग्य आहे. | ६ | १ | | | | ३४ |
| ८. | कार्यक्रमासाठी वेळेचे नियोजन योग्य आहे | ५ | २ | | | | ३३ |
| ९. | कार्यक्रमामध्ये आशय योग्यरित्या समाविष्ट होईल. अशी रचना आहे. | ४ | ३ | | | | ३२ |
| १० | कार्यक्रमात विद्यार्थिनींचा कृतीयुक्त सहभाग आहे. | ५ | २ | | | | ३३ |
| ११. | विद्यार्थिनींच्या संख्येनुसार कार्यक्रमाचे स्वरुप योग्य आहे. | ६ | १ | | | | ३४ |
| १२ | सर्वेक्षण आणि कार्यक्रमाची निर्मिती यांची योग्य सांगड घातली आहे | ६ | १ | | | | ३४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | साधननिर्मितीच्या पायऱ्यांचा समावेश कार्यक्रमामध्ये केला आहे. | ७ | | | | | ३५ |
| १४ | कार्यक्रमामध्ये शिक्षक विद्यार्थिनी आंतरक्रीयाची रचना केली आहे. | ६ | १ | | | | ३४ |
| १५ | प्रत्याभरणानुसार कार्यक्रमामध्ये योग्य ते बदल केले आहेत. | ७ | | | | | ३५ |
| | एकूण | | | | | | ५०८ |

**निरीक्षण**

कोष्टकावरुन असे दिसून येते की तज्ज्ञांच्या प्रतिसादामध्ये प्रामुख्याने पूर्ण सहमत व सहमत यांचा समावेश अधिक आहे. तज्ञ प्रतिसादातील एकूण गुण ५०८ असून गुणांची सरासरी ९६.७६% आहे.

**अर्थनिर्वचन**

तज्ज्ञांच्या प्रतिसादाची सरासरी ९६.७६ म्हणजे अधिक असून धनात्मक स्वरुपाची आहे. संशोधकाने विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाबद्दल तज्ज्ञांचे मत सकारात्मक आहे.

### ४.४.२ विद्यार्थिनी प्रतिसादाचे अर्थनिर्वचन

महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यानंतर विद्यार्थिनींकडून कार्यक्रमाविषयी प्रतिक्रीया घेतल्या या प्रतिक्रीयांचे गुणात्मक विश्लेषण पुढीलप्रमाणे

- महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींना महिलांच्या मानवी हक्कातील विविध घटकाविषयी नाविन्यपूर्ण माहिती मिळाली.
- महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींच्या व्यक्तीमत्वामध्ये सकारात्मक बदल घडून आला.

- कार्यक्रमातून मिळालेल्या माहितीचा भविष्यात वैवाहिक आणि सार्वजनिक जीवनात उपयोग होईल असे बहुतांश विद्यार्थिनींना वाटते.
- महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमातून स्वसंरक्षण आणि त्यासाठी आवश्यक असलेले कायदे यांची माहिती विद्यार्थिनींना मिळाली.
- महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झाली.

### ४.५ उद्दिष्ट क्र.३ साठी माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

उद्दिष्ट क्र. ३ वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

उद्दिष्ट क्र.३ च्या साध्यतेसाठी महिला मानवी हक्क शिक्षण विषयक प्रश्नावली संशोधकाने तयार केली. या प्रश्नावलीच्या साहाय्याने प्रायोगिक गटासाठी निवडलेल्या श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर येथील विद्यार्थिनींची पूर्वचाचणी घेतली. याच गटावर महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यानंतर त्यांच्याकडून उत्तर चाचणी भरून घेतली. महिला मानवी हक्कांमध्ये महिलांचे वैवाहिक हक्क, वारसा हक्क, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क, हिंसेपासून संरक्षणाचा हक्क आणि संविधानिक हक्क अशा पाच घटकांचा समावेश करण्यात आला. या पाच घटकांना अनुसरून माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे.

### ४.६ वैवाहिक हक्क या घटकाचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

**कोष्टक क्र. ४.१२ : वैवाहिक हक्क या घटकाबाबत वर्णनात्मक संख्याशास्त्रीय माहिती**

| Discription | Pre-test | Post test |
|---|---|---|
| N | 62 | 62 |
| Mean | 7.77 | 13.16 |
| Standerd Error of mean | 0.45 | 0.59 |
| Standerd deviation | 3.55 | 4.68 |
| Skewness | 1.103 | .179 |
| Kurtosis | 1.953 | -.936 |

**पूर्वचाचणीसाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन**

१. पूर्व चाचणी ही ६२ विद्यार्थिनींनी दिली.

२. पूर्व चाचणीचे मध्यमान ७.७७ आहे.

३. पूर्व चाचणीचे प्रमाण विचलन हे ३.५५ आहे.

४. प्रसामान्यता तपासणी.

**आलेख क्र. ४.११ : वैवाहिक हक्क या घटकातील विद्यार्थिनींचे पूर्व चाचणीतील संपादन**




**५. विषमितता (Skewness)** : पूर्व चाचणीचे विषमितता मूल्य १.१०३ असून ते धन आहे. म्हणजेच वितरण धन विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक व बहुलकापेक्षा अधिक आहे. वक्र साधारणत: डावीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते.

**६. शिखरदोष (Kurtosis)** : पूर्व चाचणीचे शिखरदोष मूल्य हे १.९५३ असून ते धन आहे. हे मूल्य ०.२६३ पेक्षा अधिक आहे. म्हणजेच वितरण साधारणत: चर्पटक शिखरी आहे. वितरण प्रसामान्याच्या जवळ आहे असे दिसून येते.

**उत्तर चाचणीसाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन**

१. उत्तर चाचणी ही ६२ विद्यार्थिनींनी दिली.

२. उत्तर चाचणीचे मध्यमान १३.१६ आहे.

३. उत्तर चाचणीचे प्रमाण विचलन हे ४.६८ आहे.

४. प्रसामान्यता तपासणी.

**आलेख क्र. ४.१२ : वैवाहिक हक्क या घटकातील विद्यार्थिनींचे उत्तर चाचणीतील संपादन**




**५. विषमितता (Skewness)** : उत्तर चाचणीचे विषमितता मूल्य ०.१७९ असून ते धन आहे. म्हणजेच वितरण धन विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक व बहुलकापेक्षा अधिक आहे. वक्र साधारणत: डावीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते.

**६. शिखरदोष (Kurtosis)** : उत्तर चाचणीचे शिखरदोष मूल्य हे −०.९३६ असून ते ऋण आहे. हे मूल्य ०.२६३ पेक्षा कमी आहे. म्हणजेच वितरण साधारणत: उच्च शिखरी आहे. वितरण प्रसामान्याच्या जवळ आहे असे दिसून येते.

**शून्य परिकल्पना १**

वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तर चाचणीतील वैवाहिक हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

**कोष्टक क्र. ४.१३ : वैवाहिक हक्क या घटकासाठी t परीक्षण**

| Test | N | M | SD | Paired t Value | Table t value at0.01 level | df | Significant 0.01 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Pre-test | 62 | 7.77 | 3.55 | 18.39 | 2.66 | 61 | Significant |
| Post-test | 62 | 13.16 | 4.68 | | | | |

### पूर्व व उत्तर चाचणीतील निरीक्षण आणि अर्थनिर्वचन

वरील सारणीवरून असे दिसून येते की, प्राप्त टी मूल्य १८.३९ आहे. स्वाधिनता मात्रा ६१ करीता ०.०१ सार्थकता स्तरावर सारणी टी मूल्य २.६६ आहे. प्राप्त टी मूल्य (१८.३९) हे सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ते सार्थ आहे. म्हणून ०.०१ स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्विकार केला.

यावरून असे स्पष्ट होते की, महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील वैवाहिक हक्क या घटकातील गुणांच्या मध्यमानामध्ये वाढ झाली. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

### ४.७ वारसा हक्क या घटकाचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

**कोष्टक क्र. ४.१४ : वारसा हक्क या घटकाबाबत वर्णनात्मक संख्याशास्त्रीय माहिती**

| Discription | Pre-test | Post test |
|---|---|---|
| N | 62 | 62 |
| Mean | 6.35 | 11.41 |
| Standerd Error of mean | 0.34 | 0.53 |
| Standerd deviation | 2.69 | 4.21 |
| Skewness | .287 | -.276 |
| Kurtosis | .397 | -1.030 |

### पूर्व चाचणीसाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

१. पूर्व चाचणी ही ६२ विद्यार्थिनींनी दिली.

२. पूर्व चाचणीचे मध्यमान ६.३५ आहे.

३. पूर्व चाचणीचे प्रमाण विचलन हे २.६९ आहे.

४. प्रसामान्यता तपासणी.

**आलेख क्र. ४.१३ : वारसा हक्क घटकातील विद्यार्थिनींचे पूर्व चाचणीमधील संपादन**




**५. विषमितता (Skewness)** : वारसा हक्क या घटकाचे पूर्व चाचणीतील विषमितता मूल्य ०.२८७ असून ते धन आहे. म्हणजेच वितरण धन विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक व बहुलकापेक्षा अधिक आहे. धन विषमित वितरणामुळे वक्र साधारणत: डावीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते.

**६. शिखरदोष (Kurtosis)** : वारसा हक्क या घटकाचे पूर्व चाचणीतील शिखरदोष मूल्य हे ०.३९७ असून ते धन आहे. हे मूल्य ०.२६३ पेक्षा अधिक आहे. म्हणजेच वितरण साधारणत: चर्पटक शिखरी आहे. वितरण प्रसामान्याच्या जवळ आहे असे दिसून येते.

**उत्तर चाचणीसाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन**

१. उत्तर चाचणी ही ६२ विद्यार्थिनींनी दिली.

२. उत्तर चाचणीचे मध्यमान ११.४१ आहे.

३. उत्तर चाचणीचे प्रमाण विचलन हे ४.२१ आहे.

४. प्रसामान्यता तपासणी.

**आलेख क्र. ४.१४ : वारसा हक्क घटकातील विद्यार्थिनींचे उत्तर चाचणीमधील संपादन**




**५. विषमितता (Skewness)** : वारसा हक्क या घटकाचे उत्तर चाचणीतील विषमितता मूल्य –०.२७६ असून ते ऋण आहे. म्हणजेच वितरण ऋण विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक व बहुलकापेक्षा कमी आहे. ऋण विषमित वितरणामुळे वक्र साधारणत: उजवीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते.

**६. शिखरदोष (Kurtosis)** : वारसा हक्क या घटकाचे उत्तर चाचणीतील शिखरदोष मूल्य हे –१.०३० असून ते ऋण आहे. हे मूल्य ०.२६३ पेक्षा कमी आहे. म्हणजेच वितरण साधारणत: उच्च शिखरी आहे. वितरण प्रसामान्याच्या जवळ आहे असे दिसून येते.

**शून्य परिकल्पना २**

वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तर चाचणीतील वारसा हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

**कोष्टक क्र. ४.१५ : वारसा हक्क या घटकासाठी t परीक्षण**

| Test | N | M | SD | Paired t Value | Table t value at0.01 level | df | Significant 0.01 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Pre-test | 62 | 6.35 | 2.69 | 16.65 | 2.66 | 61 | Significant |
| Post test | 62 | 11.41 | 4.21 | | | | |

**पूर्व आणि उत्तर चाचणीचे निरीक्षण आणि अर्थनिर्वचन**

वरील सारणीवरून असे दिसून येते की, प्राप्त टी मूल्य १६.६५ आहे. स्वाधिनता मात्रा ६१ करीता ०.०१ सार्थकता स्तरावर सारणी टी मूल्य २.६६ आहे. प्राप्त टी मूल्य (१६.६५) हे सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ते सार्थ आहे. म्हणून ०.०१ स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्विकार केला.

यावरून असे स्पष्ट होते की, महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील वारसा हक्क या घटकातील गुणांच्या मध्यमानामध्ये वाढ झाली. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

**४.८ नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटकाचे विश्लेषणह आणि अर्थनिर्वचन**

**कोष्टक क्र. ४.१६ : नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटकाबाबत वर्णनात्मक संख्याशास्त्रीय माहिती**

| Discription | Pre-test | Post-test |
|---|---|---|
| N | 62 | 62 |
| Mean | 6.80 | 12.09 |
| Standerd Error of mean | 0.38 | 0.55 |
| Standerd deviation | 3.01 | 4.35 |
| Skewness | .724 | -.390 |
| Kurtosis | .791 | -1.076 |

**पूर्व चाचणीसाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन**

५. पूर्व चाचणी ही ६२ विद्यार्थिनींनी दिली.

६. पूर्व चाचणीचे मध्यमान ६.८० आहे.

७. पूर्व चाचणीचे प्रमाण विचलन हे ३.०१ आहे.

८. प्रसामान्यता तपासणी.

**आलेख ४.१५ : नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटकातील विद्यार्थिनींचे पूर्व चाचणीतील संपादन**




**५. विषमितता (Skewness)** : नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटकाचे पूर्व चाचणीतील विषमितता मूल्य ०.७२४ असून ते धन आहे. म्हणजेच वितरण धन विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक व बहुलकापेक्षा अधिक आहे. धन विषमित वितरणामुळे वक्र साधारणत: डावीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते.

**६. शिखरदोष (Kurtosis)** : नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटकाचे पूर्व चाचणीतील शिखरदोष मूल्य हे ०.७९१ असून ते धन आहे. हे मूल्य ०.२६३ पेक्षा जास्त आहे. म्हणजेच वितरण साधारणत: चर्पटक शिखरी आहे. वितरण प्रसामान्याच्या जवळ आहे असे दिसून येते.

**उत्तर चाचणीसाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन**

१. उत्तर चाचणी ही ६२ विद्यार्थिनींनी दिली.

२. उत्तर चाचणीचे मध्यमान १२.०९ आहे.

३. उत्तर चाचणीचे प्रमाण विचलन हे ४.३५ आहे.

४. प्रसामान्यता तपासणी.

**आलेख क्र. ४.१६ : नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटकातील विद्यार्थिनींचे उत्तर चाचणीतील संपादन**




**५. विषमितता (Skewness)** : नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटकाचे उत्तर चाचणीतील विषमितता मूल्य −०.३९० असून ते ऋण आहे. म्हणजेच वितरण ऋण विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक व बहुलकापेक्षा कमी आहे. ऋण विषमित वितरणामुळे वक्र साधारणत: उजवीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते.

**६. शिखरदोष (Kurtosis)** : नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटकाचे उत्तर चाचणीतील शिखरदोष मूल्य हे −१.०७६ असून ते ऋण आहे. हे मूल्य ०.२६३ पेक्षा कमी आहे. म्हणजेच वितरण साधारणत: उच्च शिखरी आहे. वितरण प्रसामान्याच्या जवळ आहे असे दिसून येते.

**शून्य परिकल्पना ३**

वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तर चाचणीतील नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

**कोष्टक क्र. ४.१७ : नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटकासाठी t परीक्षण**

| Test | N | M | SD | Paired t Value | Table t value at0.01 level | df | Significant 0.01 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Pre-test | 62 | 6.80 | 3.01 | 16.94 | 2.66 | 61 | Significant |
| Post test | 62 | 12.09 | 4.35 | | | | |

### पूर्व आणि उत्तर चाचणीचे निरीक्षण आणि अर्थनिर्वचन

वरील सारणीवरून असे दिसून येते की, प्राप्त टी मूल्य १६.९४ आहे. स्वाधिनता मात्रा ६१ करीता ०.०१ सार्थकता स्तरावर सारणी टी मूल्य २.६६ आहे. प्राप्त टी मूल्य (१६.९४) हे सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ते सार्थ आहे. म्हणून ०.०१ स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्विकार केला.

यावरून असे स्पष्ट होते की, महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क या घटकातील गुणांच्या मध्यमानामध्ये वाढ झाली. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

### ४.९ हिंसेपासून मुक्ततेचा हक्क या घटकाचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

**कोष्टक क्र. ४.१८ : हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकाबाबत वर्णनात्मक संख्याशास्त्रीय माहिती**

| Discription | Pre-test | Post-test |
|---|---|---|
| N | 62 | 62 |
| Mean | 6.90 | 12.16 |
| Standerd Error of mean | 0.39 | 0.51 |
| Standerd deviation | 3.10 | 4.03 |
| Skewness | .662 | -.101 |
| Kurtosis | 1.088 | -.745 |

### पूर्व चाचणीसाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

१. पूर्व चाचणी ही ६२ विद्यार्थिनींनी दिली.

२. पूर्व चाचणीचे मध्यमान ६.९० आहे.

३. पूर्व चाचणीचे प्रमाण विचलन हे ३.१० आहे.

४. प्रसामान्यता तपासणी.

**आलेख ४.१७ : हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकातील विद्यार्थिनींचे पूर्व चाचणीतील संपादन**




**५. विषमितता (Skewness)** : हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकाचे पूर्व चाचणीतील विषमितता मूल्य ०.६६२ असून ते धन आहे. म्हणजेच वितरण धन विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक व बहुलकापेक्षा अधिक आहे. धन विषमित वितरणामुळे वक्र साधारणत: डावीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते.

**६. शिखरदोष (Kurtosis)** : हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकाचे पूर्व चाचणीतील शिखरदोष मूल्य हे १.०८८ असून ते धन आहे. हे मूल्य ०.२६३ पेक्षा अधिक आहे. म्हणजेच वितरण साधारणत: चर्पटक शिखरी आहे. वितरण प्रसामान्याच्या जवळ आहे असे दिसून येते.

**उत्तर चाचणीसाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन**

१. उत्तर चाचणी ही ६२ विद्यार्थिनींनी दिली.

२. उत्तर चाचणीचे मध्यमान १२.१६ आहे.

३. उत्तर चाचणीचे प्रमाण विचलन हे ४.०३ आहे.

४. प्रसामान्यता तपासणी.

**आलेख क्र. ४.१८ : हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकातील विद्यार्थिनीचे उत्तर चाचणीतील संपादन**




**५. विषमितता (Skewness)** : हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकाचे उत्तर चाचणीतील विषमितता मूल्य –०.१०१ असून ते ऋण आहे. म्हणजेच वितरण ऋण विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक व बहुलकापेक्षा कमी आहे. ऋण विषमित वितरणामुळे वक्र साधारणत: उजवीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते.

**६. शिखरदोष (Kurtosis)** : हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकाचे उत्तर चाचणीतील शिखरदोष मूल्य हे –०.७४५ असून ते ऋण आहे. हे मूल्य ०.२६३ पेक्षा कमी आहे. म्हणजेच वितरण साधारणत: उच्च शिखरी आहे. वितरण प्रसामान्याच्या जवळ आहे असे दिसून येते.

**शून्य परिकल्पना ४**

वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तर चाचणीतील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

**कोष्टक क्र. ४.१९ : हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकासाठी t परीक्षण**

| Test | N | M | SD | Paired t Value | Table t value at0.01 level | df | Significant 0.01 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Pre-test | 62 | 6.90 | 3.10 | 19.83 | 2.66 | 61 | Significant |
| Post test | 62 | 12.16 | 4.03 | | | | |

### पूर्व आणि उत्तर चाचणीचे निरीक्षण आणि अर्थनिर्वचन

वरील सारणीवरून असे दिसून येते की, प्राप्त टी मूल्य १९.८३ आहे. स्वाधिनता मात्रा ६१ करीता ०.०१ सार्थकता स्तरावर सारणी टी मूल्य २.६६ आहे. प्राप्त टी मूल्य (१९.८३) हे सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ते सार्थ आहे. म्हणून ०.०१ स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्विकार केला.

यावरून असे स्पष्ट होते की, महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकातील गुणांच्या मध्यमानामध्ये वाढ झाली. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

### ४.१० संविधानिक हक्क या घटकाचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

**कोष्टक क्र. ४.२० : संविधानिक हक्क या घटकाबाबत वर्णनात्मक संख्याशास्त्रीय माहिती**

| Discription | Pre-test | Post-test |
|---|---|---|
| N | 62 | 62 |
| Mean | 5.93 | 10.96 |
| Standerd Error of mean | 0.31 | 0.49 |
| Standerd deviation | 2.50 | 3.86 |
| Skewness | .166 | .279 |
| Kurtosis | .371 | -1.014 |

### पूर्व चाचणीसाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

१. पूर्व चाचणी ही ६२ विद्यार्थिनींनी दिली.

२. पूर्व चाचणीचे मध्यमान ५.९३ आहे.

३. पूर्व चाचणीचे प्रमाण विचलन हे २.५० आहे.

४. प्रसामान्यता तपासणी.

**आलेख क्र. ४.१९ : संविधानिक हक्क या घटकातील विद्यार्थिनींचे पूर्व चाचणीतील संपादन**




**५. विषमितता (Skewness)** : संविधानिक हक्क या घटकाचे पूर्व चाचणीतील विषमितता मूल्य ०.१६६ असून ते धन आहे. म्हणजेच वितरण धन विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक व बहुलकापेक्षा अधिक आहे. धन विषमित वितरणामुळे वक्र साधारणत: डावीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते.

**६. शिखरदोष (Kurtosis)** : संविधानिक हक्क या घटकाचे पूर्व चाचणीतील शिखरदोष मूल्य हे ०.३७१ असून ते धन आहे. हे मूल्य ०.२६३ पेक्षा अधिक आहे. म्हणजेच वितरण साधारणत: चर्पटक शिखरी आहे. वितरण प्रसामान्याच्या जवळ आहे असे दिसून येते.

**उत्तर चाचणीसाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन**

१. उत्तर चाचणी ही ६२ विद्यार्थिनींनी दिली.

२. उत्तर चाचणीचे मध्यमान १०.९६ आहे.

३. उत्तर चाचणीचे प्रमाण विचलन हे ३.८६ आहे.

४. प्रसामान्यता तपासणी.

**आलेख क्र. ४.२० : संविधानिक हक्क या घटकातील विद्यार्थिनींचे उत्तर चाचणीतील संपादन**




**५. विषमितता (Skewness)** : संविधानिक हक्क या घटकाचे उत्तर चाचणीतील विषमितता मूल्य ०.२७९ असून ते धन आहे. म्हणजेच वितरण धन विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक व बहुलकापेक्षा अधिक आहे. धन विषमित वितरणामुळे वक्र साधारणत: डावीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते.

**६. शिखरदोष (Kurtosis)** : संविधानिक हक्क या घटकाचे उत्तर चाचणीतील शिखरदोष मूल्य हे −१.०१४ असून ते ऋण आहे. हे मूल्य ०.२६३ पेक्षा कमी आहे. म्हणजेच वितरण साधारणत: उच्च शिखरी आहे. वितरण प्रसामान्याच्या जवळ आहे असे दिसून येते.

**शून्य परिकल्पना ५**

वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तर चाचणीतील संविधानिक हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

**कोष्टक क्र. ४.२१ : संविधानिक हक्क या घटकासाठी t परीक्षण**

| Test | N | M | SD | Paired t Value | Table t value at0.01 level | df | Significant 0.01 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Pre-test | 62 | 5.93 | 2.50 | 17.81 | 2.66 | 61 | Significant |
| Post-test | 62 | 10.96 | 3.86 | | | | |

## पूर्व आणि उत्तर चाचणीचे निरीक्षण आणि अर्थनिर्वचन

वरील सारणीवरून असे दिसून येते की, प्राप्त टी मूल्य १७.८१ आहे. स्वाधिनता मात्रा ६१ करीता ०.०१ सार्थकता स्तरावर सारणी टी मूल्य २.६६ आहे. प्राप्त टी मूल्य (१७.८१) हे सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ते सार्थ आहे. म्हणून ०.०१ स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्विकार केला.

यावरून असे स्पष्ट होते की, महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील संविधानिक हक्क घटकातील गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

## ४.११ : महिला मानवी हक्कातील एकत्रित पाच हक्कांचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

**कोष्टक क्र. ४.२२ : महिला मानवी हक्कातील एकत्रित पाच घटकाबाबत वर्णनात्मक संख्याशास्त्रीय माहिती**

| Discription | Pre-test | Post-test |
|---|---|---|
| N | 62 | 62 |
| Mean | 33.77 | 59.80 |
| Standerd Error of mean | 1.62 | 2.18 |
| Standerd deviation | 12.77 | 17.19 |
| Skewness | .849 | -.030 |
| Kurtosis | 1.473 | -.840 |

## पूर्व चाचणीसाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

१. पूर्व चाचणी ही ६२ विद्यार्थिनींनी दिली.

२. पूर्व चाचणीचे मध्यमान ३३.७७ आहे.

३. पूर्व चाचणीचे प्रमाण विचलन हे १२.७७ आहे.

४. प्रसामान्यता तपासणी.

**आलेख क्र. ४.२१ : महिला मानवी हक्कातील एकत्रित पाच घटकांचे पूर्व चाचणीतील संपादन**




**५. विषमितता (Skewness)** : महिला मानवी हक्कातील एकूण पाचही घटकाचे पूर्व चाचणीतील विषमितता मूल्य ०.८४९ असून ते धन आहे. म्हणजेच वितरण धन विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक व बहुलकापेक्षा अधिक आहे. धन विषमित वितरणामुळे वक्र साधारणत: डावीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते.

**६. शिखरदोष (Kurtosis)** : महिला मानवी हक्कातील एकूण पाचही घटकाचे पूर्व चाचणीतील शिखरदोष मूल्य हे १.४७३ असून ते धन आहे. हे मूल्य ०.२६३ पेक्षा अधिक आहे. म्हणजेच वितरण साधारणत: चर्पटक शिखरी आहे. वितरण प्रसामान्याच्या जवळ आहे.

**उत्तर चाचणीसाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन**

१. उत्तर चाचणी ही ६२ विद्यार्थिनींनी दिली.

२. उत्तर चाचणीचे मध्यमान ५९.८० आहे.

३. उत्तर चाचणीचे प्रमाण विचलन हे १७.१९ आहे.

४. प्रसामान्यता तपासणी.

**आलेख क्र. ४.२२ : महिला मानवी हक्कातील एकत्रित पाच घटकांचे उत्तर चाचणीतील संपादन**



Histogram of Post - test scores for 5 topic together

**५. विषमितता (Skewness)** : महिला मानवी हक्कातील एकूण पाचही घटकांचे उत्तर चाचणीतील विषमितता मूल्य −०.०३० असून ते ऋण आहे. म्हणजेच वितरण ऋण विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक व बहुलकापेक्षा कमी आहे. ऋण विषमित वितरणामुळे वक्र साधारणत: उजवीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते.

**६. शिखरदोष (Kurtosis)** : महिला मानवी हक्कातील एकूण पाचही घटकांचे उत्तर चाचणीतील शिखरदोष मूल्य हे −०.८४० असून ते ऋण आहे. हे मूल्य ०.२६३ पेक्षा कमी आहे. म्हणजेच वितरण साधारणत: उच्च शिखरी आहे. वितरण प्रसामान्याच्या जवळ आहे असे दिसून येते.

**शून्य परिकल्पना ६**

वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तर चाचणीतील संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

**कोष्टक क्र. ४.२३ : महिला मानवी हक्कातील एकत्रित पाच घटकांसाठी t परीक्षण**

| Test | N | M | SD | Paired t Value | Table t value at0.01 level | df | Significant 0.01 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Pre -test | 62 | 33.77 | 12.77 | 26.87 | 2.66 | 61 | Significant |
| Post- test | 62 | 59.80 | 17.19 | | | | |

## पूर्व आणि उत्तर चाचणीचे निरीक्षण आणि अर्थनिर्वचन

वरील सारणीवरून असे दिसून येते की, प्राप्त टी मूल्य २६.८७ आहे. स्वाधिनता मात्रा ६१ करीता ०.०१ सार्थकता स्तरावर सारणी टी मूल्य २.६६ आहे. प्राप्त टी मूल्य (२६.८७) हे सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ते सार्थ आहे. म्हणून ०.०१ स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्विकार केला.

यावरून असे स्पष्ट होते की, महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील माहिती संपादन गुणांच्या मध्यमानामध्ये वाढ झाली. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

## समारोप

प्रस्तुत प्रकरणात महिला मानवी हक्कातील प्रमुख पाच घटकांना अनुसरून मांडलेल्या सर्व परिकल्पनांचे परिक्षण केले आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी विकसित केलेला महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम उपयुक्त ठरला आहे. याबाबतचे सर्व निष्कर्ष पुढील प्रकरणामध्ये दिले आहेत.

प्रकरण पाचवे

# संशोधनाचे सारांश, निष्कर्ष व शिफारशी

**प्रकरण पाचवे**

# संशोधनाचे सारांश, निष्कर्ष व शिफारशी


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ५.१ | प्रस्तावना | १४९ |
| ५.२ | संशोधनाची गरज | १५१ |
| ५.३ | संशोधनाचे शीर्षक | १५२ |
| ५.४ | समस्या विधान | १५२ |
| ५.५ | उद्दिष्टे | १५२ |
| ५.६ | कार्यात्मक व्याख्या | १५२ |
| ५.७ | संशोधनाचे महत्त्व | १५४ |
| ५.८ | गृहीतके | १५५ |
| ५.९ | संशोधन प्रश्न | १५५ |
| ५.१० | परिकल्पना | १५५ |
| ५.११ | चले | १५६ |
| ५.१२ | व्याप्ती, मर्यादा आणि परिमर्यादा | १५७ |
| ५.१३ | संबंधित साहित्य आणि संशोधनाचा आढावा | १५७ |
| ५.१४ | संशोधन व्याप्ती | १५८ |
| ५.१५ | संशोधन अभिकल्प | १६१ |
| ५.१६ | जनसंख्या | १६१ |
| ५.१७ | न्यादर्श आणि न्यादर्श निवड पद्धती | १६१ |
| ५.१८ | माहिती संकलनाची साधने | १६१ |
| ५.१९ | माहिती विश्लेषणाची साधने | १६१ |
| ५.२० | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची निर्मिती | १६२ |
| ५.२१ | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी | १६२ |
| ५.२२ | निष्कर्ष | १६२ |
| ५.२३ | पूर्व संशोधन व प्रस्तुत संशोधन यातील निष्कर्षांवर चर्चा | १६७ |
| ५.२४ | संशोधनाचे योगदान | १६९ |
| ५.२५ | शिफारशी | १६९ |
| ५.२६ | पुढील संशोधनासाठी दिशा | १७० |

## प्रकरण पाचवे

# संशोधनाचे सारांश, निष्कर्ष व शिफारशी

### ५.१ प्रस्तावना

मानवी हक्कांची संकल्पना ही नैसर्गिक विधी या संकल्पनेचे अपत्य आहे. जन्मानेच माणूस काही मुलभूत हक्क घेऊन येतो. या गृहितकृत्यांवर या हक्कांची मांडणी करण्यात आली आहे. मानवी हक्कांची संकल्पना ग्रीक व रोमन विचारवंतांच्या तसेच ख्रिस्ती तत्त्वज्ञानात आणि थॉमस ॲक्वायन सारख्या विचारवंतांच्या लिखाणातूनही मांडली गेल्याचे दिसते. मानवी संस्कृतीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर मानवास जगण्याकरीता आवश्यक असणाऱ्या हक्कांसाठी निरनिराळ्या संज्ञा वापरल्या आहेत. मानवी हक्कांमध्ये जगण्याचा हक्क, अन्न, वस्त्र, निवारा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, हिंसेपासून मुक्तता, धार्मिक स्वातंत्र्य, अन्न मिळविण्याचा हक्क, गुलामगिरीपासून मुक्ततेचा हक्क, व्यक्तीच्या खासगीपणाचा हक्क, संपत्तीवर मालकीचा हक्क, क्रूर, अमानूष व अपमानास्पद वागणुकीपासून संरक्षणाचा हक्क यासारख्या अनेक हक्कांचा समावेश होतो.

संयुक्त राष्ट्राने मानवी हक्कांची केलेली व्याख्या, 'मानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे माणूस म्हणून जन्मल्यामुळे सर्व मानवांना मिळाले पाहिजेत. हे हक्क उपभोगल्याशिवाय मानवाला माणूस म्हणून खऱ्या अर्थाने जगणे शक्य नाही.' (देहाडराय, तांबे, २००९)

भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये मानवी हक्कापासून वंचित राहणारा व हक्कांच्या पायमल्लीचा सतत सामना करणारा, तसेच अन्याय, भेदभाव, सामाजिक चालीरिती, रूढी–परंपरांना बळी पडणाऱ्या महिलांचा वर्ग दिसून येतो. सांस्कृतिक, पारंपारिक विविधतेमुळे कुटुंबव्यवस्थेमध्ये दुय्यम स्थान स्विकाराव्या लागणाऱ्या महिलांच्या हक्कांचे मोठ्या प्रमाणात हनन होताना दिसून येते. प्रबोधन युगानंतरही एकविसाव्या शतकात महिलांना फार मोठ्या अन्यायाला सामोरे जावे लागत आहे. कौटुंबिक दुय्यम स्थान, स्त्री भ्रूण हत्या, हुंडा पद्धती, कौटुंबिक हिंसाचार, बालविवाह, बलात्कार, लैंगिक छळ, आरोग्याबाबतची अवहेलना, नोकरीच्या / कामाच्या ठिकाणचा मानसिक–शारीरिक छळ या अनेक बाबींना महिलांना आजही सामोरे जावे लागत आहे. महिलांना समाजामध्ये मानाने जगणे, स्वतःचे अस्तित्व निर्माण करणे, रोजगार मिळविणे, शारीरिक व मानसिक त्रासापासून मुक्तता करून घेऊन जीवन

जगण्याचा नैसर्गिक हक्क आहे. मात्र त्यांच्या या हक्कावर मोठ्या प्रमाणात घाला घालण्याचे काम समाजामधूनच होताना दिसून येते. महिलांचा जन्म, शिक्षण, नोकरी, लग्न, बाळंतपण, म्हातारपण काहीच सुरक्षित नसावे? एकीकडे देवी म्हणून गौरविणाऱ्या महिलेची दुसरीकडे गर्भातच हत्या करावी, आणि हे सर्व समाजाची सुमारे निम्म्या लोकसंख्येने व्यापलेल्या घटकासंदर्भात व्हावे ही या देशाची मोठी शोकांतिका आहे. (जुन्नरकर, २०१५)

महिला सक्षमीकरणाशिवाय विकसनशील भारत विकसित होणार नाही हे सत्य एकविसाव्या शतकात स्विकारावेच लागणार आहे. महिलांची समस्या परंपरेने जुनी, व्यापक आणि सामाजिक, धार्मिक जीवनाशी निगडीत असल्यामुळे त्यावर दिर्घकालीन उपाय शोधणे गरजेचे आहे.

महिलांच्या प्रश्नासंदर्भात भारतात राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना १९९० च्या अधिनियमानुसार ३१ जानेवारी १९९२ रोजी करण्यात आली. समाजामध्ये चालणाऱ्या हुंडा, मानसिक छळ, बलात्कार तत्सम तक्रारी दाखल करून त्यावर न्याय देणे, महिला हक्कांशी संबंधित कायदेनिर्मिती व दुरूस्ती या संदर्भात सुचना करणे, गरजू महिलांना समुपदेशन करणे इ. कामे महिला आयोगामार्फत केली जातात. केंद्रिय स्तरावरील महिला आयोगाच्या धर्तीवर भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४, १५, १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधित हमी देण्यात आलेले मुलभूत हक्क मिळवून देण्यासाठी १९९३ मध्ये महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. १९९४ मध्ये महिला धोरण राबविण्याचा पहिला मान महाराष्ट्र राज्याला मिळाला आहे. (बेडसे, २०११)

महिलांच्या हक्कांचे रक्षण करणाऱ्या कायद्याबरोबरच महिलांच्या सबलीकरणासाठी देश व राज्य पातळीवर विविध योजनाही सरकारमार्फत राबविल्या जातात. यामध्ये महिलांना प्रशिक्षण व रोजगार सहाय्यता कार्यक्रम १९८७, स्वयंसिद्धा, स्वाधार २००१-०२, बालिका समृद्धी योजना १९९७, जिजामाता आधार योजना १९९९, ग्रामीण महिला व बालकांचा विकास कार्यक्रम १९८३, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, सुकन्या समृद्धी योजना यासारख्या योजना सरकारमार्फत राबविल्या जातात. याशिवाय मातृत्व अनुदान योजना, किशोरी योजना, जननी सुरक्षा योजना, सावित्रीबाई फुले कन्या रत्न योजना, राजमाता जिजाऊ बाल आरोग्य

आणि पोषण मिशन, जिजामाता महिला आधार योजना या योजना विविध स्तरावर राबविल्या जातात. (पाटील, २०१५)

भारतीय राज्यघटना, मानवी हक्क आयोग, महिला आयोग, महिलांसंदर्भात वेळोवेळी केले जाणारे कायदे या सर्व बाबी असूनही महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक मात्र झालेली दिसून येत नाही. जगातील सर्वच राष्ट्रांमध्ये स्त्रियांचा सामाजिक दर्जा कनिष्ठ मानला जातो. लिंगभेदावरून स्त्री पुरूष असमानता निर्माण झालेली असल्यामुळे स्त्रियांना सर्वच क्षेत्रात पुरूषांपेक्षा कनिष्ठ मानून त्यांना अन्यायाची वागणूक दिली जात आहे. स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ व दुय्यम होण्याचे प्रमुख कारण म्हणजे भारतातील धार्मिक चालीरिती व पारंपारिक प्रथा होय. (चव्हाण, २०११)

महिलांबाबतचा कौटुंबिक हिंसाचार, हुंडा, बलात्कार, कामाच्या ठिकाणी होणारा मानसिक छळ यासारख्या अनेक समस्यांमुळे महिलांच्या हक्कांवर नेहमीच गदा येते. महिला आयोगाकडे येणाऱ्या तक्रारींमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसून येत आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे महिलांच्या मानवी हक्काविषयी समाजामध्ये व विशेषत: महिलांमध्येच जागृती असल्याचे दिसून येत नाही. महिलांच्या मानवी हक्काविषयी शिक्षणातून जनजागृती होणे गरजेचे आहे. महाविद्यायीन स्तरावर विविध उपक्रमांच्या दृष्टीकोनातून संशोधकाने प्रस्तुत विषयावर संशोधन केले आहे.

### ५.२ संशोधनाची गरज

प्रस्तुत संशोधन महिलांच्या हक्काविषयी, अर्थात त्यांच्या नैसर्गिक हक्काशी संबंधित आहे. समाजातील अनेक समस्यांना सामोरे जाणाऱ्या महिलांना त्यांच्या मानवी हक्काविषयी माहिती असणे गरजेचे आहे. प्रस्तावित संशोधनाची गरज पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. समाजामध्ये पिढ्यान्‌पिढ्या कुटुंबात दुय्यम दर्जा दिल्याने कौटुंबिक अत्याचारापासून मुक्ततेसाठी स्त्रियांना त्यांच्या हक्कांची माहिती होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

२. समाजामध्ये घडणाऱ्या बलात्कार, लैंगिक छळ, शारीरिक व मानसिक अत्याचार यासारख्या घटनांपासून संरक्षण मिळविण्यासाठी त्या विषयीची तरतुदींची माहिती संक्रमित होऊन स्त्रियांच्या सबलीकरणास मदत मिळण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाची गरज अहे.

३. सामाजिक रूढींमुळे उद्‌भवणाऱ्या स्त्री–पुरूष भेदाभेद, हुंडा प्रथा, बालविवाह या समस्यांना सामोरे जाण्याची वृत्ती विद्यार्थिनींमध्ये निर्माण होण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

४. स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कासाठी, समानतेसाठी आणि त्यांच्या सबलीकरणासाठी महाविद्यालयीन स्तरावर त्यांना योग्य ज्ञान व माहिती मिळून सक्षम समाज निर्मितीमध्ये त्यांचे योगदान मिळण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

**५.३ संशोधनाचे शीर्षक**

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे विकसन व परिणामकारकतेचा अभ्यास.

**५.४ संशोधन समस्या विधान**

पुणे जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करून त्याची परिणामकारकता तपासणे.

**५.५ संशोधनाची उद्दिष्टे**

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्काविषयी असलेल्या माहितीची सद्यस्थिती तपासणे.

२. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करणे.

३. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

**५.६ कार्यात्मक व्याख्या**

**१. पुणे जिल्हा**

**संकल्पनात्मक व्याख्या**

महाराष्ट्र राज्यातील एक प्रशासकीय घटक, प्रशासकीय सोयीसाठी महाराष्ट्राची अनेक जिल्ह्यांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. त्यातील एक जिल्हा म्हणजे पुणे जिल्हा होय.

**कार्यात्मक व्याख्या**

महाराष्ट्र राज्यातील एक प्रशासकीय विभाग.

## २. वरिष्ठ महाविद्यालय

**संकल्पनात्मक व्याख्या**

उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर उच्च शिक्षणाची व पदवी मिळविण्याची सुविधा ज्या शैक्षणिक संस्थेत होते तिला महाविद्यालय म्हणतात. महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय, शेतकी, व्यवस्थापन इत्यादी विद्याशाखांमधील विषयांचे अध्ययन, अध्यापन करण्याची सोय असते. व्यापक अर्थाने उच्च माध्यमिक शिक्षणानंतरचे शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थेला महाविद्यालय म्हटले जाते. महाविद्यालय ही विद्यापीठाशी संलग्नित असतात. (जोशी, २००७)

**कार्यात्मक व्याख्या**

ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये पदवीचे शिक्षण दिले जाते अशी शैक्षणिक संस्था म्हणजे वरिष्ठ महाविद्यालये होय.

**कला शाखा**

**संकल्पनात्मक व्याख्या**

महाविद्यालयीन शिक्षणामध्ये कला, शास्त्र, वाणिज्य, तंत्र इत्यादी अनेक शाखा उपलब्ध आहेत. कला विद्याशाखेत भाषा, संस्कृत, प्राकृत इत्यादी विषयासह मानव्य शाखेतील राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल, गणित, मानसशास्त्र इ. विषय येतात. गणित, भूगोल यासारखे काही विषय शास्त्र व कला या दोन्ही विद्याशाखेत शिकविले जातात. (जोशी बी. आर., २००७)

**कार्यात्मक व्याख्या**

वरिष्ठ महाविद्यालयामध्ये वेगवेगळ्या विद्याशाखा असतात. पुणे विद्यापीठाशी संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील एक शाखा म्हणजे कला शाखा होय.

**महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम**

**कार्यात्मक व्याख्या**

महिलांच्या मानवी हक्कांतील वैवाहिक हक्क, वारसा हक्क, नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क, हिंसेपासून संरक्षणाचा हक्क, संविधानिक हक्क या पाच हक्कांच्या माहिती संपादनात वाढ होण्यासाठी तयार केलेला कालबद्ध कार्यक्रम.

**परिणामकारकता**

**कार्यात्मक व्याख्या**

महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे कला शाखेतील विद्यार्थिनींच्या मानवी हक्काविषयी माहिती संपादनात झालेली वाढ.

**५.७ संशोधनाचे महत्त्व**

मानवी हक्क म्हणजे प्रत्येक मानवाला जन्मापासून असलेले अधिकार. या अधिकारांच्या उल्लंघनामध्ये महिलांच्या हक्कांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणात होताना दिसून येते. प्रस्तुत संशोधनातून महिलांच्या मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाद्वारे महाविद्यालयीन विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्काविषयी माहितीच्या संपादनामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन कार्य महत्त्वाचे आहे. संशोधनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे–

१. महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या मानवी हक्क विषयक माहिती संपादनात वाढ होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.
२. महिलांवर दिवसेंदिवस अत्याचारात होणाऱ्या वाढीमुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या अत्याचाराविरोधी असणाऱ्या विविध कायद्यांची माहिती होऊन त्यांच्या आत्मविश्वासात वाढ होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.
३. महाविद्यालयीन जीवनानंतर गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थिनींना महिलांच्या हक्काविषयी माहिती होणार आहे. कुटुंबव्यवस्थेच्या या महत्त्वाच्या घटकास महिला मानवी हक्कांची जाणीव झाल्यामुळे स्त्रियांच्या कौटुंबिक दर्जात सुधारणा होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.
४. आजची महाविद्यालयीन विद्यार्थिनी उद्याची गृहिणी, आई तसेच विविध नातेसंबंधातून कुटुंबातील महत्त्वाची भूमिका पार पाडणार आहे. प्रस्तुत संशोधनातून तिने अवगत केलेल्या ज्ञानाचा फायदा कुटुंबातील व्यक्तींबरोबरच भावी पिढीमध्ये संक्रमित होऊन संस्कारक्षम आणि महिलांच्या सन्मानाची आणि तिच्या हक्काची जपवणूक होण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.
५. महाविद्यालयीन शिक्षणानंतर विद्यार्थिनी नोकरी, व्यवसाय, स्वयंरोजगारानिमित्त विविध स्तरावर कार्यरत होणार आहे. मानवी हक्काविषयी, स्त्रियांच्या हक्काविषयी त्यांनी संपादन

केलेले ज्ञान त्यांना त्या त्या क्षेत्रात स्त्रियांच्या सन्मानासाठी त्यांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण आहे.

### ५.८ संशोधनाची गृहीतके

१. शालेय अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र या विषयात मानवी हक्काबद्दल माहिती दिलेली आहे. (इयत्ता आठवी नागरिकशास्त्र पाठ्यपुस्तक)

२. समाजामध्ये महिलांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होताना आढळते. (माहेश्वरी, २०११)

३. महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थिनींना मानवी हक्कांचे शिक्षण देणे गरजेचे आहे. (राधामणी,२०१५)

### ५.९ संशोधनाचे प्रश्न

महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थिनींना महिलांच्या मानवी हक्काविषयी माहितीची काय स्थिती आहे?

### ५.१० परिकल्पना

### संशोधन परिकल्पना

१. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या वैवाहिक हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

२. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या वारसा हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

३. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

४. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या हिंसेपासून संरक्षणाचा हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

५. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या संविधानिक हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

६. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्काविषयी माहिती संपादनामध्ये वाढ होईल.

**शून्य परिकल्पना**

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील वैवाहिक हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.
२. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील वारसा हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.
३. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.
४. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.
५. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील संविधानिक हक्क या घटकाच्या संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.
६. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीतील संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

## ५.११ प्रस्तुत संशोधनातील चले

**स्वाश्रयी चल** : महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम

**आश्रयी चल** : विद्यार्थिनींची संपादणूक

**नियंत्रित चल** : विद्यार्थिनींचा वयोगट, वेळ, माध्यम

**अनियंत्रित चल** : विद्यार्थिनींची सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक परिस्थिती

## ५.१२ संशोधनाची व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा

### ५.१२.१ व्याप्ती

१. प्रस्तुत संशोधन हे पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील कला शाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींशी संबंधित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे मानवी हक्कांशी संबंधित आहे.

### ५.१२.२ मर्यादा

१. प्रस्तुत संशोधनातून आलले निष्कर्ष हे पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींकडून येणाऱ्या आलेल्या प्रतिसादावर आधारित आहे.

२. प्रस्तुत संशोधनामध्ये विद्यार्थिनींच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक परिस्थितीवर संशोधकाचे नियंत्रण नाही.

### ५.१२.३ परिमर्यादा

१. प्रस्तुत संशोधन हे पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित १२ वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी माध्यमाच्या कला शाखेतील टी.वाय.बी.ए. वर्गातील विद्यार्थिनींपुरते परिमर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे उत्तर पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ आणि शिरूर या तालुक्यांपुरते परिमर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे महिलांच्या मानवी हक्कातील वैवाहिक हक्क, वारसा हक्क, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क, हिंसेपासून संरक्षणाचा हक्क, संविधानिक हक्क या हक्कांपुरते परिमर्यादित आहे.

## ५.१३ संबंधित साहित्य व पूर्व संशोधनाचा आढावा

संशोधकाने घेतलेल्या संबंधित साहित्याचा आढावा पुढील सारणीमध्ये दिलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुढीलप्रमाणे संबंधित साहित्याचा आढावा घेतला आहे.

**कोष्टक क्र. ५.१ : संबंधित साहित्याच्या आढाव्याचा तपशील**

| अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | पुस्तके : इंग्रजी | १८ |
| २ | पुस्तके : हिंदी | ९ |
| ३ | पुस्तके : मराठी | १६ |
| ४ | मासिके | २३ |
| ५ | वर्तमानपत्रे | १० |
| ६ | संकेतस्थळे | ९ |
| ७ | पूर्व संशोधन : पी.एच.डी. | १२ |
| | **एकूण** | **९७** |

## ५.१४ प्रस्तुत संशोधनाची संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने संशोधनासाठी बहु संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. बहु संशोधन पद्धती म्हणजे संशोधनाच्या उद्दिष्टांना अनुसरून दोन किंवा दोनपेक्षा जास्त संशोधन पद्धतीचा अवलंब करणे होय. प्रस्तुत संशोधनात उद्दिष्टांना अनुसरून सर्वेक्षण पद्धती, साधननिर्मिती पद्धती आणि प्रायोगिक पद्धती या तीन पद्धतींचा अवलंब केला आहे.

### उद्दिष्ट क्र. १ साठी संशोधन पद्धती

**उद्दिष्ट क्र. १ :** वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्काविषयी असलेल्या माहितीची सद्यस्थिती तपासणे.

**कोष्टक क्र. ५.२ : उद्दिष्ट क्र. १ साठी संशोधन पद्धती**

| उद्दिष्ट | संशोधन पद्धती | नमुना निवड पद्धती | नमुना | माहिती संकलनाची साधने | माहिती विश्लेषणाची साधने | माहिती सादरीकरणाची साधने |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वेक्षण पद्धती | यादृच्छिक पद्धती | १२ महाविद्यालये ७५६ विद्यार्थिनी | प्रश्नावली | शेकडेवारी | आलेख |

**उद्दिष्ट क्र. २ साठी संशोधन पद्धती**

**उद्दिष्ट क्र. २** : वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठ महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करणे.

वरील उद्दिष्टासाठी संशोधकाने संशोधन तत्त्वाच्या आधारे, साधन निर्मिती पद्धतीच्या साहाय्याने महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम तयार केला. कार्यक्रमामध्ये पथदर्शी अभ्यासाच्या साहाय्याने आणि तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाच्या साहाय्याने योग्य ते बदल केले आहेत.

**कोष्टक क्र. ५.३ महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे स्वरूप**

| अ.क्र. | महिला मानवी हक्कातील घटक | उपघटक | कार्यक्रमाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | वैवाहिक हक्क | वैवाहिक हक्काबाबत कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | हुंडाप्रथा व तिचे घातक परिणाम | व्याख्यान | २ तास |
| | | हुंडाप्रथा, प्रतिबंधात्मक उपाय | व्याख्यान | २ तास |
| | | हुंडाप्रथा व महिलांचे हक्क | बुद्धिमंथन | २ तास ३० मि. |
| | | कुटुंबातील हक्क | बुद्धिमंथन | २ तास |
| २ | वारसा हक्क | पित्याच्या संपत्तीतील हक्क | वादविवाद | २ तास |
| | | स्त्रीधन व भारतीय विवाह व्यवस्था | वादविवाद | २ तास |
| | | पतीची संपत्ती आणि महिला हक्क | निबंध लेखन | २ तास |
| | | वारसा हक्क विषयक कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | पित्याच्या संपत्तीतील हक्काबाबत योजना | प्रश्नमंजुषा | २ तास |
| ३ | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | महिला आरक्षण आणि नोकरीच्या संधी | निबंध लेखन | २ तास |
| | | नोकरी व व्यवसायातील महिलांचे स्थान | वादविवाद | २ तास ३० मि. |
| | | समान काम समान वेतन | व्याख्यान | २ तास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | नोकरी करणाऱ्या महिलांसाठी कायद्याचे संरक्षण | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | प्रश्नमंजुषा | २ तास |
| ४ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | कुटुंब आणि परिसरामध्ये होणारी महिलांबाबत हिंसा | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | २ तास |
| | | छेडछाड | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | २ तास |
| | | छेडछाड, उपाय योजनात्मक बाबी | प्रसंग विश्लेषण | २ तास |
| | | स्त्री भ्रूणहत्या | प्रसंग विश्लेषण | २ तास ३० मि. |
| | | हिंसाचारापासून संरक्षणासाठी कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| ५ | संविधानिक हक्क | संविधान आणि महिला सक्षमीकरण | व्याख्यान | २ तास |
| | | राज्यघटनेतील मुलभूत हक्क | गटचर्चा | २ तास ३० मि. |
| | | राज्यघटनेतील मुलभूत हक्कांचे रक्षण | गटचर्चा | २ तास |
| | | संविधानातील महिलांसाठीच्या तरतुदी | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | संविधानिक हक्कासाठी योजना | बुद्धीमंथन | २ तास |

## उद्दिष्ट क्र. ३ साठी संशोधन पद्धती

**उद्दिष्ट क्र. ३** : वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

वरील उद्दिष्टासाठी पुढीलप्रमाणे संशोधन पद्धती वापरली आहे.

**कोष्टक क्र. ५.४ : उद्दिष्ट क्र. ३ साठी संशोधन पद्धती**

| उद्दिष्ट क्रमांक | संशोधन पद्धती | नमुना | नमुना निवड पद्धती | स्त्रोत | माहिती संकलनाची साधने | माहिती विश्लेषणाची साधने |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | प्रायोगिक पद्धती | ६२ | सहेतुक | वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनी | पूर्व आणि उत्तर चाचणी | मध्यमान, प्रमाण विचलन, टी परिक्षिका |

## ५.१५ संशोधन अभिकल्प

प्रस्तुत संशोधनासाठी एकलगट अभिकल्पाचा वापर संशोधकाने केला आहे.

एकल गट पूर्व चाचणी–उत्तर चाणी अभिकल्प : प्रस्तुत संशोधनात श्री शिव छत्रपती महाविद्यालयातील ६२ विद्यार्थिनींचा गट पूर्व चाचणी व उत्तर चाचणीसाठी निवडला आहे.

## ५.१६ : प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या

प्रस्तुत संशोधनामध्ये पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींचा समावेश करण्यात आला आहे.

## ५.१७ न्यादर्श आणि न्यादर्श निवड पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने सर्वेक्षणासाठी पुणे जिल्ह्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्नित बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या ७५६ विद्यार्थिनींची निवड यादृच्छिक पद्धतीने केली आहे. तसेच प्रायोगिक गटासाठी श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर येथील कला शाखेतील ६२ विद्यार्थिनींची निवड सहेतुक पद्धतीने केली.

## ५.१८ माहिती संकलनाची साधने

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने उद्दिष्ट क्र. १ साठी महिला मानवी हक्क विषयक सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी संशोधक निर्मित प्रश्नावलीचा उपयोग केला.

उद्दिष्ट क्र. ३ साठी प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तर चाचणीसाठी संशोधक निर्मित प्रश्नावलीचा वापर केला आहे.

## ५.१९ माहिती विश्लेषणाची साधने

प्रस्तुत संशोधनामध्ये माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पुढील संख्याशास्त्रीय साधनांचा उपयोग संशोधकाने केला आहे.

१. सरासरी : सर्वेक्षणातून उपलब्ध झालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी.

२. मध्यमान : सर्वेक्षणातून आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी तसेच पूर्व व उत्तर चाचणी संपादनाची तुलना करण्यासाठी.

३. प्रमाण विचलन : मध्यमानानंतर टी मूल्य काढण्यासाठी.

४. टी परिक्षिका : पूर्व आणि उत्तर चाचणी यांच्या संपादन गुणांतील मध्यमानाची तुलना करण्यासाठी, महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासण्यासाठी.

**५.२० महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची निर्मिती**

संशोधकाने साधननिर्मिती पद्धतीच्या आधारे महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचा प्राथमिक आराखडा तयार केला. तयार केलेला कार्यक्रम मानवी हक्क विषयातील आणि शिक्षणशास्त्रातील तज्ञ व्यक्तींकडून तपासून घेतला. तज्ञांच्या सूचनांप्रमाणे कार्यक्रमामध्ये योग्य ते बदल केले. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमातील ठराविक घटकांच्या बाबतीत कार्यक्रमाचा पथदर्शी अभ्यास केला. पथदर्शी अभ्यासातील निष्कर्षांच्या आधारावर कार्यक्रमामध्ये योग्य ते बदल केले. कार्यक्रमाची अंतर्गत व बाह्य सप्रमाणता विचारात घेऊन अंतिम कार्यक्रमाची निर्मिती केली. सदर कार्यक्रम हा मानसशास्त्रीय तत्त्वावर आधारित असून कार्यक्रमामध्ये व्याख्यान, चर्चासत्र, प्रश्नमंजुषा, माहितीपत्रकाची निर्मिती, वादविवाद यासारख्या विविधांगी बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

**५.२१ महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी**

महिला मानवी हक्काविषयी विद्यार्थिनींमध्ये असणारी सद्यस्थितीची माहिती सर्वेक्षणाच्या माध्यमातून मिळाल्यानंतर महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर या महाविद्यालयाची निवड केली. या महाविद्यालयातील ६२ विद्यार्थिनींच्या गटावर प्रायोगिक उपायांची अंमलबजावणी केली. एकूण २५ दिवसांच्या या कार्यक्रमामध्ये विविध उपक्रम विद्यार्थिनींसाठी राबविले. कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर याच गटाची उत्तरचाचणी घेऊन पूर्व व उत्तरचाचणीतील गुणांची तुलना केली.

**५.२२ संशोधनाचे निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनात उद्दिष्टांना अनुसरून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**उद्दिष्ट क्र १** : वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या मानवी हक्काविषयी असलेल्या माहितीची सद्यस्थिती तपासणे.

प्रस्तुत उद्दिष्टाच्या साध्यतेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित पुणे जिल्ह्यातील एकूण बारा महाविद्यालयाचे सर्वेक्षण केले त्यातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिंनींची महिला मानवी हक्कातील संपादनाची सरासरी निम्म्यापेक्षाही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनीना महिला मानवी हक्क विषयी माहिति कमी आहे.

२. पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिंनींची वैवाहिक हक्क घटकातील संपादनाची सरासरी निम्मापेक्षाही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना वैवाहिक हक्कांविषयी माहिति कमी आहे.

३. पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिंनीची वारसा हक्क घटकातील संपादनाची सरासरी निम्मापेक्षाही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींना वारसा हक्काविषयी माहिति कमी आहे.

४. पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिंनींची नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क घटकातील संपादनाची सरासरी निम्मापेक्षाही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींना नोकरी करणाऱ्या महिलांच्या हक्कांविषयी माहिति कमी आहे.

५. पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींची हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकातील संपादनाची सरासरी निम्मापेक्षही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना हिंसेपासून संरक्षणाचा हक्कांविषयी माहिती कमी आहे.

६. पुणे जिल्ह्यातील बारा महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिंनींची संविधानिक हक्क घटकातील संपादनाची सरासरी निम्मापेक्षही कमी आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना संविधानिक हक्कांविषयी माहिती कमी आहे.

**उद्दिष्ट क्र. २** वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम विकसित करणे.

१. संशोधकाने तयार केलल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाबद्दल तज्ज्ञांचे मत सकारात्मक आहे. (कोष्टक क्र. ४.११ पृ. क्र.१२६)

२. संशोधकाने विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमातून विद्यार्थिनींना उपयुक्त माहिती मिळाली. कार्यक्रमाबद्दल विद्यार्थिनींचे मत सकारात्मक आहे. (विद्यार्थिनी प्रतिसादाचे निष्कर्ष पृ. क्र. १२७)

**उद्दिष्ट क्र. ३. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थिनींसाठी विकसित केलेल्या महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची परिणामकता अभ्यासणे.**

१. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील वैवाहिक हक्क घटकातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १८.३९ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

२. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील वारसा हक्क घटकातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १६.६५ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

३. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क घटकातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १६.९४ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

४. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकांतील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १९.८३ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग

करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

५. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींच्या महिला मानवी हक्कातील सांविधानिक हक्क घटकांतील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १७.८१ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

६. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींच्या महिला मानवी हक्कातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य २६.८७ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला.

**कोष्टक क्र. ५.५ : ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनांच्या परिक्षणावरून निष्कर्ष**

| अ.क्र. | महिला मानवी हक्कातील घटक | परिकल्पना क्रमांक | टी मूल्य | त्याग / स्विकार | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैवाहिक हक्क | १ | १८.३९ | त्याग | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिंनींच्या महिला मानवी हक्कातील वैवाहिक हक्क घटकातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १८.३९ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला. . |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | वारसा हक्क | २ | १६.६५ | त्याग | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील वारसा हक्क घटकातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १६.६५ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला. |
| ३ | नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क | ३ | १६.९४ | त्याग | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क घटकातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १६.९४ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला. |
| ४ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | ४ | १९.८३ | त्याग | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील हिंसेपासून संरक्षणाचा हक्क घटकांतील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १९.८३ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला. |
| ५ | संविधानिक हक्क | ५ | १७.८१ | त्याग | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील सांविधानिक हक्क घटकांतील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य १७.८१ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला. |
| ६ | महिला मावी हक्कातील एकत्रित पाच घटक | ६ | २६.८७ | त्याग | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम राबविला असता वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या महिला मानवी हक्कातील संपादन गुणांच्या मध्यमानात वाढ झाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य २६.८७ असून ते सारणी टी मूल्यापेक्षा (२.६६) अधिक असल्याने ०.०१ सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम परिणामकारक ठरला. |

## ५.२३ संशोधन निष्कर्षाची चर्चा

प्रस्तुत संशोधन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संशोधनातून आलेल्या निष्कर्षांचा पूर्व संशोधनातील निष्कर्षांशी कशा प्रकारे संबंध दिसून येतो हे पाहण्यासाठी संशोधकाने संबंधित संशोधनाच्या आढाव्यातून अभ्यासलेल्या विभिन्न संशोधनातील निष्कर्षांशी तुलना केली व परस्पर संबंध तपासला त्याची चर्चा पुढीलप्रमाणे.

**कुमार, एस. (२०१४)** यांनी शालेय स्तरावरील मानवी हक्कांच्या अभ्यासाचा, अध्ययनपद्धतीचा अभ्यास केला आहे. त्यासाठी शालेय अभ्यासक्रम व राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचे विश्लेषण केले आहे. प्रस्तुत संशोधनात वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी विविध उपक्रमांची रचना केली आहे.

**मेहता, एच. (२०११)** यांनी पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांच्या महिला सक्षमीकरणामधील भूमिकांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. यामध्ये त्यांनी कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची महिला सक्षमीकरणाबाबत तुलना केली आहे. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात अधिक सक्षमीकरण झाल्याचे या संशोधनातून दिसून आले आहे. प्रस्तुत संशोधनात महिला सक्षमीकरणाची तुलना न करता सक्षमीकरणाच्या हेतुने कार्यक्रमाची निर्मिती करून त्याची परिणामकारकता अभ्यासली आहे.

**प्रदिपकुमार, के. (२०११)** यांनी माध्यमिक शिक्षक प्रशिक्षणासाठी मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाची निर्मिती केली आहे आणि त्याचा माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांवर झालेला परिणाम अभ्यासला आहे. या संशोधनात कार्यक्रम निर्मिती ही शिक्षकांसाठी करून त्याचा विद्यार्थ्यांच्या संपादनावरील परिणाम अभ्यासला आहे. तर प्रस्तुत संशोधनामध्ये कार्यक्रमनिर्मिती ही विद्यार्थिनींसाठी केली असून त्याची परिणामकारकता तपासली आहे. दोन्ही संशोधनाच्या निष्कर्षांमध्ये साम्य दिसून आले.

**पागेदार, अ. (२०११)** यांनी महिला हक्कांच्या विशेष संदर्भात भारतातील मानवी हक्कांच्या स्वरूपाचा चिकित्सक अभ्यास केला आहे. यामध्ये भारतातील मानवाधिकाराची सद्यस्थिती अभ्यासली आहे. तसेच महिलांच्या हक्कांच्या रक्षणासाठी विविध उपाययोजना सुचविल्या आहेत.

**यादव, वि. (२०१२)** यांनी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींमधील महिलांच्या कायदेविषयक हक्कांची तुलना केली आहे. यामध्ये एम.टेक.मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थिनींच्या तुलनेत बी.एड. मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थिनींमध्ये हक्कांची जाणीव अधिक असल्याचे दिसून आले. तसेच बी.एड. मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींच्या तुलनेत एम.बी.ए. मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या कायदेविषयक हक्कांची जाणीव अधिक दिसून आली. प्रस्तुत संशोधनामध्ये मात्र

महिलांच्या हक्कांबाबत जाणिवांच्या सद्यस्थितीचा अभ्यासाबरोबरच त्यामध्ये वृद्धीसाठी कार्यक्रम विकसित केला आहे.

**राधामणी, अ. (२०१४)** यांनी माध्यमिक शाळेतील मानवी हक्कांबाबत जाणीव जागृती आणि मिडीया यांचा मुलींच्या स्व संकल्पनेच्या विकासावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास केला आहे. मिडीयाचा मानवी हक्कांच्या जाणिवेत आणि स्व संकल्पनेच्या विकासावर परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. प्रस्तुत संशोधनात मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचा प्रभाव विद्यार्थिनींच्या मानवी हक्क जाणिवांच्या विकासावर झाल्याचे दिसून आले. दोन्ही संशोधनाच्या निष्कर्षांमध्ये साम्य असल्याचे दिसून आले.

## ५.२४ संशोधनाचे योगदान

१. महाविद्यालयातील विद्यार्थिनींना त्यांच्या हक्कांविषयी माहिती मिळून स्त्री प्रश्नांच्या जाणिवांचे व त्यावरील उपायांचे ज्ञान त्यांना प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून मिळण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाचे योगदान आहे.

२. महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमामुळे महाविद्यालयीन विद्यार्थिनींना महिलांच्या प्रश्नांची जाणीव झाल्याने आणि त्यावरील उपायांची माहिती मिळाल्याने स्त्रियांचे समाजातील स्थान उंचावण्याच्या दृष्टीने सदर संशोधनाचे योगदान आहे.

३. समाजामध्ये स्त्री पुरूष समानतेचे मूल्य रूजण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाचे योगदान आहे.

४. समाजातील अनिष्ट चालीरीती, रूढी, परंपरांमुळे महिलांच्या हक्कावर येणारे संकट दूर होऊन महिलांच्या हक्कांचा प्रचार आणि प्रसार होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाचे योगदान आहे.

५. महाविद्यालयीन विद्यार्थिनींमध्ये कौटुंबिक हिंसाचाराविरोधी उपायांची जागृती घडून येण्यास मदत होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाचे योगदान आहे.

## ५.२५ शिफारशी

१. महाविद्यालयीन स्तरावर विविध अभ्यासपूरक उपक्रमांच्या माध्यमातून महिला मानवी हक्कांचा प्रसार करावा.

२. महाविद्यालयामध्ये महिला मानवी हक्काविषयी चर्चासत्र व परिसंवादाचे आयोजन करावे.

३. वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांसाठी मानवी हक्काविषयी उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करावे.

४. वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना अल्पमुदतीचे महिला मानवी हक्क विषयी कोर्स आयोजित करावे.

## ५.२६ पुढील संशोधनासाठी विषय

१. माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमांमध्ये प्रतिबिंबित झालेल्या मानवी हक्कांचा चिकित्सक अभ्यास.

२. वरिष्ठ महाविद्यालयातील कला शाखा आणि विज्ञान शाखा यामधील विद्यार्थ्यांच्या मानवी हक्कांविषयी जाणिवांचा तुलनात्मक अभ्यास.

३. विविध व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थिनींमध्ये महिलांच्या कायदेविषयक हक्कांच्या जाणीव जागृतीचा तुलनात्मक अभ्यास.

४. ग्रामीण व शहरी भागातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थिनींमध्ये मानवी हक्कांचा विकास करण्यासाठी कार्यक्रमाची निर्मिती आणि परिणामकारकतेचा अभ्यास.

५. महिला अभ्यास केंद्रामार्फत चालविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा चिकित्सक अभ्यास.

६. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी–शिक्षकांसाठी मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे विकसन आणि परिणामकारकतेचा अभ्यास.

७. पारंपारिक अभ्यासक्रम आणि व्यावसायिक अभ्यासक्रम यातील विद्यार्थिनींमध्ये मानवी हक्काविषयी माहितीचा तुलनात्मक अभ्यास.

# संदर्भ ग्रंथ

# संदर्भ ग्रंथ


१. Acharya, B.C.(2011). ***A Handbook of Womens Human rights.*** New Delhi; Wisdom Press.

२. Alston,P., & Robinson, M.(2006). ***Human Rights and development towards Mutual Reinforcement.*** New York; Oxford University Press.

३. Best, W. and Kahn, J.V. (2006). ***Research in Education.*** (9th Ed.)New Delhi ; Pearson Prentice Hall.

४. Buch, M.B.(1992). ***Fifth Survey of Research in Education.*** Vol.2.

५. Baroda : M.S. University.

६. Chandra, U.(2014). ***Human Rights.*** Alahabad; Alahabad law agency Publications.

७. Das, P.B.(2012). ***Human rights in India***. New Dehli; Sagar Pulication.

८. Edwards, A.L.(1971). ***Experimental design in psychological Research***. Amerid publishing co. pvt ltd.

९. Khan,M.S.(1990). ***Educational research***. New Delhi; Ashish Publishing House.

१०. Mahapatra,S.(2005). ***Modern Encyclopedia of women and Development: Reflection of Crime against of Women.*** Vol. 5, New Delhi; Rajat Publication.

११. Mahapatra, S. (2005). ***Modern Encyclopedia of women and development: Development of women challenges and response***. Vol.1,New Delhi; Rajat Publication.

१२. Mohonty, J. (2003). ***Human Rights Education.*** New Dehli; Deep and Deep Publications.

१३. Myneni, S. R. (2013). ***Human Rights.*** Hydrabad; Asia Law House.

१४. Naik.V., & Sahni, M. (2011). ***Human Rights and Social Justice***. New Dehli; Crescent Publishing Corporation .

१५. Saksena, A. (2004). ***Gender and Human Rights*: *Status of Women workers in India***. Dehli;Shipra publication.

१६. Schulz, W. F. (2009). ***The future of Human Rights***. New Delhi; Manas Publications. Sen, S. (1998). ***Human Rights in a Developing Society***. New Delhi; APH Publishing Corporation.

१७. Sharma, G. (1997). ***Human Rights and Social Justice.*** New Delhi ; Deep and Deep publications.

१८. Sharma, D. (2014). ***Social Security and Human Rights*.** New Delhi; Swastik Publications .

१९. Viplav, and bhaskar. (2013). ***Concept of Human Rights***. Meerat; Rahul Publishing house .

२०. सक्सेना, दि. (२०१२). *महिला सशक्तीकरण सिद्धांत और वास्तविकता.* कानपूर; रोशनी पब्लिकेशन.

२१. आगलावे, प्र. (२०००). *संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे.* नागपूर; विद्या प्रकाशन.

२२. अय्यर, ल. (जुलै २०१४). *महिलांचा निवडणुकीतील सहभाग.* (लेख). नवी मुंबई; योजना, माहिती व प्रसारण मंत्रालय, प्रकाशन विभाग, भारत सरकार. पृ.२५–३०.

२३. कौल, एस. के. (२००९). *हुंडाबंदी अधिनियम.* जळगाव; युनिव्हर्सल लॉ हाऊस.

२४. कुलकर्णी, एस. व्ही. (२०१६). *भारतीय दंड संहिता.* पुणे; अशोक ग्रोवर ॲण्ड ग्रोवर.

२५. कुलकर्णी, पी. के. (२०१५). *मानवी हक्क आणि सामाजिक न्याय.* पुणे; डायमंड पब्लिकेशन.

२६. कुलकर्णी, स्वा. (२००९). *मानवी हक्कातील मुलभूत संकल्पना.* नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

२७. कुलकर्णी, वं. (मे २०१०). *महिला सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल.* नवी मुंबई; लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन. पृ.७७.

२८. कुल्हरी, सु. (२०१०). *महिला एवं मानवाधिकार.* जयपूर : रितु पब्लिकेशन.

२९. कदम, श. प. (१९८९). *शैक्षणिक संख्याशास्त्र.* पुणे; नूतन प्रकाशन.

३०. गायकवाड, व्ही. बी. (जाने. २०१३). *फुले आंबेडकरी चळवळीचे महिला सक्षमीकरणातील योगदान* (लेख). वाई; नवभारत. पृ.१८–२३.

३१. गुरव, अ. (मार्च २०१०). *सावित्रीबाईंच्या वारसदार.* (लेख). पुणे; स्त्री, अपूर्व पब्लिकेशन. पृ.४–५.

३२. गोखले, क. (जून २०१०). *महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती चळवळीचा मागोवा.* (लेख). १९६०–२०१०; नवभारत. पृ.८३–१००.

३३. चटर्जी, म. दा. (ऑगस्ट २०१३). *महिलांचे राजकीय सबलीकरण सर्वसमावेशक लोकशाहीकडे नेणारा अश्वस्त मार्ग.* (लेख). नवी मुंबई; योजना, प्रकाशन विभाग माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार. पृ.४९–५१.

३४. चतुर्वेदी, ल. (२०११). *मानवाधिकार एवं कर्तव्य.* जयपूर; रितु पब्लिकेशन.

३५. जोशी, स्मि. (२०१४). *मानवी हक्क व जबाबदाऱ्या.* पुणे; गणराज पब्लिकेशन.

३६. जाधव, तु. आणि शिरापूरकर, म. (२०१५). *मानवी हक्क.* पुणे; युनिक अॅकेडमी.

३७. जोशी वि. ना. आणि टिपणीस, आर. आर. (२०१५). *कायदे स्त्रिया आणि मुलांचे.* ठाणे; मुकुंद प्रकाशन.

३८. टपळे, अ. (एप्रिल २०१३). *स्त्रीवादी साहित्याची वैशिष्टे आणि स्वरूप.* (लेख). वाई; नवभारत, सन प्रिंटर्स. पृ.२९–३३.

३९. दातार, छा. (फेब्रुवारी २०१४). *बलात्कारीतांचे मनोधैर्य वाढावे म्हणून.* (लेख). पुणे; मिळून साऱ्याजणी. पृ.२०–२२.

४०. दाभोलकर, मु. (फेब्रुवारी २०१५). *महिला सक्षमीकरणासाठी अंधश्रद्धा निर्मुलन. प्रबोधन अभियान.* (लेख). सांगली; अंधश्रद्धा निर्मुलन वार्तापत्र, कुमार प्रिंटर्स. पृ.१८–२५.

४१. दांडेकर, वा. ना. (१९९७). *शैक्षणिक मुल्यमापन व संख्याशास्त्र.* पुणे; श्री विद्या प्रकाशन.

४२. देहाडराय, स्वा. आणि तांबे, अ. (२००९). *स्त्रिया, कायदा आणि राजकारण.* पुणे; क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र.

४३. देहाडराय, स्वा., आणि तांबे, अ. (२००९). *स्त्रियांच्या चळवळी आणि संघटना.* पुणे; क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र.

४४. देहाडराय, स्वा., आणि तांबे, अ. (२००९). *स्त्रियांचे सामाजिक सक्षमीकरण.* पुणे; क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र.

४५. पगार, रं. (मे २०१५). *जातपंचायतीमध्ये स्त्रियांचे स्थान.* (लेख). सांगली; अंधश्रद्धा निर्मुलन वार्तापत्र, कुमार प्रिंटर्स. पृ.२३–२४.

४६. नाटाणी, प्र. ना. (२०११). *मानवाधिकार और कर्तव्य.* जयपूर; अविष्कार पब्लिशर्स.

४७. पटेल, र. (सप्टेंबर २०१३). *शैक्षणिकदृष्ट्या मागास अल्पसंख्यांक समुदायातील स्त्री शिक्षणाचा प्रश्न.* (लेख). नवी मुंबई; योजना, प्रकाशन विभाग माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार. पृ.४७–४८.

४८. पाटील, व्ही. बी. (२०१४). *मानवी हक्क.* पुणे; के सागर पब्लिकेशन.

४९. पेशवे, व्ही. एम., आणि पेशवे, मं. (२०१४). *मुलभूत मानवाधिकारांची अंमलबजावणी.* दिल्ली; मानक पब्लिकेशन.

५०. पंडित, ब. बि. (१९९७). *शिक्षणातील संशोधन.* पुणे; नूतन प्रकाशन.

५१. बऱ्हाटे, नि. ल. (ऑगस्ट २०१३). *बदलत्या सामाजिक परिस्थितीत महिलांची भूमिका.* (लेख). पुणे; शिक्षण संक्रमण, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ. पृ.५–१७.

५२. बुव्हा, सी. द. (एप्रिल २०१०). *स्त्रीवादाचा विसाव्या शतकातील आद्य अविष्कार.* (लेख). पुणे; स्त्री, अपूर्व पब्लिकेशन. पृ.४–७.

५३. भागवत, वि. (जून २०१५). *पुनरूत्पादनाचे राजकारण आणि स्त्री प्रश्नाची वाटचाल.* (लेख). मिळून साऱ्याजणी. पृ.२८–३१.

५४. भागवत, वि. (नोव्हेंबर २०१४). *शेतकरी संघटना आणि स्त्री प्रश्नाची वाटचाल.* पुणे; मिळून साऱ्याजणी. पृ.७६–८५.

५५. भागवत, वि. (२००८). *स्त्रीवादी सामाजिक विचार.* पुणे; डायमंड पब्लिकेशन.

५६. भारंबे, नं. (२०१०*). मानवी हक्क व समाज.* पुणे; निराली प्रकाशन.

५७. भिंताडे वि. रा. (२००८). *शैक्षणिक संशोधन पद्धती. (तिसरी आवृत्ती).* पुणे; नित्यनूतन प्रकाशन.

५८. मुळे, सु., बागवान इ. आणि पाटील ग. (मार्च २०१६). *सामर्थ्य आहे कर्तृत्वाचे.* (लेख). नवी मुंबई, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन. पृ.६–११.

५९. मस्के, टी. ए. (१९९१). *शैक्षणिक संख्याशास्त्र.* संगमनेर; प्रज्ञा प्रकाशन.

६०. सबनीस, श्री. नी. (२०१५). *कामाच्या ठिकाणी महिलांची छळवणूक (प्रतिबंध, मनाई व निवारण अधिनियम) २०१३.* ठाणे; मुकुन्द प्रकाशन.

६१. मुहावर, सु. (२०११). *राज्य एवं महिला मानवाधिकार.* जयपूर; पोइन्टर पब्लिशर्स.

६२. यादव, वि. सिं. (२०१०). *नई सहस्त्राब्दी मे मानवाधिकार के विविध संदर्भ.* जयपूर; ओमेगा पब्लिकेशन.

६३. येलमटे, अ. तु. (ऑगस्ट २०१३). *बदलत्या सामाजिक परिस्थितीत महिलांची भूमिका.* पुणे; शिक्षण संक्रमण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ. पृ.१८–३३.

६४. रोडे, पु. (२००९). *महिलांसाठी आधार कायद्याचा.* पुणे; डायमंड पब्लिकेशन.

६५. लाड, गि. (सप्टेंबर २०१४). *स्त्री भ्रूण हत्येसाठी राष्ट्रीय सुरक्षा कायदा.* (लेख). पुणे; साप्ताहिक साधना, कल्पना प्रिंटर्स. पृ.११–१४.

६६. लाड, गि. (जानेवारी २०१५). *गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा, हेतू अंमलबजावणी आणि परिणाम.* (लेख). पुणे; मिळून साऱ्याजणी. पृ.४४–४५.

६७. शर्मा, मं. (२००९). *नारी के प्रति अत्याचार एवं मानवाधिकार.* जयपूर; मार्क पब्लिशर्स.

६८. शर्मा, र. और मिस्त्रा, एस. के. (२०१०). *महिला और मानवाधिकार.* दिल्ली; अर्जुन पब्लिकेशन हाऊस.

६९. सोनवणे, व्ही. वाय. आणि भालेराव. सु. (२०१४). *महिला आणि मानवी हक्क.* जळगाव; प्रशांत पब्लिकेशन.

७०. https://www.hrw.org

७१. https://www.nhrc.nic.in

७२. https://www.humanrights.com

७३. https://www.wikipedia.org

७४. https://www.ohchr.org

७५. https://www.censusindia.gov.in

७६. https://www.ncw.in

७७. https://www.womenchild.maharashtra.gov.in

७८. https://www.mscw.org.in

७९. http://djunnarkar.blogspot.com/2015/03/blog-post.html

८०. https://www.slideshare.net/mobile/energeticarun/item-analysis-16082143

# परिशिष्ट

# परिशिष्ट यादी


| परिशिष्टक्र. | परिशिष्ट तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| क | महाविद्यालयांची यादी | १७९ |
| ख | विद्यार्थिनींची यादी | १८० |
| ग | महिला मानवी हक्क शिक्षण प्रश्नावली | १८१ |
| घ | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम | १९२ |
| च | महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक | २०२ |
| छ | महिला मानवी हक्क शिक्षण माहिती पुस्तिका | २०४ |
| ज | पूर्व आणि उत्तर चाचणीतील प्राप्तांक | २१४ |
| झ | तज्ञांची नावे | २१८ |
| ट | प्रमाणपत्रे | २१९ |
| ठ | विद्यार्थिनी प्रतिक्रीया | २३३ |
| ड | छायाचित्रे | २३६ |

परिशिष्ट क

# महाविद्यालयांची यादी

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|
| १ | बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे. |
| २ | अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे. |
| ३ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे, ता.खेड, जि.पुणे. |
| ४ | रत्नाई महिला महाविद्यालय, राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे. |
| ५ | श्रीमती सिताबाई रंगुजी शिंदे महाविद्यालय, बोरी, ता.जुन्नर, जि.पुणे. |
| ६ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे. |
| ७ | मा.बाळासाहेब जाधव महाविद्यालय, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे. |
| ८ | श्री शिव छत्रपती महाविद्यालय, बोडकेनगर, ता.जुन्नर, जि.पुणे. |
| ९ | अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर, ता.जुन्नर, जि.पुणे. |
| १० | पद्ममणि जैन महाविद्यालय, पाबळ, ता.शिरूर, जि.पुणे. |
| ११ | इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे. |
| १२ | सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे. |

परिशिष्ट ख

## प्रायोगिक गटातील विद्यार्थिनींची यादी

| अ.क्र. | विद्यार्थिनीचे नाव | अ.क्र. | विद्यार्थिनीचे नाव |
|---|---|---|---|
| १ | बांगर अश्विनी बबन | ३२ | केदारी वंदना हेमा |
| २ | भांगे स्वाती शांताराम | ३३ | कोकणे पुजा कुशाबा |
| ३ | चव्हाण गौरी सुरेश | ३४ | कोकाटे रेखा जयराम |
| ४ | ढोले मयुरी खंडू | ३५ | लांडे मनिषा काशिनाथ |
| ५ | गायकवाड नम्रता अनिल | ३६ | मांडवे अनुजा भाऊ |
| ६ | कौदरे सारिका विठ्ठल | ३७ | मरभळ प्रतिक्षा हरिभाऊ |
| ७ | खैरे ज्योती जयसिंग | ३८ | मस्करे स्नेहल राजेंद्र |
| ८ | पारधी मंगल लक्ष्मण | ३९ | मातेले पुजा रामदास |
| ९ | रघतवान अपेक्षा जालिंदर | ४० | मोरे कल्पना धोंडीभाऊ |
| १० | साबळे राखी गोविंद | ४१ | निगळे निशा भरत |
| ११ | सांगडे सुरेखा दिनकर | ४२ | पांडे मयुरी नंदाराम |
| १२ | शेळकंदे प्रियांका तानाजी | ४३ | पारधी दिपाली विलास |
| १३ | शिंदे हेमा दत्तात्रय | ४४ | रेंगडे राजश्री सुभाष |
| १४ | बगाड मनिषा गणपत | ४५ | रेंगडे अनुजा अशोक |
| १५ | भोर प्राजक्ता खंडू | ४६ | साबळे अक्षदा वामन |
| १६ | बोराडे कुंदा तुकाराम | ४७ | बगाड रूपाली त्रिंबक |
| १७ | बोराडे प्राची गुलाबराव | ४८ | भालचिम निलम लक्ष्मण |
| १८ | चिमटे पुजा रामचंद्र | ४९ | बोराडे आशा गेणू |
| १९ | डामसे अश्विनी शिवाजी | ५० | चिमटे अर्चना किसन |
| २० | डामसे माधुरी सुभाष | ५१ | डामसे सुरेश किसन |
| २१ | देवाडे स्वाती सुरेश | ५२ | डामसे सुवर्णा रामदास |
| २२ | गायकवाड सुवर्णा प्रभाकर | ५३ | देवाडे नुतन राजेंद्र |
| २३ | गागरे उर्मिला चिमाजी | ५४ | डोमसे वैभवी राजेंद्र |
| २४ | घोटकर वनिता पुनाजी | ५५ | डोके माधुरी माणिक |
| २५ | जठार कविता देवेंद्र | ५६ | गागरे सोनाली तुळशिराम |
| २६ | जवळे सुप्रिया देवराम | ५७ | गवारी उर्मिला गणपत |
| २७ | कबाडी रोहिणी मधुकर | ५८ | गोडे कविता गेरू |
| २८ | काशिद श्वेता दिलीप | ५९ | गोसावी रिया शिरीष |
| २९ | काशिद स्वाती रोहिदास | ६० | काचळे अक्षदा ज्ञानेश्वर |
| ३० | कवटे स्वाती अंकुश | ६१ | काळे प्रियांका जयदास |
| ३१ | केदारी पुष्पा कमलाकर | ६२ | कसबे धनश्री सुरेश |

परिशिष्ट ग

# महिला मानवी हक्क शिक्षण प्रश्नावली

**विद्यार्थिनीची वैयक्तिक माहिती**

विद्यार्थिनीचे नाव :---------------------------------------

महाविद्यालयाचे नाव : ---------------------------------------

विद्याशाखा : -------------------- वर्ग : -------------------

वय : ---------- विवाहित / अविवाहित : ----------------------

वडील / पतीचा व्यवसाय : -----------------------------------

**सूचना : खाली दिलेल्या पर्यापयांपैकी योग्य पर्याय निवडून पर्यायासमोर ✓अशी खूण करा.**

१. खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या हिंसाचारास कौटुंबिक हिंसाचार म्हणता येणार नाही?

अ) महिलेची कुटुंबात होणारी शारीरिक पिळवणूक

ब) महिलेची कुटुंबात होणारी मानसिक पिळवणूक

क) महिलेची कुटुंबात होणारी आर्थिक पिळवणूक

ड) नोकरीच्या ठिकाणी होणारी पिळवणूक

२. स्त्रियांच्या कौटुंबिक छळास आळा घालण्यासाठी भारत सरकारने २००५ मध्ये कोणता कायदा निर्माण केला आहे.

अ) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा

ब) मातृत्व लाभ कायदा

क) हुंडा प्रतिबंधक कायदा

ड) कुटुंब न्यायालय कायदा

३. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायद्यांतर्गत कोणाला दाद मागता येते?

अ) केवळ विवाहित महिला

ब) केवळ विवाहित व अविवाहित महिला

क) कुटुंबातील सर्व महिला

ड) विवाहित, अविवाहित महिला व १८ वर्षाखालील मुले

४. कौटुंबिक हिंसाचार कायद्यामुळे महिलांना कोणता हक्क प्राप्त होतो?

अ) महिलेला कौटुंबिक बेबनावानंतर त्याच घरात हिंसाचार मुक्त राहण्याचा हक्क

ब) महिलेला तिच्या मर्जीप्रमाणे घरात समान हिस्सा मिळतो.

क) महिलेला संपत्तीमध्ये वाटा मागण्याचा अधिकार

ड) कुटुंबातील सर्वधिकार

५. हुंड्याच्या संबंधात खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे?

अ) विवाह प्रसंगी अथवा विवाहानंतर महिलेच्या पित्याकडून, नातेवाईकांकडून रक्कम अगर वस्तुच्या रूपात केलेल्या मागणीचा समावेश हुंड्यामध्ये येतो.

ब) जेथे हुंडा देण्याची परंपरा आहे तेथे हुंडा प्रतिबंधक कायदा लागू होत नाही.

क) केवळ लग्नापूर्वी अथवा लग्नप्रसंगी घेतलेल्या रकमेचाच समावेश हुंड्यामध्ये होतो.

ड) स्त्रीधनाचा समावेश हुंड्यामध्ये होतो.

६. हुंडाबंदी कायद्यांतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यासंदर्भात कोणते विधान चुकीचे आहे?

अ) कोणत्याही विवाहित महिलेला ठराविक रकमेसाठी, वस्तुंसाठी पती अथवा सासरच्या इतर कोणत्याही व्यक्तीकडून शारीरिक अगर मानसिक छळ होत असेल तर गुन्हा दाखल करता येतो.

ब) हुंड्याच्या त्रासाने महिलेने आत्महत्या केल्यास नातेवाईकांना गुन्हा दाखल करता येतो.

क) पिडीत महिलेबरोबरच तिच्या माहेरच्या व्यक्तीला देखील गुन्हा दाखल करता येतो.

ड) गुन्हा फक्त पतीवरच दाखल करता येतो. पतीच्या कुटुंबियांवर नाही.

७. हुंडा प्रथेस विरोध करणे गरजेचे आहे, याचे संयुक्तिक कारण म्हणजे ...

अ) हुंडा ही अनिष्ट सामाजिक प्रथा असून त्यामुळे स्त्रियांच्या हाल अपेष्टांमध्ये वाढ होते.

ब) कायद्याने या प्रथेस बंदी आहे म्हणून

क) प्रत्येकाला हुंडा देणे शक्य होणार नाही म्हणून

ड) समाजाला या प्रथेपासून कोणताच फायदा होत नाही म्हणून

८. खालीलपैकी हिंदू विवाह पद्धतीचा पाया कोणता?

अ) एकपत्नीत्व आणि एकपतित्व

ब) विवाहातील संस्कार

क) वैवाहिक बंधने

ड) एकपत्नीत्व

९. पहिल्या लग्नाचा कायदेशीर घटस्फोट झाला नसताना दुसरे लग्न केल्यास,

अ) विधीपूर्वक विवाह केल्यास तो कायदेशीर ठरतो.

ब) पहिल्या पत्नीने संमती दिल्यास तो कायदेशीर ठरतो.

क) असा विवाह कायदेशीर न ठरता तो रद्द होतो.

ड) असा विवाह कायदेशीर असतो.

१०. शून्य विवाह म्हणजे ...

अ) विवाहाची नोंदणी न करता केलेला विवाह कायद्याच्या दृष्टीने शून्य (रद्द) ठरतो.

ब) आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह कायद्याच्या दृष्टीने शून्य (रद्द) ठरतो.

क) विवाहाच्या वेळी पती किंवा पत्नी यांना हयात जीवनसाथी असेल तर असा विवाह कायद्याच्या दृष्टीने शून्य (रद्द) ठरतो.

ड) विधीपूर्वक विवाह न केल्यास शून्य ठरतो.

११. विवाहनोंदणी करणे गरजेची आहे कारण...

अ) विवाह कायदेशीर होतो.

ब) महिलेच्या सुरक्षिततेत वाढ होते.

क) विवाहाचे कायदेशीर लाभ मिळण्यास उपयुक्त ठरते.

ड) वरील सर्व बरोबर

१२. कुटुंब न्यायालय कायद्याचा प्रमुख उद्देश कोणता?

अ) महिलांच्या वारसा हक्काच्या तक्रारी सोडविणे?

ब) कुटुंब नियोजनाची मोहिम राबविणे.

क) विभक्त होण्यापूर्वी पती आणि पत्नीमध्ये तडजोड घडवून आणणे.

ड) स्त्री भ्रूण हत्येवर नियंत्रण ठेवणे.

१३. पित्याच्या संपत्तीत वारसा हक्काने मुलीला किती हिस्सा मिळतो?

अ) मुलांच्या तुलनेत अर्धा हिस्सा

ब) मुलांच्या तुलनेत २५ टक्के हिस्सा

क) मुलांच्या बरोबरीने समान हिस्सा

ड) मुलींना संपत्तीत हिस्सा मिळत नाही

१४. खालीलपैकी सत्य विधान कोणते?

अ) विवाहित महिलेला वडिलांच्या संपत्तीत हिस्सा मिळत नाही.

ब) वडिलोपार्जित संपत्तीत केवळ मुले आणि मुलींनाच समान हिस्से मिळतात.

क) वडिलोपार्जित संपत्तीत मुले, मुली आणि पत्नी यांना समान हिस्से मिळतात.

ड) वडिलोपार्जित संपत्तीत मुले, मुली, पत्नी आणि आई यांना समान हक्क मिळतात.

१५. मृत्युपत्राविषयी खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?

अ) मृत्युपत्र केवळ पुरूषालाच करता येते.

ब) कायद्यानुसार मृत्युपत्र करणे बंधनकारक असते.

क) पुरूषांबरोबर महिलेलाही मृत्युपत्र करता येते.

ड) मृत्यूपत्राशिवाय संपत्तीत हिस्सा मिळत नाही.

१६. खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे?

अ) पहिल्या पत्नीच्या निधनानंतर दुसऱ्या पत्नीस पहिल्या पत्नीइतकेच पतीच्या संपत्तीत हक्क मिळतात.

ब) पहिल्या पत्नीच्या निधनानंतर दुसऱ्या पत्नीस पतीच्या संपत्तीत कायदेशीर कोणताच हक्क नसतो.

क) पहिल्या पत्नीच्या निधनानंतर दुसऱ्या पत्नीस पहिल्या पत्नीच्या तुलनेत पतीच्या संपत्तीत अर्धा हिस्सा मिळतो.

ड) पहिल्या पत्नीच्या निधनांनंतर दुसऱ्या पत्नीस संपत्तीत नाममात्र हिस्सा मिळतो.

१७. हिंदू महिला अपत्य नसताना मयत झाली तर तिला वडिलांकडून मिळालेल्या संपत्तीचे कायदेशीर वारस कोण?

अ) पतीचे भाऊ

ब) पतीचे आई, वडील

क) पतीचे नातेवाईक

ड) माहेरचे नातेवाईक

१८. विधवेने पुनर्विवाह केल्यास तिच्या पूर्व पतीकडून मिळालेली संपत्तीच्या बाबत खालीलपैकी

कोणते विधान योग्य आहे?

अ) मयत पतीची संपत्ती पतीच्या आईवडीलांकडे जाते.

ब) संपत्तीत संबंधित महिलेला हिस्सा मिळतो.

क) संपत्ती पतीच्या नातेवाईकांकडे जाते.

ड) महिलेचा त्या संपत्तीत कोणताही हक्क राहत नाही.

१९. हिंदू वारसा हक्क कायदा (१९५६) कोणास लागू होतो?

अ) जी व्यक्ती धर्माने हिंदू आहे केवळ त्यांनाच

ब) जी व्यक्ती धर्माने हिंदू, बौद्ध, जैन, शीख आहे अशा व्यक्तीस

क) भारतात राहणाऱ्या सर्व धर्माच्या व्यक्तीस

ड) जी व्यक्ती धर्माने हिंदू/ मुस्लीम आहे. त्यांनाच

२०. स्त्रीधन म्हणजे काय?

अ) प्राचीन तत्त्वज्ञानानुसार कन्येला स्त्रीधन म्हणून संबोधले जाते.

ब) महिलेला लग्नापूर्वी माहेरच्या व्यक्तीकडून दागिने, नकद अथवा वस्तुच्या रूपात मिळालेले धन

क) लग्नप्रसंगी दिला जाणारा हुंडा

ड) महिलेला सासरकडून मिळणारी रक्कम

२१. स्त्रीधनावर कायदेशीर अधिकार कोणाचा असतो?

अ) स्त्रीचा

ब) पतीचा

क) सासरकडील व्यक्तींचा

ड) माहेरकडील व्यक्तीचा

२२. नोकरी वा कामगार महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळास आळा घालण्यासाठी कोणता कायदा उपयुक्त ठरतो?

अ) स्त्रियांचे अश्लिल प्रदर्शन प्रतिबंध कायदा १९८६

ब) वेठबिगार प्रतिबंध कायदा १९७६

क) कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणूक प्रतिबंध कायदा २०१३

ड) किमान वेतन कायदा १९४८

२३. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणूक प्रतिबंध कायद्याचा फायदा खालीलपैकी कोणास होतो?

अ) केवळ सरकारी नोकरदार महिला

ब) उच्च पदस्थ नोकरदार महिला

क) खासगी, सरकारी क्षेत्र, घरकाम अशा कोणत्याही ठिकाणी काम करणारी महिला

ड) अविवाहित नोकरदार महिला

२४. कामाच्या ठिकाणी महिलेच्या लैंगिक छळास प्रतिबंध कायद्यानुसार लैंगिक छळ म्हणजे काय?

अ) शारीरिक जवळीक, लगट, विकृत अंगविक्षेप

ब) असभ्य व अश्लिल शेरेबाजी

क) अश्लिल वा असभ्य चित्रफित दाखवणे

ड) वरीलपैकी सर्व

२५. खालीलपैकी कोणत्या बाबीच्या आधारे कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणूक कायद्यांतर्गत तक्रार करता येईल?

अ) लैंगिक छळवणुकीच्या उद्देशाने महिलेला सवलतीची वागणूक देण्याचे गर्भित/सुस्पष्ट अभिवचन देणे.

ब) लैंगिक छळवणुकीच्या उद्देशाने महिलेला भेदभावकारी वागणूक देणे, तिच्या भावी नोकरीबद्दलच्या स्थितीबद्दलची गर्भित/सुस्पष्ट धमकी देणे.

क) लैंगिक छळवणुकीच्या उद्देशाने महिलेच्या कामात हस्तक्षेप करणे किंवा प्रतिकूल कामाचे वातावरण तयार करणे.

ड) वरीलपैकी सर्व

२६. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळास प्रतिबंध कायद्यांतर्गत तक्रार कोठे दाखल करता येते?

अ) जेथे पिडीत महिला कार्यरत आहे त्या ठिकाणच्या अंतर्गत तक्रार समितीकडे.

ब) जेथे पिडीत महिला कार्यरत आहे त्या ठिकाणच्या मालकाकडे

क) सर्वप्रथम जिल्हा न्यायालयामध्ये

ड) उच्च न्यायालयामध्ये

२७. कामगार महिलांना मातृत्वासाठी कोणता कायदा निर्माण केला आहे?

अ) हिंदू विवाह कायदा

ब) कामाच्या ठिकाणी लैंगिक छळास प्रतिबंध कायदा

क) मातृत्व लाभ कायदा

ड) विधी सेवा प्राधिकरण कायदा

२८. समान कामास समान वेतनाचे तत्त्व खालीलपैकी कशामध्ये समाविष्ट आहे?

अ) भारतीय राज्यघटना

ब) धर्मग्रंथ

क) कुटुंब न्यायालय कायदा

ड) यापैकी नाही

२९. तुम्हाला तुमच्या कामाचे योग्य वेतन तुम्ही स्त्री आहे म्हणून नाकारले गेल्यास तुम्ही खालीलपैकी कोणती भूमिका घ्याल?

अ) मिळालेल्या वेतनामध्ये समाधान मानेन.

ब) कायदेशीररित्या योग्य वेतन मागणी करून प्राप्त करून घेईल.

क) अशा ठिकाणचे काम/नोकरी सोडून देईन.

ड) पुन्हा अशी मागणी करणार नाही.

३०. राज्याच्या नवीन तरतुदीनुसार महिलांना किती दिवसाची प्रसुती रजा देण्यात आली आहे?

अ) १२ आठवडे

ब) २६ आठवडे

क) २४ आठवडे

ड) ३६ आठवडे

३१. कुटुंबामध्ये सातत्याने होणारा अपमान हा कौटुंबिक हिंसाचाराच्या कोणत्या प्रकारात मोडेल?

अ) शारीरिक पिळवणूक

ब) मानसिक पिळवणूक

क) आर्थिक पिळवणूक

ड) सामाजिक पिळवणूक

३२. अपवादात्मक परिस्थितीत गर्भपात करता येण्याची मुभा कोणत्या कायद्याने दिली आहे?

अ) हिंदू दत्तक व पोटगी कायदा

ब) पालकत्वाचा कायदा

क) गर्भजल निदान कायदा

ड) वैद्यकीय गर्भपात कायदा

३३. गर्भवती महिलेच्या इच्छेविरूद्ध गर्भलिंग निदान केल्यास...

अ) महिलेस गर्भलिंग निदान करावयास प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल होतो.

ब) गर्भवती महिलेसह कुटुंबातील व्यक्तीवर गुन्हा दाखल होतो.

क) केवळ गर्भवती महिलेवरच गुन्हा दाखल होतो.

ड) गुन्हा दाखल होणार नाही.

३४. स्त्री भ्रूणहत्या रोखण्याच्या उद्देशाने कोणत्या कायद्याची निर्मिती करण्यात आली आहे?

अ) गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा

ब) कौटुंबिक हिंसाचार कायदा

क) वैद्यकीय गर्भपातन कायदा

ड) कुटुंब न्यायालय कायदा

३५. भारतात गर्भलिंग निदान चाचणी करण्यास कायद्याने बंदी घातलेली आहे कारण...

अ) मुलाच्या अपेक्षेमुळे स्त्री भ्रूणहत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत.

अ) वैद्यकीय अधिकारी या चाचणीसाठी मोठ्या रकमेची मागणी करतात.

क) या चाचणीतून येणारे निष्कर्ष अथवा निदान योग्य येत नाहीत.

ड) ही चाचणी महिलेच्या आरोग्यास अपायकारक आहे.

३६. मनोधैर्य योजनेचा उद्देश कोणता?

अ) मुलीच्या जन्माचे स्वागत करणे.

ब) आर्थिकदृष्ट्या पिडीत महिलांचा आर्थिक स्तर उंचावणे.

क) बलात्कार, लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिलांना आधार देणे.

ड) कौटुंबिक हिंसाचारास बळी पडलेल्या महिलांना आधार देणे.

३७. बलात्कार अथवा लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांची नोंद होण्याचे प्रमाण कमी आहे, याचे कारण कोणते?

अ) गुन्हे सिद्ध होण्याचे अत्यल्प प्रमाण, समाजाकडून होणारी मानहानी.

ब) गुन्हा नोंदविण्यासाठी अधिक खर्च येतो.

क) अशा गुन्ह्यांवर कायदेशीर उपाय नाहीत.

ड) पोलिस गुन्हा नोंद करत नाही.

३८. लैंगिक अत्याचाराविरूद्ध पोलिसात गुन्ह्याची नोंद होणे गरजेचे आहे. कारण...

अ) महिलांना हिंसामुक्त जीवन जगण्याच्या अधिकारासाठी.

ब) समाजातील अशा घातक प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी.

क) महिलांच्या सक्षमीकरणासाठी.

ड) वरीलपैकी सर्व

३९. छेडछाडीच्या प्रसंगात तुम्ही कोणती भूमिका घ्याल?

अ) अशा बाबींकडे दुर्लक्ष करणे.

ब) अशा ठिकाणापासून दूर निघून जाणे.

क) पालकांच्या मदतीने अथवा स्वत: पोलिसात तक्रार देणे.

ड) पुन्हा त्याठिकाणी जाणे टाळणे.

४०. स्त्री भ्रूण हत्येस खालीलपैकी कोणता घटक सर्वाधिक जबाबदार आहे असे तुम्हास वाटते?

अ) समाज

ब) पालक

क) पोलिस

ड) वैद्यकीय अधिकारी/डॉक्टर

४१. महिला व मुलींचे देहव्यापार आणि लैंगिक शोषण थांबविण्यासाठी केंद्र सरकार कोणती योजना राबवते?

अ) स्टेप योजना

ब) उज्वला योजना

क) मनोधैर्य योजना

ड) सन्मान योजना

४२. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना किती टक्के आरक्षण आहे?

अ) ४०%

ब) ५०%

क) ३३%

ड) २५%

४३. भारतात मुलभूत हक्कांचे संरक्षण म्हणून कोणास ओळखले जाते?

अ) संसद

ब) केंद्र सरकार

क) राष्ट्रपती

ड) न्यायालय

४४. कोणत्या मुलभूत हक्कास मुलभूत हक्कांचा आत्मा म्हणून ओळखले जाते?

अ) शोषणाविरोधी हक्क

ब) स्वातंत्र्याचा हक्क

क) संपत्तीचा हक्क

ड) समानतेचा हक्क

४५. खालीलपैकी कोणत्या हक्काचा समावेश राज्यघटनेतील मुलभूत हक्कांमध्ये होत नाही?

अ) समानतेचा हक्क

ब) स्वातंत्र्याचा हक्क

क) संपत्तीचा हक्क

ड) न्यायालयात दाद मागण्याचा हक्क

४६. महिलांसाठी सामाजिक राजकीय क्षेत्रामध्ये राखीव जागा गरजेच्या आहेत, कारण...

अ) महिलांच्या उन्नतीशिवाय समाजाची व राष्ट्राची उन्नती होणार नाही.

ब) परंपरांमुळे महिलांना शोषित रहावे लागले आहे.

क) समाजामध्ये स्त्री पुरूष असमानता मोठ्या प्रमाणात आढळून येते.

ड) वरील सर्व

४७. समाजामध्ये तुमचे मुलभूत हक्क डावलले गेल्यास राज्यघटनेच्या कोणत्या तत्त्वाचा आधार घ्याल?

अ) समानतेचा हक्क

ब) मार्गदर्शक तत्त्वे

क) राज्यघटनेचा सरनामा

ड) न्यायालयात दाद मागण्याचा हक्क

४८. सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेचा फायदा कोणास होतो?

अ) अपंग विद्यार्थिनींना

ब) आर्थिक बेरोजगार कुटुंबातील महिलांना

क) अनाथ मुलींना

ड) एक किंवा दोन मुलीनंतर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या व्यक्तीला

४९. भारतामध्ये मुलभूत हक्क साधारणत: केव्हा नाकारले जातात?

अ) निवडणुकीच्या कालखंडात

ब) आणीबाणीच्या काळात

क) सत्ताबदल होत असताना

ड) युद्धप्रसंगी

५०. खालीलपैकी महिला आयोगाचा प्रमुख उद्देश कोणता?

अ) महिलांची जनगणना करणे.

ब) महिलांना पोषण आहार पुरविणे.

क) महिलांच्या हक्कांचे रक्षण करणे.

ड) महिलांना शिक्षण देणे.

परिशिष्ट घ

## महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम

| अ.क्र. | महिला मानवी हक्कातील घटक | उपघटक | कार्यक्रमाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | वैवाहिक हक्क | वैवाहिक हक्काबाबत कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | हुंडाप्रथा व तिचे घातक परिणाम | व्याख्यान | २ तास |
| | | हुंडाप्रथा, प्रतिबंधात्मक उपाय | व्याख्यान | २ तास |
| | | हुंडाप्रथा व महिलांचे हक्क | बुद्धिमंथन | २ तास ३० मि. |
| | | कुटुंबातील हक्क | बुद्धिमंथन | २ तास |
| २ | वारसा हक्क | पित्याच्या संपत्तीतील हक्क | वादविवाद | २ तास |
| | | स्त्रीधन व भारतीय विवाह व्यवस्था | वादविवाद | २ तास |
| | | पतीची संपत्ती आणि महिला हक्क | निबंध लेखन | २ तास |
| | | वारसा हक्क विषयक कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | पित्याच्या संपत्तीतील हक्कांबाबत योजना | प्रश्नमंजुषा | २ तास |
| ३ | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | महिला आरक्षण आणि नोकरीच्या संधी | निबंध लेखन | २ तास |
| | | नोकरी व्यवसायातील महिलांचे स्थान | वादविवाद | २ तास ३० मि. |
| | | समान काम समान वेतन | व्याख्यान | २ तास |
| | | नोकरी करणाऱ्या महिलांसाठी कायद्याचे संरक्षण | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | प्रश्नमंजुषा | २ तास |
| ४ | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | कुटुंब आणि परिसरामध्ये होणारी महिलांबाबत हिंसा | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | २ तास |
| | | छेडछाड | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | २ तास |
| | | छेडछाड, उपाययोजनात्मक | प्रसंग विश्लेषण | २ तास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | बाबी | | |
| | | स्त्री भ्रूणहत्या | प्रसंग विश्लेषण | २ तास ३० मि. |
| | | हिंसाचारापासून संरक्षणासाठी कायदे | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| ५ | संविधानिक हक्क | संविधान आणि महिला सक्षमीकरण | व्याख्यान | २ तास |
| | | राज्यघटनेतील मुलभूत हक्क | गटचर्चा | २ तास ३० मि. |
| | | राज्यघटनेतील मुलभूत हक्कांचे रक्षण | गटचर्चा | २ तास |
| | | संविधानातील महिलांसाठीच्या तरतुदी | अध्ययन साहित्याचे अवलोकन | २ तास |
| | | संविधानिक हक्कासाठी योजना | बुद्धीमंथन | २ तास |

## १. महिला मानवी हक्क शिक्षण माहिती पुस्तिका

**उद्दिष्टे**

१. विद्यार्थिनींना वैवाहिक हक्कासाठी आवश्यक असणाऱ्या कायद्यांविषयी माहिती देणे.

२. विद्यार्थिनींना वारसा हक्क कायद्याविषयी माहिती देणे.

३. विद्यार्थिनींना नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी अस्तित्त्वात असलेले विविध कायदे आणि तरतुदी याविषयी माहिती देणे.

४. विद्यार्थिनींना महिलांवर होणाऱ्या हिंसाचारापासून संरक्षण देणाऱ्या विविध कायद्यांची माहिती देणे.

५. विद्यार्थिनींना महिलांसाठी संविधानामध्ये असलेल्या विविध हक्कांची माहिती देणे.

६. विद्यार्थिनींना महिला सक्षमीकरणासाठीच्या विविध योजनांची माहिती देणे.

**साहित्य**

महिला मानवी हक्क शिक्षण माहिती पुस्तिका

**कार्यक्रमातून साध्य होणारे घटक** **वेळ**

१. वैवाहिक हक्क २ तास

२. वारसा हक्क — २ तास

३. नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क — २ तास

४. हिंसेपासून संरक्षणाचा हक्क — २ तास

५. संविधानिक हक्क — २ तास

**कार्यक्रमाचे स्वरूप/कृती**

संशोधक विद्यार्थिनींना महिला मानवी हक्क शिक्षण पुस्तिकेचे वाचन करण्यास सांगतात. त्यातील महत्त्वाच्या बाबींची नोंद एका कागदावर घेण्यास सांगतात. विद्यार्थिनींसमोर घटकाचे सादरीकरण करतात. विद्यार्थिनींनी घेतलेल्या नोंदीच्या आधारावर चर्चा घडवून आणतात. विद्यार्थिनींना न समजलेल्या भागाचे स्पष्टीकरण देतात. (महिला मानवी हक्क शिक्षण माहिती पुस्तिका : परिशिष्ट छ)

## २. व्याख्यान

**उद्दिष्टे**

१. विद्यार्थिनींमध्ये हुंडा पद्धती आणि तिच्या दुष्परिणामांविषयी जागृती घडवून आणणे.
२. विद्यार्थिनींमध्ये हुंडा पद्धतीस प्रतिबंध घालण्यासाठीच्या उपाययोजनात्मक बाबींची माहिती देणे.
३. विद्यार्थिनींना महिलांच्या वेतन समानतेबद्दल कायदेविषयक माहिती देणे.
४. विद्यार्थिनींना महिला सक्षमीकरणाच्या विविध योजनांची माहिती देणे.

**साहित्य** : फलक, कृतिपत्रिका

| **कार्यक्रमातून साध्य होणारे घटक** | **वेळ** |
|---|---|
| १. वैवाहिक हक्क | |
| अ) हुंडाप्रथा व तिचे घातक परिणाम | २ तास |
| ब) हुंडाप्रथा प्रतिबंधकात्मक उपाय | २ तास |
| २. नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क | |
| अ) समान काम समान वेतन | २ तास |
| ३. संविधानिक हक्क | |
| अ) संविधान आणि महिला सक्षमीकरण | २ तास |

**कार्यक्रमाचे स्वरूप**

संशोधक / तज्ञ व्यक्ती विद्यार्थिनींना मानवी हक्कातील पुढील घटकांवर व्याख्याने देतात.

१. हुंडा पद्धती, स्वरूप दुष्परिणाम, उपाययोजनात्मक बाबी.

२. स्त्री पुरूष समान कामास समान मोबदला.

३. महिला सक्षमीकरणासाठी राज्य सरकारच्या योजना.

वरील विषयांवर संशोधक / तज्ञ व्यक्ती विद्यार्थिनींना व्याख्यान देतात.

## ३. गटचर्चा

**उद्दिष्टे**

१. विद्यार्थिनींमध्ये महिलांचे मुलभूत हक्क यावर चर्चा घडवून आणणे.

२. मुलभूत हक्कांच्या रक्षणासाठी असलेल्या उपायांवर विद्यार्थिनींमध्ये चर्चा घडवून आणणे.

**साहित्य** : फलक

| **कार्यक्रमातून साध्य होणारे घटक** | **वेळ** |
|---|---|
| १. संविधानिक हक्क | |
| अ) राज्यघटनेतील मुलभूत हक्क | २ तास ३० मिनीटे |
| ब) मुलभूत हक्कांचे रक्षण | २ तास |

**कार्यक्रमाचे स्वरूप / कृती**

संशोधक १० ते १२ विद्यार्थिनींचे गट तयार करतात. प्रत्येक गटासाठी विषय निश्चित करून देतात. खालील विषयांवर चर्चा घडवून आणतात.

१. समानतेचा हक्क आणि महिला.

२. स्वातंत्र्याचा हक्क आणि भारतीय महिला.

३. न्यायालयात दाद मागण्याचा हक्क आणि महिला.

वरील विषयांवर वर्गात विद्यार्थिनींमध्ये चर्चा घडवून आणली जाते. चर्चा चालू असताना महत्त्वाचे घटक संशोधक फलकावर लिहितात. चर्चेत न आलेले मुद्दे शेवटी स्पष्ट करतात.

## ४. बुद्धीमंथन

**उद्दिष्टे**

१. विद्यार्थिनींना त्यांच्या वैवाहिक हक्काविषयी माहिती बुद्धीमंथन तंत्राच्या साहाय्याने देणे.

२. विद्यार्थिनींना महिलांचे कुटुंबातील स्थान याविषयी बुद्धीमंथन तंत्राच्या आधारे माहिती देणे.

३. महिलांसाठी असणाऱ्या विविध योजनांची माहिती बुद्धीमंथन तंत्राच्या आधारे विद्यार्थिनींना देणे.

**साहित्य** : फलक

| **कार्यक्रमातून साध्य होणारे घटक** | **वेळ** |
|---|---|
| १. वैवाहिक हक्क | |
| अ) हुंडा प्रथा आणि महिलांचे हक्क | २ तास ३० मिनीटे |
| ब) कुटुंबातील हक्क | २ तास |
| २. संविधानिक हक्क | |
| अ) संविधानिक हक्कासाठी योजना | २ तास |

**कार्यक्रमाचे स्वरूप**

ऑसबोर्न यांच्या मते माणसाच्या मनात अनेक नवीन कल्पना असतात. परंतु तो व्यक्त करत नाही. त्याचे प्रमुख कारण म्हणजे संकोच वा भिती. सामाजिक बाबींमुळे तो या कल्पनाच दडपून टाकतो. कोणीही एखादी नवीन विलक्षण कल्पना मांडली की, ती हास्यास्पद ठरविली जाते. नव्या कल्पनांचे स्वागत सहसा केले जात नाही. यामुळे अनेक चांगले मौलिक विचार, सूचना, सुंदर कल्पना विरून जातात. अशा या नाविन्यपूर्ण विचारांना प्रस्फुटीत करणे, मुक्तपणे वाव देणे हे बुद्धीमंथन तंत्राचे उद्दिष्ट आहे.

उदा. कुटुंबातील एक सदस्य म्हणून महिलांना कुटुंबात सामोरे जावे लागणाऱ्या समस्या विद्यार्थिनींना संशोधक विचारतात व आलेला प्रतिसाद फलकावर लिहितात. या सर्व समस्यांपैकी 'स्त्रीला कुटुंबामध्ये दुय्यम वागणूक दिली जाते.' ही समस्या निश्चित करून संशोधक ती फलकाच्या डाव्या बाजूस एका चौकटीत लिहितात. ही समस्या का निर्माण झाली आहे याची कारणे विद्यार्थिनींना विचारतात. आलेला प्रतिसाद तिरक्या रेषा देऊन फलकावर

लिहितात. आलेल्या प्रत्येक कारणावर कोणकोणत्या उपाययोजना करता येतील यावर चर्चा करून मुद्यांची नोंद फलकावर करतात.

यातून फलकावर तयार होणारी आकृती पुढीलप्रमाणे–




वरील समस्यांवर पुढील उपाययोजना सुचविल्या जातात.

| अ.क्र. | समस्या | उपाययोजना |
|---|---|---|
| १ | महिलांचे शिक्षण कमी असल्यामुळे दुय्यम स्थान दिले जाते. | महिलांनी उच्च शिक्षण घेणे गरजेचे आहे. |
| २ | कुटुंबातील पुरूष अर्थार्जन करतात. त्यामुळे ते अधिकार गाजवतात. | स्त्रियांनी नोकरी, व्यवसाय, स्वयंरोजगाराद्वारे स्वयंपूर्ण व्हावे. |
| ३ | महिलांना गृहकार्ये करावी लागतात. | गृहकामे ही केवळ महिलेचीच जबाबदारी नूसन ती स्त्री व पुरूष दोहोंचीही जबाबदारी आहे ही भावना प्रबळ करणे. |
| ४ | चूल व मूल या व्यतिरिक्त महिला विचार करत नाहीत. | महिलांनी जुने विचार सोडून नवीन विचारांची कास धरावी. |
| ५ | कुटुंबातील पुरूषी अहंभावामुळे महिलांना दुय्यम स्थान दिले जाते. | स्त्री व पुरूष यांच्यातील समानतेचे मूल्य रूजविणे. |
| ६ | परंपरा व रूढींचा पगडा महिलांवर मोठ्या प्रमाणात आहे. | अनिष्ट रूढी, परंपरा ज्या महिलांच्या नैसर्गिक हक्कांच्या आड येतात त्यांचा त्याग करणे गरजेचे आहे. |

## ५. वादविवाद

**उद्दिष्टे**

१. विद्यार्थिनींमध्ये पित्याच्या वडिलोपार्जित मालमत्तेत मुलीचा असलेला समान हक्क याविषयी जाणीव निर्माण करणे.

२. विद्यार्थिनींना स्त्रीधन आणि भारतीय विवाह व्यवस्था याविषयी वादविवादाच्या माध्यमातून माहिती देणे.

३. नोकरी, उद्योग आणि व्यवसाय यातील महिलांच्या स्थानाविषयी विद्यार्थिनींना माहिती देणे.

**साहित्य** : फलक

| **कार्यक्रमातून साध्य होणारे घटक** | **वेळ** |
|---|---|
| १. वारसा हक्क | |
| अ) पित्याच्या संपत्तीतील हक्क | २ तास |
| ब) स्त्रीधन आणि भारतीय विवाह व्यवस्था | २ तास |
| २. नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क | |
| अ) नोकरी, व्यवसायातील महिलांचे स्थान | २ तास ३० मिनीटे |

**कार्यक्रमाचे स्वरूप**

संशोधक विद्यार्थिनींना वादविवाद उपक्रमाच्या नियमांविषयी माहिती देतात. विद्यार्थिनींना वादविवादासाठी विषय देतात. विषयाशी संबंधित होकारार्थी आणि नकारार्थी या दोन्ही बाजूंनी विचार मांडले जातात. वादविवादातून आलेल्या महत्त्वाच्या मुद्यांची नोंद संशोधक फलकावर करतात. संशोधक वादविवादातून विषयांतर होणार नाही याची दक्षता घेतात. वादविवादात न आलेले मुद्दे शेवटी स्पष्ट करतात.

## ६. प्रसंग विश्लेषण

**उद्दिष्टे**

१. विद्यार्थिनींना मुलींची होणारी छेडछाड या समस्येची आणि त्यावरील उपायांची माहिती देणे.

२. विद्यार्थिनींना स्त्री भ्रूणहत्या या समस्येची आणि त्यावरील उपायांची माहिती देणे.

**कार्यक्रमातून साध्य होणारे घटक** **वेळ**

१. हिंसेपासून संरक्षणाचा हक्क

अ) छेडछाड २ तास

ब) स्त्री भ्रूणहत्या २ तास ३० मिनीटे

**कार्यक्रमाचे स्वरूप / कृती**

संशोधक विद्यार्थिनीसमोर छेडछाड आणि स्त्री भ्रूणहत्या या संदर्भातील काल्पनिक प्रसंगाचे वर्णन करतात. प्रसंगातील समस्या घडत असताना विद्यार्थिनी त्याबाबत कोणती भूमिका घेतील याबाबत त्यांची मते जाणून घेतात. मिळालेला प्रतिसाद ते फलकावर लिहितात. त्यावर चर्चा करतात.

उदा. प्रसंग १ : 'सारिका ही महाविद्यालयात उच्च शिक्षण घेत असलेली मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगी आहे. तिच्या भावास दोन मुली आहेत आणि आता तिच्या गर्भवती वहिनीला घरातील व्यक्तींकडून गर्भलिंग निदा करण्यास भाग पाडले जाते. जबरदस्तीने गर्भलिंग निदान केल्यावर मुलीचा गर्भ असल्याने मुलाच्या अपेक्षेने गर्भपातास प्रवृत्त केले जात आहे.'

संशोधक विद्यार्थिनींना सारिकाच्या भूमिकेत तुम्ही असाल तर तुम्ही कोणती भूमिका घ्याल असा प्रश्न विचारतात. आलेल्या प्रतिसादाची नोंद करतात आणि त्यावर चर्चा घडवून आणतात.

## ७. विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण

**उद्दिष्टे**

१. विद्यार्थिनींना समाजामध्ये आणि कुटुंबामध्ये होणाऱ्या अत्याचाराबाबत जागृत करणे.

२. विद्यार्थिनींना छेडछाड, शेरेबाजी, मानसिक इजा याविषयी जागृत करणे आणि उपाय सुचविणे.

**साहित्य** : फलक, नोंदीसाठी कागद.

**कार्यक्रमातून साध्य होणारे घटक** **वेळ**

१. हिंसेपासून संरक्षणाचा हक्क

अ) कुटुंब आणि परिसरामध्ये होणारी महिलांबाबत हिंसा २ तास

ब) छेडछाड २ तास

**कार्यक्रमाचे स्वरूप/कृती**

संशोधक विद्यार्थिनींना स्वतःबाबत आणि समाजामध्ये, सभोवताली महिलांच्या हिंसाचाराबद्दलचे त्यांना आलेले अनुभव आणि घटना सांगण्यास प्रोत्साहित करतात. विद्यार्थिनींकडून आलेला प्रतिसाद संशोधक फलकावर लिहितात. त्याची नोंद विद्यार्थिनी पेपरवर घेतात.

## ८. प्रश्नमंजुषा

**उद्दिष्टे**

१. विद्यार्थिनींना पती व पित्याच्या संपत्तीतील महिलांच्या हक्कांची माहिती देणे.

२. विद्यार्थिनींना महाविद्यालय, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक छळावरील उपायांची माहिती देणे.

**साहित्य** : प्रश्नांची सूची

| **कार्यक्रमातून साध्य होणारे घटक** | **वेळ** |
|---|---|
| १. वारसा हक्क | |
| अ) पित्याच्या संपत्तीतील हक्क | २ तास |
| २. नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | |
| अ) कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | २ तास |

**कार्यक्रमाचे स्वरूप/कृती**

संशोधक महिला मानवी हक्काविषयी विविध घटकावर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्नांची यादी तयार करतात. प्रश्नांची यादी तयार झाल्यानंतर प्रश्न विचारतात. विद्यार्थिनीला एका प्रश्नाचे उत्तर बरोबर आल्यानंतर दुसरा प्रश्न आणि दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर बरोबर आल्यानंतर तिसरा प्रश्न असे प्रश्न विचारले जातात. सलग तीनही प्रश्नांची बरोबर उत्तरे देणाऱ्या विद्यार्थिनीला प्रोत्साहनपर बक्षिस दिले जाते. विद्यार्थिनींना सांगता न आलेल्या प्रश्नांची उत्तरे शेवटी संशोधक देतात.

## ९. निबंध स्पर्धा

**उद्दिष्टे**

१. विद्यार्थिनींना महिलांच्या संपत्ती आणि वारसा हक्क यांची माहिती देणे.

२. विद्यार्थिनींना नोकरीतील संधी, आरक्षण याविषयी माहिती देणे.

**साहित्य** : पेपर

| **कार्यक्रमातून साध्य होणारे घटक** | **वेळ** |
|---|---|
| १. वारसा हक्क | |
| अ) पतीची संपत्ती आणि महिला हक्क | २ तास |
| २. नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | |
| अ) महिला आरक्षण आणि नोकरीच्या संधी | २ तास |

**कार्यक्रमाचे स्वरूप/कृती**

संशोधक विद्यार्थिनींना निबंधाचे विषय सांगतात. त्यावर माहिती मिळविण्यासाठी आणि अभ्यासासाठी विद्यार्थिनींना दोन दिवस वेळ दिल्यानंतर प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या दिवशी विद्यार्थिनींना निबंध लेखनासाठी एक तास वेळ देतात. संबंधित विषयावरील निबंधाचे मुल्यमापन त्या विषयातील तज्ञ व्यक्तींकडून करून घेतात. प्रथम तीन क्रमांक येणाऱ्या विद्यार्थिनीस प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात येतात.

परिशिष्ट च

# महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक

| अ. क्र. | दिनांक | कार्यक्रम | महिला मानवी हक्कातील घटक | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | २८/११/२०१७ | महिला मानवी हक्क शिक्षण माहिती पुस्तिकेचे अवलोकन | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | २ तास |
| २ | २९/११/२०१७ | वादविवाद स्पर्धा | वारसा हक्क | २ तास |
| ३ | ३०/११/२०१७ | वादविवाद स्पर्धा | वारसा हक्क | २ तास |
| ४ | २/१२/२०१७ | निबंध लेखन | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | २ तास |
| ५ | ४/१२/२०१७ | वादविवाद स्पर्धा | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | २ तास ३० मि. |
| ६ | ५/१२/२०१७ | बुद्धीमंथन | वैवाहिक हक्क | २ तास ३० मि. |
| ७ | ६/१२/२०१७ | बुद्धीमंथन | वैवाहिक हक्क | २ तास |
| ८ | ७/१२/२०१७ | अध्ययन साहित्याचे अवलोकन | संविधानिक हक्क | २ तास |
| ९ | ८/१२/२०१७ | व्याख्यान | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हक्क | २ तास |
| १० | ९/१२/२०१७ | प्रसंग विश्लेषण | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | २ तास ३० मि. |
| ११ | ११/१२/२०१७ | प्रसंग विश्लेषण | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | २ तास |
| १२ | १२/१२/२०१७ | गटचर्चा | संविधानिक हक्क | २ तास ३० मि. |
| १३ | १३/१२/२०१७ | गटचर्चा | संविधानिक हक्क | २ तास |
| १४ | १४/१२/२०१७ | अध्ययन साहित्याचे अवलोकन | वैवाहिक हक्क | २ तास |
| १५ | १५/१२/२०१७ | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | २ तास |
| १६ | १६/१२/२०१७ | प्रश्नमंजुषा | नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे | २ तास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | हक्क | |
| १७ | १८/१२/२०१७ | अध्ययन साहित्याचे अवलोकन | वारसा हक्क | २ तास |
| १८ | १९/१२/२०१७ | बुद्धीमंथन | संविधानिक हक्क | २ तास |
| १९ | २०/१२/२०१७ | व्याख्यान | वैवाहिक हक्क | २ तास |
| २० | २१/१२/२०१७ | निबंध स्पर्धा | वारसा हक्क | २ तास |
| २१ | २२/१२/२०१७ | व्याख्यान | वैवाहिक हक्क | २ तास |
| २२ | २३/१२/२०१७ | व्याख्यान | संविधानिक हक्क | २ तास |
| २३ | २६/१२/२०१७ | अध्ययन साहित्याचे अवलोकन | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | २ तास |
| २४ | २७/१२/२०१७ | विद्यार्थिनींच्या अनुभवांचे सादरीकरण | हिंसेपासून संरक्षणाचा हक्क | २ तास |
| २५ | २८/१२/२०१७ | प्रश्नमंजुषा | वारसा हक्क | २ तास |

परिशिष्ट छ

## महिला मानवी हक्क शिक्षण माहिती पुस्तिका



**भारतामध्ये महिला हक्कांच्या रक्षणासाठी अस्तित्वात असलेल्या संस्था**

महिलांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे या साठी भारतामध्ये आधुनिक कालखंडात अनेक प्रयत्न झाले . भारतामध्ये विविध आयोग, समित्या यांच्या मार्फत महिलांच्या हक्कांचे रक्षण केले जाते. या आयोगांची माहिती पुढीलप्रमाणे.

**मानवी हक्क आयोग :-** आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी होत असलेल्या प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३ नुसार भारतात मानवी हक्क आयोगाची स्थापना झाली.

**रचना :-**

अध्यक्ष :- सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशपदी राहिलेली व्यक्ती

सदस्य :-

१. एक सदस्य - सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधिश किंवा तसे पद पूर्वी धारण केलेली व्यक्ती.
२. एक सदस्य - उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधिश किंवा तसे पद पूर्वी धारण केलेली व्यक्ती.
३. दोन सदस्य - हे मानवी हक्कांचे किंवा त्यामधिल प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्ती.
४. एक सदस्य - अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष
५. एक महासचिव

**आयोगाची कार्ये :-** राष्ट्रीय मानवी हक्क आयोग पुढीलप्रमाणे कार्य करते.

१. पिडीत व्यक्तीने अर्ज केल्यास , मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबत चौकशी करणे. लोकसेवकाने दुर्लक्ष केल्याच्या तक्रारीची चौकशी करणे.
२. मानवी हक्कांशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात प्रलंबित असेल तर संबंधित न्यायालयाच्या पूर्वसंमतीने त्यात मध्यस्ती करणे.
३. स्थानबद्ध केलेल्या ठिकाणी , सुधारगृहाच्या ठिकाणी तसेच संरक्षणाच्या ठिकाणी राज्यशासनाला पूर्व सूचना देवून भेट घेणे.
४. मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी भारतीय संविधानाचा आणि कायद्याचा आढावा घेणे. ते अधिक परिणामकारक करण्यासाठी उपाययोजना करणे.
५. दहशतवादासारख्या घटकांचा अभ्यास करणे व त्यावर उपाययोजना सुचविणे.
६. मानवी हक्कांच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय दस्तऐवजाचा अभ्यास करणे . आणि त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे.
७. मानवी हक्कांच्या क्षेत्रातील संशोधनाला प्राधान्य देणे.

८. मानवी हक्कांसंबंधी जनजागृती करणे.
९. मानवी हक्काच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था, संघटना व व्यक्तीना प्रोत्साहन देणे.
१०. मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक कार्य करणे.

**राज्य मानवी हक्क आयोग:-**

महाराष्ट्रामध्ये राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या धरतीवर ६ मार्च २००१ रोजी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली.

**रचना :-**

अध्यक्ष :- कालापधी ५ वर्षे

सदस्य :-

१. एक सदस्य -मुख्य न्यायालयाचे मुख्य न्यायाधिशपद भूषविलेली व्यक्ती,
२. एक सदस्य - उच्च न्यायालयाचे न्यायाधिशपद भूषविलेली व्यक्ती,
३. एक सदस्य - जिल्हा न्यायाधिशपद भूषविलेली व्यक्ती
४. दोन सदस्य - मानवी हक्कांशी संबंधित काम केलेल्या व्यक्तीतून निवड

**नेमणूका :-** आयोगातील अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती ही राज्यपालांकडून होते. त्यासाठी राज्यपालांना सल्ला देण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात येते.

**कार्यकाल :-** आयोगाचे अध्यक्ष हे ५ वर्ष किंवा वयाची ७० वर्ष पूर्ण होईपर्यंत पदावर राहतात.

**अधिकार आणि कार्ये :-** राज्य मानवी हक्क आयोग आपल्या राज्यांमध्ये होणाऱ्या मानवी हक्क भंगाच्या घटना आणि राज्य शासनाच्या अखत्यारीतील विषयांवर चौकशी करु शकते. जर देशातील अन्य कोणताही आयोग एखाद्या प्रकरणात चौकशी करत असेल तर राज्य आयोग त्या प्रकरणात चौकशी करु शकत नाही. बाकी सर्व बाबतीत राज्य आणि राष्ट्रीय आयोगाचे अधिकार सारखेच आहे.

**राष्ट्रीय महिला आयोग :-**

राष्ट्रीय महिला आयोग कायदा १९९० अन्वये जानेवारी १९९२ मध्ये या आयोगाची स्थापना करण्यात आली. महिलांसाठी पुरविण्यात आलेल्या घटनात्मक व कायदेशीर तरतुदींचे पुनरावलोकन करण्यासाठी हा आयोग स्थापन करण्यात आला. महिलांच्या हक्कांवर परिणाम करणाऱ्या बाबींविषयी शासनास सल्ला पुरविणे , महिलांच्या तक्रारीचे निवारण करणे, आणि उपाययोजनात्मक कायदेशीर साधनांची शिफारशी करण्याचे महत्वाचे कार्य हा आयोग करतो.

२

**रचना :-** एक अध्यक्ष आणि पाच सदस्य असे या आयोगाचे स्वरुप आहे. याशिवाय एक सचिव नेमला जातो. आयोगाच्या अध्यक्षांची व सदस्यांची नियुक्ती केंद्र शासनाकडून होते.

आयोगाच्या स्थापनेनंतर महिलांच्या प्रश्नांबाबत आयोगाने महत्वपूर्ण काम केलेले आहे. २०१४ - १५ मध्ये आयोगाने पंजाब , प. बंगाल , राजस्थान , तामिळणाडू , त्रिपूरा मधील मुली , महिलांचे विश्लेषन करण्यासाठी भारतीय प्रशासनीक स्टाफ कॉलेज हैद्राबाद बरोबर करार केला.

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग :-**

महिलांसंदर्भातील विविध धोरणे व कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी व्हावी त्याच बरोबर महिलांचा सामाजिक दर्जा उंचावून त्यांच्या सर्वांगिण विकासास चालना मिळावी या हेतूने महाराष्ट्र शासनाने केंद्रीय महिला आयोगाच्या धरतीवर २५ एप्रिल १९९३ रोजी राज्य महिला आयोगाची स्थापना केली . १९९४ मध्ये महिला धोरण राबविण्याचा पहिला मान महाराष्ट्र राज्याला मिळाला आहे. (बेडसे मसा मार्च २०११)आयोगाचे एक अध्यक्ष, सहा अशासकीय सदस्य, पदसिद्ध सदस्य म्हणून पोलिस महासंचालक अशी आयोगाची रचना आहे. स्त्रियांचा सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेस धक्का पोहोचेल अशा प्रथांबाबत अन्वेशन करुन योग्य त्या सुधारणात्मक उपाययोजना करणे, शासनास महिलांच्या विकासासाठी, सक्षमीकरणासाठी सल्ला देणे. हे आयोगाचे महत्वाचे कार्य आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने हुंडाबळी, बलात्कार, कौटुंबिक न्यायालयात पडून राहिलेल्या खटल्यांचा आढावा यासारख्या महत्वाच्या विषयावर कार्य केले आहे. महिला कायद्यामध्ये तरतुदी सुचविण्यासाठी कायदेतज्ञांची एक समिती स्थापन करण्यात आली. महाराष्ट्र महिला संरक्षण कायदयाचा मसुदा आयोगाने तयार केला आहे. केंद्रीय न्यायसंस्थेच्या सहाय्याने महाराष्ट्रात लोकअदालती स्थापन केल्या.

## महिलांचे वैवाहिक हक्क आणि कायदे

**विवाह विषयक कायदे :-**

भारतीय कुटुंबसंस्थेचा महत्वाच आधार विवाह हा आहे. भारतातील सामाजिक जीवनाची दिशा ही कुटुंबातून मिळते. विवाह हा पूर्वीपासूनच एक महत्वाचा संस्कार व विधी मानला जातो . भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य असल्याने अनेक धर्माचे नागरिक याठिकाणी राहतात. प्रत्येक धर्माच्या विवाहाचे संस्कार वेगवेगळे आहेत . त्या दृष्टीने विवाह विषयक कायदे करताना धर्मातील विविधतेचा विचार करुन कायदे केले आहेत.

३

त्यामुळेच हिंदू विवाह कायदा, पारशी विवाह कायदा, मुस्लीम विवाह कायदा या सारखे विवाह कायदे या ठिकाणी दिसून येतात.

**हिंदू विवाह कायदा :-**

एकपत्नीत्व व एकपतित्व हा हिंदू विवाह पद्धतीचा पाया आहे. या कायद्यामध्ये वापरला गेलेला हिंदू हा शब्द धर्म म्हणून वापरला गेला नाही. हा कायदा हिंदू , बौद्ध, जैन , शीख या धर्मातील लोकांसाठी आहे. या कायद्यान्वये मुलाचे व मुलीचे लग्नाचे वय निश्चित करण्यात आले आहे. यानुसार विवाह समयी मुलाचे वय २१ तर मुलीचे वय १८ वर्षे पेक्षा कमी नसावे. कायद्यानुसार काही जवळच्या नातलगांचा विवाह या कायदयानुसार होउ शकत नाही. उदा बहिण भाऊ, काका पुतनी, इ. हिंदू विवाह कायदयानुसार हिंदूच्या विवाहासाठी सप्तपदी आणि लाजाहोम या विधी विवाह संपन्न होण्यासाठी महत्वाच्या मानल्या जातात. विवाहाची नोंदणी कायद्यानुसार बंधनकारक आहे. या कायद्यातील अनेक तरतुदीने विवाहामध्ये येणाऱ्या व विवाहानंतर येणाऱ्या समस्यांबाबत दिशानिर्देश दिलेले आहे. कलम ९ नुसार कोणत्याही कारणाशिवाय सहवासातून दूर जाणाऱ्या जोडीदारा विरुद्ध दांपत्याधिकाराचे पुनर्स्थापनाचा अधिकार देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे या कायद्याच्या कलम १०नुसार योग्य कारणांसाठी पती आणि पत्नी न्यायिक फारकत घेऊ शकतात. विवाहाच्या नियमांचे खंडन केल्यास कलम ११ अन्वये विवाह रद्दबादल ठरविण्याचा अर्थात विवाहाचे शून्यकरण करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या कायद्यातील कलम १३ नुसार घटस्फोट आणि त्याच्या कारणांचा समावेश करण्यात आला आहे.

**विशेष विवाह कायदा (१९५४)**

दोन विभिन्न धर्मातील व्यक्तींना रुढी मध्ये न अडकता विवाह करायचा असेल तर विशेष विवाह कायद्याचा आधार घ्यावा लागतो . रुढ पद्धतीशिवाय कायदेशीर रित्या हा विवाह करता येतो. हिंदू मुस्लीम खिश्चन या कोणत्याही धर्मातील व्यक्तींना या कायद्यांतर्गत विवाह करता येतो.यासाठी पूर्व नोंदनी करणे आणि विवाहाच्या वयाचे पालन करणे बंधनकारक आहे.

**कुटुंब न्यायालय कायदा (१९८४):-**

विवाह आणि कौटुंबिक वादाच्या बाबतीत समुपदेशन घडवून आणण्यासाठी व ती प्रकरणे लवकर संपविण्यासाठी कुटुंब न्यायालय कायदा १९८४ मध्ये पारित करण्यात आला. राज्य शासन उच्च न्यायालयांशी विचार विनिमय करुन क्षेत्राच्या बाबतीत मर्यादा वाढवू शकते.

**हुडाबंदी अधिनियम (१९६१) सुधारणा (१९८६):-**

हुडा या लग्नविधीशी संबंधित असलेल्या अनिष्ठ सामाजिक प्रथेस बंदी घालण्यासाठी १९६१ मध्ये हुंडाबंदी अधिनियम पारित करण्यात आला . या



कायद्यानुसार हुंडा देणे अथवा घेणे या दोन्हीही बाबी गुन्हा आहे. या कायद्यांतर्गत दाखल केला गेलेला गुन्हा हा अजामिनपात्र असतो. हुंडयाची जाहिरात देणे हा देखिल या कायद्यानुसार गुन्हा आहे. हुंडा प्रथेवर नियंत्रण प्रस्तापित करण्यासाठी या कायद्यांतर्गत हुंडाबंदी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येते. हुडाबंदी अधिकाऱ्यास या कायद्याचे पालन करण्यास सहाय्य करणे, अपराध करणाऱ्या व्यक्तीवर खटला भरण्यास आवश्यक असेल असा साक्षी पुरावा गोळा करणे, यासारखी कार्ये सोपविलेली आहेत. या कायदयानुसार हुंडा देणाऱ्या अथवा घेणाऱ्या व्यक्तीस कमीत कमी ५ वर्षे कारावास आणि कमीत कमी १५ हजार रु. दंड किंवा हुंडयाची रक्कम यापैकी जी जास्त असेल त्या रकमेचा दंड होऊ शकतो.

## महिलांच्या वारसा हक्क विषयी कायदे

**हिंदू उत्तराधिकार अधिनियम (१९५६) :-**

हंदू स्त्रीच्या संपत्तीविषयी आणि संपत्तीतील वारसा हक्काविषयी महत्वपूर्ण ठरणारा हा अधिनियम आहे. हिंदू संस्कृतीमध्ये स्त्रीधनाची संकल्पना पूर्वापार चालत आलेली आहे. कायद्याच्या दृष्टीने स्त्रीधन म्हणजे स्त्रीला तिच्या नातेवाईकांकडून बक्षीस रुपाने मिळालेली चल आणि अचल मिळकत होय. स्त्रीधनावर केवळ स्त्रीचाच हक्क असून स्त्रीधन विकण्याचे, बक्षीस देण्याचे, भाडेपट्टीने देण्याचे असे कोणत्याही पद्धतीने विनियोग करण्याचा अधिकार तिला आहे. (जोशी,टिपणीस २०१५) कौटुंबिक मालमत्तेत मात्र स्त्रीला टप्प्याटप्प्याने अधिकार प्राप्त होत गेले. १९५६ चा उत्तराधिकार येण्यापूर्वी स्त्रीला वडीलोपार्जित संपत्तीत कोणत्याही प्रकारचा हिस्सा अथवा अधिकार नव्हता. १९५६ मध्ये हिंदू उत्तराधिकार अधिनियम पारित झाल्यानंतर स्त्रीला पित्याच्या संपत्तीमध्ये अधिकार मिळाला . मात्र या कायद्याने स्त्रीला कोपार्सनरचा हक्क अथवा दर्जा दिला नाही. म्हणजेच मुलाच्या बरोबरीने तिला समान हिस्याचे दावेदार केले नाही. पित्याच्या मृत्युसमयी त्याची पत्नी आणि मुलगा असे तीन हिस्से केले जायचे यातील मयत पित्याच्या वाटयाला असलेल्या हिस्यामध्ये त्याची विधवा पत्नी मुलगा आणि मुलगी असा हिस्सा दिला जात असे. त्यामुळे समान हिस्याची ती दावेदार ठरत नसे. केंद्राच्या या कायद्याला अनुसरुन राज्य सरकारने १९९४ मध्ये मुलीला मुलाच्या बरोबरीने समान हिस्सा देणारा कायदा पारित केला. त्यामुळे मुलीला महाराष्ट्रामध्ये कोपार्सनरचा दर्जा मिळाला. मुलीच्या समान हिस्याच्या अनुषंगाने केंद्राने २००५ मध्ये १९५६ च्या कायद्यात सुधारणा घडवून आणली.या कायद्याने पूर्वविवाहित मुलीबरोबरच मुली अणि मुलांना पित्याच्या संपत्तीत समान हिस्सेदार केले.

## नोकरी करणाऱ्या महिलांसाठी कायदे

**कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक (प्रतिबंध मनाई व निराकरण)अधिनियम (२०१३)**

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाविरुद्ध त्यांना संरक्षण देण्यासाठी, छळास प्रतिबंध करण्यासाठी आणि लैंगिक छळाविरुद्धच्या किंवा त्यांच्याशी संबंधित तक्रारीचे निवारण करण्यासाठी २०१३ मध्ये या कायद्याची निर्मिती करण्यात आली. (प्रिंट http )या कायदयामध्ये कामाच्या ठिकाणच्या संपर्कातील कोणतीही बाधित महिला कामास असलेली किंवा नसलेली, एखाद्या घरात घरकामासाठी असलेली, कोणत्याही वयातील महिलांच्या हक्काचा विचार केला आहे . लैंगिक छळवणूकीमध्ये शारीरिक संपर्क किंवा लगट करणे, लैंगिक अनुग्रह करण्याची मागणी अथवा विनंती करणे, लैंगिकतापूर्ण शेरेबाजी करणे, संभोगचित्रण दाखविणे तसेच लैंगिक स्वरुपाची अन्य कोणतीही अवांछणीय शारीरिक, शाब्दिक किंवा अशाब्दिक वर्तणूक यांचा समावेश होतो. याशिवाय लैंगिक छळवणूकीच्या उद्देशाने स्त्रीच्या नोकरीमध्ये अभिमान्य वागणूक देण्याचे गर्भित किंवा सुस्पष्ट धमकी देणे. तिच्या सध्याच्या व भावी नोकरीच्या स्थितीबाबत गर्भित किंवा सुस्पष्ठ धमकी देणे. तिचे आरोग्य, सुरक्षा यांस बाधा पोहोचण्याचा संभव असणारी मानहाणीकारक वागणूक देणे. या बाबीसुद्धा या कायद्यांतर्गत गुन्हा ठरु शकतात.

या कायद्यांतर्गत प्रत्येक कार्यालयामध्ये, अस्थापनेमध्ये अंतर्गत तक्रार समितीची स्थापना करण्यात येते. या समितीमध्ये कार्यालयात काम करत असणारी वरिष्ठ महिला ही पीठासीन अधिकारी असेल. सामाजिक जाण व कायदेविषयक ज्ञान असणारे दोन कर्मचारी सदस्य , त्याचबरोबर महिलांच्या प्रश्नांची जाण , लैंगिक छळवणूकीच्या प्रश्नांची समज असलेली अशासकीय संघटनातील एक व्यक्ती अशी रचना या समितीची असते. यातील निम्मे सदस्य हे महिला असतील ही समिती सहापेक्षा अधिक कामगार असणाऱ्या ठिकाणी स्थापन करण्यात येईल. १० पेक्षा कमी कामगार असणाऱ्या अस्थापनेसाठी जिल्हा स्तरावर स्थानिक तक्रार समितीची स्थापना करण्याविषयी या कायद्यामध्ये तरतूद आहे.

**मातृत्व लाभ कायदा :- (१९६१)**

भारतीय संविधानातील कलम दहामध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्याने कामाच्या ठिकाणी योग्य व मानवी परिस्थिती व मातृत्व लाभाच्या तरतुदी करणे आवश्यक आहे. हा उद्देश साध्य करण्यासाठी १९६१ मध्ये मातृत्व लाभाचा कायदा संमत केला गेला. अपत्यजन्मापूर्वी व नंतर महिलांचा सेवाकाल नियमित करणे. आणि मातृत्व व इतर लाभाची तरतुद करण्यासाठी हा कायदा महत्वपूर्ण आहे. या कायद्यान्वये कारखाना, खाण, वनरोपन, डोंबारी वा कसरतीचे खेळ, दुकाने वा

६

अस्थापना याठिकाणी काम करणाऱ्या महिलांना पगारी मातृत्व रजा मिळण्याची सोय उपलब्ध झाली आहे

**समान वेतन कायदा (१९७६):-**

भारतीय संविधानातील कलम ३९ प्रमाणे राज्यांना ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार स्त्री व पुरुषाला समान कामासाठी समान वेतन दिले गेले पाहीजे या तरतुदीला परिणामकारक स्वरुप देण्यासाठी समान वेतन कायदा १९७६ मध्ये लागू करण्यात आला. या कायद्यानुसार एकाच स्वरुपाच्या आणि एकाच प्रकारच्या कामासाठी स्त्री आणि पुरुषांचा लैंगिक भेदाभेद न करता समान वेतन देण्यात यावे . समान कामास समान मोबदला हे या कायद्याचे महत्वाचे तत्व आहे. समान प्रकारच्या कामासाठी भरती करताना कोणत्याही सेवाशर्तींमध्ये पदोन्नती प्रशिक्षण किंवा बदली यामध्ये मालकाने स्त्री या कारणाने भेदाभेद करु नये. या तरतुदी मुळे राज्यघटनेच्या कलम १६ (१) यास हा कायदा सहाय्य करतो. या कायदयातील तरतुदींचा भंग करणाऱ्यास २० हजार रु. पर्यंतचा दंड आणि तीन महिने ते एक वर्षापर्यंत मुदतीचा तुरुंगवास होवू शकतो.

## हिंसाचारापासून संरक्षणासाठी कायदे

**कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा (२००५) :-**

कुटुंबामध्ये कोणत्याही प्रकारच्या हिंसाचारास बळी ठरणाऱ्या महिलांच्या संरक्षणसाठी कौटुंबिक हिंसाचार अधिनियम २००५ मध्ये संमत केला गेला . या कायद्यांतर्गत स्त्रिया आणि १८ वर्षाखालील मुले यांना कौटुंबिक हिंसाचाराविरुद्ध दाद मागता येते. या कायद्यांतर्गत कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी संरक्षण अधिकारी हे पद निर्माण करण्यात आले आहे. संरक्षण अधिकारी म्हणून जिल्हा बालकल्याण अधिकारी प्रांताधिकारी तहसिलदार गटविकास अधिकारी विस्तार अधिकारी यांचा समावेश होतो. या कायद्यान्वये हिंसाग्रस्त महिलांच्या रक्षणासाठी न्यायदंडाधिकारी विविध प्रकारचे आदेश देवू शकतात. यामध्ये संरक्षण आदेश , निवास आदेश , ताबा आदेश , आर्थिक आदेश , नुकसान भरपाई आदेश या प्रकारच्या आदेशांचा समावेश होतो. कौटुंबिक हिंसेची व्याख्या करताना प्रामुख्याने खालील प्रकारच्या हिंसाचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये शारीरिक गैरवर्तणूक, वेदना देणे, स्त्रीच्या आरोग्य आणि विकासास बाधा पोहचण्यास कारणीभूत होणे, दंडणीय बलप्रयोग इत्यादींचा समावेश होतो, त्याचप्रमाणे लैंगिक गैरवर्तणूक मध्ये बीभत्स कृत्य, अश्लील हावभाव यांचा समावेश होतो. शाब्दिक आणि भावनिक अत्याचारामध्ये अपमान करणे, पाणउतारा करणे, शिव्या देणे या

७

अत्याचारांचा समावेश होतो. आर्थिक अत्याचारामध्ये स्त्रीधनावर हक्क सांगणे, हुंड्याची मागणी करणे, पालनपोषणासाठी खर्च न देणे, नोकरीस मज्जाव करणे, पगारावर हक्क सांगणे, घरात प्रवेश करण्यास मज्जाव करणे या सारख्या अत्याचारांचा समावेश होतो.

**वैद्यकीय गर्भपातन कायदा:-**

भारतात गर्भपातास काही विशिष्ठ परिस्थितीत काही मर्यादा पाळून कायदेशीर अनुमती देणारा कायदा १९७१ मध्ये अमलात आणला गेला. या कायद्यानुसार तज्ञ आणि स्त्रीरोगशास्त्राचा विशेष अनुभव असणाऱ्या डॉक्टरांना २० आठवड्यापर्यंत गर्भपात करण्याची अनुमती आहे. एम.बी.बी. एस पदवीनंतर तीन आठवड्यांचे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या व्यक्तींना फक्त १२ आठवड्यापर्यंतच्या गर्भपातास अनुमती आहे. कायदेशीर आणि त्यामुळे सुरक्षित असणारा गर्भपात आजही देशात सर्वत्र सहजी उपलब्ध नाही. ही वस्तुस्थिती आहे. ग्रामिण भागात आजही अधिकृत गर्भपात केंद्रांची संख्या अपुरी आहे. कायदेशीर गर्भपात सेवा उपलब्ध नसल्यामुळे गर्भपाताशी निगडीत स्त्री मृत्युंची संख्या वर्षाला पंधरा ते अठरा हजारापर्यंत आहे. वैद्यकीय गर्भपातन कायद्यानुसार ज्या परिस्थितीत गर्भपात करणे गरजेचे आहे त्यामध्ये, गर्भकाळ पुढे चालू ठेवल्यास स्त्रीच्या जीवाला धोका असणे, अपत्य जन्म झाल्यानंतर ते शारिरीक किंवा मानसिक आरोग्यदृष्ट्या अनियमित, अपंग असण्याचा निश्चित धोका असणे, तर कुटुंबनियोजनाच्या पद्धतीमध्ये अपयश आल्याने गर्भ राहणे अशा अपवादात्मक परिस्थितीत गर्भपात करण्यास परवानगी असते. सप्टे. २०१६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एका निर्णयामध्ये अपवादात्मक परिस्थितीत २४ व्या आठवड्यात गर्भपातास परवानगी दिली आहे.

## महिलांचे संविधानिक हक्क

**महिला हक्क आणि संविधान :-**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २६ जाने. १९५० रोजी भारत लोकसत्ताक देश म्हणून घोषित केला गेला. भारतीय राज्यघटनाही याच दिवसापासून अंमलात आली. राज्यघटनेची सुरुवात ज्या सरनाम्याने झाली त्यातील पहिलेच वाक्य आम्ही स्वतंत्र भारताचे नागरिक हे आहे. या शब्दामध्ये सर्व जातीचे, धर्माचे, वंशाचे, स्त्रिया व पुरुष यांचा समावेश होतो. मूलभूत हक्क हे भारतीय राज्यघटनेचा आत्मा आहे. समाजातील दुर्बल घटक, स्त्रिया, अल्पसंख्यांक यांची जबाबदारी शासनावर टाकण्यात आली आहे. भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांमध्ये समतेचा अधिकार,



स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क, आणि घटनात्मक उपायांचा हक्क यांचा समावेश होतो.

**भारतीय संविधानातील महिलाविषयक तरतुदी :-**

१. कलम १४ नुसार राज्यघटना प्रत्येक नागरिकाला कायद्याची समानता व कायद्याचे समान संरक्षण देते. मात्र याठिकाणी समानता म्हणजे सारखेपणा नव्हे, असमान लोकांना समान वागणूक देणे म्हणजे समानता नव्हे.

२. कलम १५ (१) नुसार धर्म, वंश, जात, लिंग यावरुन सार्वजनिक स्थान व जागा यांचा वापर करण्यास कुठल्याही भारतीय नागरिकास इतर भारतीय नागरिकाशी भेदभाव करता येणार नाही.

३. कलम १५ (३) नुसार राज्य महिला व बालकांसाठी विशेष तरतुदी करु शकते.

४. कलम १६(२) नुसार कोणत्याही नागरिकाला लिंगभावाच्या आधारे राज्यसेवेतील पदाकरीता भेदभाव केला जाणार नाही.वा अपात्र ठरविले जाणार नाही.

५. कलम २१ नुसार कायद्याने प्रस्थापित केलेल्या प्रक्रीयेशिवाय व्यक्तीच्या जिवीत व स्वातंत्र्याच्या हक्काचा संकोच करता येणार नाही.

६. कलम २३ नुसार मानवाचा व्यापार अथवा वेठबिगारास प्रतिबंध करण्यात आला आहे.

७. कलम ३९ नुसार स्त्री व पुरुष या दोहोनाही समान कामासाठी समान वेतन देण्यात येईल.

८. कलम ३९ (अ) नुसार पुरुष आणि स्त्रियांना उपजिविकेची पुरेशी साधने मिळविण्याचा समान हक्क आहे.

९. कलम ३९ (ई) नुसार स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे वय यांचा दुरुपयोग करुण घेण्यात येवू नये. आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय वा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडू नये.

१०. कलम ४२ नुसार राज्यसंस्था कामाबाबत न्याय आणि मानवोचित परिस्थिती उपलब्ध करण्यासाठी व प्रसुतीसहायासाठी तरतुद करेल.

११. कलम ५१ (अ) (ई) नुसार स्त्रियांच्या प्रतिष्ठेला दुय्यमत्व आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे हे प्रत्येक भारतीयाचे मूलभूत कर्तव्य असेल.

१२. कलम २४३ (ड) ३ नुसार प्रत्येक पंचायतीमध्ये प्रत्यक्ष निवडणूकीत भरल्या जाणाऱ्या एकूण जागापैकी एक तृतीयांश पदे महिलांसाठी राखीव असेल

१३. कलम २४३ (ड) ४ नुसार प्रत्येक स्तरावरील पंचायतीमधील एकूण पदाधिकारी पदापैकी एक तृतीयांश पदे महिलांसाठी राखीव असेल.

१४. कलम २४३ ट ३ नुसार प्रत्येक नगरपालीकेतील थेट निवडणूकीद्वारे भरावयाच्या जागाच्या संख्येपैकी एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव असेल. (जाधव, शिरापूरकर, २०१५)

१५. राज्यघटनेमध्ये महिलांच्या हक्कांसाठी अनेक उपाय योजलेले आहेत. हे हक्क डावलले गेल्यास व्यक्ती घटनात्मक उपायांच्या अधिकाराचा वापर करु शकते. भारतात राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांचे रक्षण न्यायसंस्था करते.

## महाराष्ट्र राज्याच्या महिलांविषयक योजना

महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या १८ कोटीपेक्षा अधिक आहे. त्यापैकी जवळपास अर्धी लोकसंख्या महिलांची आहे .शासनाच्या महिला आणि बालविकास विभागामार्फत विविध योजना राबविल्या जातात. यातील महत्वाच्या योजना पुढीलप्रमाणे.

**समुपदेशन केंद्र :-**

महिलांवरील अत्याचाराला आळा घालण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (गृह विभाग) यांचे अध्यक्षतेखाली कृती दलाची स्थापना (टास्क फोर्स )करण्यात आली आहे. सध्या राज्यात १०५ समुपदेशन केंद्रे आहेत.

**मनोधैर्य योजना :-**

बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार , ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला, बालके व त्यांच्या वारसदारांना आर्थिक मदत व मानसोपचार तज्ञांची सेवा देणे, अशा महिला व बालकांना शारीरिक आणि मानसिक अपघातातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करणे, वित्तीय सहाय्य देणे, त्याचबरोबर त्यांना समुपदेशन ,निवारा , वैद्यकीय व कायदेशीर मदत देणे हा योजनेचा उद्देश आहे.

**महिलांचे संरक्षण अधिनियम :-**

केंद्र शासनाच्या कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने जिल्हा स्तरावर ३७ पूर्णवेळ सरक्षण अधिकाऱ्यांच्या ३७ विधी सल्लागाराची ,३७ डाटा एन्ट्री ऑपरेटरची पदे निर्माण केली आहेत. त्यापैकी ३० संरक्षण अधिकाऱ्यांची तर ३० विधी सल्लागारांची पदे भरण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे तालुकास्तरावरही पूर्णवेळ संरक्षण अधिकाऱ्यांच्या सेवा उपालब्ध करुन देण्यासाठी दोन तालुक्यांना मिळून एक याप्रमाणे २१६ कनिष्ठ संरक्षण अधिकाऱ्यांची पदे निर्माण करण्यात आली आहेत.

**महिला प्रशिक्षक केंद्रांना सहायक अनुदान :-**

आर्थिकदृष्टया गरीब कुटुंबातील १८ ते ४० वर्षे वयोगटातील महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्या आधारे त्यांना स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविता यावा यासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत महिला प्रशिक्षण केंद्रे चालविण्यात



येतात. या प्रशिक्षण केंद्रामध्ये शिवणकला, टंकलेखन, संगणक स्क्रिन प्रिंटींग, हस्तकला, अंगणवाडी बालवाडी प्रशिक्षण इत्यादी प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येतात. प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना रु. ७५ प्रमाणे दरमहा विद्यावेतन देण्यात येते. स्वयंसेवी संस्थेस प्रशिक्षण केंद्रासाठी यंत्रसामग्री व कार्यालयीन साहित्य खरेदीकरीता २८५०० रु. इतके अनावर्ती अनुदान एकदाच देण्यात येते. त्यानंतरच्या सहा महिन्यांच्या एका प्रशिक्षण सत्रास २१ हजार ५०० प्रमाणे आवर्ती अनुदान देण्यात येते. प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेश घेण्यासाठी महिलेचे वय १८ ते ४० या वयोगटातील असावी तसेच महिला आर्थिकदृष्टया मागास व गरीब कुटुंबातील असावी . एका प्रशिक्षण केंद्रामध्ये ३० महिला याप्रमाणे एका सत्रामध्ये एकूण २६२ प्रशिक्षण केंद्राद्वारे ७८६० महिलांना प्रशिक्षण देण्यात येते.

**निराश्रित मुलींच्या विवाहासाठी आर्थिक सहाय्य :-**

अनाथ मुलींच्या पुनर्वसनासाठी शासनाने ही योजना सुरु केली आहे. अनाथ मुलींच्या विवाहासाठी २५००० रुपये अनुदान जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्यामार्फत देण्यात येते. ही योजना अनाथालये, शासकीय महिला वसतिगृहे, (राज्यगृहे)संरक्षणगृहे, आधारगृहे, अल्पमुदती निवासगृहे व शासन अनुदानीत बालगृहे तसेच शासकीय व स्वयंसेवी संस्थांमधील निराश्रित मुलींसाठी आहे.

**महिला जिल्हा सल्लागार समिती:-**

हुंडा पद्धतीचे निर्मुलन करण्यासाठी प्रत्येक जिल्हयामध्ये महिला बालविकास विभागांतर्गत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसमावेशक महिला जिल्हा सल्लागार समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या समितीस दरवर्षी ४५ हजार रु. अनुदान देण्यात येते. हुंडापद्धती नष्ट करणे , कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांच्या संरक्षण अधिनियमाच्या कामकाजाचा आढावा घेणे, अनैतिक व्यापारास बळी पडलेल्या महिला व मुलींचे पुनर्वसन करणे, महिलांचे सक्षमीकरण करणे याबाबतीत प्रचार प्रसिध्दी व त्या अनुषंगाने शासनास शिफारशी करण्याचे कामकाज करण्यात येते.

**जिल्हा परिषद महिला व बालकल्याण समिती :-**

या समितीमार्फत महिला व बालविकासाची कामे केली जातात . राज्य सरकारकडून सहाय्यक अनुदान दिले जाते. जि. प . च्या उत्पन्नातून १० टक्के रक्कम समितीस मिळते. जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या तरतुदीतून प्रतिवर्षी २० लाख रु. अनुदान मिळते.

**वसतिगृहे :-**

१६ ते ६० वयोगटातील निराश्रित, परितक्त्या, घटस्पोटीत, कुमारीमाता, लैंगिक अत्याचारग्रस्त, अनैतिक व्यापारात अडकलेल्या, सामाजिक संकटग्रस्त,

महिलांना या वसतिगृहामध्ये प्रवेश दिला जातो. राज्यात १८ जिल्हयामध्ये २० संस्था कार्यरत आहेत. राज्यपातळीवर एकूण मंजूर प्रवेशक्षमता २००० आहे. प्रत्येक संस्थेत १०० महिलांना प्रवेश दिला जातो. गरजू महिला स्वेच्छेने प्रवेश घेवून २ ते ३ वर्षे वसतिगृहात राहू शकतात. सुधारित माहेर योजनेंतर्गत प्रवेशित महिलेस १००० रु. अनुदान दिले जाते. महिलेबरोबर तिची लहानमुले असल्यास पहिल्या मुलाला ५०० रु व दुसऱ्या मुलास ४०० रु. दरमहा जादा अनुदान जास्तीत जास्त एक वर्षासाठी दिले जाते.

**महिला संरक्षणगृहे :-**

अनैतिक व्यापार (प्रतिबंध ) अधिनियम १९५६ कायद्याखाली ही योजना राबविली जाते. पोलीसांमार्फत कुंटनखान्यातून सोडवून आणलेल्या व न्यायालयातर्फे आदेशित केलेल्या १८ वर्षावरील महिलांचे संरक्षण व पुनर्वसन करण्यासाठी शासनाद्वारे ही संरक्षणगृहे चालवली जातात. महाराष्ट्रात एकूण दोन शासकीय संरक्षणगृहे मुंबई व नागपूर येथे आहे. त्यातील प्रत्येक गृहाची प्रवेशक्षमता २०० आहे. त्याचबरोबर स्वयंसेवी संस्थांकडून ५ संरक्षणगृहे विनाअनुदानित तत्वावर चालविण्यात येतात.या संस्थांची प्रवेशक्षमता २६५ इतकी आहे.

**आधारगृहे :-**

समाजातील नैसर्गिक, अनैसर्गिक संकटे व असामाजिक कृतीतून निर्माण होणाऱ्या समस्याग्रस्त महिलांना समाजात पुन्हा स्वताच्या पायावर उभे करण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी १६ ते ६० वर्ष वयोगटातील निराश्रित, परितक्ता, कुमारीमाता, संकटग्रस्त महिलांना आश्रय देवून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी स्वयंसेवी संस्थामार्फत आधारगृहे चालविण्यात येतात. राज्यात ९ आधारगृहे कार्यरत आहेत. त्यातील एकूण मान्यसंख्या ५९० इतकी आहे. या संस्थांमध्ये महिलांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकीय मदत, शिक्षण व प्रशिक्षण सुविधा आणि कायदेविषयक सल्ला इत्यादी सेवा पुरविण्यात येतात. या योजनेंतर्गत दरमहा दरडोई ९५० रु. इतके सहायक अनुदान दिले जाते.

**देवदासींसाठी कल्याणकारी योजना :-**

४० वय वर्षावरील देवदासींना उदरनिर्वाहाकरीता दरमहा ६०० रु. निर्वाह अनुदान देण्यात येते. ही वैयक्तिक लाभाची योजना असून देवदासींचे प्राबल्य असणाऱ्या मुंबई, मुंबई उपनगर , सिंधुदुर्ग , पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नांदेड, लातूर, उस्मानाबाद या अकरा जिल्हयांमध्ये ही योजना राबविण्यात येते.

१२

**विवाहासाठी अनुदान :-**

अविवाहित देवदासी व देवदासींच्या मुलींसाठी विवाहासाठी राज्य सरकारकडून अनुदान दिले जाते. १८ वर्षावरील देवदासी किंवा देवदासीची कन्या पदवीधर नसल्यास २५००० रु. आणि पदवीधर असल्यास ५०००० रु. अनुदान देण्यात येते.

**देवदासींच्या मुलांमुलींसाठी वसतिगृहे :-**

देवदासीच्या मुलामुलींना योग्य शिक्षण देवून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यातील कोल्हापूर व सांगली या दोन जिल्हयांमध्ये देवदासींच्या मुलांमुलींसाठी वसतिगृह योजना राबविण्यात येते.

**बहुउद्देशीय महिला केंद्रे :-**

आपदग्रस्त महिलांना सल्ला , मार्गदर्शन व मदत मिळावी यादृष्टीने मुंबई , पुणे, नागपूर , नाशिक व औरंगाबाद येथे प्रत्येकी एक याप्रमाणे पाच बहुउद्देशीय महिला केंद्रे कार्यरत आहेत.

**कौशल्य विकास व उद्योजकता :-**

कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत राज्यात शिक्षण न झालेल्या, शिक्षण अर्धवट झालेल्या, महिलांसाठी त्यांना उच्च प्रतीचे प्रशिक्षण देवून रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने ही योजना उपयुक्त आहे.

**जननी सुरक्षा योजना :-**

या योजनेचा उद्देश अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व दारिद्रयरेषेखालील कुटुंबातील गरोदर महिलांचे आरोग्य संस्थेत होणाऱ्या प्रसुतीचे प्रमाण वाढविणे व मातामृत्यु आणि अर्भकमृत्युचे प्रमाण कमी करणे हे आहे. या योजनेनुसार अनुसुचित जाती जमाती व दारिद्रयरेषेखालील कुटुंबातील गरोदर महिलांचे आरोग्यसंस्थेत होणाऱ्या प्रसुतीस ग्रामिण भागात ७०० रु. तर शहरी भागात ६०० चा धनादेश देण्यात येतो. त्याचबरोबर दारिद्रयरेषेखालील कुटुंबातील महिलेची प्रसुती घरी झाली तर रु. ५०० चा धनादेश देण्यात येतो. या योजनेचा लाभ शासकीय आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामिण रुग्नालये ,स्त्री रुग्नालये, सामान्य रुग्नालये , जिल्हा रुग्णालये आणि शासन मानांकीत खाजगी रुग्नालयात प्रसुती झालेल्या अनुसुचित जाती आणि जमाती व दारिद्रयरेषेखालील महिलांना देण्यात येतो.

**गरोदर माता व स्तनदा मातांना मोफत सेवा :-**

गरोदरपणात आणि बाळंतपणानंतर ४२ दिवसापर्यंत मातांना शासकिय दवाखान्यामध्ये या सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. यामध्ये मोफत बाळंतपण, मोफत सिझेरियन शस्त्रक्रीया, मोफ्त औषधोपचार, मोफ्त प्रयोगशाळा तपासणी व इतर

१३

तपासण्या केल्या जातात. बाळंतपणात तीन दिवसापर्यंत, सिझेरियन बाळंतपण झाल्यास सात दिवसापर्यंत मोफत आहार देण्यात येतो. तसेच घरापासून दवाखाना आणि पुन्हा घरी जाण्यासाठी मोफत वाहन व्यवस्था देण्यात येते.

**मातृत्व अनुदान योजना :-**

नवसंजिवणी योजनेअंतर्गत ही योजना राज्यातील १६ आदिवासी जिल्हयामध्ये राबविली जाते. गरोदर मातांची नियमित आरोग्यतपासणी व्हावी व त्यांना सुयोग्य आहार वेळेत उपलब्ध व्हावा हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेमध्ये प्रत्येक लाभार्थीला गरोदरपणात ४०० रु. रोखीने तर ४०० रु. ची औषधे याप्रमाणे आठशे रु. चा लाभ दिला जातो.

**सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना :-**

एक किंवा दोन मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया करुन घेणाऱ्या दारिद्रयरेषेखालील जोडप्यासाठी सुधारीत स्वरुपात १ एप्रिल २००७ पासून लागू करण्यात आली. कुटुंबनियोजन शस्त्रक्रीया एक मुलगी झाल्यावर केल्यास शस्त्रक्रीया करणाऱ्या व्यक्तीस २००० रु. व मुलीच्या नावे ८००० रु. रोख बचत प्रमाणपत्राच्या स्वरुपात देण्यात येतात. दोन मुलींवर कुटुंबनियोजन शस्त्रक्रीया केल्यास शस्त्रक्रीया करणाऱ्या व्यक्तीस दोन हजार रुपये व प्रत्येक मुलीच्या नावे ४००० रु. म्हणजे एकूण आठ हजार रुपये राष्ट्रीय बचतप्रमाणपत्राच्या स्वरुपात देण्यात येतात.

**कन्याशाळा :-**

आदिवासी भागातील मुलींना चांगले शिक्षण घेता यावे यासाठी आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त एकूण २५ कन्याशाळा आहेत. काही आश्रमशाळांचे रुपांतर कन्या शाळांमध्ये करण्यात आले आहे.

**अल्पसंख्यांक समाजातील महिलांसाठी स्वयंसहायता बचत गट :-**

अल्पसंख्यांक समाजातील महिलांसाठी ही योजना राबविण्यात येते. राज्यातील अल्पसंख्यांक बहुल शहरातील अल्पसंख्यांकांसाठी (मुस्लीम, बौद्ध, जैन, पारशी, ख्रिश्चन, शीख) हि योजना राबविण्यात येते.



**केंद्रशासनाच्या योजना**

**अल्पमुदती निवासगृहे :-**

मानसिक तणावग्रस्त स्त्रीया , सामाजिक व नैतिकदृष्टया संकटात सापडलेल्या स्त्रीया, लैंगिकदृष्टया शोषित स्त्रिया, निराधार , निराश्रित, घटस्फोटीत महिलांना निवासगृहात आश्रय देवून वैद्यकीय, मानसिक उपचार, समुदपेशन, व्यवसाय प्रशिक्षण इ. सुविधा पुरवून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने स्वयंसेवी संस्थांमार्फत अल्पमुदती निवासस्थाने चालविली जातात. या योजनेंतर्गत ३० महिलांकरीता ५०,००० रु. अनावर्ती अनुदान व साधारणता ४ लाख रु. आवर्ती अनुदान दिले जाते. केंद्र शासनातर्फे या योजनेमार्फत १०० टक्के सहायक अनुदान या संस्थेस परस्पर दिले जाते.

**नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह :-**

नोकरी करणाऱ्या, एकटया, अविवाहित, विधवा, घटस्फोटीत, विभक्त, पती बाहेरगावी असलेल्या स्त्रियांची संरक्षणाच्या दृष्टीने राहण्याच्या जागेची सोय करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलेचे मासिक उत्पन्न शहरी भागात ३० हजारापेक्षा जास्त आणि ग्रामिण भागात २५ हजारापेक्षा जास्त नसावे ही अट आहे. ही वसतिगृहे नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालवितात. इमारत बांधकामासाठी सरकार या संस्थांना ७५ टक्के खर्च देते. भारतात एकूण १२९ संस्था कार्यरत आसून त्यांची प्रवेशक्षमता १०,१६८ इतकी आहे.

**स्टेप :- (महिलांसाठी प्रशिक्षण आणि रोजगाराकरीता कार्यक्रम) :-**

या योजनेचा उद्देश आर्थिकदृष्टया दुर्बल महिलांमधील कौशल्य वाढवून त्यांची व्यावसायिकदृष्टया उत्पादकता वाढविणे हा आहे. या योजनेंतर्गत महिलांना पशुपालन , डेअरी , मत्स्यव्यवसाय, हस्तकला , खादी ग्रामोद्योग, रेशमी किडयांचे पालन इ. बाबत प्रशिक्षण देण्यात येते. ही योजना स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविली जाते. लाभार्थींना प्रशिक्षण सुविधांची उपलब्धता, कर्मचारी वर्गाची नियुक्ती, कच्च्या मालाची उपलब्धता, यासाठी केंद्र शासनाकडून एकूण खर्चाच्या ९० टक्के रक्कम अनुदान म्हणून दिले जाते. तर १० टक्के स्वयंसेवी संस्थांना खर्च करावा लागतो. या योजनेसाठी कमीत कमी ५०० व जास्तीत जास्त एक हजार महिला असणे आवश्यक आहे. एकूण १६ संस्था ही योजना राबवितात.

**उज्वला :-**

महिला व मुलींच्या मानवी वाहतुकीला आळा घालून स्त्रिया व मुलींचे लैंगिक शोषण थांबविणे व अशा पिडीत महिलांची सुटका करुन त्यांना संरक्षण, शिक्षण, प्रशिक्षण, देऊन त्यांचे पुनर्वसन करुन त्यांना परत समाजात पुनर्स्थापित करणे हे या योजनेचे उदिष्ट आहे. या योजनेंतर्गत 'अ' गट शहरासाठी २१ लाख ७६ हजार आवर्ती अनुदान व अ आणि ब गटासाठी सोळा हजार अनावर्ती अनुदान मिळते. अनैतिक वाहतुक प्रतिबंधासाठी असे ३४ प्रकल्प राज्यात आहेत.

या योजनेमध्ये निराधार , निराश्रित महिला, कुंटनखान्यातून मुक्त केलेल्या महिला, ब्रलात्कारीत , लैंगिक अत्याचारात बळी पडलेल्या महिला , हुंडाग्रस्त, एडसग्रस्त महिलांना स्वेच्छेने प्रवेश दिला जातो . या योजनेंतर्गत महिलांना अन्न, वस्त्र, निवारा इ. सुविधांसह मेडीकल हेल्पलाईन, व्यवसाय प्रशिक्षण, मानसोपचार केंद्र, समुपदेशन केंद्र, इ. लाभ दिले जातात. स्वयंसेवी संस्थांना १०० स्त्रियांच्या निवासस्थानासाठी २५ लाख रु. अनुदान दिले जाते. राज्यामध्ये ४८ संस्था असून त्यांची प्रवेशक्षमता २५००इतकी आहे.

परिशिष्ट ज

# पूर्व आणि उत्तर चाचणीतील गुण

## पूर्व चाचणीतील गुण

| रोल नं. | महिला मानवी हक्कातील घटक | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | वैवाहिक हक्क | वारसा हक्क | नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क | हिंसेपासून मुक्ततेचा हक्क | संविधानिक हक्क | |
| १ | १२ | १० | १४ | १४ | १० | ६० |
| २ | ८ | ६ | ८ | ६ | ६ | ३४ |
| ३ | ६ | २ | ४ | ८ | २ | २२ |
| ४ | ८ | ६ | ६ | ६ | ८ | ३४ |
| ५ | १० | ८ | १० | ८ | ६ | ४२ |
| ६ | ४ | ६ | ४ | ४ | ४ | २२ |
| ७ | ४ | ६ | ४ | ४ | ६ | २४ |
| ८ | ६ | ६ | ८ | ६ | ४ | ३० |
| ९ | ४ | ६ | ४ | ४ | ६ | २४ |
| १० | ८ | ६ | ४ | ८ | ६ | ३२ |
| ११ | ४ | २ | ४ | ४ | ६ | २० |
| १२ | ४ | ८ | ६ | ८ | ८ | ३४ |
| १३ | ६ | ४ | ६ | ४ | ६ | २६ |
| १४ | १० | ६ | ८ | ८ | ८ | ४० |
| १५ | ६ | ६ | ६ | ६ | ६ | ३० |
| १६ | ८ | ६ | ४ | ४ | ६ | २८ |
| १७ | ६ | ४ | २ | ४ | ४ | २० |
| १८ | १० | ८ | ८ | ८ | ८ | ४२ |
| १९ | १२ | ८ | १० | १२ | ६ | ४८ |
| २० | ६ | २ | ४ | ४ | ० | १६ |
| २१ | ८ | ६ | ८ | ८ | ४ | ३४ |
| २२ | ४ | २ | ४ | ४ | ४ | १८ |
| २३ | ८ | ८ | ६ | ८ | ४ | ३४ |
| २४ | १० | ८ | ८ | ६ | ४ | ३६ |
| २५ | १० | ८ | ८ | ६ | ८ | ४० |
| २६ | ६ | २ | २ | ४ | ६ | २० |
| २७ | ८ | ६ | ८ | ८ | ६ | ३६ |
| २८ | ६ | ८ | ६ | ८ | ४ | ३२ |
| २९ | ८ | ६ | ८ | ६ | ८ | ३६ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३० | १२ | ८ | ६ | ८ | ६ | ४० |
| ३१ | २ | ४ | ६ | ६ | ४ | २२ |
| ३२ | ४ | ४ | ६ | ४ | ६ | २४ |
| ३३ | ८ | ६ | ६ | १० | ४ | ३४ |
| ३४ | १२ | १२ | १२ | १४ | ८ | ५८ |
| ३५ | ६ | ६ | १२ | ६ | ४ | ३४ |
| ३६ | ६ | ४ | ८ | ६ | ६ | ३० |
| ३७ | ४ | २ | २ | ० | २ | १० |
| ३८ | ८ | ६ | ६ | ४ | ८ | ३२ |
| ३९ | १० | ८ | ८ | ८ | १० | ४४ |
| ४० | १६ | १२ | ८ | १० | ४ | ५० |
| ४१ | ८ | ८ | ६ | ८ | ४ | ३४ |
| ४२ | २ | ४ | २ | ६ | ६ | २० |
| ४३ | ६ | ८ | ६ | ४ | ६ | ३० |
| ४४ | २० | १४ | १६ | १४ | १२ | ७६ |
| ४५ | ४ | २ | ४ | ६ | ६ | २२ |
| ४६ | ४ | २ | २ | ० | २ | १० |
| ४७ | १० | ८ | १० | ८ | ६ | ४२ |
| ४८ | १० | ६ | ८ | १२ | १२ | ४८ |
| ४९ | १२ | १० | १० | १० | ४ | ४६ |
| ५० | ६ | ४ | ४ | ४ | ० | १८ |
| ५१ | १८ | १२ | १४ | १६ | ८ | ६८ |
| ५२ | ६ | ८ | ६ | ६ | ६ | ३२ |
| ५३ | ४ | ६ | ४ | ६ | ४ | २४ |
| ५४ | १२ | ८ | १० | १० | १० | ५० |
| ५५ | १० | ८ | ८ | ८ | ६ | ४० |
| ५६ | ८ | ६ | ८ | ८ | ४ | ३४ |
| ५७ | ४ | २ | ४ | ४ | ६ | २० |
| ५८ | ६ | ६ | ८ | ६ | ८ | ३४ |
| ५९ | १० | ८ | ८ | ८ | १० | ४४ |
| ६० | ८ | ८ | १० | ८ | ८ | ४२ |
| ६१ | ६ | ६ | ६ | ४ | १० | ३२ |
| ६२ | १० | ८ | ६ | ८ | ४ | ३६ |

## उत्तर चाचणीतील गुण

| रोल नं. | महिला मानवी हक्कातील घटक | | | | | एकूण |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | वैवाहिक हक्क | वारसा हक्क | नोकरी करणाऱ्या महिलांचे हक्क | हिंसेपासून मुक्ततेचा हक्क | संविधानिक हक्क | |
| १ | १८ | १४ | १६ | १८ | १४ | ८० |
| २ | १४ | १० | १२ | १२ | ८ | ५६ |
| ३ | १० | ६ | ८ | १२ | ६ | ४२ |
| ४ | १४ | १० | १० | १२ | १२ | ५८ |
| ५ | १४ | १२ | १४ | १२ | १० | ६२ |
| ६ | ८ | १० | ६ | १० | ८ | ४२ |
| ७ | ६ | १० | ८ | १० | १४ | ४८ |
| ८ | १० | १२ | १४ | १० | ८ | ५४ |
| ९ | ८ | १० | १० | ८ | १० | ४६ |
| १० | १४ | ८ | ६ | १४ | १० | ५२ |
| ११ | १० | ६ | ८ | १० | १४ | ४८ |
| १२ | ८ | १४ | १४ | १८ | १० | ६४ |
| १३ | १० | ८ | १४ | ८ | १२ | ५२ |
| १४ | १८ | १४ | १८ | १४ | १६ | ८० |
| १५ | १० | १२ | १४ | १४ | १० | ६० |
| १६ | १६ | १० | ८ | ६ | १४ | ५४ |
| १७ | १४ | ६ | ६ | ८ | १० | ४४ |
| १८ | १८ | १८ | १६ | १४ | १४ | ८० |
| १९ | २० | १८ | १८ | १८ | १४ | ८८ |
| २० | १० | ४ | ६ | ८ | ६ | ३४ |
| २१ | १० | १४ | १८ | १४ | ८ | ६४ |
| २२ | १० | ६ | ६ | ८ | ६ | ३६ |
| २३ | १४ | १६ | १४ | १२ | १० | ६६ |
| २४ | १८ | १८ | १६ | १४ | ६ | ७२ |
| २५ | २० | १४ | १६ | १४ | १८ | ८२ |
| २६ | १० | ४ | ४ | ६ | ८ | ३२ |
| २७ | १६ | १० | १४ | १४ | १४ | ६८ |
| २८ | १२ | १४ | १४ | १० | ८ | ५८ |
| २९ | १८ | १२ | १० | १० | १८ | ६८ |
| ३० | १८ | १८ | १४ | २० | १० | ८० |
| ३१ | ४ | ८ | १४ | १४ | ८ | ४८ |
| ३२ | १० | १० | १४ | १० | १० | ५४ |
| ३३ | १४ | १४ | १० | १६ | ६ | ६० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | २२ | १६ | १८ | १८ | १८ | ९२ |
| ३५ | १० | १४ | १८ | १४ | ६ | ६२ |
| ३६ | १० | ६ | १६ | १४ | १० | ५६ |
| ३७ | १० | ४ | ४ | ४ | ६ | २८ |
| ३८ | १० | ८ | ८ | ६ | १४ | ४६ |
| ३९ | १६ | १६ | १४ | १४ | १८ | ७८ |
| ४० | २२ | १६ | १६ | १८ | ६ | ७८ |
| ४१ | १२ | १४ | १२ | १४ | ८ | ६० |
| ४२ | ६ | ८ | ४ | १० | १० | ३८ |
| ४३ | १० | १४ | १० | ८ | १० | ५२ |
| ४४ | २० | १६ | १८ | १८ | १६ | ८८ |
| ४५ | ८ | ४ | ६ | १० | १२ | ४० |
| ४६ | ६ | ४ | ४ | ४ | ६ | २४ |
| ४७ | १८ | १६ | १८ | १४ | १४ | ८० |
| ४८ | १६ | १० | १४ | १८ | १८ | ७६ |
| ४९ | २० | १६ | १८ | १८ | ८ | ८० |
| ५० | १० | ६ | ६ | ६ | ४ | ३२ |
| ५१ | २२ | १६ | १६ | १८ | १६ | ८८ |
| ५२ | १४ | १० | १० | १० | १४ | ५८ |
| ५३ | ६ | १० | ८ | १० | ८ | ४२ |
| ५४ | २० | १६ | १६ | १८ | १६ | ८६ |
| ५५ | १८ | १६ | १४ | १४ | १० | ७२ |
| ५६ | १२ | १० | १२ | १४ | ८ | ५६ |
| ५७ | ६ | ४ | ८ | ६ | १० | ३४ |
| ५८ | १० | १० | १४ | १२ | १४ | ६० |
| ५९ | १८ | १६ | १६ | १४ | १६ | ८० |
| ६० | १४ | १४ | १६ | १४ | १६ | ७४ |
| ६१ | १४ | १४ | १२ | ६ | १२ | ५८ |
| ६२ | १२ | १४ | १४ | १२ | ६ | ५८ |

## परिशिष्ट झ

# **तज्ञ व्यक्तींची नावे**

| अ.क्र. | तज्ञ व्यक्ती |
|---|---|
| १ | डॉ.भालचंद्र भावे, प्राचार्य, शिक्षण प्रसारक संस्थेचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर, जि.अहमदनगर. |
| २ | डॉ.राहुल गोंगे, राज्यशास्त्र विभागप्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे. |
| ३ | डॉ.भास्कर शेळके, प्राचार्य, अगस्ति महाविद्यालय, अकोले, जि.अहमदनगर. |
| ४ | डॉ.विलास रणसुरे, अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर, पुणे. |
| ५ | प्रा.स्मिता गोळे, सहाय्यक प्राध्यापिका, सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे. |
| ६ | ॲड. मिथुन पवार, शिवाजीनगर, पुणे. |
| ७ | डॉ.इंद्रजित जाधव, प्राचार्य आणि राज्यशास्त्र विभागप्रमुख, बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे. |
| ८ | डॉ.कैलास दौंडकर, प्राचार्य, डॉ.एम.ए. खान शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे. |
| ९ | डॉ.नितीन वाठोरे, प्राचार्य, कर्मवीर बाबासाहेब आपोतेकर महाविद्यालय, जि.अकोला. |
| १० | डॉ. संदिप मुळे, नंदुरबार. |
| ११ | डॉ. रत्नाकर म्हस्के, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, उस्मानाबाद |
| १२ | डॉ. निशांत निर्मळे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, उस्मानाबाद |

परिशिष्ट ट

# प्रमाणपत्रे

॥ एकमेका सहाय्य करु । अवघे धरु सुपंथ ॥

आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित

## बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव

(कला-वाणिज्य-विज्ञान-बी.सी.ए.-एम.ए.-एम.कॉम.)

(आयडेंटिफिकेशन नंबर पी.यू./पी.एन./ए.सी./०७६/१९८९) (स्थापना १९८९)

कॉलेज कोड नंबर : १९६

NAAC Re-Accredited 'B' Grade

डॉ. इंद्रजित भाऊराव जाधव
(M.A. M.Phil. Politics)
प्राचार्य

☎: कार्यालय (०२१३३) २४४२८२
फॅक्स नं. (०२१३३) २४४२८२
Website - www.bdkalecollege.in
E - Mail :- bdkcollege_ghodegaon@Rediffmail.com.

जा. क्र. अमक्ष

दिनांक :- ०७/०९/२०१७

### प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की प्रा.एकनाथ वाजगे यांनी दि.२८/०८/२०१७ रोजी आमच्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष (कला शाखा) वर्गातील विद्यार्थीनींकडून पीएच. डी.संशोधनासाठी प्रश्नावली भरून घेतली आहे.

बी. डी. काळे महाविद्यालय, कोड नं. १९६, घोडेगाव

प्राचार्य
बी. डी. काळे महाविद्यालय
घोडेगाव, ता.आंबेगाव, जि पुणे

स्थापना : १९६६

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद !" – कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे,
**अण्णासाहेब आवटे आर्टस्, कॉमर्स, हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज व सौ. कुसुमबेन कांतीलाल शाह आर्टस्,कॉमर्स, सायन्स ज्युनियर कॉलेज**
मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे. पिन – ४१०५०३.
'नॅक' व्दारा प्रमाणित 'बी ग्रेड'
ID. No. - PU/PN/ASC/017/1966 ज्युनिअर कॉलेज क्रमांक- J11.01.001

* प्राचार्य *
डॉ. गायकवाड पी. एन.
एम.ए., बी.एड.,पी.एच.डी.
अधिसभा सदस्य, पुणे विद्यापीठ



* संस्थापक *
पद्मभूषण डॉ. कर्मवीर
भाऊराव पाटील डी.लीट

जा. क्र. ६०२/२०१७-१८ दिनांक : १६/०९/२०१७.

## प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, प्रा.एकनाथ दत्तात्रय वाजगे यांनी पीएच.डी. संशोधनासाठी आमच्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष कला शाखा वर्गातील विद्यार्थिनींकडून "महिला मानवी हक्क" या विषयावरील प्रश्नावली भरुन घेतली.

सदरचे प्रमाणपत्र त्यांचे मागणी अर्जावरुन देण्यात येत आहे.

स्थळ - मंचर
दि- २६/९/२०१७

प्राचार्य
अण्णासाहेब आवटे कॉलेज,
मंचर – ४१० ५०३

दुरध्वनी क्र. – एस.टी.डी. (०२१३३) कार्यालय : २२३१६० प्राचार्य : २२५७२१ संगणक : २२३८६० निवास : २२३३१२ फॅक्स : २२३१६०
Websit : aacmanchar.com E-mail : annasahebawate2007@yahoo.com / aac.manchar@gmail.com skype : aac.manchar1

हुतात्मा राजगुरु शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे

ता.खेड, जि.पुणे-४१२ ४०२ मो.९२२५५९१८२५

ID No. : PU/PN/ACS / 281 / 2007 Code No. : 830 Centre No.830

।। जीवनाय ज्ञानं वरम् ।।

दिनांक : ०६/१०/२०१६

समक्ष

## प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, प्रा.एकनाथ दत्तात्रय वाजगे यांनी आमच्या महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देवून तृतीय वर्ष (कला शाखा) वर्गातील विद्यार्थीनींकडून पीएच.डी संशोधनासाठी प्रश्नावली भरून घेतली.

प्राचार्य

( डॉ.सुनिल दादाराम पवार )

प्राचार्य
हु. रा. शि. प्र. मंडळाचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
डेहणे, ता.खेड, जि.पुणे. ४१२ ४०२

हुतात्मा राजगुरु शिक्षण प्रसारक मंडळ,राजगुरुनगर

रत्नाई महिला महाविद्यालय,राजगुरुनगर

शासकिय विश्रांतगृहाजवळ(डाक-बंगला),पुणे-नाशिक महामार्ग,राजगुरुनगर,
ता.खेड,जि.पुणे-४१०५०५,फोन : (०२१३५) २८८४०० मो.७०८३३८८६९३

।। जीवनाय ज्ञानं वरम् ।।

ID No.PU/PN/ACS/358/2009 • Code No.: 890 • Centre No.: 066

प्राचार्य डॉ.शिवाजीराव मोहिते
एम.ए.एम.एड,पी.एच.डी.
साहित्याचार्य

संदर्भ क्र. : समक्ष
दिनांक : ५/०९/२०१७.

## प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, प्रा. एकनाथ दत्तात्रय वाजगे यांनी पीएच. डी. संशोधनासाठी आमच्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष (कला शाखा) वर्गातील विद्यार्थिनींकडून महिला मानवी हक्क या विषयावरील प्रश्नावली भरुन घेतली.

डॉ.शिवाजीराव नि. मोहिते
प्राचार्य
रत्नाई महिला महाविद्यालय
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे.

SITARANG CHARITABLE SOCIETY'S
**SHREEMATI SITABAI RANGUJI SHINDE**
Arts,Commerce & Science Mahavidyalaya
Bori Bk.Tal.: Junnar, Dist.: Pune 412 411 Ph. (02132)282136
Regd. No. NGC 2003/(1/03)/MS-3,Dt.17/7/2003
College Code-811, College ID No.PU/PN/ACS(W)/246/2006
Email - ssrs_246 boribk@ rediffmail.com

Ref No.: S.S.R.S/515 2017-2018 Date : 31 /07 /2017

प्रमाणपत्र देण्यात येते की,प्रा . एकनाथ दत्तात्रय वाजगे यांनी आमच्या महाविद्यालयात प्रत्यक्ष भेट देवून महाविद्यालयातील तृतीय वर्ष (कला शाखा) वर्गातील विद्यार्थ्यांकडून पी . एच . डी संकलनासाठी प्रश्नावली भरून घेतली .

for [signature]
सिता-रंग चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
श्रीमती सिताबाई रंगुजी शिंदे
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
बोरी बु.।।,ता.जुन्नर,जि.पुणे-४१२४११

ग्रामोन्नती मंडळाचे
# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे - ४१० ५०४
फोन नं.:(०२१३२) २४२५८२, २४४८६२ Email: acsc232@gmail.com Website : www.acscnarayangaon.com
एकाग्रता यशोबिजम्
Estd : 1993
NAAC - Re-accredited 'A' Grade College Affiliated to Pune University ID. No. PU/PN/AC/100/(1993)
श्रीकांत शेवाळे
प्राचार्य

जा. क्र. : १९० /२०१७/१८
दिनांक : १६ / ०८/२०१८

**प्रमाणपत्र**

प्रमाणपत्र देण्यात येते की, प्रा. एकनाथ दत्तात्रय वाजगे यांनी पीएच.डी.संशोधनासाठी आमच्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष (कला) वर्गातील विद्यार्थीनीकडून 'महिला मानवी हक्क' या विषयावरील प्रश्नावली भरून घेतली.

प्राचार्य

प्राचार्य
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय नारायणगाव

ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे,
**मा. बाळासाहेब जाधव**
**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे**
ता. जुन्नर, जि. पुणे ४१२ ४११.
पुणे विद्यापीठाशी संलग्न
आय डी.नं.पी.यु./पीएन्/एएस्सी/०९७/१९९३
(NAAC- Accredited 'B' Grade CGPA 2.80)
☎: ऑ. : (०२१३२) २६३०७८
फॅक्स नं.-(०२१३२) २६२५२२
ई-मेल- bjcollege_ale@yahoo.co.in

जावक क्र. : 133/2017-18

दिनांक 13/9/2017

# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की ,प्रा. एकनाथ दत्तात्रय वाजगे यांनी पीएच.डी संशोधनासाठी आमच्या महाविदयालयातील तृतीय वर्ष (कला शाखा) वर्गातील विदयार्थिनींकडून महिला मानवी हक्क या विषयावरील प्रश्नावली भरून घेतली .

प्राचार्य
बी.जे.कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
बी.सी.ए. व एम.सी.ए. विभाग
आळे,ता.जुन्नर,जि.पुणे

जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक, मंडळ, जुन्नर
**श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)**
एस./आर.नं. महा./ ६६७/ पुणे, दिनांक २/१/१९७० कला - वाणिज्य - विज्ञान पी.टी.आर. एफ.: ४३१/ पुणे, दिनांक ३१/१२/१९६९
• डी.एस.टी.- फिस्ट स्पॉन्सर्ड
• कॉलेज विथ पोटेंशियल फॉर एक्सलन्स - यु.जी.सी.
'नॅक' - मुल्यांकित 'अ'
'उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार प्राप्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
• बोडकेनगर, जुन्नर, जि. पुणे, पीनः ४१० ५०२.
• दूरध्वनी क्र. : ०२१३२-२२२०९४ • फॅक्सः ०२१३२-२२२१५०
• वेब साईटः www.ssccollegejunnar.org
• ई-मेलः ssccj@yahoo.co.in
प्रभारी प्राचार्य डॉ. सी.आर.मंडलिक
एम.ए., पी.एचडी., डी.लिट (यू.एस.ए.)
मोबाईल नं. ८८५७० ८७५२२

जावक क्र.: एस.एस.सी.सी.जे / 318/2017-18 दिनांक : 9/9/2017

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, प्रा. एकनाथ दत्तात्रय वाजगे यांनी आमच्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष(कला शाखा) वर्गातील विद्यार्थीनींकडून पीएच.डी. संशोधनासाठी प्रश्नावली भरुन घेतली.

स्थळ - जुन्नर
दिनांक- ०९/०९/२०१७

प्रभारी प्राचार्य
प्र.प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

PUNE DISTRICT EDUCATION ASSOCIATION'S
**Annasaheb Waghire Arts, Science & Commerce College**
Otur, Tal. Junnar, Dist. Pune - 412 409.
• Identification No. : PU / PN / ASC / 090 / 025 • J 11-07-001 • HSCVOC-3/90-11/30072 Dt. 23/11/90
☎ : Office : (02132) 264138 • Fax (02132) 265728 • E-mail : awc_otur@pdeapune.org
Affiliated to Pune University • Naac Accredited B+ grade

President
Ajit Pawar

Hon. Secretary
Sandeep Kadam

President's Representative
Rajendra Ghadge

Treasurer
Adv. Mohanrao Deshmukh

Dy. Secretary
P. E. Kulkarni

Principal
Dr. Pandit Shelke

Outward No. : AWCO/ 102/3/2017-18 Date : 09 /09 /2017

# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, प्रा. एकनाथ दत्तात्रय वाजगे राज्यशास्त्र विभाग शिवछत्रपती महाविद्यालय जुन्नर यांनी आमच्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष (कला शाखेतील) वर्गातील विद्यार्थीनींकडून पीएच. डी. संशोधनासाठी आवश्यक असलेली महिला मानवी हक्काविषयी प्रश्नावली भरून घेतली सदर प्रमाणपत्र विनंतीवरून देण्यात येत आहे

8/9/17

प्राचार्य
अण्णासाहेब वाघीरे विज्ञान कला वाणिज्य महाविद्यालय
ओतूर (पुणे)

शिक्षण प्रसारक मंडळ पाबळ संचलित

# श्री पद्ममणि जैन कला व वाणिज्य महाविद्यालय, पाबळ,

ता. शिरुर, जि. पुणे पिन नं. ४१२ ४०३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीकरण क्र. आय.डी. क्र. पी.यु./पी.एन/ए.सी.१४८/२०००

SHRI PADMAMANI JAIN ARTS AND COMMERCE COLLEGE PABAL

डॉ. संजय दगडू घोडेकर
एम.ए.एम.फिल.पीएच.डी.
प्र. प्राचार्य
मो. नं. ९९७०२०४१६०

● दुरध्वनी ०२१३८२९२५४८ ● फॅक्स नं.०२१३८२९२५४८

E Mail i.d. www.spjcpabal.in
dr.sanjayghodeker@gmail.com

संदर्भ क्र. समक्ष

दिनांक २8/ 09 /2017

## प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, प्रा. एकनाथ दत्तात्रय वाजगे यांनी पीएच. डी. संशोधनासाठी आमच्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष ( कला शाखा ) वर्गातील विद्यार्थिनींकडून महिला मानवी हक्क या विषयावरील प्रश्नावली भरून घेतली.

प्राचार्य
श्री पद्ममणि जैन महाविद्यालय,
पाबळ, ता. शिरुर, जि. पुणे.

दि. २२/०९/१८

**प्रमाणपत्र**

प्रमाणपत्र देण्यात येते की , प्रा. एकनाथ दत्तात्रय वाजगे यांनी पीएच. डी. संशोधनासाठी आमच्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष (कला शाखा ) वर्गातील विद्यार्थिनींकडून महिला मानवी हक्क या विषयावरील प्रश्नावली भरुन घेतली.

प्राचार्य

प्राचार्य
इंद्रायणी महाविद्यालय
तळेगाव (दाभाडे) ४१०५०७

MAVAL SHIKSHAN PRATISHTHAN'S

(Public Trust Regd No. F/6865 Poona)

# SAVITRIBAI PHULE MAHILA MAHAVIDYALAYA

**Arts & Commerce**

Code No. : PU/PN/AC/447/2012

विद्या सर्वार्थ साधनम् ।

Laxmibaug Colony, Behind Nagar Parishad, Talegaon Dabhade, Tal. Maval, Dist. Pune 410 506

☎ : (02114) 229826 Mob.: 7249597073 E-mail:mavalspm@gmail.com



| Dr. Krushnakant Wadhokar | Shri. Yadavendra Khalde | Dr. Dattatray Balsaraf | Shri. Sanjay Bhalerao |
|---|---|---|---|
| President | Vice President | Secretary | Treasurer |


Outward No. : SPM/2017-18/51 Date : 14.10.17

## प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, प्रा. एकनाथ दत्तात्रय वाजगे यांनी पीएच.डी. संशोधनासाठी आमच्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष (कला शाखा) वर्गातील विद्यार्थिनींकडून महिला मानवी हक्क या विषयावरील प्रश्नावली भरून घेतली.

प्राचार्य

PRINCIPAL

Savitribai Phule Mahila Mahavidyalaya

Talegaon Dabhade, Tal. Maval Dist Pune

।। विष्णुविण जप व्यर्थ त्याचे ज्ञान ।।

श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित

# दिलीप वळसे पाटील

## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मु.पो. निमगाव सावा, ता.जुन्नर, जि.पुणे. ४१० ५०४ ७५१७२३७३३३/८३१७२३७३३३

संस्थापक -अध्यक्ष : मा.श्री. पांडुरंगजी पवार (M.Com) मा. उपाध्यक्ष, जि.प.पुणे.

Website : www.dvpcollege.com Email : dvp_nimgaonsawa@rediffmail.com

* महाराष्ट्र शासन नोंदणी क्र. एन.जी.सी. २००९/(१५२/०९) मशि-०४ दि.११/०७/२००९ * पुणे विद्यापीठ आय.डी.क्र.पी.यु./पी.एन./ए.सी.एस./३३८/२००९


जावक क्रमांक : DVPC/1412/2017. दिनांक : ६/०३/२०१८

D. V. Patil College Junnar (Pune) Nimgaonsawa

प्रमाणपत्र देण्यात येते की, प्रा. वाजगे एकनाथ दत्तात्रय यांनी आमच्या महाविद्यालयात दि.६.३.२०१८ येऊन तृतीय वर्ष कला या वर्गातील विद्यार्थीनींकडून पीएच.डी. संशोधनातील पथदर्शी अभ्यासासाठी प्रश्नावली भरून घेतली.

सदर प्रमाणपत्र मागितल्यावरून देण्यात येत आहे.

स्थळ . निमगाव सावा.

दि. ६/३/२०१८

प्रभारी प्राचार्य

दिलीप वळसे पाटील

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

निमगाव सावा, ता.जुन्नर, जि.पुणे. ४१० ५०४

जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक, मंडळ, जुन्नर
श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)
एस./आर.नं. महा./ ६६७/ पुणे, दिनांक २/१/१९७० कला - वाणिज्य - विज्ञान पी.टी.आर. एफ.: ४३९/ पुणे, दिनांक ३१/१२/१९६९
• डी.एस.टी.- फिस्ट स्पॉन्सर्ड
• कॉलेज विथ पोटेंशियल फॉर एक्सलन्स - यु.जी.सी.
'नॅक' - मुल्यांकित 'अ'
'उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार प्राप्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
• बोडकेनगर, जुन्नर, जि. पुणे, पीनः ४१० ५०२.
• दूरध्वनी क्र. : ०२१३२-२२२०९४ • फॅक्सः ०२१३२-२२२१५०
• वेब साईटः www.ssccollegejunnar.org
• ई-मेलः ssccj@yahoo.co.in
प्रभारी प्राचार्य डॉ. सी.आर.मंडलिक
एम.ए., पी.एचडी., डी.लिट (यू.एस.ए.)
मोबाईल नं. ८८५७० ८७५२२

जावक क्र.: एस.एस.सी.सी.जे / 586/17-18 दिनांक : 30/12/2017

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, प्रा. वाजगे एकनाथ दत्तात्रय यांनी वरिष्ठ महाविद्यालयातील विदयार्थिनींसाठी महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रमाचे विकसन व परिणामकारकतेचा अभ्यास या विषयावरील पीएच.डी. संशोधनानिमित्त आमच्या महाविद्यालयात महिला मानवी हक्क शिक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबविला. मागितलेवरुन प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

प्राचार्य
प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

# परिशिष्ट ठ

# विद्यार्थिंनी प्रतिक्रिया

## विद्यार्थिनी प्रतिसाद शोधिका

विद्यार्थिनीचे नाव :- भालेराव निलम लक्ष्मण
वर्ग :- T.Y.B.A
महाविद्यालयाचे नाव :- श्री शिवछत्रपती कॉलेज,

---

१. कार्यक्रमामधुन महिला मानवी हक्काविषयी अधिक माहिती तुम्हाला मिळाली आहे का ?

होय ☑ नाही ☐

२. कार्यक्रमातील कोणत्या उपक्रमातून प्रभावी माहिती मिळाली ?

या कार्यक्रमातील वादविवाद स्पर्धा, बुद्धिमंथन आणि गटचर्चेतून उपयोगी माहिती मिळाली, व्याख्यानातूनही खूप चांगली माहिती मिळाली

३. कार्यक्रमातून मिळालेल्या माहितीचा दैनंदिन जीवनात उपयोग होईल असे तुम्हास वाटते का ?

होय ☑ नाही ☐

४. असल्यास , कार्यक्रमातून मिळालेल्या माहितीचा उपयोग कसा होईल असे तुम्हास वाटते. ?

कारण, भविष्यामध्ये वैवाहिक आयुष्यामध्ये कुटुंबात हिंसाचार झाला तर सदर माहिती उपयुक्त ठरेल.

५. कार्यक्रमातून मिळालेल्या महिला मानवी हक्काव्यतिरिक्त कोणत्या घटकाची माहिती मिळावी असे तुम्हास वाटते ?

महिलांच्या हक्काविषयी आवश्यक माहिती या कार्यक्रमातून आम्हाला मिळाली आहे.

६. कार्यक्रमाविषयी तुमचा अनुभव / अभिप्राय लिहा .

या कार्यक्रमातून उपयुक्त माहिती मिळाली त्यामुळे त्यातून आत्मविश्वास निर्माण झाला. छेडछाडी संदर्भात करावयाच्या उपायांची माहिती यामधून आम्हाला मिळाली.

विद्यार्थिनीची सही.

Nilam

## विद्यार्थिनी प्रतिसाद शोधिका

विद्यार्थिनीचे नाव :- कु. बगाड रुपाली त्रिंबक
वर्ग :- T.Y.B.A
महाविद्यालयाचे नाव :- श्री शिव छत्रपती महाविद्यालय

---

१. कार्यक्रमामधुन महिला मानवी हक्काविषयी अधिक माहिती तुम्हाला मिळाली आहे का ?

होय ☑ नाही ☐

२. कार्यक्रमातील कोणत्या उपक्रमातून प्रभावी माहिती मिळाली ?

गटचर्चा, निबंध स्पर्धा, आणि अध्ययनाची पुस्तिका, यातून आम्हाला खूप चांगली माहिती मिळाली. बुध्दिमंथन आणि व्याख्यानातूनही उपयुक्त माहिती मिळाली.

३. कार्यक्रमातून मिळालेल्या माहितीचा दैनंदिन जीवनात उपयोग होईल असे तुम्हास वाटते का ?

होय ☑ नाही ☐

४. असल्यास , कार्यक्रमातून मिळालेल्या माहितीचा उपयोग कसा होईल असे तुम्हास वाटते. ?

यापुढील आयुष्यामध्ये समाजात वावरताना तसेच नोकरी करताना कार्यक्रमातून मिळालेली कायदेविषयीची माहिती उपयुक्त ठरेल असे वाटते.

५. कार्यक्रमातून मिळालेल्या महिला मानवी हक्काव्यतिरिक्त कोणत्या घटकाची माहिती मिळावी असे तुम्हास वाटते ?

कार्यक्रमातून सर्वच घटकांबाबत उपयुक्त माहिती मिळाली

६. कार्यक्रमाविषयी तुमचा अनुभव / अभिप्राय लिहा .

या कार्यक्रमाच्या माध्यमातून सरांनी आम्हाला कायदे-विषयांची आणि महिलांसाठीच्या उपाययोजनांची माहिती दिली यातून आम्हाला नवीन ज्ञान मिळाले.

B.Bagad
विद्यार्थिनीची सही.
(कु. रुपाली बगाड)

## विद्यार्थिनी प्रतिसाद शोधिका

**विद्यार्थिनीचे नाव** :- देवाडे नुतन राजेंद्र
**वर्ग** :- टी. वाय. बी. ए.
**महाविद्यालयाचे नाव** :- श्री शिवछत्रपती महाविद्यालय जुन्नर

---

१. कार्यक्रमामधुन महिला मानवी हक्काविषयी अधिक माहिती तुम्हाला मिळाली आहे का?

होय ☑ नाही ☐

२. कार्यक्रमातील कोणत्या उपक्रमातून प्रभावी माहिती मिळाली?

घटनापर्यंतुन, वादविवाद स्पर्धेमधुन प्रसंगाच्या प्रात्यक्षिकरणातुन.

३. कार्यक्रमातून मिळालेल्या माहितीचा दैनंदिन जीवनात उपयोग होईल असे तुम्हास वाटते का ?

होय ☑ नाही ☐

४. असल्यास , कार्यक्रमातून मिळालेल्या माहितीचा उपयोग कसा होईल असे तुम्हास वाटते. ?

यापुढे नोकरी करताना, विवाहानंतर कुटुंबामध्ये वावरताना समाजामध्ये जाताना माहितीचा उपयोग होईल.

५. कार्यक्रमातून मिळालेल्या महिला मानवी हक्काव्यतिरिक्त कोणत्या घटकाची माहिती मिळावी असे तुम्हास वाटते ?

महीलांच्या आरोग्याविषयी.

६. कार्यक्रमाविषयी तुमचा अनुभव / अभिप्राय लिहा .

कार्यक्रमातून उपयुक्त अशी माहिती मिळाली त्याचा उपयोग आम्हाला आयुष्यामध्ये होईल.

Nutan.
विद्यार्थिनीची सही.

परिशिष्ट ड

# **छायाचित्रे**









Lecture Hall






Lecture Hall















